
# द्विसाहस्त्री - सटीक



# द्विसाहस्त्री - सटीक




सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रकाशन दिवस
**गुरुपोर्णिमा**
२९ जुलै २००७

मुद्रक
**ग्राफिक प्रिंटर्स**
वझिरा नाका, बोरिवली (पश्चिम),
मुंबई - ४०० ०९१.
दूरध्वनी क्र. २८९९ ९३३०, २८९९ ९२३९, ९३२२८४०८४६

प्रकाशक
**श्री भगवती प्रकाशन**
६/१, साईविहार, कर्वेनगर,
पुणे - ४११ ०५२



प.पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर

# द्विसाहस्त्री

## प.पू.श्रीनी आश्रमात द्विसाहस्त्रीवर

## केलेले निरुपण मे १९८७

सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामी म. नी प्राकृत गुरु चरित्रावरुन संस्कृत गुरुचरित्र केले. त्याचे नावही श्रीगुरुचरित्र असे त्यांनी ठेवले आहे. 'द्विसाहस्त्री गुरुचरित्र' म्हणून ते प्रसिद्ध आहे. भगवान् दत्तात्रेयांच्या प्रेरणेने गुरुचरित्रामध्ये काय काय अर्थ आले आहेत, सिद्धांत आलेले आहेत. ते सर्व लोकांना समजावून देण्याकरता म्हणून महाराजांनी त्याच्यावर टीका केली आहे.

महाराज आरंभालाच म्हणतात, पूर्वीचे जे आचार्यादि प्रभृती, सिद्धांत सांगणारे मोठे मोठे आचार्य, त्यांच्या मताप्रमाणे ही टीका केलेली आहे. पारमार्थिक जे ग्रंथ आहेत या ग्रंथार्थाचे **उत्तम ज्ञान व्हावे अशी ज्यांना इच्छा आहे त्यांचा अधिकार म्हणजे निर्मत्सर ते असले पाहिजेत.** दुसऱ्याच्या कल्याणाबद्दल द्वेष बुद्धी मनामध्ये असणे त्याला **मत्सर** म्हणतात. कोशामध्ये असा अर्थ केलेला आहे. **तो मत्सर ज्यांच्या मनामध्ये नाही ते ह्या ग्रंथाचे अध्ययन करण्यास पात्र आहेत.** आरंभाला महाराजांनी या श्लोकाच्या उपक्रमात विषय मांडलेला आहे. वंदन केलेले आहे. मंगलाचरणाचा हा श्लोक आहे. ग्रंथाची निर्विघ्न समाप्ती व्हावी याकरता आरंभी मंगलाचरण करण्याची शास्त्राची पध्दती आहे. इथे सद्गुरुंनाच वंदन केलेले आहे. गुरुस्वरुप हे साक्षात ब्रह्मस्वरुप आहे, असे याच्यात दाखवले आहे. हा एक महत्त्वाचा विषय आहे. चित्, आनंद आणि सत्गुरुम् ही तीन  विशेषणे गुरुंना दिलेली आहेत. चित् म्हणजे चेतन. चैतन्य म्हणजे स्वयं प्रकाश. आणि आनंदरुप. निरुपाधिक आनंद कोणाच्या निमित्ताने मिळणारा नाही. आणि सत् म्हणजे त्रिकालाबधित. असं गुरु स्वरुप आहे. गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णो..... यात जे गुरुंचे वर्णन केलेले आहे तेच या ठिकाणी दाखवलेले आहे. अशा ब्रह्मरुप गुरुंना मी वंदन करतो. ही प्रार्थना केली. त्यांचे वर्णन केलेले आहे.

आरंभाला उपक्रमात जगाची स्थिती कशी झाली आहे याचे वर्णन करताहेत महाराज. ते म्हणतात, ईश्वराची माया इतकी विलक्षण आहे की सर्वही जीव, अगदी ब्रह्मदेवापर्यंत वस्तुत: परमात्मरुप आहेत. संसारी नाहीत, दु:खी नाहीत सर्व श्रेष्ठ पुरुषांनी त्यांना बोध केला, 'तूं काही जीव नाही, संसारी नाहीस परमात्मरुप तूं आहेस.' पण त्याला ते पटत

नाही. मी परमात्मस्वरुप आहेस, असे त्याला कधीही ज्ञान होत नाही. शास्त्राने, शास्त्रज्ञ पुरुषांनी असें सांगून सुध्दा असा त्याला बोध होत नाही आणि उलट देह, इंद्रिय वगैरे जे पदार्थ आहेत यानांच तो 'मी' समजतो आहे. हे कांही त्याला सांगायला लागत नाही. मी ब्राह्मण आहे. मी अमक्याचा मुलगा आहे. हे सगळे देहासंबंधीच विचार आहेत ना ! ब्राह्मणत्व म्हणजे, देहाचा, शरीर धर्म आहे. अमक्याचा मुलगा आहे. काही न सांगतासुध्दा त्याला हे ज्ञान होते. आणि हे पक्के ज्ञान आहे. भ्रांती आहे. या वरुन त्याचे खरे स्वरुप त्याला समजावून सांगून सुध्दा ते सोडून देऊन नसलेले अनात्म स्वरुप आपल्या ठिकाणी तो धारण करतो. म्हणजे कोणाच्या तरी मायेने तो मोहित झालेला आहे, असे म्हणावे लागते. भ्रांती मध्ये पडलेला आहे.

त्याची ती भ्रांती दूर करण्याकरता श्रुतींनी प्रयत्न केलेला आहे. शेकडो माता पितापेक्षांही अत्यंत श्रेष्ठ असणाऱ्या श्रुतींनी हे सांगितले आहे. श्रुती अत्यंत दयाळू आहेत. आचार्यासारख्या अत्यंत दयाळू भाष्यकारांनी त्याला बोध केलेला आहे. जीव हा संसारी नाही. दु:खी नाही.

लहान मुलाला रोग झालेला आहे. त्याला गोड खाण्याची इच्छा आहे, आवड आहे. त्याला एखादे कडू औषध द्यायला गेले तर तो घेत नाही. मग ते औषध गोड पदार्थात घालून त्याला देतात. त्याप्रमाणे **सर्व संसारी लोकांचे विषयांकडे चित्त लागलेले असते. त्यांना आता बोध करायचा आहे. तो बोध करण्याकरता सगुण ब्रह्माचा प्रसाद प्राप्त करुन घ्यावा हे श्रुतींनी सांगितले आहे**. तूं निर्गुण ब्रह्मरुप आहेस असे एकदम जीवाला सांगितले तर पटत नाही. जगताची उत्पत्ती, पालन आणि संहार करणारा सगुण ब्रह्म परमात्मा जो आहे त्या ईश्वराचा प्रसाद जर तू संपादन केलास तर तुझी सर्व दु:ख जातील हे त्याला सांगितले. तो स्वत:ला दु:खीच समजतो आहे. त्यामुळे त्याला तसाच बोध केला पाहिजे. म्हणून या सगुण ब्रह्मद्वारा त्याला निर्गुण ब्रह्मापर्यंत न्यायचे आहे. त्याकरता महाराजांनी गुरुचरित्र ग्रंथ केला आहे, त्यांनी उल्लेख केला आहे. दत्तात्रेयांचीच आज्ञा आहे, प्रेरणा आहे. त्यामुळे वासुदेव शर्मा विप्रांना हा ग्रंथ करण्याची इच्छा आहे. आणि **गुरुचरित्र ग्रंथ हा काय आहे तर** 'श्रुतिसारसंग्रहणरुपम्' हे त्यांनी एकाच विशेषणाने हे दाखविलेले आहे. **संपूर्ण वेदांचे सार याच्यामध्ये आलेले आहे. सगळे सिद्धांत आलेले आहेत. ते समजून घ्यायला पाहिजे**. त्या इच्छेने महाराज त्यावर टीका लिहिताहेत. **मोक्ष, मोक्ष ज्याला आपण म्हणतो तो मोक्ष काय आहे? याचा अगोदर विचार केला पाहिजे.**

आणि तो कशाने मिळतो ? तर सिद्धांत अगोदर सांगतात. आपण काम्य कर्म आणि निषिध्द कर्म करीत असतो. वेदांनी, शास्त्राने जे करु नये असें सांगितले आहे ते करण्याकडे आपली प्रवृत्ती आहे. आपल्या अनेक प्रकारच्या बऱ्यावाईट इच्छा पूर्ण करण्याकरताही आपण कर्म करीत असतो. तर त्याकरता काम्य आणि निषिध्द कर्म करायची नाहीत हा एक प्रथम नियम त्यांनी सांगितला. ती दोन्ही सोडून दिली पाहिजे.

**तिसरे प्रारब्ध कर्म** - प्रारब्ध कर्म हे भोगाने संपते. म्हणजे ही तिन्ही संपली. पुढे कदाचित काही प्रत्यवाय उत्पन्न झाला तर ? केवल नाही म्हणून काही दोष उत्पन्न झाला तर ? त्याकरता नित्यकर्म सांगितली आहे. संध्या, पूजा वगैरे या नित्यकर्मांचे अनुष्ठान केले म्हणजे पुढे कोणत्याही प्रकारचा प्रत्यवाय उत्पन्न होत नाही. कोणचेही अपूर्व होत नाही. पापक्षय होऊन जातो. अशी सगळी कर्म संपली म्हणजे तो जीवात्मा केवल आत्मानंदामध्ये निमग्न राहातो. सगळी कर्म संपल्यामुळे दु:ख संपली.

**मीमांसक** वगैरे सर्वोच्च सुखाला **स्वर्ग** म्हणतात. अग्निहोत्र, यज्ञयाग वगैरे कर्म स्वर्गप्राप्ती करता करायची. स्वर्ग म्हणजे अत्यंत उच्च सुख आहे, असे त्यांचे सांगणे आहे आणि ते स्वर्गसुख कर्मांशिवाय मिळणार नाही. वेदांती सांगतात सगळी कर्म संपली पाहिजेत. काम्य, निषिद्ध तर सोडून द्यायची. आपणच त्याच्यापासून दूर व्हायचे. **पुढे आणखी नवीन काही उत्पन्न होऊ नये याकरता नित्यकर्म करीत राहायचे.** प्रारब्धकर्म भोगून संपवायची. म्हणजे **सगळी कर्म संपल्यामुळे तो जीव केवळ आत्मचिंतनामध्ये निमग्न राहातो. तो आनंदात असतो. हा मोक्ष आहे.** नित्यनैमितिक कर्मांचे फल नाही. काही प्रतिबंध निर्माण होऊ नये म्हणून करायची. पण हे कर्मवादी म्हणतात स्वर्ग म्हणजे 'सुख'. स्वर्ग म्हणजे काही 'लोक' नाही. अत्यंत श्रेष्ठ असे सुख ते कर्मांशिवाय मिळणार नाही. म्हणून कर्मांनीच मोक्ष होतो असा त्याचा सिद्धांत आहे. शेवटपर्यंत कर्म करीत राहिले पाहिजे. भाष्यकारांनी त्यांचे खंडन केले आहे. तेही सांगायला पाहिजे. तेव्हा तो जो पूर्वपक्ष आहे, त्याचा अनुवाद करुन त्याचा निरास करायचा आहे आणि शेवटी **अविद्या, काम आणि कर्म ही सगळी दु:खाला कारण आहेत. अविद्या म्हणजे अज्ञान, काम म्हणजे अनंत वासना आणि त्याप्रमाणे घडणारी बरी वाईट कर्म. ही सामुग्री जो पर्यंत आहे तो पर्यंत मोक्ष नाही. दु:ख नाश नाही. जन्म बंद होणार नाही.** तर हे उपादान आहेत. **अविद्या, काम आणि कर्म ह्यांची निवृत्ती म्हणजेच मोक्ष आहे.** ते सगळे कारण संपणे असे भाष्यकारांनी सांगितले आहे. **म्हणून आरंभी या गुरुचरित्रामध्ये ज्ञानकांडाचा**

**विचार केलेला आहे. ज्ञानाने मोक्ष मिळणार आहे. कर्माने मोक्ष नाही.** हा सिद्धांत त्यांनी सांगितलेला आहे.

श्रुतीचे, शास्त्राचे, वेदांचे सिद्धांत सांगण्याकरता हा ग्रंथ करायचा आहे.

या ग्रंथाची निर्विघ्न समाप्ती व्हावी आणि प्रसार व्हावा याकरता शिष्टाचाराप्रमाणे मंगलाचरण आरंभाला एका श्लोकात केले आहे.

**मंगलाचे आशीर्वाद, नमस्कार आणि वस्तु निर्देश असे तीन प्रकार असतात.** इथे नमस्कारात्मक मंगल आहे. सद्‌गुरुंना नमस्कार आहे. कसे आहेत गुरु? **हा परमात्मा सद्‌गुरु सगळ्याला अधिष्ठान म्हणजे कारण आहे. आधार आहे.** याचेच अज्ञान आहे. गुरु स्वरुप काय आहे, गुरु शक्ती काय आहे हेच ज्ञान नाहीये. अज्ञान म्हणजे ज्ञान अभाव असाच अर्थ नाही तर अज्ञान म्हणजे एक पदार्थ आहे. सगळे जग करणारा आहे तो. शक्ती आहे त्याची. त्याच्याच आश्रयाने ती शक्ती राहाती. आणि त्यालाच विषय करती. म्हणजे जे ब्रह्म किंवा आनंदरुप परमात्मा आहे. त्याची शक्ती त्याला मोहामध्ये टाकती म्हणतात. त्याचे अज्ञान. ती अनिर्वाच्च शक्ती आहे. तिचे कोणी कांहीही वर्णन करु शकत नाही. अज्ञान म्हणजे सत् आहे की असत् आहे. त्याच्यापेक्षा भिन्न आहे की अभिन्न आहे. शब्दांनी कांहीही सांगता येत नाही. अशी शक्ती ज्याची आहे, असा जो परमात्मा सत्य, ज्ञान, आनंदरुप तो आहे. दत्तात्रेय स्वरुप आहे. त्याच्या स्वरुपाचे अज्ञान आहे. ईश्वराभिन्न गुरु आहेत हे पुढे दाखवितात आता.

त्या **अज्ञानानें** मोह उत्पन्न झाला म्हणजे स्वत:चे स्वरुपच अगोदर विसरले. मी आनंदरुप नाही. मी ब्रह्म नाही. मी परमात्मा नाही. अभाव. परमात्मा नाही म्हणजे मीच परमात्मा नाही. अगोदर स्वरुप विसरल्यामुळे जग निर्माण झाले. नाम आणि रुप हे जगाचे रुप आहे. शब्द आणखी पदार्थ त्यांची नावे, त्यालाच **जग** असे म्हणतात. त्याच्या अज्ञानामुळे हे जग उत्पन्न झाले. आत्मरुप विसरल्यामुळे जगत् उत्पन्न असे म्हणतात. त्याच्या अज्ञानामुळे हे जग उत्पन्न झाले. आत्मरुप विसरल्यामुळे जगत् उत्पन्न झाले हा दृष्टांत दिलेला आहे. **विवर्तवाद याला** म्हणतात.

जगाच्या उत्पत्तीबद्दल अनेक वाद आहेत. जगाबद्दल चार प्रकारांनी विचार केला जातो. **आरंभवाद** म्हणजे जग पूर्वी नव्हते नवीन झालेले आहे. जगाचा आरंभ झाला. पूर्वी नसलेले जग निर्माण झाले. असे तार्किक, नैय्यायिक वगैरे म्हणतात. वस्त्र पूर्वी

नाही. कार्य पूर्वी नाही. त्याचे कारण म्हणजे पूर्वी सगळे तंतू आहेत ते आडवे, उभे वगैरे कोष्टयाने विणल्यानंतर वस्त्र नावाचा पदार्थ निर्माण झाला. तंतू हे त्याचे अवयव आणि त्या अवयवापासून वस्त्र नावाचा एक अवयवी पदार्थ कार्य हे नवीन निर्माण झाले तसे जग निर्माण झाले आहे. पूर्वी काही तरी **परमाणु** वगैरे ते मानतात. परमाणु एकत्र जोडले गेल्यानंतर ही नवीन भौतिक सृष्टी तयार झाली. याला **आरंभवाद** म्हणतात. आरंभवादाला अवयव वगैरे लागतात ना!

एक अद्वितीय परमात्म्याशिवाय दुसरे काहीही नाही असे वर्णन केलेले आहे. म्हणजे जग नाहीच आहे. बरं ईश्वराला काही अवयव वगैरे नाहीत. तो अगदी निरवयव पदार्थ आहे. **आकाशाला** अवयव नाही म्हणतात. वस्तुत: तो सुद्धां सिद्धांत नाहीये. वेदांतमताने आकाश हे सुद्धा कार्य आहे. परमेश्वराला अवयव नाहीत. **परिणामवाद म्हणजे रुपांतर** दूधामध्ये ताक किंवा दही टाकल्यानंतर त्या दूधाचे दही तयार झाले. हे त्या आरंभवादापेक्षा थोडे जास्ती बुद्धिमान आहेत. ह्याचा विचार थोडा जास्त पुढे गेला आहे. हे सांख्य लोक आहेत. दूधच दही या रुपामध्ये तयार  झाले पण दही हे रुप खरे आहे. तसे जे काही मूल कारण आहे तेच जगत् रुपाने तयार झाले. जगत् रुप दिसायला लागले. पण त्याचे जगत् रुपही खरे आहे. दुध रुपही खरे आहे आणि दही रुपही खरे आहे. सुवर्णरुपही खरे आहे. अलंकाररुपही खरे आहे. पण एकच आहे ते. कारणच कार्यरुप झाले. कार्य आणि कारण अशी दोन तत्त्व त्यांनी नैय्यायिकांच्याप्रमाणे मानली नाहीत. हा एक यांचा विचार. तसे या ठिकाणी नाही, म्हणाले. केवळ अज्ञानापासून प्रपंच उत्पन्न झाला. दुसरे काहीही कारण नाही म्हणतात. परमेश्वराचे स्वरुप आहे तसे आहे. **सद्गुरु किंवा परमेश्वर यांचे स्वरुप आहे तसे आहे. अर्थात् त्या स्वरुपाचे ज्ञान झाल्यावर अज्ञान गेले की संपूर्ण प्रपंच अज्ञानाचे कार्यही नाहीसे होते.**

**जगाचे तात्विक स्वरुप काय आहे पहायला गेल्यानंतर मूल जे परब्रह्म सच्चिदानंदघन रुप आहे. तिथपर्यंत चित्त गेल्याबरोबर जे जगत् स्वरुप नाहीसे होते.** तात्विक ज्ञान करणारे मूल अधिष्ठानापर्यंत ज्यांचे अंत:करण जाऊन पोहोचले. त्यांच्या दृष्टीने जग नाहीसे होते. असा तो सद्गुरु. हे **गुरुंचे** वर्णन  केलेले आहे. म्हणजे **गुरुशक्ती, परमात्मशक्ती, परब्रह्मशक्ती एकच आहे**. हे या ग्रंथामध्ये मुद्दाम सांगितले आहे. गुरुचरित्र वर्णन करायचे आहे ना तेव्हा गुरुंचे स्वरुप म्हणजे चित्त, आनंद आणि सत् स्वरुप परमात्मा आहे. चैतन्यरुप तो आहे. जड नाही. **जड म्हणजे दिसणारे इंद्रियांनी, मनाने जे जे दृष्य होते, समजून येते ते सगळही जड**

आहे. परप्रकाश्य आहे. तसे हे गुरुस्वरुप नाही. चैतन्यस्वरुप म्हणजे त्याला स्वयंप्रकाश आहे.

ते दाखवण्याकरता दुसऱ्या कशाचीही जरुरी नाही. बाकी सगळी प्रमेय आहेत. प्रत्यक्षांनी कांही समजतात. अनुमान प्रमाणाने समजतात. शब्द प्रमाणाने समजतात. म्हणजे कोणत्या तरी प्रमाणाचा उपयोग झाला तरच ते पदार्थ समजून येतात. परंतु हे जे गुरु स्वरुप आहे त्याला प्रमाणाची जरुरी नाही. सगळ्या प्रमाणांनाच हे प्रकाशक आहे ना. याच्याच प्रकाशामध्ये प्रमाणांचे प्रमेयांचे काय असेल ते सगळे कार्य याच्याच प्रकाशाने चाललेले आहे. तेव्हा सद्‌गुरु प्रकाशरुप आहे. हे एक वर्णन केले आणि आनंदरुप गुरु आहेत. चिद्रुप आहे आणि सत्‌रुप आहे. आनंद म्हणजे निरुपाधिक आनंद. ज्या आनंदाला सीमा नाही. अमर्याद आनंद. आणि कोणच्याही उपाधीमुळे मिळालेला नाही. पेढा खाल्यानंतर आनंद होतो. पण पेढ्यामुळे तो आनंद झालेला आहे. मुळात नैसर्गिक एक आनंद आहे की ज्याला कोणचेही कारण लागत नाही. तो सर्वोत्कृष्ट असतो. ते आनंदस्वरुप म्हणजे गुरु आहे आणि सत् आहेत ते. कोणच्याही काळामध्ये गुरुशक्तीचा बाध नाहीये. त्याला कालाची मर्यादा नाही. प्रकाशक ज्याला कोणीही लागत नाही. उलट सर्वांना हेच प्रकाशक आहे आणि आनंदस्वरुप आहे. अशा प्रकारच्या गुरुंना मी वंदन करतो, अशा प्रकारचे मंगलाचरण आरंभाला केलेले आहे. तेव्हा हेच गुरु सगळ्या विश्वाला कारण आहेत. त्यांच्याबद्दल अज्ञान असताना विश्वाभास होतो. ज्ञान झाले की विश्व संबंध नाहीसा होतो. याबद्दलचे अनेक वाद उपनिषदामध्ये आलेले आहेत. आचार्यांच्या ब्रह्मसूत्र भाष्यामध्ये या सगळ्या वादांचे खंडन केलेले आहे. व्यासांनी मूळ सूत्रे केली त्यावर आचार्यांनी भाष्य लिहिले आहे.

ब्रह्मदेवाने जग उत्पन्न केले असा एक वाद आहे. तर ब्रह्मदेव म्हणजे त्या गुरुंचे शिष्य आहेत. ब्रह्मदेवाला अगोदर निर्माण करुन परमात्म्याने त्याला ज्ञानाचा, वेदांचा उपदेश केला आणि नंतर ब्रह्मदेवांनी पुढची सृष्टी निर्माण केली.

त्याचप्रमाणे त्रिगुणात्मक मायाशक्ती प्रकृती जी आहे तीच जगाचे कारण आहे असे सांख्य म्हणतात. चेतनकारणवाद हा पुष्कळ लोकांना पटत नाही. अचेतन कोणी तरी कारण आहे तीच प्रकृती आहे. सत् म्हणजे प्रकृती, मायाशक्ती ही कारण आहे. त्याचे अगदी सविस्तर खंडन ब्रह्मसूत्र भाष्यामध्ये आलेले आहे. कोणचाही अचेतन पदार्थ जगाला कारण होऊ शकत नाही. अतेचनापासून कार्य होत नाही. रथ किंवा मोटार

आपोआप चालते का ? बर, क्षणभर धरुन चालू काही कोणाच्या धक्क्याने म्हणा अन्य काही कारणाने म्हणा आपोआप चालू झाली तर ती तिच्या मार्गात येणाऱ्या कोणाच्याही अंगावर जाणार. कुठे थांबायचे हे कळणार नाही. म्हणजे अतेचन कारणवाद जो आहे, प्रकृती किंवा माया, ही कारण आहे म्हणणारे त्याच्यापासून रचनाच होणे शक्य नाही. कार्यच होणे शक्य नाही. म्हणून अचेतन कारणवाद खंडनीय असल्यामुळे त्याचे आचार्यांनी पुष्कळ खंडन केले आहे.

याप्रमाणे या प्रथम श्लोकामध्ये गुरुस्वरुपाचे गुरुशक्तीचे स्मरण केले, नमन केले म्हणजे त्याच्या चिंतनामध्ये तद्‌भिन्न होऊन गेलेले आहेत. हे झाले निर्गुण ब्रह्माचे वर्णन. निर्गुणब्रह्म जे आहे तेच गुरु स्वरुप आहे. ते आपल्याला समजत नाही त्यामुळे जगाकडे आपले लक्ष जाते. जग मनामध्ये येते. आणि जग निर्माण झाले, त्या मूल स्वरुपाकडे जर चित्त गेले, गुरुशक्तीकडे जर लक्ष गेले आणि तिथेच जर स्थिर झाले तर जगाचा आभास मावळून जातो. हा एक मोठा महत्त्वाचा सिद्धांत सांगितला आणि गुरु म्हणजे साक्षात् परब्रह्म रुप आहेत. तेच सगळ्या जगताला कारण आहे. हे ही त्या ठिकाणी सांगितले. आता या नंतर आणखी एक मंगलाचरण केलेले आहे. मूलरुप जे आहे तिथपर्यंत चित्त नेऊन त्याला नमन केले म्हणजे अत्यंत श्रेष्ठ शक्तीचे चिंतन केले पहिल्या प्रथम. आता त्या नंतर जगाचा विचार सुरु झाला. जगामध्ये जीवही अनेक आहेत आणि ईश्वरही आहे. जगाचा कर्ता कोणीतरी मानला पाहिजे. तर्काने, अनुमान प्रमाणाने जगत् कर्ता सिद्ध होतो. तर ते जे स्वरुप आहे त्याचा विचार प्रथम केलेला आहे. वस्तुत: ईश्वर आणि जीव, ब्रह्म आणि जीव हे एक आहेत.

**एकं एवं अद्वितीयम्**

**उपनिषदांमध्ये हे तीन शब्द आहेत.**

सत् तर एक होते पूर्वी. ते एक आहे. 'एक' शब्द घातलाय. एकच आहे. आणि अद्वितीयम् म्हणजे स्वगत भेद नाही. सजातीय भेद नाही. आणि विजायतीय भेद नाही. म्हणजे जगात द्वैत नाहीच हे तीन प्रकारांनी त्यांनी सिद्ध केले आहे.

वृक्ष हा एकच वाटतो आपल्याला पण पाने निराळी, खोड निराळे, शाखा निराळी हे त्याचेच अवयव आहेत. ते अवयव म्हणजे काही वृक्ष नाही. सगळे मिळून एक वृक्ष नाव आहे, एक कल्पना आहे, एक पदार्थ आहे. तसाही याच्यामध्ये भेद नाही. हा भाग

चांगला तो वाईट असा काही भेद नाही. असे एक शब्दाने त्यांनी सांगितले. पण नुसते एक सांगून नाही. एकच आहे. म्हणजे त्याला सजातीय कोणी नाही. वृक्षामध्येसुद्धा आपण आंब्याचे झाड म्हणतो. आंब्यामध्ये सुध्दा पुष्कळ जाती आहेत. वृक्ष या रुपाने सजातीय अनेक वृक्ष आहेत. तसा सजातीय पदार्थही कोणी नाही. म्हणजे याच्या जातीचा याच्यासारखा कोणी नाही. हे 'एकं एवं' या शब्दाने सांगितले. वृक्षाचे पत्र, पुष्प वगैरे स्वगत भेदही याला नाहीत. सजातीय भेद नाही. सजातीय पुष्कळ वृक्ष असतात. त्यांचा त्यांचाही भेद असतो. हा ही भेद नाही आणि वृक्षाला विजायतीय म्हणजे बाकीचे पदार्थ आहेत. वृक्ष हा एक पदार्थ आणि दूसरे दगड, माती, पाणी वगैरे पदार्थ. अर्थात् ते सगळे विजातीय आहेत. ते निराळे आणि हा निराळा असा जसा भेद असतो तसाही याच्यापेक्षा विजातीयही कोणी नाही. अद्वितीयम् द्वितीय नाहीच कोणी. असे एकं, एवं, अद्वितीयं म्हणजे मनातला सजातीय भेद गेला. विजायतीय कोणी नाही. स्वगत कोणी नाही. इथपर्यंत आमची चित्तवृत्ती गेल्यानंतर जे शिल्लक राहणारे एक तत्त्व आहे. तेच परमात्मा किंवा गुरु अथवा परब्रह्म आहे. त्या रुपाने पहावे, त्या रुपाने चिंतन करावे म्हणतात.

पण झालेले आहे काय, म्हणाले, जीव आणि ईश्वर वेगळे वेगळे वाटतात. आम्ही सगळे नियम्य आहोत. कोणाच्या तरी ताब्यामध्ये आहोत, असे आम्हाला वाटते. आमची एकंदर इंद्रिये, मन, बुध्दितत्त्व आहे. पंचप्राण आहेत पण त्या शक्तीने आमच्या इच्छेप्रमाणे कोणतेही कार्य घडून येत नाही. एखादे वेळेला येते. त्यामुळे वाटते माझ्याच सर्व ताब्यात आहे. मीच सगळे करु शकतो. परंतु अनेक वेळा आपल्या इच्छेच्या विरुद्ध घटना घडत असतात. यावरुन कोणीतरी एक नियामक असला पाहिजे, त्याच्या इच्छेने हे सगळे चाललेले आहे असं मान्य करावे लागते.

मग हा सगळा नियम, नियम्य भाव जगात असताना तत्व कसे आहे ? अद्वितीय कसें म्हणता तुम्ही ? याचे उत्तर देतात.

हे भासते, म्हणाले. एक तत्व असताना अनेक आहे असे दिसते. अनेक जीव आहेत. स्थावर जंगम किती पदार्थ आहेत. ज्यावेळेला एकरुप ज्ञान होत. आम्हाला भेद घेऊन त्या पदार्थाने ज्ञान होते आहे. परमात्मा आहे. अस्ति, भाति आणि प्रियम्. सत्. चित्त आणि आनंद. एवढेच चिंतन करायचे आहे. पण त्याच्यामध्ये नाम आणि रुप मिसळून गेलेले आहे. त्याचा भेद काही करता येत नाही. त्याकरता वारंवार श्रवण करणे, मनन

करणे, निदिध्यासन करणे, समाधीचा अभ्यास करणे, अखंड अभ्यास चिंतन केले असताना, यातले नामरुप बाजूला करण्याचा अभ्यास ज्या वेळेला चालू झाला. विवेक ज्याला म्हणतात हा उत्पन्न झाला. नामरुप वेगळे करायचे म्हणजे अनित्य कोण आहे, हे समजून घ्यायचे. नित्य आनंदरुप जे आहे, ब्रह्मस्वरुप ते नित्य आहे. बाकी सगळे अनित्य आपल्या चित्तातून काढून टाकायचे. किती जन्माचे संस्कार आहेत. हे सगळे आपल्याला खरे वाटतय. तर खरे एका बाजूला ठेवायचे आणि हे खोटे, विनाशी ते मनातून बाजूला करणे याचे नाव विवेक आहे.

एखाद्या पदार्थाचे खडे मिसळलेले असतात ते आपण बाजूला करतो तसे हे नाही. मनामध्ये चैतन्यही आहे, ब्रह्मही आहे पण नावरुपात त्याचा अध्यास झालेला आहे. ते दोन्ही एक होऊन गेलेले आहेत. ते जे एक झालेले आहे त्याला बाजूला करायचे आहे. मनानेच बाजूला करायचे आहे. तो अभ्यास, तो विवेक, उत्पन्न होण्याकरता **ईश्वराची उपासना** सांगितली आहे. आणि अशा बाजूला करण्याचा अभ्यास सुरु झालेला असताना अनित्य सगळे बाजूला व्हायला लागले मनातून. **वैराग्य** ज्याला म्हणतात. अनित्य समजल्यावर नको म्हणाले, नको असे वाटले की ते मनातून बाजूला गेलेले आहे. मग राहिले जे आहे आनंदस्वरुप तिथेच मन स्थिर झाले आणि त्यामुळे संपूर्ण विश्व बाजूला करता करता ते नाहीसे झाले. एकच रुप उरलेले आहे. दत्तात्रेय नावाचे ते परब्रह्मच ईश्वररुप आहे. म्हणजे परब्रह्मच ईश्वर आहे. हाही सिद्धांत समजून घेतला पाहिजे. म्हणजे आपल्या मनाचा किती गोंधळ झालेला असतो. काही तरी आपण ऐकतो, संस्कार करुन घेतो. सद्गुरु निराळे आहेत. ईश्वर निराळा आहे, त्याचप्रमाणे मूळ जे अधिष्ठान ते परब्रह्म निराळे आहे. निर्गुण निराळे, सगुण निराळे. त्याचप्रमाणे या दोघांना बोध करुन देणारे सद्गुरुस्वरुपही निराळे. हा जो निराळेपणा आहे तो आमच्या मनाने केलेला आहे. तो खोटा आहे.

खरा वेगळेपणाचा आता आपल्याला अभ्यास करायचा आहे. खरा विवेक ज्याला म्हणतात. खोटाच विवेक आहे हा. वस्तुत: गुरुस्वरुप, ईश्वरस्वरुप आणि परब्रह्मस्वरुप सगळे एक आहे. तेच सगुण झालेले आहे. तेच गुरुस्वरुप झालेले आहे. दत्तात्रेय. हा गुरुंचा अवतार आहे. गुरुंचे चरित्र म्हणजे साक्षात परमेश्वराचेच हे चरित्र आहे. म्हणजे दत्तात्रेय आणि परब्रह्म एक आहेत. ही पक्की भावना झाली पाहिजे. यातील खोटा भेद जो आहे तो गेला पाहिजे. ईश्वर, गुरु आणि परमात्मा हे तिन्ही एक आहेत.

त्या दक्षिणामूर्ती स्तोत्रामध्ये शेवटी आचार्यांनी लिहिले आहे - ''ईश्वर: गुरु: आत्मा इति मूर्तीभेद विभागिने योगवत् व्याप्त देहाय दक्षिणा मूर्तये नम:'' हा दक्षिणामूर्ती परमात्मा ईश्वररुपाने भासतो. त्याचप्रमाणे गुरुरुपानेही भासतो. आणखी शुध्द आत्मस्वरुप, ब्रह्मस्वरुप असा विभागी दिसतो आहे. वेगळा वेगळा दिसतो आहे. आता त्यातही उपासना आहे. गुरुंची उपासना करताना ईश्वराला वेगळे ठेवतात. आणि गुरु वेगळे असे मानून गुरुनिष्ठा असावी, गुरुंनाच शरण जावे असा एक अभ्यास प्रकार आहे. परंतु गुरु आणि ईश्वर एक मानून जर भक्ती झाली तर ती भक्ती अत्यंत श्रेष्ठ आहे. म्हणजे तो तरी एक भेद गेला. ईश्वराकडे आम्हाला जायचे नाही गुरुंच्याकडे जायचे म्हणजे ईश्वरापेक्षा गुरु निराळे मानले. तिथे श्रेष्ठ कनिष्ठ भाव आला. तो खोटा विवेक मनांतला गेला पाहिजे. केवल एकरुपाने आत्मस्वरुपाची उपासना झाली पाहिजे. हा सिद्धांत महाराजांनी सांगितला आहे.

आतापर्यंत ईश्वरस्वरुपाचे वर्णन महाराजांनी केले आणि आता यातच जीवस्वरुपाचेही वर्णन ते करताहेत. हा जीवात्मा जो आहे अहम् हा सगळ्यात मिसळलेला आहे. त्याच्यामध्ये देह आलेला आहे. अहम् म्हणजे देहाला अहम म्हणतो. मी पाहतो म्हणजे डोळे पहाण्याचे काम करतात. पण आम्ही समजतो मी पाहतो. मी ऐकतो. म्हणजे तोच जीवात्मा आता ऐकणारा झाला. मी श्वासोच्छवास करतो. म्हणजे तो प्राणरुप झालेला आहे. मी रसास्वाद घेतो म्हणजे रसनेंद्रियरुप तो झालेला आहे. हा जो भेद या ठिकाणी दिसतो आहे, वस्तुत: एकच जीवात्मा आहे तो. साक्षीभूत आहे तो. तोच जीवात्मा एखादे वेळेला डोळेरुप धारण करतो, मी ऐकतो म्हणून कानरुप होतो, श्वास घेतो म्हणून प्राणवायुरुप होतो अशी अनेक रुपे धारण करतो. वस्तुत: तत्त्वविचार केला असतो हा जीवात्मा एक आहे. ही सगळी त्याची साधनं आहेत. इंद्रियवर्ग, प्राणवायू, मन, बुद्धी यांच्याद्वाराने जी जी कामे होतात तेवढ्या तेवढ्या पुरताच तो स्वत:ला मी असा समजतो. तो असा अनेकरुप जीवात्मा नाहीये.

तर ही सगळी कार्य चालू असताना एक त्याचे जे स्वरुप आहे, आत्मस्वरुप, साक्षीस्वरुप, प्रकाशरुप जे आहे, निर्विकाररुप जे आहे. ते त्याचे एक रुप आहे. त्या त्या इंद्रियांनी, मनाने, बुद्धीने कार्य चाललेली असताना ते मी करतो म्हणजे तेवढा पुरता तो वेगळा झालेला दिसतो. पण तसा तो नाही. तो एक आहे. हे अहम् चे ध्यान करतानासुद्धा मी एक आहे. पहाणारा निराळा, ऐकणारा निराळा, श्वासोच्छवास करणारा निराळा, मी हाताने घेतो. घेतो म्हणजे मीच घेतो, हे सगळे कर्मेंद्रियाचे व्यवहार, ज्ञानेंद्रियांचे व्यवहार,

मन बुद्धीचे व्यवहार करताना तो त्या त्यामध्ये मिसळून जातो आहे. त्याला वेगळा करायचायं. जीवस्वरुप एक असताना अनेकाप्रमाणे भासते. तशी त्याची उपासना करु नये. ऐकणारा मी आहे. पहाणारा मी आहे असें समजू नये. तर सर्वाधिष्ठान सर्व प्रकाशक, सर्व पहाणारा, साक्षी मी आहे हे जीवाचे स्वरुप एक आहे.

उपनिषदामध्ये सांगतात. खरा आत्मा आहे तो एकेक रुप बनतो तसे नसून तो आत्मा म्हणजे सर्वात्मा, सर्वस्वरुप आहे. निर्विकार तो आहे. प्रकाशक तो आहे. साक्षी तो आहे. त्यामुळे केवळ 'शुद्ध अहम्' चे जे स्वरुप आहे ते याच्या मध्येच आहे. जीवस्वरुप एक असताना अनेकाप्रमाणे भासते.

ईश्वरस्वरुप, परमात्मस्वरुप एक असताना अनेक रुपांनी भासायला लागलेले आहे. त्याचे ज्ञान जर करुन घेतले, तत्वविचार केल्यावर ईश्वरही एकच आहे, जीवस्वरुपही एकच आहे मग तो जीव आणि ईश्वर यांचा अभेद होऊन जातो. अगोदर बाह्य व्यवहारासाठी 'मी कोण आहे' या 'मी' पर्यंत जायचे म्हणजे 'शुद्ध मी' साक्षीरुप आहे. हे जीवाचे खरे ज्ञान मी पहाणारा आहे, मी ऐकणारा आहे हे एकेक भागापुरते ज्ञान झाले . ते खरे ज्ञान नाही. तर हे सगळे भेदज्ञान जाऊन अहम् हा केवल साक्षीस्वरुप आहे, त्या साक्षीस्वरुपाचे चिंतन सुरु झाले पाहिजे. आणि तेच दत्तात्रेय आहेत, तेच परब्रह्म आहे. हे नंतर पुढे आहे.

अशा रीतीने ह्या दोन श्लोकांच्या मंगलामध्ये एक मूल स्वरुप काय आहे, अधिष्ठान कसें आहे, त्याची जी अज्ञानरुपी किंवा मायात्मक शक्ती आहे त्या शक्तीमुळे हा सगळा जगदाभास भासतो आहे. त्याच्या तत्त्वविचाराने चिंतन सुरु झालेले आहे. ज्यांना ह्याचे ज्ञान झालेले आहे त्या ज्ञानी पुरुषांना हे सगळे जग नाहीसे झाले आहे. म्हणजे श्रुतीप्रमाणे आहे आणि ज्ञानी महात्म्यांचा याबद्दलचा अनुभवही प्रमाण आहे. जग आले कसे आणि ते जाते कसे ? हे ते सांगताहेत.

स्वप्नामध्ये आपण अनेक दृष्य पहातोच की, निजलेला जीवात्मा एकच आहे. कोणी दुसरे नाही. त्याचे जे मन आहे ते मात्र कार्य करत असते. मनामध्ये अनंत संस्कार आहेत. इतके मोठे विलक्षण साधन मन हे दिलेले आहे. परमेश्वराने प्रत्येक जीवाला की त्या मनामध्ये किती तरी संस्कार भरलेले आहेत. काही प्रबल आहेत काही अप्रगट असतील. पण आहेत. त्या आणखी मनापासून ज्यांचा ज्यांचा अनुभव जागृती अवस्थेमध्ये आपल्याला आलेला आहे ते सगळे अनुभव, संस्कार सगळे आणखी त्या ठिकाणी

येतात आणि त्यामुळे तेच मन त्यावेळी सर्वरुप बनते. वाघ, हत्ती वगैरे अनेक पदार्थ स्वप्नामध्ये दिसतात, मी दरिद्री झालो, माझे सगळे धन गेले समजतो, तर एखादे वेळेस मी राजा झालो, असेंही समजतो. वाटेल तसे स्वप्नात दिसते. ते सगळे मनामध्ये भरलेले आहे. ते मनच त्यावेळेला अनेक रुपे धारण करुन त्यावेळेला जीवात्मा जो आहे त्याच्या प्रकाशामध्ये ते सर्व दृष्य दिसते. पण जागा होईपर्यंत.

या ठिकाणी जागृती ही तत्त्वज्ञानाच्या ठिकाणी दृष्टांत म्हणून घेऊ. नामरुपात्मक जग, मिथ्यारुप कसे उत्पन्न झाले ते सांगण्याकरता स्वप्नाचा दृष्टांत दिला. म्हणून स्वप्नदृष्टांताचा विचार करा म्हणतात आणि जागृतीसुध्दा स्वप्नच आहे, असे समजून जर आपण वागलो तर तेही स्वप्न जाते. हे रोज पडणारे स्वप्न काही कालापुरते आहे. जागृतीही हे सुध्दा स्वप्नच आहे, म्हणाले. पण ते दीर्घकाल रहाणारे स्वप्न आहे. कारण तेही जाणारच आहे.

असे विचार त्यांनी मांडलेले आहेत. **ते विचार ऐकायचे, त्यांचे चिंतन करायचे मग निदिध्यासन.** एकदा ठरलं, मुख्य काय आहे तो विषय ठरल्यानंतर त्याच मुख्य परमात्म परब्रह्मस्वरुपाचे चिंतन करता करता समाधी अवस्थेपर्यंत ते मन जाऊ शकते. त्याला क्रमाक्रमाने स्थिरता येते आणि अत्यंत स्थिर झालेले मन म्हणजे ध्याता, ध्यान, ध्येय वगैरे ही त्रिपुटीही नाहीशी झाली, तदाकार मन झाल्यानंतर प्रकाश होतो आहे. समाधी अवस्था अत्यंत तदाकार झाल्यानंतर पुढे त्याचा प्रकाश होतो आहे. समाधी अवस्था अत्यंत तदाकार झाल्यानंतर पुढे त्याचा प्रकाश म्हणजे प्रत्यक्ष ज्ञान. समाधी नंतर प्रत्यक्ष साक्षात्कार आहे. याकरता हा सगळा विचार थोडक्यामध्ये या ठिकाणी मांडलेला आहे आणि आता दत्तात्रेय म्हणजे सद्गुरुस्वरुप ईश्वराचे स्वरुप, गुरुंचे स्वरुप, आत्मस्वरुप, ब्रह्मस्वरुप म्हणजे गुरु, चिदानंदरुप ही एक मुख्य भावना आरंभाला सांगितली. चित् आनंद आणि सत् अशी एक गुरुशक्ती आहे. तीच ब्रह्मरुप आहे. स्वयंप्रकाशी आहे. सत् म्हणजे त्रिकालाबाधित आहे म्हणजे त्याला नाश नाही. नित्य आहे. आणि आनंदस्वरुप आहे. नित्य आनंदरुप ते आहे. आनंद मिळवायचा नाही. सुखी मी आहे ही सुध्दा भावना चुकीची आहे.

सुख म्हणजे माझ्याजवळ नव्हते ते मला मिळाले, मी आता सुखात आहे, सुखरुप जो आहे त्याला, मला सुखं मिळालं, असं कसं म्हणायचे ? गेलं होतं कुठं ते ? म्हणून मिळणारे जाणारे अशा प्रकारचे सुख किंवा आनंद आहे. तो खरा आनंद नाही.

औपाधिक आनंद आहे. निमित्ताने मिळणारा आनंद आहे, काही काळ टिकणारा आनंद आहे याच्यापेक्षा निराळे आनंद स्वरुप म्हणजे निरंतर आनंदातच आहे. तो आनंद कशामुळे मिळाला काही सांगता येत नाही. आनंदस्वरुपच आहे ना! तो कशामुळे मिळतो म्हटले म्हणजे त्याला काही निमित्त झाले. निमित्त काही नाही.

इथपर्यंत आता आणलेले आहे. म्हणजे दत्तात्रेय गुरु, परमात्मा, परब्रह्म त्यांनी पुढे अवतार घेतले. हे सांगायला सुरुवात केली.

त्यांचेच प्रतिपादन आता करताहेत. दत्तात्रेय हे ब्रह्म आहेत. मग अत्रिमहर्षींचे पुत्र असे कसे ? हो, अत्रिमहर्षींचे पुत्र झाले. कारण त्यांनी व्यक्त रुप धारण केले. तेच परब्रह्म, तेच ईश्वर, तेच गुरु. ह्यांनी दत्तात्रेयस्वरुप धारण केले. अत्रिपुत्ररुपाने. 'बाल' म्हणजे 'ज्ञानी' असा अर्थ घेतला आहे. रागद्वेषादिक विकार ज्यांच्या मनामध्ये नाहीत. अनेक जन्म अभ्यास करता करता कर्मानुष्ठान आहे, ईश्वराची उपासना आहे, वेदाभ्यास आहे, अशा अनेक साधनांचा अनेक जन्म अभ्यास करुन शेवटी काहीही विकार मनामध्ये राहिलेले नाहीत. इतके मन, बुद्धी तयार केलेले आहे. त्यांचा उद्धार करण्याकरता हे रुप धारण केले. स्वरुप आनंद पाहिजे अशी इच्छा उत्पन्न झाली. तोही अभ्यास लागतो ना !

इथे एक दिवस राजेश्वरशास्त्री आपल्या पाटणकरशास्त्रींना घेऊन आले. त्यांना जेव्हा विचारले, दूधात साखर घालायची का ? तेव्हा ते म्हणाले, तुम्ही जर दूधात साखर घातली तर दूधाचे माधुर्य तुम्हाला समजणार नाही. म्हणजे जे साखर न घालता दूध घेतात त्यांना दूधामध्येसुद्धा माधुर्य असल्याचा अनुभव येतो आहे. काही तरी विषय मिळाल्याशिवाय आनंद नाहीच अशी आमची कल्पना झाली आहे. म्हणून सर्व विषयाचा संग्रह करण्यामागे, त्याच्या अनुषंगाने येणारे, लोभादिक विकार मान्य करुन, आम्ही लागतो. सुखाची साधन संपत्ती पाहिजे. तरीही आम्हाला ते सुख मिळत नाहीये.

असे एक सुख आहे की ज्याला साधनसंपत्तीची जरुरी नाही. नित्य आहे तो. तर स्वस्वरुपाचाच रस घ्यावा अशी ज्यानी इच्छा उत्पन्न झाली तो स्वरुपानंद आम्हाला पाहिजे आहे. बाहेरचा आनंद नकोय. ती साधनं नको. इतके तीव्र वैराग्य ज्याला उत्पन्न झाले आहे, आत्मानंदाकरता उत्सुकता, तीव्र जिज्ञासा उत्पन्न झाली आहे, असे जे निर्विकार चित्त झालेले आहेत, त्यांनाच सांगण्याकरता (दत्तात्रेय) आलेले आहेत. वाटेल त्याला बोध करुन उपयोग काय ? समजायचेही नाही. बाह्य साधनांशिवाय

सुख मिळणार नाही. अशीच आमची कल्पना त्यामुळे सारखे आम्ही तिकडे धावतो आहोत. ही कल्पनाच चुकीची आहे.

स्वस्वरुप एक आनंद आहे. तो आनंद मिळवण्याची ज्यांना उत्कट इच्छा झाली म्हणून बाह्य विषयांपासून ते बाजूला झाले. काही इच्छा नाही. जे काही मिळेल त्याच्यामध्ये संतोषाने राहणारे. आत्मानंद मिळाला पाहिजे. कार्तवीर्यार्जुनचे एक उदाहरण दिलेले आहे आणि यदुराजा. अलर्कराजा वगैरे. दिव्ययोग याचा अर्थ ज्ञानयोग असाही अर्थ केला महाराजांनी. ध्यानयोग असाही अर्थ योगाभ्यासाच्या दृष्टीने. आणखी ज्ञानयोग आहे. संपूर्ण जग म्हणजे एक पाद आहे असे श्रुतीमध्ये वर्णन आलेले आहे. त्या परब्रह्माचा एक अंश आहे. संपूर्ण जगत् माझ्या एका अंशावर राहिलेले आहे. आणि मी असा त्रिपाद अजून शिल्लक आहे. तीन पाद ब्रह्म शिल्लक आहे म्हणतात. म्हणजे काय ? तर हे जे उत्कृष्ट ब्रह्म जे आहे नामरुपामध्ये सापडलेले, नामरुपात्मक आभास ज्याच्यावरती झालेला आहे ते स्वरुप सोडून देऊन जे अगदी शुद्ध स्वरुप आहे त्या शुद्ध स्वरुपाच्या ठिकाणी आपल्या आश्रित भक्तांना त्यांनी नेऊन ठेवले. म्हणजे ते स्वस्वरुप त्यांना दाखवले. ते ब्रह्मच मी आहे असे ज्ञान त्यांना दिले. म्हणतात ना, 'आपणासारखे करीती तात्काळ'. आपले जे मूळ स्वरुप आहे ते त्यांना दाखवून दिलेले आहे. हे दत्तात्रेयांचे कार्य (अवतारकार्य) थोडक्यात सांगितले.

कलियुगामध्ये पुष्कळ भक्त आहेत. अनेक जन्म गेले तरीसुद्धा अनेक जन्म त्यांच्या अभ्यास चालू आहे. उपासना चालू आहे. योगाभ्यास चालू आहे. कर्मानुष्ठान चालू आहे. असे कर्मामध्येही अनेक प्रकार आहेत. यज्ञ करण्याकडे कोणाची प्रवृत्ती आहे. दान करण्याकडे कोणाची प्रवृत्ती आहे. तर कोणाची तपश्चर्या करण्याकडे. म्हणजे अशी सर्व साधन हे आपले आत्मस्वरुप काय आहे, आपला जो स्वरुप आनंद काय आहे, नित्य जो आनंद आहे तो आपल्याला मिळावा, मिळावा म्हणजे प्रकाशित व्हावा. स्वरुपानंद मिळायचा म्हणजे तो कुठे दुसरीकडे आहे तिथून घ्यायचा असा अर्थ नाही. ते जे विसरुन गेलेले आहे, इतके विस्मरण झालेले आहे, त्याचे स्मरण करुन द्यायचे म्हणजे प्रत्यक्ष ज्ञानच करुन द्यायचे. प्रत्यक्ष ज्ञान झाल्यावर विस्मरण म्हणजे अज्ञान दूर होते. असे अनेक भक्त आहे. कार्तवीर्यार्जून वगैरेच आहेत असे नाही. त्या काळात आयुष्यही पुष्कळ होते, अभ्यासही चालू होता. पण बाकीच्या भक्तांचा उध्दार करण्याकरता श्रीपादवल्लभ रुपाने अवतार धारण केला. नृसिंहसरस्वती म्हणूनही अवतार घेतलेला आहे असे भगवान दत्तात्रेय ईश्वरस्वरुप, परब्रह्मस्वरुप, गुरुस्वरुप,

कृष्णातीरावर वाडी, औंदुबर, भीमातीरावर गाणागापुरात राहणारे ते सर्वोत्कृष्ट आहेत. त्यांचे चिंतन करा.

म्हणून प्रथम आपली शुद्धी करुन घ्यावी. अहम् कोण आहे हे समजावून घेतले म्हणजे मग तो परमात्मा कोण आहे हेही लक्षामध्ये येते आणि मग त्याचे आणि आपले ऐक्य आहे हाही बोध होतो. हा शेवटचा भेद जायचाय. बाह्य जगाचा भेद जाण्याकरता वैराग्यादि उपाय आहेत. त्याला नकोच म्हटले म्हणजे ते कांही संस्कार मनामध्ये राहत नाहीत. सारखा त्याचा ध्यास असला म्हणजे स्मरण होते. तो ध्यास सुटण्याकरता वैराग्याची आवश्यकता आहे. हे नको आता, याची मला काही जरुरी नाही. वैराग्याची परमसीमा म्हणजे अगदी ब्रह्मलोकसुध्दा मला नको.

धर्मराजाला ब्रह्मलोकात जाऊन राहण्याची इच्छा झाली म्हणे. म्हणून त्याने साम्राज्य मिळवून राजसूय यज्ञ केला. ब्रह्मलोकामध्ये इथल्यासारखी सुखदु:ख काही नाहीत. ब्रह्मदेवांच्या सान्निध्यात जीवात्मा राहतो. पण ती तरी इच्छा कशाला हवी ? काही नको. मानवलोकामध्ये असतानाच हा अभ्यास करुन ब्रह्मलोकापर्यंत वैराग्य उत्पन्न झाले तर हा बाहेरचा सगळा भेद गेला. आता चिंतन करता करता हा शुद्ध अहम् कोण आहे ? मी एक साक्षी आहे. ही इंद्रिय माझे रुप नाही, मन माझे रुप, देह माझे स्वरुप नाही. या सर्वांपेक्षा निराळा, या सर्वांना पहाणारा मी आहे. असा अहम् पदार्थ एक आहे. बाह्य जगाचा विचार करता करता वैराग्य निर्माण झाल्यामुळे जीवात्मा तर त्याच्यापासून सुटलेलाच आहे शिवाय ईश्वराच्या अज्ञानामुळे उत्पन्न झालेले हे नामरुपात्मक जग, मूळ जे कारण ईश्वरतत्त्व आहे तेच खरं आहे. बाकी सगळे खोटं आहे. अनित्य आहे. हे अनित्य सगळे मनातून गेल्यानंतर एक जे अधिष्ठान कारण जे मूळ ईश्वरस्वरुप आहे तिथपर्यंत बुद्धी जायला पाहिजे.

'अहम्' चा विचार करता करता सगळे देहेंद्रिय, ज्यांच्यापासून हा अलिप्त झालेला आहे, साक्षीस्वरुप मी आहे इथपर्यंत. आता मी आणि तो जगत् निर्माण कर्ता तो नियामक आहे मी नियम्य आहे, हा एवढा भेद शिल्लक राहिलेला आहे. पुढे परमात्म्याच्या सुद्‌गुरुंच्या कृपेने अभेद स्वरुपाचे ज्ञान त्याला होते. ते शेवटचा भेद जाणं आहे. 'अहम्' निराळा आणि तो 'परमात्मा' निराळा असा भेद नसून सगळंही एक आहे. अहम्ही गेला. त्यावेळेला साक्षीरुपाने तरी कशाला रहायचे. कारण हे साक्ष म्हणून तरी हे जग राहते की नाही. त्यावेळेला! पहातो आहे तो त्या पदार्थाच्या राहाण्याने

जाण्याने ह्यांच्या मनावर काहीही परिणाम होत नाही. इतकी तयारी झालेली असते. पण ते पहावे लागते ना! एखादे वेळेला परिणाम होणार नाही कशावरुन ? म्हणून ते साक्ष आणि साक्षी हाही भाव जायला पाहिजे शेवटी. तो भाव जायचा म्हणजे जगत् निर्माण कर्ता, जग अजिबात विसरले पाहिजे, अहम् साक्षी म्हणजे साक्ष संपूर्ण विसरले पाहिजे. राहिलेले जे एक केवल चैतन्य आहे, चित् आनंदरुप हे आणि ते एक आहे. मग आता द्वैत शिल्लक राहिले नाही. ही संपूर्ण अभेद दृष्टी म्हणजेच मोक्ष आहे.

पूर्ण आनंदाची प्राप्ती म्हणजे नवीन आनंद मिळवायचा नाही. विसरल्यामुळे गेलेला आनंद, स्मरण झाले, ज्ञान झाल्यामुळे मिळालेला आहे असे वाटते. मिळाला नाही तो आहेच. होताच तो. म्हणजे जग पूर्वी नव्हते आता आहे हेसुध्दा खोटं आहे. पूर्वी नाही. आताही नाही. जग नाहीच. अजातवाद आहे. काही नाही. ही संपूर्ण भेदन वृत्ती म्हणजे खरा मोक्ष आहे. त्याच्या स्वरुपाचे वर्णन महाराजांनी या ठिकाणी केले आहे.

विश्वाची उत्पत्ती कशी झाली याबद्दल विचार आरंभाला दिलेला आहे. गुरुस्वरुप काय आहे हे ही सुचिवले महाराजांनी. 'गुरुः साक्षात परब्रह्म' हा श्लोक प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणेच गुरुस्वरुप आहे. चिदानंद सद्‌गुरुम् चित्.आनंद, आणि सत्. म्हणजे स्वयंप्रकाश आहे. स्वतंत्र आहे. पूर्ण आनंदस्वरुप आहे. आणि सत् म्हणजे त्रिकालबाधित आहे. बाह्यरुप पाहून आपल्या मनात विकल्प उत्पन्न होतात. गुरुसुध्दा आपल्याप्रमाणेच आहेत. मनुष्यरुप जे आहे बाहेरचे. ते रुप चर्मचक्षूंना दिसणारे आहे. पण बुद्धीने समजून घेण्याचे जे गुरुस्वरुप आहे ते साक्षात् परब्रह्मरुप आहे हे आरंभाला सांगितले.

आणखी त्यांनीच सर्व विश्व निर्माण केले, ते कसे केले ते आता इथे सांगताहेत. परमात्मस्वरुप हे अजः म्हणतात. जन्म नाही. अक्रियः म्हणजे कोणचीही क्रिया नाही. क्रिया म्हणजे कर्म नाही. त्याचाच अर्थ पतंजलीच्या सूत्रात सांगितल्याप्रमाणे ज्याला क्लेश नाहीत, अविद्या, अस्मिता, अज्ञात वगैरे नाहीत. कर्म नाही म्हणजे कोणचीही क्रिया नाही. विपाक म्हणजे कर्माचे सूक्ष्म संस्कार ज्याला वासना म्हणतात. किंवा विपाक म्हणजे फल. सुख दुःख हे फल नाही. कर्म नाही अर्थात त्याचे फल नाही. आणि आशय म्हणजे वासना नाही. ह्या वासना, हे संस्कारच पुन्हा कर्म करायला प्रवृत्त करतात. त्यामुळे कर्म होतात. ह्या कशाचाही ज्याला संबंध नाही असा परमात्मा आहे. त्याचप्रमाणे 'अस्पृहः' म्हणजे कोणचीही इच्छा नाही. आप्तकाम म्हणतात त्याला. सगळ्या इच्छा ज्याच्या पूर्ण झालेल्या आहेत. कोणतीही इच्छा ज्याला राहिलेली नाही.

परिपूर्ण शक्ती असल्यामुळे कोणचीच इच्छा त्याला नाहीये. क्रिया नाही, इच्छा नाही, जन्म नाही, नाश नाही.

मग हे जग कसें निर्माण झाले ? कोणतीही इच्छा नाही मग जग कशाला निर्माण केले ? कसे केले ? त्याकरता प्रकृती म्हणजे एक परमेश्वराची मायाशक्ती मानावी लागते. कारण ईश्वर तर अक्रिय आहे. अजन्मा आहे, निरिच्छ आहे, तृप्त आहे, मग जग कसे उत्पन्न होईल ? त्याकरता 'बहुस्याम' ही एक वृत्ती उत्पन्न झाली आपण बहुरुप व्हावं. एक मी आहे आता बहुरुप व्हावं. ही अविद्यावृत्ती निर्माण झाल्याबरोबर हे संपूर्ण जगत् उत्पन्न झाले. ही गुणमयी प्रकृती म्हणजे त्याची त्रिगुणात्मक मायाशक्ती आहे. म्हणजे द्वैत आले की काय ? ईश्वर आणि त्याची शक्ती. 'एकं एव अद्वितीय' हा जो सिद्धांत सांगितला. ईश्वराशिवाय कोणीही नाही. मग त्याची मायाशक्ती कशी मानली ? तर त्याच्याबद्दल महाराजांनी दोन समाधानं सांगितली आहेत.

शक्ती ही शक्तीमानापेक्षा निराळी मानण्याची पद्धत नाहीये. आपल्या शक्तीने कोणी काही काम केले तर त्या कामाबद्दल तुला हा मोबदला. तुझ्या शक्तीला हा मोबदला असे कोणी म्हणत नाही. शक्ती आणि शक्त एकच मानले जाते आणि ती मायाशक्ती जी आहे ती मिथ्या आहे. अवस्तुरुप आहे. खरं नाही. सत्य एक परमात्मा आहे त्याची एक शक्ती मानावी लागली. त्याशिवाय जग कसं निर्माण झाले हे सांगता येत नाही. परंतु ती जगाप्रमाणेच मिथ्या म्हणजे अवस्तु आहे. त्रिकालाबाधित नाही. म्हणून द्वैत नाही.

असे जे जग उत्पन्न केले बहुस्याम अशी वृत्ती झाल्यामुळे तर जग हे कोणचे ? ते सांगतात ब्रह्मदेवापासून लहानशा गवताच्या काडीपर्यंत. तिच्यातही जीवात्मा आहेच की ! लहान लहान गवताच्या काड्या ह्यासुध्दा जीवात्मे आहेत. वृक्षही जीव आहे. पशुपक्षी वगैरे अनेक जीव आहेत. तर ते सगळे जीवात्मे हे अभिव्यक्त केले. जीवरुप त्याने धारण केले. प्रत्येक जीवाला देह, इंद्रिय, बुद्धी, पंचप्राण वगैरे प्रत्येक जीवाला पाहिजे की नको ! म्हणजे जितके जीव आहेत तितके देह आहेत, तितकी इंद्रिय आहेत. त्याचप्रमाणे बुद्धी, मन ज्याला म्हणतात ते अंत:करण तत्त्व प्रत्येक जीवाला आहे. प्राणवायू प्रत्येक जीवाला आहे. प्रत्येक जीवाबरोबर हे सगळे निर्माण केले त्याने आणि मग ब्रह्मदेवाला उत्पन्न करुन ब्रह्मदेवांपासून पुढची सगळी सृष्टी निर्माण झाली. हे चराचर विश्व निर्माण केले आणि याच्यामध्ये सगळे जीव आहेत, म्हणाला. पण या

ईश्वरस्वरुपाचे ज्ञान होण्याला पात्र म्हणजे एक नरोत्तम आहे. नुसता मानव सांगितला नाही. ब्राह्मण: असे मुद्दाम केलेले आहे.

मनुष्य शरीर ज्या वेळेला निर्माण केले मनुष्यालाही अधिकार आहे आणि त्यातल्या त्यात उत्तम नर म्हणजे ब्राह्मण हाही अर्थ घेतात किंवा उत्तम अधिकारी मनुष्य जो आहे, विचार करु शकणारा, वैराग्य ज्याच्यामध्ये आहे, विषयासक्ती नाही. कारण ईश्वराने सृष्टी निर्माण करताना नवीन नवीन शरीरे दाखवली म्हणतात. ऐतरेय ब्राह्मणामध्ये हा उल्लेख आहे. गायीचे शरीर, अश्वाचे शरीर वगैरे सगळी शरीर दाखवली. सगळ्या देवतांनी, हे काही आम्हाला पसंत नाही, असें सांगितले. मनुष्य शरीर ज्या वेळेला दाखविलं. त्यावेळी त्या सर्व देवांना आनंद झाला. मनुष्यशरीरामध्ये आत्मा हा जास्ती प्रगट आहे. आत्मशक्ती अधिक प्रगट आहे. बाकीच्या शरीरामध्ये अज्ञान जास्ती आहे आणि या शरीरामध्ये मात्र अज्ञान कमी आहे. ज्ञान मिळिवण्याची पात्रता आहे. म्हणून मनुष्य शरीर हे चांगले म्हणून सांगितले. ज्ञानाचा आणि कर्माचा अधिकारी मानवच आहे. आता प्रत्येकाची कर्म ही वेगळी आहेत, शास्त्राप्रमाणे.

तर हे अद्वितीय, जे आत्मस्वरुप आहे, परमात्मस्वरुप, मूल सृष्टीच्या पूर्वी असणारे त्याच्याच मायाशक्तीने, त्याच्याच संकल्पाने संपूर्ण सृष्टी त्याने निर्माण केली. हे शास्त्राने कळून येते, म्हणतात. व्यास महर्षींनी ब्रह्मसूत्रात तिसरे सूत्र शास्त्र हेच याला प्रमाण आहे असे केले आहे. शास्त्र प्रमाणाशिवाय हे ज्ञान बाह्य इंद्रियांनी, तर्काने होऊ शकत नाही. हे ज्ञान मिळिवण्याकरता मानवजन्म आला पाहिजे. गरुड पुराणातील सुद्धा दाखले दिले आहेत. हे इतके सांगितले. परंतु उपनिषदामध्ये वगैरे असे आलेले आहे. ज्ञानाला योग्य मानव आहे, श्रेष्ठ मानव आहे, विचार करणारा, वैराग्यसंपन्न, पुष्कळ विचार सांगितला आहे. मन त्या इंद्रियांच्या दाराने बाहेर जाणार. खिडकी उघडली म्हणजे सूर्याचे किरण आत येतात की नाही. खिडकीच बंद असेल तर कशाला आत येतील ? डोळे उघडे ठेवले डोळे त्या विषयाकडे गेले. मनही त्याच्याबरोबर बाहेर गेले आणि बाहेरचाच विचार सगळा सुरु झाला. तेव्हा बाह्य विषयांशी इंद्रियांचा संबंध होतो. त्यामुळे इंद्रियांच्या द्वारा मनाचाही संबंध येतो. आणि सगळे विषयच त्या मनामध्ये भरुन जातात. आत्मा काय, परमात्मा काय, काही विचार तो करु शकत नाही.

एखादाच धीर पुरुष जो आहे. म्हणजे इंद्रिय, मन, बुद्धी वगैरे ताब्यात ठेवणारा, असा

एखादा पुरुष निर्माण होतो. अनेक जन्म अभ्यास करता करता, ईश्वराची उपासना करुन, सदगुरुंच्या कृपाप्रसादाने एखाद्याचीच इंद्रिय बाहेर जाण्याची बंद होतात, आत आपण कोण आहोत ? हा विचार त्याचा सुरु होतो म्हणजे हा विचार दुसरा कोणी अगदीच करु शकत नाही असा ह्याचा अर्थ नाही. ह्या मार्गाने कोणालाच जाता येणार नाही असा त्याचा अर्थ नाही. अल्प आहे एखादाच धीर पुरुष. वाणी आणि मन ह्यांचा जर निग्रह केला तर अंतरात्मा जो आहे त्याचा विचार करता येतो. बाहेरच्या विषयाकडे मन जाऊ न देण्याचा अभ्यास करता येतो. प्राणवायूचा निग्रह केला म्हणजे मनाचा निग्रह होतो. किंवा मनाने ईश्वराचे ध्यान वगैरे करायला सुरुवात केली म्हणजे मन स्थिर होते. अशी मनाची स्थिरता झाली की 'अहम्' 'मी' जे आपण प्रत्येक वेळेला म्हणतो तो कोण आहे हे समजून येते. मागे सांगितल्याप्रमाणे 'मी बोलतो, मी चालतो' ही इंद्रियाची कामे चालू असताना हा 'मी' तिथे जातो म्हणजे त्या इंद्रियांनाच तो मी समजतो. डोळे पहात असताना 'मी पाहतो' म्हणजे कान ऐकत असताना 'मी ऐकतो' म्हणतो. हा 'अहम्' त्या सगळ्यामध्ये मिसळून गेलेला आहे.

त्या 'अहम्' चा विचार करायला सुरुवात झाली. बाह्य इंद्रियेही थोडीशी आवरली गेली योगशास्त्रामध्ये त्याला प्रत्याहार म्हणतात. आपल्या आपल्या जागेवर इंद्रिये राह्णे, बाहेर विषयांकडे न जाणे ह्याला प्रत्याहार म्हणतात. हे सुध्दा काम कठिण आहे. थोडासा कुठे आवाज झाला की लगेच कान तिकडे जातात. मन जाते. सगळे लक्ष तिकडे जाते. अभ्यास करणारा जीवात्मा ही इंद्रिये आपापल्या स्थानावर ठेवू शकतो. त्यामुळे त्याचे मनही स्थिर होते. आणि त्या स्थिर झालेल्या मनाला भूत, भविष्य, वर्तमान सर्वही गोष्टींचा विचार करता येतो आणि खरे ज्ञान त्याला संपादन करता येते.

द्रोणाचार्यांना अश्वत्थामा मेला म्हणून समजले. धर्मराजांनीही काही संदिग्ध सांगितले. सभोवताली घनघोर युध्द चालू असतानाही ते आसन घालून बसले. सगळी इंद्रिये आपल्या आपल्या स्थानावर आणून ठेवली आणि मन स्थिर झाल्यावर अश्वत्थामा कुठे आहे याचा शोध घेतला. पाहू या, आहे की नाही, म्हणाले, त्यावेळेला त्या धृष्टद्युम्नाने येऊन त्यांचा शिरच्छेद केला. पुढे ते राहिलेच नाहीत. अशा महात्म्यांना मनाला, इंद्रियांना आवरण्याचा अभ्यास साध्य झाला आहे. ते कोणच्याही वेळेला आणि कोणच्याही परिस्थितीत आपले मन एकाग्र स्थिर करु शकतात. एकांत स्थानच पाहिजे असे त्यांना लागत नाही. ते मोठे अधिकारी आहेत.

तर अशा प्रकारची जी साधनं सांगितली आहेत त्यांचा अभ्यास करुन इंद्रियांना, मनाला ज्यांनी आवरले आहे त्यांचे मन 'अहम्' किंवा आत तो अंतरात्मा आहे त्याचा विचार करु शकते. म्हणून हे काही अगदी असंभव आहे असे नाही. ईश्वराने सृष्टी निर्माण केली. त्यात उत्तमाधिकारी, मध्यमाधिकारी अगदी मंद अधिकारी, अगदी पराङमुख, अगदी विषयासक्त असे सगळ्या प्रकारचे जीव निर्माण झालेले आहेत त्यांच्या त्यांच्या पूर्वीच्या कर्माप्रमाणे आणि वासनेप्रमाणे.

राग याचा अर्थ इच्छा, स्पर्श, रस, रुप आणि गंध या पाच विषयांमध्ये सगळी सृष्टी आलेली आहे. शब्दाची इच्छा आहे. चांगली चांगली गाणी ऐकावीत. आपली स्तुती म्हणजे आपल्याला चांगला शब्द वाटतो. स्तुती ऐकावी. म्हणजे शब्दाकडे लक्ष जाते. स्पर्श सुख घ्यावेसे वाटते. चांगल्या गाद्यागिरद्या आवडतात.रुपाची आसक्ती आहे. रसाची आसक्ती आहे. रसनेंद्रिय आहे. चांगल्या सुंगधाची आसक्ती आहे. आणि ह्या पाच विषयांचा भोग घेणारी जी इंद्रिये आहेत. त्यातच हा आत्मा जाऊन अडकला आहे. बाजूला होतच नाही ना ! एक होऊन गेलेला आहे. तेव्हा त्या इंद्रियांना आणखी स्वस्थ बसविल्यानंतर तसा जर अभ्यास करता आला, ते सगळं समजून घेऊन प्राणायामादिकांच्या बलाने, प्रत्याहाराची सिद्धी होऊ शकते आणि इंद्रिय आपल्या आपल्या स्थानामध्ये बसतात आणि त्यामुळे काय होत शब्द, स्पर्श, रस, रुप, गंध हे जे विषय आहेत या काही विषयांबद्दल आपल्याला इच्छा असती हे मला मिळालं तर बरं होईल, असं वाटतं. आपल्याला जे नको असेल त्याच्याबद्दल द्वेष उत्पन्न होतो हे मला नकोय. निंदा ऐकायला नकोय. स्तुती शब्द ऐकायला पाहिजेत. चांगले पदार्थ खायला मिळावेत. सुंदर असेल ते पहायला मिळावे, अत्यंत भयंकर असेल ते पाहू नये. त्याच्याबद्दल द्वेष आहे.

हे जे सगळेही रागद्वेषादिक विकार मनामध्ये उत्पन्न होतात, अनुकूलाबद्दल इच्छा, प्रतिकूलाबद्दल द्वेष हे सगळे मुख्य दोष ज्याने जिंकले आहेत. अनुकूल प्रतिकुल ही भावना मनातली गेली म्हणजे काय झालं. इंद्रियांनी पाहिल्यानंतर मनाने हे अनुकूल ठरवायचे त्याची इच्छा व्हायची. इंद्रियांनी जे प्रतिकूल ठरवायचे त्याच्याबद्दल तिरस्कार, द्वेष निर्माण व्हायचा. म्हणजे रागद्वेष हे विकार मनामध्ये उत्पन्न झाल्यानंतर 'मला हे नकोय' 'मला हे पाहिजे' ही प्रबल इच्छा झाली किंवा तिरस्कार निर्माण झाला की आपल्याला जे नको असेल, ते काढून टाकण्याकरता प्रयत्न सुरु होतो. जे पाहिजे अशी इच्छा निर्माण झाली असेल ते मिळिवण्याकरता प्रयत्न सुरु होतो. तो प्रयत्न

यशस्वी करण्याकरता चांगल वाईट, नीती अनीती इकडेही काही पाहिले जात नाही. आपल्याला जे पाहिजे आहे ते मिळिवण्याचा प्रयत्न होतो. त्यामुळे पुण्य पापं सगळी घडत जातात.

तर ते मूळ रागद्वेष हे जिंकले पाहिजेत. प्रारब्ध आणि प्रयत्नवाद याचे उत्तर ह्याच श्लोकामध्ये दिले आहे. गीतेमध्येसुध्दा असाच श्लोक आहे. हे मानवाचे काम आहे. प्रयत्न इथपर्यंत करायचा. जे पुढे व्हायचे असेल ते प्रारब्धकर्मानुसार होते वगैरे हा जरी वाद असला, सिद्धांत असला तरीसुध्दा आपल्या मनामध्ये, हे अनुकूल आहे, ते प्रतिकूल आहे, हा आपला आत्मीय आहे. मित्र आहे, तो आपला शत्रु आहे. अशाप्रकारचे जे भाव निर्माण होतात ते भाव जिंकले पाहिजेत, मनामध्ये असणारी अनुकूल प्रतिकूल ही वृत्ती कमी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आणि रागद्वेष हे कमी कमी झाल्यानंतर मग तो प्रयत्न कमी होतो. अनुकूल जे वाटेल ते मिळिवलेच पाहिजे हा आग्रह निर्माण झाल्यामुळे तसा प्रयत्न होतो तो चांगला होईल वाईट होईल, पुण्य घडेल पाप घडेल.

द्वेष म्हणजे ज्याच्याबद्दल तिरस्कार आहे हे दूर करण्याकरताही प्रयत्न घडेल. ते रागद्वेषच जर मूळचे मनांतले दूर केले तिथे प्रयत्नवाद आहे. शास्त्राने सांगितलेला प्रयत्न इथे करायचा. रागद्वेष कमी करायचा प्रयत्न करायचा. पुढे प्रारब्धाचा संबंध आहे. सगळेच प्रारब्धाप्रमाणे घडेल म्हटल्यावर प्रयत्नाला काहीच अर्थ राहणार नाही ना! असं होईल. सगळे विधीनिषेध व्यर्थ होणार. हे करावे, ते करु नये हे कशाला सांगितले मग ! सगळच प्रारब्धाने काय व्हायचे असेल ते होणार आहे. तसे नाही. तर ह्या ठिकाणी विधि निषेधाचा विषय म्हणजे अनुकूल प्रतिकूल वृत्ती उत्पन्न होऊन जे मुख्य रागद्वेष निर्माण होतात. त्यामुळे पुढची सगळी कर्म घडतात. पुण्य किंवा पाप मनात उत्पन्न होणाऱ्या अनुकूल प्रतिकूल विकारांना जिंकण्यात प्रयत्नवादाला अवसर आहे म्हणतात.

मनामध्ये अनुकूल प्रतिकूल कशाला पाहिजे ? ही मनाची सवय जर बंद करता आली, सम स्थिती ठेवता आली त्याकरता दैवी संपत्ती गीतेच्या १६ व्या अध्यायात सांगितली आहे. हे गुण मिळिवण्याचा प्रयत्न करुन दैवी संपत्ती ज्याने आत्मसात करुन घेतली तो रागद्वेष जिंकू शकतो. विचाराने, सत्संगतीच्या प्रभावाने, त्याच्याकरता इतर सगळे उपाय आहेत. नुसत्या विचारांनी (किंवा तशी इच्छा करुन) मनांतील अनुकूल प्रतिकूल वृत्ती नाहीशा होतील असे नाही.

तर अशा प्रकारच्या महात्म्यांची संगती झाल्यानंतर, त्यांच्या सहवासात राहून जर एखाद्याने निरिक्षण केले तर त्याला आढळेल महात्म्यांच्याकडे अनुकूल प्रतिकूल काहीच नाही. सम स्थिती आहे. आम्हाला जे जे अनुकूल वाटते. वस्त्र पात्र, धन वगैरे सगळं पाहिजे आहे. पाहिजे आहे म्हटल्यानंतर ते मिळिवण्यासाठी प्रयत्न आलाच. पण सगळं मिळालेलं असतानासुध्दा जे पाहिजे आहे म्हणत नाहीत किंवा राहू दे म्हणत नाहीत किंवा त्याला कोणी प्रतिस्पर्धी असेल तर तो बाजूला व्हावा आणि आपले हे टिकावे असे काही त्यांच्या मनात येत नाही. सत्संगतीमध्ये राहून हे निरिक्षण करायचे आहे. आणि ते निरिक्षण करुन आपल्या मनाची स्थिती तशी करायचा प्रयत्न करायचा. रागद्वेष जिंकणे हा प्रयत्न आहे. पुरुष प्रयत्नाला शास्त्रकारांनी हा अवसर दिलेला दिलेला आहे. केवळ प्रारब्धाने सगळं होतं असं नाहीये.

तेव्हा ती दैवी संपत्ती मिळिवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. दैवी संपत्ती त्या सत्पुरुषांजवळ कशी असती, ती दैवी संपत्ती कोणची कोणची आहे ते सगळे समजून घेऊन त्यांनी ती कशी मिळिवलेली आहे, त्यांनी काय काय साधनं केली हे आपल्याला ऐकायला मिळते. आपण त्यांना त्याबद्दल विचारायचे, प्रश्न करायचे ती दैवी संपत्ती कशी मिळेल ? अंत:करण शुध्द कसे होईल ? त्याचप्रमाणे दम म्हणजे इंद्रियांचा निग्रह कसा होईल ? हे त्यांच्याजवळ बसून विचारायचे. ते सांगतात. स्वत: त्यांनी मिळिवलेले आहे त्यामुळे त्यांना सांगायला काही अडचण नाही. त्यांच्या दृष्टीने ते समजावून सांगणे सोपे आहे. पण दैवी संपत्ती वगैरे मिळिवण्याचा मार्ग ते दाखवू शकतात आणि त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे ही दैवी संपत्ती मिळिवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आणि ती संपत्ती मिळाल्यानंतर रागद्वेष हे मुख्य जे दोष आहेत ते कमी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हे मला पाहिजे, ते मला नको. कां नको ? हे कां पाहिजे ? चांगले असेल तेवढे पाहिजे. वाईट असेल तेवढे नको. चांगले आणि वाईट ठरविलं कोणी ? आम्हीच मनाने ठरिवले ना ! हे चांगल आहे हे तेवढं मला पाहिजे. दुसऱ्याला ते पाहिजे असेल काय घेईना का तो. पण तो घ्यायला लागला की द्वेष तो प्रतिकूल आहे. तर ही जी मनाची सवय आहे ती सवय मोडण्याकरता प्रयत्न केला पाहिजे. एवढच सांगतात. मानवाचा प्रयत्न इथपर्यंत आहे. त्याकरता मग सगळी साधनं आहे. सत्संगती आहे. ईश्वराची उपासना आहे, हे सगळं त्याच्याकरता केले पाहिजे. नुसत्या विचारांनी, नुसत्या मनाने निग्रह होऊ शकत नाही.

इथे मोठे महाराज एक महत्त्वाचा सिद्धांत सांगताहेत, अशा प्रकारचा जो आणखी श्रेष्ठ

पुरुष आहे. मुमुक्षु जो आहे, आपल्या इंद्रियांना ताब्यात ठेवणारा जो आहे. मनाला ताब्यात ठेवणारा, त्याकरता ईश्वराची प्रार्थना, उपासना, नामस्मरण, गायत्रीजप वगैरे पुष्कळ उपाय करणारा जो आहे, त्याप्रमाणे वागणारा, त्यासाठी असा प्रयत्न करणारा जो आहे, या मार्गाने जाणारा, त्याच्याकरता ईश्वर अवतार धारण करतो. 'जगाच्या कल्याणा संताच्या विभूती.'' संत सगळे करतात पण ईश्वराचा अवतार मात्र या करता होता. दैवी संपत्ती मिळवून संसारातून आपलं मन बाजूला करणारा रागद्वेषरहित अंत:करण ज्याचे झाले आहे त्याच्याकरता अवतार होतात. 'जैशी स्थिती आहे तैशापरि राहे' हे संत सांगतात. कशी त्यांनी तयारी केली असेल ?मनुष्य जन्म घेऊन ज्याने हा प्रयत्न केला आणि दैवी संपत्ती मिळिवतो आहे. ती मिळावी टिकावी म्हणून प्रयत्न करतो आहे. पांडवांचे राज्य गेले तरी धर्मराजांची समस्थिती ढळली नाही. राग नाही आणि द्वेष नाही. मी एकट्याने साम्राज्य मिळिवले ही भावना नाही. सगळ्या बंधूनी सर्व पृथ्वी जिंकली नंतर राजसूय यज्ञ केला. संपूर्ण पृथ्वी ज्याने जिंकली त्यानेच राजसूय यज्ञ करावा असे शास्त्राने सांगितले आहे. पण मिळालेले राज्य गेले तरीसुध्दा अनुकूल असे वाटत नव्हते त्याला. म्हणून त्याच्या मनात द्वेष उत्पन्न झाला नाही. माझे राज्य आहे, मी मिळिवलेले आहे अशी अनुकूल वृत्ती असती तर कौरवांनी माझे राज्य घेतले ही वृत्ती उत्कट होऊन त्याने राज्याचा ध्यास घेतला असता आणि तो परत मिळिवण्याचा प्रयत्न केला असता. त्याने कौरवांना सांगितले असते तुम्ही खोटे खेळलात, फसवले, आम्ही वनवासाची आणि अज्ञातवासाची अट मानायला तयार नाही.

पण त्याने सगळे मान्य केले. रागद्वेष ज्याने जिंकले आणि दैवी संपत्ती ज्याने जिंकली त्याचे हे लक्षण आहे. आणि त्याच्याकरताच ईश्वर अवतार धारण करतो. सर्व लोकांकरता नाही. केवळ एकट्या प्रल्हादाकरता नरसिंह अवतार ईश्वराने धारण केलेला आहे हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. सगळ्या लोकांना हिरण्यकश्यिपूने त्रास द्यायला सुरवात केली वगैरे आहेच आहे. सर्व सामान्य लोकांची दु:ख दूर करण्याकरता दत्तात्रेय अवतार धारण करतात असेही सांगतात आणि अत्रि ऋषी व अनसूयामातेच्या तपश्चर्येचे फळ म्हणूनही दत्तात्रेय अवतार आहे. एक व्यक्ती करतासुध्दा अवतार होतो. प्रल्हादजींचे उदाहरण आहे.

कां बर असे ? हा जो भक्त दैवी संपत्ती ज्याने मिळिवलेली आहे, दैवी संपत्तीच आपल्याजवळ राहावी असा ज्याचा प्रयत्न चाललेला आहे, दुसरी संपत्ती राहिली काय नि गेली काय त्याच्या मनात रागद्वेष नाही. हे अनुकूल, ते प्रतिकूल अशी वृत्ती नाही.

त्यामुळे इच्छा नाही, तिरस्कार नाही. द्वेष नाही, कांही नाही. अशा जो महात्मा आहे तो भगवंताला अत्यंत प्रिय आहे. त्यालाही भगवान प्रिय आहेत. ज्ञानी मनुष्याला भगवान अत्यंत प्रिय आणि भगवान म्हणतात असा ज्ञानी महात्मा मला प्रिय आहे. म्हणून अशा भक्ताच्या संरक्षणाकरता भगवान अवतार घेतात.

सध्या सर्व सामान्य एका व्यक्तीने अर्ज करुन काम होत नाही. युनियन पाहिजे म्हणतात, मंडळ पाहिजे. त्या मंडळातर्फे गेल्यानंतर जरी काही दिवस लागले तरी विचार करतात. सध्याच्या जगात एक व्यक्तीचे गुण काही मानायला तयार नाही. देवाजवळ तसे नाही.

अशा ज्ञानी महात्म्याचा किती जन्मांचा अभ्यास झाला असेल! त्याने मन जिंकलेले आहे. मनाची समस्थिती आहे. त्याच्या मनांतला शत्रुमित्रभाव गेलेला आहे. अशा वागणारा जो आहे त्याचं संरक्षण करायचे. म्हणजे त्यांच्या द्वाराने सगळ्या जगाचे संरक्षण होते ना! त्याची आदर्श वागणूक पाहून जिज्ञासू लोक त्याच्याकडे जातील, त्याला प्रश्न विचारतील, त्याचे मार्गदर्शन घडेल. साधन करतील. यातून सगळ्या लोकांचे कल्याण होईल. म्हणून मुख्यत्वे करुन अशा ज्ञानी महात्म्याचे, साधूचे संरक्षण करण्याकरता भगवान अवतार घेतात.

जीवाला जन्म घ्यावाच लागतो. परमेश्वराला जन्म नाही. जीवाला जन्म नको म्हणून भागत नाहीये. त्याने कर्म केलेली असतात. त्या कर्माचे फल म्हणजे नवीन देह येणे. बरं मृत्यु नको म्हणतो आम्ही. जन्म नको म्हटलं तरी जन्म आला. जन्म आल्यानंतर मृत्युही अटळ आहे. ईश्वराच्याबाबतीत जन्मही त्याच्या इच्छेवर अवलंबून आहे. त्याला आमच्यासारखा जन्म घ्यायला कर्माचा संबंध नाही. लीला विग्रह आहे म्हणतात. भगवंताची स्वतंत्र स्थिती आहे. कर्म परतंत्र नसल्यामुळे त्याचे शरीर कर्माधीन नाही. भौतिक शरीर नाही. असे गुलाबराव महाराजांनी सांगितलेले आहे. 'भगवंताचे शरीर चैतन्यमय आहे. त्याला पंचभूतांचा संबंध नाही. ते तसेच नित्य आहे असेही पुष्कळ प्रतिपादन केलेले आहे. आज अव्यय जन्म नाही आणि मृत्यू नाही. केव्हाही जन्माला यायचे केव्हाही अदृश्य व्हायचे अशी ती स्थिती आहे. असं कुठपर्यंत ?

ईश्वराचे सृष्टीकार्य कसं चाललेलं आहे ते समजावून सांगताहेत महाराज. शास्त्राप्रमाणे अर्थात शास्त्राने हे सगळे वर्णन केलेले आहे. ते या ग्रंथरुपाने महाराज पुढे मांडताहेत.

भगवंतानी प्रत्येक युगात अवतार धारण केलेले आहेत. कृतयुगामध्ये आहेत, त्रेतायुगामध्ये आहेत. द्वापारयुगामध्ये आहेत. कलियुगामध्ये आहेत आणि ते अवतार ज्यांच्याकरता धारण केले असे साधुपुरुषही त्या युगात आहेत, हे म्हणायाला हरकत नाही. द्वंद्वात्मक जग आहे. चांगली मंडळी असतात तशी त्यांना विरोध करणारी मंडळीही असतात. म्हणून सज्जनांचे संरक्षण करायचे, प्रसंगाने त्यांना त्रास देणाऱ्या दूर्जनांचा नाश करायचा, आणि धर्ममार्ग प्रतिबंधरहित करायचा. असे अवतार धारण करुन ते कार्य संपले की ते शरीर सोडून द्यायचे. आपल्या मूळ स्वरुपात व्यक्त व्हायचे. असे ईश्वराचे कार्य चालू आहे.

ब्रह्मदेवाचा एक दिवस म्हणजे एक कल्प. ब्रह्मदेवांचे आयुष्य हे सर्वात अधिक आहे. देवांचे आयुष्य मानवांपेक्षा मोठे आहे. माणसांचे सहा महिने म्हणजे देवांचा एक दिवस. दक्षिणायने, उत्तरायणे असे आपण म्हणतो ना. दक्षिणायन आणि उत्तरायण. म्हणजे कर्कराशीला सूर्य आलेला आहे, म्हणजे दक्षिणायन सुरु झालं. मकरराशीला सूर्य आलेला आहे, म्हणजे उत्तरायण सुरु झालेले आहे. तर हे सहा सहा महिने म्हणजे देवांचा एक दिवस व एक रात्र अशी त्यांची १०० वर्षे. मानवांचा एक महिना म्हणजे पितरांचा एक दिवस. अशी आयुष्याची कालगणना त्यांनी केली आहे.

हे जे भूलोक, भूवर्लोक वगैरे त्रैलोक्य आहे. त्याचा त्यावेळेला प्रलय होतो. ब्रह्मदेव निद्रिस्त झाले. चार हजार युगांचा काल गेल्यानंतर ब्रह्मदेव जागृत होतात पुन्हा त्रैलोक्य निर्माण करतात असे सारखे कार्य चाललेले आहे. ब्रह्मदेव तेच आहेत. तर इतके दीर्घायुष्य कोणालाही नाहीये. तसं ब्रह्मदेवांच आयुष्यसुध्दा पंचागात दिलेले असते. ४० वर्षे आधीची आणि ५० वर्षे पुढची ही पंचागात दिलेले असते. त्यांना परार्ध म्हणतात. परार्ध ही संख्या नाहीये. 'ब्राह्मण द्वितीय परार्धे' असे आपण सध्या संकल्पात म्हणतो. ब्रह्मदेवाचा दुसरा परार्ध सुरु झालेला आहे. आरंभाला इतकी वर्षे, इतक्या घटका वगैरे दिलेले असते. ब्रह्मदेवाच्या आयुष्याच्या १०० वर्षापैकी चार चार हजार युगे म्हणजे एक दिवस आणि एक रात्र इतके आयुष्य असूनसुध्दा ५० वर्षे संपून गेलेली आहे त्याची. आता ५० च शिल्लक राहिलेली अजून पुष्कळ अवकाश आहे. अष्ट प्रकृती म्हणजे पंच भूतं, त्याच्यानंतर अहंकार तत्त्व आहे. पृथ्वीच्या दसपट जलतत्त्व आहे म्हणतात. पाणी म्हणजे नुसते पाणी असे नाही. जल तत्त्व. त्याच्या दसपट तेजस तत्व आहे. त्याच्या दसपट वायुतत्व आहे. त्याच्या दसपट आकाशतत्त्व आहे. त्यांच्यानंतर अहंकार आहे. मग समष्टी मन आहे. नंतर

महत् तत्व. महत् तत्वानंतर मूल प्रकृती. ह्या प्रकृती वगैरे सगळ्या विश्वाचा विलय होऊन गेला म्हणजे महाप्रलय झाला. ब्रह्मदेवही संपले.

पुण्यकर्म करणारे जीवात्मे ब्रह्मदेवांच्या लोकामध्ये जाऊन राहातात. ब्रह्मदेवांची उपासना करुन त्या लोकात जाऊन राहातात. त्यांना पुन्हा या ठिकाणी मृत्युलोकात यावे लागत नाही. तिथेच आपले आनंदात असतात. आयुष्यही पुष्कळ असते. ब्रह्मदेवांचे आयुष्य संपले म्हणजे ब्रह्मलोकात राहाणारे जीवात्मेही मुक्त होतात. पुन्हा सृष्टीमध्ये नाही. पण महाप्रलय झाल्यानंतरसुद्धा पुन्हा सृष्टी आहे. 'एकोहम् बहुस्याम' हा संकल्प झाला की सुरुवात झाली. पुन्हा सृष्टी आहे. प्रथम जशी सृष्टी होती तशीच सृष्टी पुन्हा निर्माण झाली. वेदही जसेच्या तसेच. महाप्रलयाच्या वेळेला सगळे नाहीसे झाले. जडही गेले. आकाशही गेले. तेजही गेले. वायू गेला. केवळ त्रिगुणात्मक प्रकृती - सत्वरजतम साम्यावस्था हे त्रिगुण समान स्थितीमध्ये राहिले म्हणजे प्रलय आणि त्यांच्यामध्ये विषमता सुरु झाली म्हणजे सृष्टी. विषमता हे सृष्टीचे स्वरुप आहे. सृष्टीतले वैषम्य घालवण्याची इच्छा करणे म्हणजे प्रलय करण्याची इच्छा करण्यासारखे आहे. प्रलय म्हणजे साम्यावस्था आणि वैषम्य म्हणजे सृष्टीची अवस्था. हे इतकं कार्य अखंड चालू आहे. किती काल गेला काही कोणाला सांगता येणार नाही.

५००० वर्षापूर्वी वेद झाले, लाख वर्षापूर्वी अमूक झाले अशी गणित मांडणे चालू आहे पण त्या बुद्धीने निश्चित निर्णय असा काहीच घेता आलेला नाही. तर सध्या २८ वे युग आहे. ब्रह्मदेवाच्या दिवसापैकी हे दारुण कलियुग आहे म्हणतात. कलियुगामध्ये काय काय होईल ते खाली टीकेमध्ये दिलेले आहे. सर्व लोक धर्म भ्रष्ट होतील. संन्यासी कुटुंबी होतील. सगळे गृहस्थाश्रमी लोक आपला आचार सोडून देतील, कोणालाही आपल्या लोकांबद्दल प्रेम राहाणारा नाही, स्त्रीया पतीची अवज्ञा करणाऱ्या होतील, मुले पित्याचा द्वेष करतील, सेवक आपल्या स्वामीचा त्याग करतील, शिष्य गुरुवंचक होतील, सर्व राजे लोक म्लेंच्छप्राय आणि केवळ अर्थार्जनाकरता सर्व प्रजाजनांचे शोषण करतील. प्रजाजनांची त्यांना काळजी राहाणार नाही. ब्राह्मण अत्यल्प द्रव्यासाठी वेद विक्रय करु लागतील, त्यामुळे त्यांची शक्ती जाईल. मंत्राची सिद्धी त्यांना मिळणार नाही. श्रेष्ठ हीनाप्रमाणे वागील, जे हीन असतील त्यांना आपण जानवं घालावं, गायत्री मंत्राचा जप करावा अशी इच्छा होईल. ज्यांना गायत्री मंत्र जप करण्याचा अधिकार आहे त्यांना जानवं काढून ठेवावं, गायत्री जप करु नये अशी इच्छा होईल. यज्ञयाग

बंद पडल्यामुळे पाऊस, धान्योत्पादन कुठे कुठे होईल. सोळाव्या वर्षीच म्हातारपण येईल. काय विलक्षण परिस्थिती आहे. दहाव्या वर्षी प्रसुती होईल. सगळे राजे चोर होतील. सगळा धर्म पाखंडमय होईल. खरं धर्माचं स्वरुप राहाणार नाही. सर्व दांभिक होईल. गृहस्थाश्रमाशिवाय दुसरा कोणता आश्रम राहाणार नाही. असे कलियुगामध्ये होणार आहे.

असे हे भयंकर कलियुग सुरु झाल्यावर भगवंतानी कां अवतार घेतला ? हे सगळे देव होते की त्यांना पाठवायचं होतं भूलोकावर, तुम्ही जाऊन कार्य करा, असे त्यांना सांगायचं होते. पण त्या देवांना दया राहिली नाही, म्हणाले, ईश्वराचा स्वत:चा अंश म्हणजे ब्रह्मदेव, आद्य जीव. त्याचे अंश म्हणजे कश्यप, अत्रि वगैरे सगळे ऋषी त्यांच्यापासून विभूतिरुप उत्पन्न झालेले इंद्रादिक देव म्हणाले आम्हाला काय जरुरी पडली ? आमचं लोक ऐकत नाहीत, शास्त्राप्रमाणे वागत नाहीत, मरेनात का. तरीसुध्दा भगवान् दत्तात्रेय स्वत: प्रगट झाले.

आपण अवतार घेऊन काय केलं ? म्हणजे त्यांना कामाला लावलं हो ! कामाला लावलेली मंडळी एखादे वेळेस दमलेली असतील. कंटाळलेली असतील. निजली असतील. मग स्वामी स्वत: ते काम करायला लागला. म्हणजे तेही मग उठतात. चला आपण सहाय्य करु या. आपोआप येतात. हा व्यवहारच आहे. म्हणजे स्वामीनेसुध्दा स्वत: काम करायला पाहिजे. त्याला हे शिक्षण आहे न बोलताना. त्याप्रमाणे दत्तात्रेयांनी स्वत: अवतार घेऊन लोकांचे संरक्षण करण्याचे काम सुरु केल्यावर सर्व देव आले. पहायला लागले, म्हणजे, त्याकरता अवतार घेतला.

कलियुगातील अवताराचे वर्णन आता इथे चाललेले आहे. कृष्णातीरावरही भगवान् दत्तात्रेय आहेत. अमरजा तीरावरही आहेत आणि सर्व लोकांना पावन करणारे भगवंताचे चरित्र आहे. ऐकणं त्याचप्रमाणे मनाने अखंड त्याचं चिंतन करणं. त्याचच किती तरी फळ आहे. त्या चरित्राच्या पठणाने, श्रवणाने मन पवित्र होत आहे. भगवान संन्यासीरुपाने राहिले. कृष्णाअमरजा तीरावरती राहून, संचार करुन आणि लोकांना पवित्र करणाऱ्या अनेक प्रकारच्या लीला केल्या आणि अदृष्यरुपाने मात्र या ठिकाणीच आहेत अजून. स्थान सोडून गेले नाहीत ते. हे आता पहाणाऱ्याने सांगितले आहे. हे आपलं कोणाच्या तोंडून ऐकून लिहिलं असं नाही. दंतकथा नाही ही. त्या ठिकाणी भगवान् दत्तात्रेय

अद्यापि आहेत पण अदृश्य आहेत. अर्थात ज्यांना पहायची तळमळ व उत्कट इच्छा आहे त्यांना दृष्यमान होतात.

तर हे साक्षात् भगवान् नरसिंहसरस्वति आहेत कशावरुन? हा एक प्रश्न येतो ना! मनुष्य वेष आहे. आणि सन्यांसी आहेत पुन्हा. हे साक्षात भगवान् कसे? त्यांच्या चरित्राचा थोडा उल्लेख करुन हे माणसाचे चरित्र आहे का पहा तुम्ही, म्हणाले.

पहिली लीला आहे - जन्माला आल्याबरोबर ओंकाराचा उच्चार चाललेला आहे. काय आहे, म्हणाले, तो जीवात्मा आईच्या गर्भात राहिल्याने त्याच्या सगळ्या नाड्या कफाने भरलेल्या असतात. ते सगळं शुध्द करायचं. त्याला स्नान घालायचं, सगळं धुवून काढायचं. अशा स्थितीमध्ये तोंडून काही शब्दही बाहेर पडणार नाही आणि ओंकाराचा उच्चार चाललाय मोठ्यांदा. हे काही मानवाचे लक्षण आहे का म्हणाले, एकेक सांगताहेत. जन्माला आल्याबरोबर ओंकाराचा उच्चार आहे. आईवडिलांची खात्री पटवण्याकरता लोखंडाच्या पळीला स्पर्श करुन त्याचे सुवर्ण करुन दाखवले. हे दुसरे कोणी करु शकेल का?

आठव्या वर्षी उपनयन झालं. उपनयन झाल्याबरोबर आणखी वेद शिकवायला सुरवात झाली. कुठं अभ्यास केला? 'बाळपणीच सर्वज्ञता वरि तयाते'. ज्ञानेश्वर महाराजांनी सांगितले आहे. तो महात्मा म्हणजे साक्षात् श्रीहरि आहे. उपनयन झाल्यावर वेद शिकवायला लागले. नुसते म्हणून दाखवले नाहीत. कसं म्हणायचं काय म्हणायचं. मोठे मोठे शास्त्री पंडित विद्या शिकण्यासाठी त्यांच्याकडे यायला लागले. हे अवताराशिवाय शक्य आहे का? तीर्थाटनाला जायच्या वेळेला आईवडिलांना तत्त्वज्ञान सांगितले, हे शक्य आहे? आठ वर्षाच्या मुलाने आईवडिलांना तत्त्वज्ञान शिकवणे शक्य आहे का? आणि बालवयामध्येच सर्व तीर्थाटनही केलेले आहे. संपूर्ण योगमार्गाचा उपदेश केलेला आहे. संन्यासमार्गाची स्थापना संन्यासदीक्षा ग्रहण करुन केलेली आहे. सगळ्या संन्याशांना संन्यासमार्गाचा उपदेश केलेला आहे. लहान वयामध्ये संन्यासी लोकांना त्यांचे त्यांचे धर्म शिकवलेले आहेत. हे मनुष्याला कसे शक्य आहे? म्हणून अर्थात, हे अवतार आहेत ही त्यांनी कल्पना दिली.

अन्न खाल्याबरोबर आणखी पोटात दुखायला लागायचे. त्याचा तो पोटदुखीचा रोग त्याला जेवायला घालूनच बरा केला हे दुसरे कोणी करु शकेल का? हे पथ्य तुम्हाला करावे लागेल, महिनाभर औषध घ्यावे लागेल. पथ्याने राहिला तर बरं ताकिदच दिली

असती त्यांनी. इथे तसं काही नाही. विरुध्द आचरण आहे. अन्न खाल्ल्यानंतर पोटदुखी होणार. अन्न खायला घातलं त्याला. आणि त्याचा तो रोग दूर केलेला आहे. ही मानवाची शक्ती नाही.

तो कोल्हापूरचा ब्राह्मण कुमार आलेला आहे. तो भिल्लवडीला भुवनेश्वरीच्या जवळ राहिला होता. तीन दिवस वाट पाहिली आणि देवी दर्शन देत नाही म्हणून शस्त्र घेऊन जीभ तोडून टाकली. बोलता येईना. तोंडातून सारखे रक्त वाहू लागले. देवीने सांगितले, ''जा, बाळ नदीच्या पलिकडे जा. औंदुबराच्या वृक्षाखाली महातापसी संन्यासी आहे तो तुझी सर्व इच्छा पूर्ण करील.'' धावत धावत गेला बिचारा. काही बोलायला येत नाही. पण त्याला विद्वता देऊन टाकली. जीभही आली आणि त्याचे संबंध जे प्रारब्धकर्म आहे अज्ञानामध्ये रहायचं, ते प्रारब्धकर्मही बदलून टाकलेले आहे. उत्तम, विद्वान तो झालेला आहे. हे मनुष्याला करता येण्यासारखे आहे काय ? हा प्रत्येकवेळी ते प्रश्न विचारताहेत. हे अन्यथा कसं होईल ? ह्याला जर तुम्ही अवतार म्हटलं नाही तर हे चरित्र होणार नाही. कोणाकडूनही हे होणार नाही.

घेवड्याचा वेल उपटून टाकला. शेंगाची नुसती भाजीच दिली ती खाऊन घेवड्याचा वेल उपटून टाकला. आणि त्या ब्राह्मणाने जेव्हा त्या वेलाचे मूळ काढून टाकण्यासाठी उकरले तेव्हा तिथे त्याला ती संपत्ती मिळाली. त्याचे दैन्य, दारिद्रय लगेच दूर केले. भिक्षेला एकदाच गेले आणि त्याचे दैन्य तत्काल दूर केले. हे कार्य करायला त्यांना वेळ लागत नाहीये ना ! विचार चालू आहे. मिटिंगा व्हायच्या आहेत. अमूक आहे तसं इथं काही नाही.

समाधान करणारी उत्तर आहेत ही. फळ इथं लगेच पदरात पडलेलं आहे.

त्या गंगानुजाला त्रिस्थली यात्रेला नेऊन आणले. वाडीपासून खाली ८-९ मैलावर जुगुळ युगालय क्षेत्र म्हणून आहे. तिथे विरुपाक्षेश्वराचे मोठे मंदिर आहे. त्याला काशी, म्हणाले. आणि कृष्णा पंचगंगा संगम म्हणजे प्रयाग आहे. कोल्हापूर म्हणजे दक्षिण काशी. अशी त्रिस्थळी यात्रा दाखविली ती उत्तरेकडची त्रिस्थळीही गंगानुजाला त्याच दिवशी दाखविली म्हणजे. दोन्ही त्रिस्थळी दाखवल्या आणि संध्याकाळी वाडीला परत आणून सोडले. हे कसे शक्य आहे ? तो स्वत: जाऊन आल्याचे सांगतो. त्या काही ऐकीव गोष्टी नाहीयते. नुसत्या ऐकीव गोष्टींना दंतकथा म्हणतात. त्याला पुन्हा महाराजांनी ताकिद केली, आम्ही इथे असेपर्यंत कोणाला हे सांगायचे नाही. तो बिचारा थांबला

होता. महाराज अदृश्य झाले म्हणा तिथून निघून गेले म्हणा. मग त्यांने सांगायला सुरुवात केली त्या नदीमध्ये मी गेलो होतो. नदी दुभंगली. आत मोठे नगर होते. तिथे ६४ योगिनी आल्या त्यांनी महारांजाची पूजा केली. भिक्षा केली. एका दिवसात त्रिस्थळी यात्रा करुन आलो. असं तो स्वत:च सांगतोय. प्रत्यक्ष अनुभव ज्याने घेतलाय त्याला आम्ही खोट कसं म्हणायचं ? आम्हाला अनुभव नाहीये. तेव्हा तो जो अनुभव त्याने सांगितला त्यावरुन त्रिस्थळी यात्रा तो करुन आलेला आहे. वर्णनही केले असेल कोणी तिथे असं असं आहे. गंगा पाहिली यमुना पाहिली. अर्थात ते लोक म्हणतील खरं आहे बुवा.

शिरोळच्या बाईचा मेलेला मुलगा जिवंत केलेला आहे. वंध्या म्हशीने दूध दिलेले आहे. हे ईश्वराशिवाय दुसऱ्या कोणालाही करता येणे शक्य नाहीये. त्रिविक्रम यतीला विश्वरुप दाखविले आहे. अहंकारी विद्वान ब्राह्मणांचा गर्व दूर केला त्यासाठी पतिताला वेद म्हणायला लावले. माहुरच्या विधवा स्त्रीला सौभाग्यदान दिले. हे केवढे मोठे काम आहे. मेलेल्या मनुष्याला जिवंत करणं मनुष्याला कसं शक्य आहे ? मानवाची शक्ती परिमित आहे. ह्या अद्भुत गोष्टी ईश्वराकडे लक्ष लागावे म्हणून त्यांनी केल्या.

कर्मकांडाचा प्रकाश केलेला आहे. वाळलेल्या फांदीला पल्लव आलेले आहेत. कुष्ठरोग्याचा सगळा कुष्ठरोग गेलेला आहे. ही सगळी शक्तीपाताची उदाहरणे आहे. मनुष्याला करता येणे शक्य नाही अर्थात हा ईश्वर आहे हे मानणं याचा अर्थ त्याची संकल्प शक्ती आहे. दृष्टी शक्ती आहे. शब्द शक्ती आहे. 'सौभाग्यवती भव' अत्यंत आणखी निराश झालेली. परंतु आपल्या कर्मावरती निष्ठा ठेवणारी मी पतिव्रता आहे. पतीबरोबर मी जाईन. मी इथे असताना पती इथे राहिला नाही. हे असले प्रारब्ध माझे. माझे अत्यंत उत्कट पुण्य म्हणजे माझा स्वत:चा देह मी चितेमध्ये टाकणार आहे. शास्त्राने सांगितल्याप्रमाणे. हे अत्यंत उत्कट पुण्य आहे. त्या पुण्याने मी तरी पतीबरोबर निश्चित जाणार आहे. हे ठरवून ती आलेली आहे महाराजांच्याजवळ, तुमचं तुम्ही बघा, म्हणाले. अशा स्थितीमध्ये यन्नमस्क्रिया महाराज लिहिताहेत. त्या स्त्रीने फक्त नमस्कार केल्याबरोबर सौभाग्यवती भव असे महाराजांच्या तोंडून शब्द निघाले. तर ही शब्द शक्ती आहे. दृष्टी शक्ती आहे. त्याचे प्रेतही आणलेले आहे. त्यावर दृष्टी टाकलेली आहे. संकल्प शक्ती तर आहेच आहे. ही सगळी उदाहरणे शक्तीपाताची आहेत.

म्हणजे विटाळसुध्दा गेलेला आहे कधीही मूल होणार नाही अशी वंध्या स्त्री तिला उत्तम

मुलगा झाला. मुलगी झाली. कुष्ठ हरणं दृष्टी मात्रत:. तो नंदीनामा ब्राह्मण आलेला आहे. तूं निंदा केलीस. तुझ्याजवळ तुझी निंदा असूं दे. त्याच्यावर कृपा केलेली आहे. क्षण याचा अर्थ उत्सव असाही होतो. दीपावलीच्या उत्सव प्रसंगी गाणगापुरामध्येही आहेत. आठ गावांतही गेलेले आहेत भक्तांच्या इच्छेसाठी. म्हणजे भगवान कुठेही असू शकतात. अदृष्य झाल्यानंतर कसे दिसतील ? अशी एक शंका मनामध्ये येते. अदृश्य झाल्यानंतरसुध्दा तितकी तळमळ निर्माण झाल्यावर दर्शन होते. हे उत्तर आहे. परंतु दृष्य स्थितीमध्येसुध्दा दुसऱ्या गांवातल्या माणसांना गाणगापुरातल्या गुरुंचे दर्शन कसे होणार ही शंका नाही का? गुरुमहाराज गाणगापुरामध्येच आहेत. ते आमच्या गावाला कशाला येणार ? पण त्या गावालाही गेलेले आहेत. तिथेही दर्शन झालेले आहे. सगळ्या गावी त्या त्या भक्तांना दर्शन झालेले आहे. दीपावलीमध्ये राहाणे झालेले आहे. हे मनुष्याचे कर्म आहे काय ? काही तरी हे लिहिलेले आहे असे म्हणून याची उपेक्षा करुन चालणार नाही.

महाराजांनी एका शेतकऱ्यांचे सबंध शेत त्याला सकाळी संगमावर जाताना कापायला लावलेले आहे. पीक अगदी तयार झालेले आहे. धान्य येणार. त्या स्थितीमध्ये कापून टाक, म्हणाले. त्यानेही दुपारी १ २ वाजेच्या आत सर्व पीक कापून टाकले. सद्गुरुंची आज्ञा पालन करताना काहीही विचार करायचा नाही. त्यांच्या शब्दामध्ये शक्ती आहे अशी जर खात्री असेल तर असे घडते नाही तर घडत नाही. जरी विरुद्ध शब्द असले तरी त्यातही शक्ती आहे. तेच अनुकूल बोलल्यावर पुन्हा सस्य वाढेल. ही शब्दशक्तीची जाणीव ज्याला आहे त्याच्याकडून असं कां व्हावं ? आणि त्याला फळ मिळतयं. सबंध धान्य आलेले आहे. विलक्षण अद्भुत कर्म महाराजांनी केलेली आहेत. अजूनही करत आहेत. कित्येक लोक येताहेत. चाललेले आहे कार्य त्या ठिकाणी आणि पुढेही होणार आहे. कालयात्रामध्ये तो अबाधित आहे. कालाची मर्यादा त्याला नाही.

आकाशातील तारकांचीही गणना करणारे भेटतील, वाळूचे कण देखील मोजणारे एखादे बुद्धीमान भेटतील ते एक संख्याशास्त्र काही तरी आहे म्हणतात -

नळराजा त्या वेळेला थोडासा प्रारब्धकर्मात सापडला होता. पत्नी एकीकडे गेलेली. आपण एकीकडे. त्याला तो कल्पक नाग चावला त्यामुळे तो काळा झाला होता. त्याने नळराजाला एक वस्त्र देऊन सांगितले होते, तुला ज्या वेळेला मूळचे स्वरुप घ्यावेसे वाटेल त्या वेळेला हे वस्त्र पांघर तुला कोणी ओळखू नये म्हणून तुला मी मुद्दाम दंश

केला. त्याचा वर्ण पालटला. त्यावेळी तो ऋतुपर्ण राजाच्या पदरी सारथी म्हणून राहिला होता. उत्तम सारथी, घोडा कसा पाहिजे, त्याचे गुण कसे आहेत. हे सगळे त्याला ज्ञान होते. नळ राजाने यावे म्हणून दमयंतीच्या वडिलांनी जाहीर केले, दमयंतीचे पुन्हा स्वयंवर होणार आहे. त्यासाठी सर्व राजांना निमंत्रण पाठवले. नळाच्या कानावर ही बातमी गेली. तो तिथे सारथी होता. ऋतुपर्ण राजाने नळाला सांगितले, उद्या दमयंतीच्या गांवी पोहोचले पाहिजे. नळ म्हणाला, हो काही हरकत नाही. मग अश्वशाळेत जाऊन परिक्षा करुन नळाने चार घोडे निवडले. बाहेरुन ते घोडे अगदी कृश दिसत होते. ऋतुपर्ण राजा नळाला म्हणाला, हे असले घोडे इतक्या लांबचा प्रवास कसा करतील? नळ म्हणाला, तुम्हाला त्यातली माहीती नाही. हेच घोडे चांगले आहेत ते जुंपून चला, म्हणाला.

जाता जाता रथ वेगात असल्यामुळे वाऱ्याने ऋतुपर्ण राजाच्या अंगावरील वस्त्र खाली पडले. राजा म्हणाला, अरे माझे वस्त्र पडले. नळाने रथ थांबवून म्हटले, एक योजनं लांब अंतरावर तुमचे वस्त्र पडले आहे. चार कोस लांब आहे. इतका वेग त्या घोड्यांचा होता. ऋतुपर्ण राजाने नळाला ही अश्वविद्या द्यायची विनंती केली. नळाने द्यायचे कबूल केले. ऋतुपर्ण राजा म्हणाला, माझ्याजवळही एक विद्या आहे. समोर एक मोठ झाड होत. त्याला किती पान आहेत हे बरोबर मी सांगू शकतो. परिक्षा करण्याकरता त्याने एक शाखा आणली. ह्याला इतकी पाने आहे, म्हणाला, सगळ्या झाडाची सांगू का, विचारले, ही विद्या तुला मी देतो तूं तुझी अश्वविद्या मला दे. राजाकडून संख्याशास्त्राची विद्या मिळाल्याबरोबर नळाच्या शरीरातील तो कली निघून गेला. नळाने ऋतुपर्ण राजाला अश्वविद्या दिली आणि स्वत:चे खरे स्वरुप प्रगट केले. अशा किती तरी विद्या पूर्वी होत्या.

तर वाळूच्या कणांचीसुध्दा गणना करता येईल. पण परमेश्वराच्या गुणांची मात्र गणना करता येणार नाही. किती अगणित गुण परमेश्वराचे आहेत. कारण किती भक्त त्यांच्याकडे सारखे जाताहेत. परमेश्वर काही पाच वर्षांनी बदलणारा नाही. त्याची सत्ता बदलणारी नाही. इथे लहान मोठ्या राज्यसत्ता पाच वर्षसुध्दा टिकत नाहीत. पण त्यांना टिकल्या तरी पाच वर्षांची मर्यादा आहे. तशी ही ईश्वरी सत्ता बदलणारी नाही. कायम आहे. त्यामुळे किती गुणांचे वर्णन करणार? किती लोकांना अनुभव आलेले आहेत. किती अर्थार्थी आहेत. किती आर्त झालेले आहेत. किती जिज्ञासू आहेत. किती लोकांना ज्ञान दिलेले आहे. काय त्यांच्याबद्दल कसं लिहिणार? हे शक्य नाही.

हे सगळं अनुभवाने लिहिलेले आहे महाराजांनी हं! दैवी संपत्ती कशी मिळावी ह्याचं उदाहरण आहे. सहज लीलेने असे गुण प्रकट केलेत. ज्या गुणांच्या बद्दल कधी कल्पनासुध्दा करता येणार नाही. काही रुप नाही काही गुण नाही परंतु हे गुण त्यांनी प्रगट केले. आम्हाला ऐकायला मिळतात, पहायला मिळतात. असा हा भगवान आहे. गुण श्रवण करताना त्यांचेच गुणवर्णन चालल्यामुळे भगवानही त्याच्यात आहेतच. गुणश्रवण करताना कर्णाच्या मार्गाने तो भगवान आत येतो. भक्ताच्या मनाची शुद्धी करतो. पापवासना ह्या मनामध्येच आहेत. कर्णाच्या मार्गाने आत जाऊन तो भगवान भक्ताच्या मनांतील पाप स्वत: धुवून काढतो आहे. मग ते पाप मनात राहाण शक्य आहे का ? श्रद्धेने जर भगवंतांचे चरित्र श्रवण केले तर भगवान अंत:करणामध्ये राहून सगळ्या पापांचा क्षय करतात आणि अशारितीने भगवंतांनी स्वत: पापक्षय केल्यामुळे त्याचे अंत:करणही तिथे एकनिष्ठ होऊन जाते. पवित्र अंत:करण होतं आणि शेवटी तो जीवनमुक्त होतो. संसारातून मुक्त होतो.

जीवनमुक्त म्हणजे त्याचा देह लगेच पडत नाही. मृत्यू नाही. प्रारब्धकर्म चाललेलं आहे. कोणी स्तुती करतील, कोणी निंदा करतील, मान अपमान सगळं चाललेलं आहे. परंतु जीवनमुक्त अवस्था म्हणजे मनातील रागद्वेष सगळे गेलेले आहेत. मन निर्द्वंद्व झालेले आहे. मानापमानाकडे लक्ष नाही. किर्ती अपकीर्तीकडे लक्ष नाही. आणखी रागद्वेष, इच्छा वगैरे मनात काही नाही. प्रारब्धकर्म तेवढे भोगून संपवायचे. तेव्हा देह राहिला काय आणि गेला काय अस त्यांच चाललय. प्रारब्ध संपल की देह पडणार. सुखदु:ख, मान, अपमान, शीत उष्ण हे अज्ञानामुळे निर्माण होणारे द्वंद्व तिथे राहात नाही. अज्ञान गेलेले आहे. त्यावेळेला तो जीवनमुक्त होतो याचा अर्थ त्याला हे काहीही नाही. सुखाबद्दलही काही विचार नाही. दु:खाबद्दलही काही उद्वेग नाही. ही स्थिती होते. प्रारब्ध संपल्याबरोबर देह संपला. कर्म सगळी संपून. गेली. पुन्हा देह संबंध नाही काही नाही. आत्मा आनंदरुप होऊन जातो.

पण हा जो मोक्ष मार्ग आहे तो ज्यांच्या मनात अविवेक आहे, मोह आहे, आसक्ती आहे, त्यांच्या दृष्टीला कधीही पडत नाही. अत्संग आहे, दैवी संपत्ती नाही त्यांच्यासाठी नाही. मोहामध्ये सापडून बाहेरच्याच संपत्तीत आसक्त झालेले त्यांच्या दृष्टीला सुद्धा हा मार्ग पडत नाही. सत्संगती घडत नाही. परमार्थाचा विचार करण्याची प्रवृत्ती होत नाही. ते अज्ञानातच राहातात. हे दोन्ही मार्ग दाखवले.

इथून आता नामधारकाच्या चरित्राला सुरवात होत आहे. प्रत्यक्ष चरित्रावरुन महाराज ही चरित्र सांगताहेत.

ईश्वरापासून कशी सृष्टी झाली याचे विवरण झालेले आहे. हे सगळे जीव जन्माला आहे. त्या जीवांच्या पैकी जे काही शास्त्राप्रमाणे वर्तन करणारे, धर्माचरण करणारे रागद्वेषादिक विकार हे ज्यांनी ताब्यामध्ये ठेवलेले आहेत, दूर केले आहेत. असे जे भक्त आहेत त्यांच्या उद्धाराकरता ईश्वर अवतार धारण करतो, हे सांगितले. तीच कथा आता सांगतायत. गुरुचरित्र सांगायला सुरुवात केली. कलियुगामध्ये झालेले अवतार. दत्तात्रेय हा पूर्व युगातील अवतार आहे. त्यांनीच कलियुगामध्ये पुढे दोन अवतार धारण केले. श्रीपादवल्लभ आणि नरसिंहसरस्वती. ते चरित्र सांगताहेत.

वर्णाश्रमाने जे काही कर्म सांगितले आहे ते करणारा. विद्वान म्हणजे सगळं शास्त्रज्ञानही ज्याने मिळवलेले आहे. कर्तव्यअकर्तव्य सगळे समजून घेतलेले आहे. आणि आश्रमधर्माप्रमाणे वागणारा. सज्जनांना इष्ट म्हणजे सज्जनांचे ज्याच्यावर प्रेम आहे, सत्संगती ही ज्याला घडती आहे, ईश्वराभिन्न गुरुची भक्ती करणारा असा अर्थ केलाय मुद्दाम.

म्हणजे कर्मानुष्ठानाने विविदिशा उत्पन्न झाली. ईश्वराचे ज्ञान, आत्मज्ञान व्हावे अशी इच्छा उत्पन्न झाली. पुढे आता श्रवण, मनन, निदिध्यासन करायचे म्हणजे चित्ताची एकाग्रता पाहिजे. याकरता भगवत् भक्ती. गुरुदेवभक्तः म्हणजे ईश्वराभिन्न गुरु यांची भक्ती करणारा. या उपासनेमुळे चित्त एकाग्र होऊ लागले. चित्त स्थिर झाले. चित्त स्थिर झाल्यानंतर सगळी साधन चतुष्टय संपत्ती आपोआप मिळते. श्रवण मननाला जी काही साधन चतुष्टय संपत्ती पाहिजे. अधिकार पाहिजे, तो आपोआप उत्पन्न होतो. गुरुदेव भक्तीचे हे फल आहे, आणि श्रवण मनन निदिध्यासन वगैरे करणारा 'इहैव भाक्तिंच लभेत मुक्तिम्' असे म्हणतात. हा जो संन्यासी आहे सर्व संन्यास करणारा त्याला याच ठिकाणी मुक्तीआणि भुक्ती दोन्ही प्राप्त होतात. इहलोकातही मुक्ती मिळती, प्रारब्धकर्म जर प्रतिबंधक नसेल तर असे एक सूत्र आहे.

'ऐहिकमपि अप्रस्तुत प्रतिबंधे तद्दर्शनात' व्याससूत्र दिलय त्यांनी.

तर आता मुक्ती मिळती म्हटल्यानंतर त्याला कशाला भुक्ती पाहिजे ? ही एक शंका येती की नाही ? गुरुभक्तीच्या योगाने चित्त स्थैर्य झाले. त्यामुळे तो श्रवणाचा अधिकारी

झाला. कर्माने त्याला आत्मसाक्षात्कार होऊन मुक्ती मिळाली. तर मुक्ती याचा अर्थ विषयांशी काहीही संबंध नाही. निर्विषय मन झालेले आहे. मग भुक्तिम् लभेत् हे कसे काय ? मुक्ती मिळाल्यानंतर भुक्तीचा संबंध काय ? त्याचे असे आहे काही प्रतिबंध जर राहिलेला असेल. वासनाक्षय सगळा झालेला नाहीये. मुक्ती म्हणजे ब्रह्मज्ञान झाले. अज्ञान गेले. सगळे झाले. तरी काही वासना जर शिल्लक राहिलेल्या असतील तर तैत्तीरिय उपनिषदामध्ये आनंद म्हणून सांगितलेत कांही. भुक्ती शब्दाने तो अर्थ घेतलाय. ब्रह्मानंदाचाच अंश आहे तो. ब्रह्मानंदामध्ये त्या सर्वांचा अविर्भाव होतो. देवांचा आनंद, गंधर्वाचा आनंद, देवेंद्राचा आनंद, बृहस्पतीचा आनंद, असे एकापेक्षा एक आनंद वर्णन केलेले आहेत. ते या ठिकाणी त्याला मिळतात, म्हणतात.

तर भुक्ती याचा अर्थ मुक्तीमध्ये म्हणजे त्या ब्रह्मानंदामध्ये सर्वही आनंदाचा अंतर्भाव झाल्यामुळे त्याला भुक्तीही मिळाली असे औपचारिक वर्णन केलेले आहे. आणि असेही आहे की कदाचित पुन्हा जन्म घ्यावा लागला - ज्ञानी माणासाला, वस्तुत: पुन्हा जन्म नाहीय. मोक्षाला प्रतिबंध झाला असेल तर दुसऱ्या जन्मामध्ये मुक्ती मिळते. असा एक सिद्धांत सांगितला आहे. या नंतर आता प्रत्यक्ष चरित्राला सुरवात केली.

एक नामधारक नावाचा साधक, सरस्वतीगंगाधराचा पुत्र, परमेश्वराचा महिमा त्याच्या कानावर आला. अत्यंत श्रेष्ठ असे ज्याचे कर्म आहे अशा परमेश्वराचा महिमा ऐकून एक संसारतापाने तप्त झालेला, त्यामुळे संसारामध्ये ज्याचे मन काही लागत नाही. संसारातून मन उठलेले आहे. आणि भीमा अमरजा संगमाकडे जायला निघाला आहे तो. गाणागापुराला जाण्याकरता निघाला आहे. आश्रिताला कल्पवृक्षासारखा असणारे भगवान त्यांच्याकडे जायला तो निघालेला आहे. परंतु सद्गुरु तिथे अदृश्यच झालेले आहेत. नामधारकाच्या वेळेला होते कुठे ते ? पण तिथे महाराज पादुकारुपाने आहेत म्हणून जाऊन दर्शन घ्यावे या इच्छेने निघालेला आहे. प्रत्यक्ष सद्गुरुंच्या दर्शनाची इच्छा आहे. पण आता तो त्या पादुकारुपी सद्गुरुंचे दर्शन करण्याकरता निघालेला आहे. आणि तो स्तुती करतोय. कलियुगामध्ये मनुष्यरुपाने असणाऱ्या श्रीहरिची स्तुती करायला त्याने सुरवात केली. गणेश आणि शारदेची स्तुती केली. संसार तप्त झालेला तो अत्यंत जिज्ञासू भक्त आहे. आणि त्याची ही स्तुती आहे. श्रध्दाही आहे. पण सिद्धांनी त्याला तुझी श्रद्धा थोडी कमी आहे, असे सांगितलंय पुढे.

ईश्वराचे जे गुण आहेत ते याला पक्के माहीत आहेत. दर्शन मला झाले नाही. म्हणजे तू

मला जाणले नाहीस, मी कोण आहे हे जर तुला कळले नाही तर तुला सर्वज्ञ कसे म्हणायचे ? माझ्याकडे तुमची जर दृष्टी गेली नाही तर तुम्ही विश्वसाक्षी कसे ? मी केलेला शोक तुमच्या कानावर आला नाही असेही म्हणता येत नाही कारण तुम्ही विष्णु आहात. विष्णु म्हणजे व्यापक. सर्व जगामध्ये व्यापून राहाणारे म्हणून विष्णु असे म्हणतात. सर्वव्यापी असताना माझा शोक तुम्ही ऐकला नाही हेही म्हणता येत नाही. ऐकूनही उपेक्षा केली तुम्ही हे तरी कसे शक्य आहे ? हे बरोबर आहे काय ? भक्ताची उपेक्षा बरी नाही. 'न जानिषे' म्हटले तर सर्वज्ञ होत नाही. ती तुमची विशेषणे बरोबर आहेत.नुसती स्तुती नाही ती. खरी विशेषणे आहेत. जर मला तुम्ही जाणले असेल, मी कोणच्या परिस्थितीत आहे, तर हा माझा शोक, ही माझी अशी स्थिती का राहिली ? आपण पाहिलेले असताना माझे दैन्य कसे राहिले ? आपण पाहिलेले असताना माझे दैन्य कसे राहिले ? आपण विष्णु आहात. आपण माझा विलाप ऐकलेला आहे. मग माझा शोक राहिला कसा ? नाही आम्हाला सवड. आम्ही उपेक्षा केली. दयानिधी आपण असताना ही उपेक्षा बुद्धी योग्य आहे का ? म्हणजे जणु काय आपण परमेश्वराजवळ बोलतोच आहोत आणि परमेश्वर सर्वव्यापी आहे अशा समजुतीने त्याची स्तुती चाललेली आहे.

तुला थांबायला वेळ नसेल तर दुसऱ्या देवाकडे जा, म्हणाला, असे कदाचित आपण म्हणाल तर सर्वही देवांचे ईश्वर म्हणजे नियामक आपण आहात. दुसऱ्या कोणच्या देवाकडे जायचे ? आमचे कुलदैवत आपण आहात, हीसुध्दा त्याने जवळीक दाखिवलेली आहे. तेव्हा तुम्हाला सोडून कोणच्या देवाची प्रार्थना मी करावी ? आपण ईश्वर आहात ही जाणीव मला आहे. आपणही मला जाणता आहात. मी कोणच्या कर्मबंधनात, संकटात सापडलो आहे हे आपल्याला माहीत आहे. लौकिक दृष्टांत दिला त्यांनी. व्यवहारामध्ये राजा कोण आहे सर्वांना माहीत असते पण राजा सर्वांना ओळखत नाही. तसे मला माहीती नाही तू कोण आहेस तो. हा राजाचा दृष्टांत म्हणजे तो अज्ञानी आहे राजा. पण आपण तर सर्वज्ञ आहात ना ! आपण ओळखत नाही असे कसे म्हणायचे. त्या नंतर तूं सेवा केली नाहीस, आम्हाला काही दिले नाहीस मग आम्ही तुला कसे द्यायचे ? असेवकाला व अदात्याला जर आपण देणार नसाल तर हे आपल्याला शोभत नाही. कारण दान केले तर त्याला परत द्यायचे. जो देणारा आहे त्याला मागण्याचा हक्क आहे. तूं काहीं दिलेले नाहीस तुला हरकत नाही. आपण जर सेवेची इच्छा बाळगली तर त्याला दाता कसे म्हणायचे ? तसेच दिल्यानंतर मिळेल. असा जो

प्रत्युपकारी आहे तो खरा दाता होत नाही. म्हणून मारुतीरायांचे एक उदाहरण दिले आहे त्यांनी.

सीतेचा शोध करुन आले मारुतीराय त्यावेळी रामराय म्हणाले, तूं जो माझ्यावर उपकार केलास तो माझ्याच ठिकाणी जिरुन जाऊं दे. तुझ्यावर परत उपकार करण्याची इच्छा नाहीये. कारण उपकारकर्त्यावर परत उपकार करावासा वाटणे म्हणजे त्याच्यावर संकट यावे अशी इच्छा करण्यासारखे आहे. दात्याचा स्वभाव किती मोठा पाहिजे. उपकार घ्यायचा, फेडायचा नाही. उपकार फेडायची इच्छा केली की तुझ्यावर संकट यायला पाहिजे. मारुती, तुझ्यावर असे संकट येऊ नये. इतके प्रेम आहे. म्हणून तो सेवकही तसाच असतो. तो स्वामीकडून काही मागत नाही, शुद्ध सेवा करतो.

कोणीही काही न देता आपण काही देत नाही का ? अशी उदाहरणे आहेत. सूर्याचे तेज सर्वांनाच प्रकाश देत आहे. कोणी त्याची सेवा केली की काय केली ? प्रकाश सर्वांनाच द्यायचा. मेघ जो आहे. तो जल सर्वांना देतो आहे. पाणी असेल तिथेही पाऊस पडतो. सगळीकडे पडतो. सम बुद्धी आहे. नामधारकाने ध्रुव आणि बिभिषणाची उदाहरणे दिली. ध्रुवाने आपल्याला काय दिले ? आणि बिभिषणाने काय दिले ? सेवा केली. पण बाह्य जो प्रश्न आहे तू काही सेवा केली नाहीस आणि दिले नाहीस, या दोघांनी काही आपल्याला दिले नाही. या दोघांनाही आपण दिलेले आहे म्हणून मला जे पाहिजे ते आपण द्यावे. आणि मी तरी आपल्याला काय देणार ? आपल्याला देण्यायोग्य काही आहे का माझ्याजवळ ? आपल्याला मी काय द्यावे व आपली सेवा तरी काय करावी ? नवनिधि आपल्याजवळ आहेत. सगळ्या सिद्धी आपल्या दासी आहेत. श्रीही आपली दासी आहे. असे आपण. आपल्याला द्यायचे तरी काय ? सुदामजींनी पोह्याची गाठोडी लपवून ठेवली. आणलय म्हणाले, काही तरी. पण श्रीकृष्णांनीच ती मागून घेतली. आपली सेवा तरी काय करावी आणि आपल्याला द्यावे तरी काय ?

आणखी एक युक्तीवाद केला नामधारकाने. तो म्हणाला, माझ्या पूर्वजांनी तरी आपली सेवा केली की नाही ? राजे सेवकाचे पालन करतात, पण त्या सेवकाच्या कुळातील माणसांचेही पालन करतात मग त्याने सेवा केली नसली तरीही. मग माझी उपेक्षा कां करता ? माझ्या पूर्वजांनी आपली सेवा केली हे तरी खरे आहे ना ? संपूर्ण विश्वाचे संरक्षण करणारे आपण आहात. म्हणजे माझाही हक्क आहे. संपूर्ण विश्वाचे जर आपण पोषण करता तर माझेही पोषण आपल्याला करायला पाहिजे.

अपराध होतात आमच्या हातून. ह्या जीवाला किती सांगायचे ह्याचा आपल्याला विषाद वाटत असेल. तर तेही बरोबर आहे. मानुषी मातेलासुध्दा आपल्या मांडीवर घेतलेल्या मुलाने पाय मारले तरी रागावत नाही मग आपण तर सर्व विश्वाची माता आहात. आई रागावली तर पित्याकडे जाता येईल. पिता रागावला तर आईकडे जाता येईल. कोणी तरी एक संरक्षण करील पण इथे माता पिता दोन्ही आपणच आहात. विश्वपोषण करणारे आपण जर निर्दय झालात तर काय करायचे ? माझ्या एकंदर परिस्थितीमुळे मला वाटू लागले आहे की आपण माझ्या बाबतील निर्दय झाला आहात काय करावे ? आम्ही पापाची निंदाही करतो आणि पापही करतो. मग पाप घालविण्याकरता प्रायश्चित घे, म्हणाला. ते प्रायश्चित माझ्याकडे येतच नाही, म्हणाले. नामधारक पुण्यवानच आहे. पण थोडेसे पाप आहे. पण थोडेसे पाप घडले तर प्रायश्चित घेता येते पण चौथ्या वेळेला व त्याच्या पुढे जर तेच पाप घडले तर त्याला प्रायश्चित नाही.

तसे नामधारकाकडून किंचित पाप घडले असेल पण ज्याच्याकडून पुण्य घडतय तर प्रायश्चित त्याचे पाप घालविल. माझ्यासारख्या पापी माणसाला पाहून ते प्रायश्चित कर्म पळूनच जाईल, म्हणाला. शार्दूलाला पाहून जशी गाय पळून जाईल तसे प्रायश्चितही माझ्याजवळ येत नाही. मी पतितच आहे. पतित म्हणजे प्रायश्चित कर्म सुध्दा करता येणार नाही. असे मोठे दोष झाले तर तो जन्म फुकटच गेला. ईश्वराचे नामस्मरण करीत राहायचे. मालिन्य दोष आहे त्या भीतीने प्रायश्चित करावे. उडदाच्या ढीगामध्ये खडे पडलेले आहेत. ते दिसतील का ? ते वेगळे काढता येतील का ? तसे माझे पाप माझे रुपच झाले आहे. सगळेच पाप असल्यामुळे ते वेगळे काढता आले नाही. त्याने काय होणार आहे ? म्हणून भक्तीयोग हे शेवटचे प्रायश्चित आहे. बाकीच्या कोणच्याही प्रायश्चित्ताने शुद्धी होत नाही. त्यातही जास्त पाप असेल तर प्रायश्चित्त घ्यायचा अधिकारच राहात नाही. प्रायश्चित घेणार कसे ? परदेशामध्ये जाऊन स्नान संध्यादि नित्य कर्म करायचा अधिकार नाही. ती संध्या लोपच पावणार. करुनसुद्धा काही उपयोग नाही.

म्हणून माझ्यासारखा पापी नाही आणि आपल्यासारखा पाप नाश करणारा कोणी नाही. तेव्हा आपण माझे संरक्षण करा. जीवनामध्ये आशेला काही जागाच राहिलेली नाही. धर्मशास्त्राची आशा राहिलेली नाही. पाप घालवायचे कसे ? इतकी विलक्षण स्थिती आहे सध्या. म्हणजे विचार करायला लागले तर काही सुचतच नाही.

ब्रह्महत्या, सुरापान, सुवर्णस्तेय, गुरुतल्पगमन ही चार महापापे आहेत आणि ह्या महापापे

करणाऱ्या लोकांशी ज्याचा संबंध आला तो ५ वा महापापी आहे. संसर्ग हे महापाप आहे. आता हा संसर्ग दोष कसा घालविणार ? म्हणजे सगळीकडे पाप आहे. सुवर्णस्तय इतके भंयकर झाले आहे की सोनार, सराफ सगळे आणखी महापापी झाल्यासारखे आहेत आणि त्याचा संसर्ग तर अवश्य आहे. मग आता कुठले प्रायश्चित्त घ्यायचे ? कृष्णनाम म्हणा भगवंताच्या नामानेच तो दोष दूर होणार आहे.

तेव्हा सगळ्या शीळासुध्दा माझा शोक ऐकून द्रवायला लागल्या पण आपल्याला दया येत नाही. गुरुध्यानामध्ये एकतानता झाली. आणि प्रायोपवेशनाला बसलेला आहे. सर्व संन्यास करुन अनशन करुन बसणे याला 'प्राय' शब्द आहे. तिथेच थांबला तो आणि मग त्याला स्वप्न झालेले आहे. स्वप्न म्हणजे झोप आलेली नाही. ध्यान लागलेले आहे त्याला. एकनिष्ठता उत्पन्न झाली. काही वेळेला जागे झाल्यावरसुद्धा स्वप्न खरे असल्याचे जाणवते.

नवीनच प्रसूत झालेली धेनु जशी वत्साकडे जाते तसे भगवान नामधारकाला दर्शन देण्यासाठी, सिद्धरुपाने आलेले आहेत. तेवढे त्याचे समाधान झाले. प्रत्यक्ष साक्षात्कार अजून झालेला नाही तो पुढे होणार आहे. नामधारकाची भक्ती जास्त दृढ व्हावी म्हणून सिद्धांनी त्याला उपदेश केलेला आहे. ब्रह्मदेवांनी कलीला जी गुरुशिष्यांची कथा सांगितली ती या दुसऱ्या अध्यायात आली आहे. सावध झाल्यानंतर नामधारक जायला निघाले. पण स्वप्नामध्ये पाहिलेले अवधूत काही दिसेना. इकडे तिकडे पहाताहेत. ध्यान सारखे चाललेले आहे. इतक्यात त्यांना प्रत्यक्ष दर्शन झाले. शत्रुमित्र भाव ज्याला नाहीत अशा योगी पुरुषाचे दर्शन झाले. लगेच नमस्कार केला. सद्‌गुरुचे दर्शन प्रथम झालेले आहे. त्यावेळेला त्याची अवस्था काय झाली हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. अगोदरच त्याची वृत्ती कशी होती. कोणी तरी मला दर्शन द्यावे. दत्तात्रेयांनी सद्‌गुरुंनी आपल्याला दर्शन द्यावे अशी आरंभापासून उत्सुकता आहे. स्वप्नामध्ये आणि प्रत्यक्ष दर्शन झाले. सात्विक अष्टभाव उत्पन्न झाले. बोलता येईना. डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या. सद्‌गुरुंच्याबद्दल त्याचे उद्गार आहेत. प्रथम दर्शनी माता, पिता, उपदेष्टा, भीहर्ता आणि भर्ता. सगळी शक्ती आपल्याजवळ आहे. कुठून आलात महाराज आपण आणि निघालात कुठे ? दैवयोगाने मला आज दर्शन झालेले आहे. अनुकूल काल असला म्हणजे सगळे स्वकिय येऊन भेटतात, प्रेम करतात आणि प्रतिकूल काळ आला म्हणजे सज्जनांची भेट होते. स्त्रीपुत्रादि सगळे मी सोडलेले आहे

आणि मुमुर्षु आहे. मृत्युची इच्छा झालेली आहे. जावे आता देह सोडून. आपण माझे सर्व आहात. आपण स्वकिय आहात, संत आहात, गुरु आहात. सिद्धांनी नामधारकाला त्याचा परिचय विचारल्यावर, विचारले 'का ? मृत्युची कां इच्छा झाली तुला ?' त्याने आपले नामधारक हे टोपण नाव सांगितले, निरभिमानत्व दाखवण्याकरता आहे. नावांचाही अभिमान नाही. संसार तप्त मी आहे. आणि सद्गुरुच्या दर्शनाच्या इच्छेने निघालो असताना इतके क्लेश मला झाले, निराश झालो. संसारही सोडून निघालो आणि सद्गुरुंचेही दर्शन होत नाही. त्याला सद्गुरुंचे सामर्थ्य कळलेले आहे. सबंध इंद्रियांना तप्त करणारा हा शोक ह्याला दुसरा कोणीही दूर करणारा समर्थ नाही. आपण एकटे समर्थ आहात. कारण आपले दर्शन झाल्याबरोबरच माझ्या चित्ताला समाधान झालेले आहे. आपणच सर्व दु:ख दूर करणारे आहात हे त्याने आत्मतुष्टीने सिद्ध केले आहे. त्याच्या प्रश्नाला सिद्धांनी उत्तर दिले.

सर्व योगी ज्यांचे ध्यान करतात, ब्रह्मविष्णुशिवरुपी, त्रिमूर्त्यात्मक जे आहेत, ज्यांच्या भक्तांना भक्ती आणि मुक्ती दोन्ही मिळते. भीमातटावर असा जो परमात्मा आहे त्याचा मी शिष्य आहे. म्हणजे मी भीमातटावरुन आलो असे सांगितले असेल.

त्यांनी (सिद्धांनी) जैव्हां सांगितले, भीमातटावर आमचे सद्गुरु आहेत. म्हटल्यावर नामधारक म्हणाले, 'काय हे सद्गुरु. आपण ज्या सदगुरुंचे वर्णन केले तेच भगवान आमचं कुलदैवत आहे. मी एकटाच नाही. आमच्या कुळामध्ये सगळेच त्यांची भक्ती करणारे निघाले. मीसुध्दा श्रध्दा भक्तीने त्यांचे भजन करीत असताना या कष्ट समुद्रामध्ये मला त्यांनी टाकलेले आहे. हे कसे काय ? आपल्या भक्ताला ते भुक्ती, मुक्ती देतात असे आपण म्हणता आणि मी तर अशा कष्ट सागरात आहे.'

त्यावेळेला सिद्ध सांगताहेत, ते सद्गुरु कोण आहेत हे तू जाणलेस का ? उत्पत्ती स्थिती, संहार ही तीन कार्य करणारे जे त्रिमूर्ती आहेत. तत्स्वरुप ते आहेत. म्हणजे या सगळ्या शक्ती त्यांच्या जवळ आहेत. बाकी जगातले कोणीही रागावले तरी ते त्या जीवाचे संरक्षण करु शकतात. लौकिक गुरु जरी रुष्ट झाले तरी त्याचे संरक्षण करायला कोणीही समर्थ नाही. पण बाकी कोणीही रुष्ट झाले तरी हा प्रभु समर्थ आहे रक्षण करायला. मग तू सांगतोस मला कष्ट समुद्रामध्ये का टाकले ? नाही. त्याचा तूं खरा भक्त नाहीयेस. तू त्याला अजून इष्ट वाटत नाहीस, अजून तुला योग्यता यायला

पाहिजे. संशय पुष्कळ येतात. मोठ्या महाराजांनी टीकेमध्ये त्या संशयाचे सविस्तर वर्णन केले आहे.

परमर्थामध्ये असे संशय पुष्कळ येतात. 'अयं आत्मास्थूलदेहरुपोवासूक्ष्मदेहरुपोवा' हे सगळे संशय आहेत. विचाराला उपयोगी आहेत. ताभ्यांव्यतिरिक्तोवा. स्थूल किंवा सूक्ष्मदेहरुप आहे आत्मा का यांच्यापेक्षा वेगळा आहे ? हा एक संशय. असे अनेक संशय आहे. तो जो आत्मा आहे या स्थूल देहांपेक्षा निराळा आहे. बरं तो अणु आहे की शरीर इतका आहे का सर्वव्यापी आहे ? हे तीन संशय. हे सगळे शास्त्रामध्ये आलेले आहेत. तो अचेतन पदार्थाप्रमाणे जड आहे किंवा जड आणखी चेतन दोन्ही आहे ? काजव्याचा दृष्टान्त देतात. तो एकदम प्रकाशमान होतो एकदम अंधार पडतो. असा आहे का आत्मा ? थोडासा प्रकाशित होणारा थोडासा जड असणारा ? कि नित्य प्रकाशमान आहे ? हा जो 'अहम्' आहे जीवात्मा हा ईश्वरापेक्षा वेगळा आहे. की ईश्वररुप आहे ? हे झाले संशय आत्म्याबद्दल.

प्रपंच खरा आहे की खोटा आहे, हे सगळे संशय आहेत ना ! कर्म, योग का ज्ञान या पैकी मोक्षाचे साधन कोणते आहे ? एक निश्चय होत नाही ना ! असा संशयात्मा. संशय दूर करण्याकरता वेदांतशास्त्रामध्ये भरपूर युक्तिवाद आहे. युक्तीने ते सिद्ध करु शकतात. त्याच्यावर विश्वास नाही. संशय घ्यायचे पण संशय दूर करणारे जे वेदांतशास्त्र आहे त्याच्यावर विश्वास नाही. मग ते जाणार कसे ? त्रयात्मक श्रीगुरुंनी ज्याला सोडलेले आहे आणि तो स्वत: संशयात्मा बनलेला आहे. त्याचे संरक्षण करणारा कोण आहे ? नुसते ईश्वर श्रेष्ठ आहे सांगून काय उपयोग ? म्हणजे जीवानेसुध्दा आपली साधकदशा पक्की बनिवली पाहिजे. हे त्यांना म्हणायचे आहे. सगळेच आपण करणारे आहात. भक्तांचा उद्धार करणे वगैरे आपले ब्रीदच आहे. अशी नुसती स्तुती करुन काय उपयोग ? आम्हाला काही करायला नको. आम्ही संशय घेतच राहाणार असे नाहीये.

नामधारकाने हे सगळे ऐकले. त्याने काही संशय काढले नाहीत. किंवा सिद्धांच्याबरोबर प्रत्यक्ष वादविवाद केला नाही. ईश्वराची मानसिक भावना धारण करुन तो बोलला, आपण सर्वज्ञ आहात, सर्वव्यापी आहात. आता हे लौकिक गुरु रागावले तरी कोणी संरक्षण करु शकत नाहीत असें आपण म्हणालात, आणि बाकी कोणीही रागावले तरी हे सद्‌गुरु संरक्षण करु शकतात. त्याबद्दल त्याचा प्रश्न आहे. तो म्हणाला, ह्याला

पूर्वीचा एखादा दृष्टांत असला तर सांगा, हा त्रयात्मा कसा ? ब्रह्मा, विष्णु, शिवरुपी हा कसा आहे ? माझ्या मनांत संशय आहे. हे त्याने कबूल केले पण तो आपण दूर करा.

सिद्धांनी आता त्याला सांगायला सुरवात केली. पण थोडक्यात सांगितले. निरिच्छ आहे. काही इच्छा नाही काही नाही. प्रलयकाल झालेला आहे. अगोदर योगनिद्रित आहेत. योगनिद्रा ईश्वराला लागल्यानंतर सगळ्या जगाचा प्रलय होतो. कर्म जो पर्यंत आहेत जीवांची, ती कर्म फल देत असतात. फलोन्मुख झालेल्या कर्मांना प्रारब्ध म्हणतात. संचित असलेली, शक्ती आहे. त्याच्यामध्ये. ते संचित कर्म आहे. नुसत्या वासनांमुळे घडणाऱ्या कर्मांना क्रियमाण कर्म असे म्हणतात. ही कर्म सध्या चालू आहेत. काही सुप्त शक्ती आहे काही प्रगट झालेली शक्ती आहे. त्यानी प्रारब्धकर्माचे फळ मिळते. पण ह्या सगळ्याही कर्माची शक्ती म्हणजे कर्म वासना आहेत. सगळे संस्कार कर्माचे ह्या सगळ्याही कर्म संस्कारांशी ईश्वराचा संबंध आला. संस्कारांशी संबंध आहे, कर्मांशी नाही. कर्माशी संबंध असताना सृष्टी आहे. सगळ्याही जीवांचे जे वासनारहीत मन आहे त्या वासनेला प्राधान्य देऊन वासनारहीत मनाशी ईश्वराचा संबंध झाला म्हणजे त्याला योगनिद्रा म्हणतात. योग नावाची निद्रा. प्रत्यक्ष अशी झोप नाही. वासनेशी संबंध आल्यावर कर्माचे बाह्य स्वरुप थांबलेले आहे. कर्माची बाह्य शक्ती सृष्टी शक्ती वगैरे थांबली. फक्त वासना रुपाने कर्म आहेत आणि तसे मन. त्या मनात विलीन झालेले जीव (मन म्हणजे जीव वगैरै) इथे भगवंताचा संबंध आल्या बरोबर प्रलय झाला. कर्माचा प्रत्यक्ष संबध सृष्टीशी आहे ना तो आता सुटलेला आहे. मग प्रलय झाला. त्या योगनिद्रेमध्ये असणारा ईश्वर - बरं ईश्वराला स्वत:ला तर काहीच इच्छा नाही. सृष्टीला उत्पन्न करणारा कर्माचा प्रत्यक्ष संबंध आता बंद झालेला आहे. कर्म फक्त आता वासनारुपाने आहे. अशावेळी 'बहुस्याम्' अशी वृत्ती उत्पन्न झाली. तिला अविद्या वृत्ती म्हणतात. बहुस्याम् असा संकल्प झाल्याबरोबर सगळे जग निर्माण झाले.

अगदी आरंभी ब्रह्मदेव उत्पन्न झाले. ईश्वर विभागामध्ये एक ब्रह्मदेव आहेत. हे जीव विभागातले ब्रह्मदेव आहेत. ह्यांना आदिजीव म्हणतात. शंभर ब्राह्मणाच्या जन्मात उत्तम कर्म ज्याने केलेले असेल तो ब्रह्मदेव होतो म्हणतात. त्यात थोडीही चूक चालत नाही. म्हणजे शंभर जन्म उत्तम कर्म करणारा केवढा पुण्यशील असेल. एक जन्म नाही. असे ते ब्रह्मदेव प्रथम उत्पन्न झाले. मनानेच सर्व वेद त्याच्या स्वाधीन केले. सगळे ज्ञान त्यांना दिले. पुढची सगळी सृष्टी त्या वेदांतील ज्ञानाप्रमाणे ब्रह्मदेवांनी केले.

ब्रह्मदेवांनी प्रथम कालविभाग केले. चार युग उत्पन्न केली. त्यांचे त्यांचे युगधर्म ठरवून दिले. त्यात कलियुगही आलेले आहे. वर्णाश्रम विभाग उत्पन्न केले. मनुष्याच्या स्थैर्य, सुखासाठी हे सर्व उत्पन्न केले. वर्ण विभाग तसेच ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ, संन्यासी हे आश्रम उत्पन्न केले. कृतयुगात वैराग्य आणि ध्यान हे प्रधान धर्म आहेत. ह्या युगातील बहुतेक सगळी मंडळी या दोन गोष्टीकडे जास्त लक्ष देणारी होणार. म्हणून उदयनाचार्यांनी आपल्या कुसुमांजलीत वर्णन केले आहे. पूर्व कालात ब्राह्मणाच्या घरीसुध्दा कोणी अतिथी जात नव्हते. अतिथी मिळवायला त्यांना कष्ट पडायचे. वाटेल तिथले अन्न खाणारे लोक सध्या आहेत. आता कोणीही मिळतील. वैराग्य प्रधान असल्यामुळे अतिथी वगैरे बाकीच्या धर्मांना काही महत्त्व नव्हते.

यज्ञयाग वगैरे त्रेतायुगात सुरु झाले. भगवन्नाम संकीर्तन हा कलियुगाचा तारक धर्म आहे. चार वर्ण, चार आश्रम सगळे निर्माण केले. पुण्य पाप आहे. उग्रता शांती आहे, दया निष्ठुरता वगैरे सर्व द्वंद्व त्यात आहेत. आता सृष्टी कार्य चालू व्हायचंय. प्रत्येक युगात काल मर्यादित आहे. कृतयुगाचा काल १७,२८,००० वर्षे १२,९६,००० वर्षे त्रेतायुगाचा काल, ८,६४,००० वर्षे द्वापारयुगाचा काल, सगळेच त्यांनी ठरवायचे ना! प्रत्येकाची मर्यादाही त्यांनी ठरविली. कलियुगाचा काल ४,३२,००० वर्षे. आतापर्यंत ५,००० वर्षे झाली आहेत. अजून इतका काल जायचाय कलीचा. पुढे काय काय होणार आहे हे कालच्या अध्यायात त्यांनी सांगितले. माणसे, झाडे लहान आकाराची होतील. १६ व्या वर्षी म्हातारपण येईल, दहाव्या वर्षी मुली प्रसूत होतील.

कली यायला निघाला असताना त्यांनी त्याला एक गुरु कथा सांगितली. कली बलवान आहे. पण त्यालाही सावध राहायला सांगतिले. म्हणजे आरंभाला कलीलासुध्दा इथे यायच्या वळेला भीती वाटलेली आहे. त्यावेळी सगळे धर्माचरण चालू होते. कमी कमी झाले तरीसुध्दा. कलीने विचारले, धर्मबल असलेले शांत, सज्जन लोक ज्या ठिकाणी असतील त्या ठिकाणी मी कसा जाऊ? मी धर्म मर्यादा तोडून टाकणारा आहे. सगळीकडे कलह, शोक, द्वेष, ताप करणारा मी आहे. दुसऱ्याचे धन, स्त्री हरण करणारा माझा भाऊ आहे. ज्याने कामक्रोधादि षड्विकार जवळ बाळगले आहेत तो मला प्राणप्रिय आहे. आपले आश्रम (ब्रह्मचारी, गृहस्थ इ) ज्याने सोडून दिलेले आहेत तो मला अतिशय प्रिय आहे. नास्तिक, अधार्मिक मला अत्यंत जवळचे वाटतात. गुरु, ईश्वर, संत, सद्विप्र, पितृधर्मपर अशा लोकांना पाहिल्याबरोबर माझे प्राण बाहेर

जातात. त्यातल्या त्या योगी किंवा ज्ञानी पुरुषाला पहाता क्षणीच माझे प्राण जातात. अशा ठिकाणी मी जायचे कसे, माझे तिथे जमायचे कसे ? हा त्याचा प्रश्न आहे. मला अनुयायी कसें मिळतील ? माझ्यासारखे अनुयायी मिळाले पाहिजे.

ब्रह्मदेव उत्तर देताहेत. असुरी संपत्ती बरोबर घेऊन जा. दंभ, दर्प, अभिमान क्रोध, अज्ञान, वगैरेही सगळी गुण संपत्ती घेऊन जा. मनुष्याला जास्तीत जास्तच १०० वर्षे आयुष्य आहे. पण एखादा जर चांगला कोणी भगवत् भक्त उत्पन्न झालाच तर त्याच्या वाटेला जाऊ नकोस. गुरु, देव मातापिता विप्र वगैरेची सेवा करणारे जे असतील त्यांना तुझा काही दोष लागणार नाही.

कली जर प्रतिज्ञा करुन येतोय तरी ब्रह्मदेवांनी हे मुद्दाम सांगितले आहे. ते पुढे म्हणाले, विशेषत: गुरु भक्तांना तर तुझा काहीच दोष लागणार नाही. पाण्याने कमल पत्र लिप्त होत नाही. पाण्यात घातले तर पाणी त्यावर राहात नाही. त्या प्रमाणे जो गुरु भक्त आहे त्याला जिंकायला देव सुध्दा समर्थ नाहीत.

कलीने विचारले, सर्व देवांपेक्षाही गुरु श्रेष्ठ हे कसे काय ? आणि गुरु प्रिय जो आहे त्याला कोणीही जिंकू शकत नाही याबद्दल एखादे उदाहरण सांगा

ब्रह्मदेवांनी मग कलीला थोडक्यात गुरुंचे महात्म्य सांगितले. ज्ञान हे गुरुशिवाय होणार नाही. हा एक सिद्धांत सांगितला.

इंद्र बृहस्पतीकडे ज्ञान मिळवण्यासाठी गेले, अश्विनी कुमार दधिची ऋषीकडे गेले. त्या गुरु भक्तीने त्यांचे कार्य झालेले आहे. देवसुद्धा गुरु भक्तीने कृतार्थ झाले, म्हणून गुरु हे देवापेक्षांही श्रेष्ठआहेत. स्वर्गस्थ इंद्रादिक देवांनासुद्धा संसार आहे म्हणतात. जन्माला आल्यानंतर भूक आणि तहान हे पहिले बंधन आहे. ही भावना मानवांप्रमाणे पशु, पक्षी, देवांनासुध्दा आहे. म्हणजे संसार त्यांनाही आलाच की, ते काही मुक्त नाहीयेत. पण त्यांनीसुध्दा गुरुंना शरण जायला पाहिजे. मनुष्यांना कर्मानुष्ठान आहे, ईश्वरभक्ती वगैरे साधने आहेत. देव मुक्त कसे होणार ? त्यांना मुक्तीचे काय साधन आहे ? त्यांनी कर्मानुष्ठान, यज्ञ कोणच्या देवाचे करायचे ? इंद्राने दुसऱ्या कोणत्या इंद्राला यज्ञात आवाहन करायचे ? कर्म नाही त्यांना, कर्म केले नाही तर अंत:करण शुद्ध होणार नाही आणि अंत:करण शुध्द झाल्याशिवाय मोक्ष त्यांना कसा मिळेल ?

काय आहे, देवांना मोक्ष कसा मिळतो ? संसार कुठे आहे देवांना ? संसार आहे,

म्हणाले, तहान, भूक आहे की त्यांना सुध्दा . तर ती असेल. मग साधन कुठे आहे मोक्षाचे त्यांना ? मनुष्यांना कर्माचा अधिकार आहे, कर्माने अंत:करण शुद्ध होते, वैराग्य उत्पन्न होते, श्रवण, मनन घडते. असे देवांना कुठायं ? कर्माचा अधिकार नाही काही नाही. त्यांना उपनयन संस्कार नाही. सर्व वेद ज्ञान त्यांना जन्मत:च आहे. वेदाध्ययनासाठी मनुष्यांना जसा उपनयन संस्कार आहे तसा देवांना नाही. अंत:करण शुद्ध आहे. त्यामुळे कर्माची अपेक्षा नाही. त्यांना जर वैराग्य उत्पन्न झाले तर योग्य गुरुंकडून ज्ञान प्राप्त करुन घेऊ शकतात. कर्मानेच अंत:करण शुद्धी होते असे नाही. त्यांचे अंत:करण पूर्वीच्या कर्माने शुध्द झालेले आहे, मनुष्य जन्मामध्ये असताना. तेव्हा देवयोनीमध्येसुध्दा मोक्षाचा अधिकार आहे. श्रवण, मनन वगैरे करु शकतात. ब्रह्मज्ञान मिळवू शकतात. हे त्यांनी सांगितले.

उपनिषदामध्ये एक कथा आहे. इंद्र प्रजापतीला शरण गेला. दैत्यांचा राजा विरोचनही प्रजापतीला शरण गेला. आत्मस्वरुप कसे आहे हे समजून घेण्याकरता आले, म्हणाले, प्रजापतींनी आरंभालाच त्यांना सांगितले,उत्तम पोशाख करुन या. अलंकार घाला. आरशामध्ये पहा हाच आत्मा आहे. विरोचनाला ते पटले. आरशात दिसणारे आपले प्रतिबिंब म्हणजेच आपला देह हाच आत्मा आहे. हा देहात्मववाद घेऊन तो दैत्यलोकाला परत गेला. दैत्यांच्यात त्याने या देहात्मवादाचा प्रचार केला.

इंद्राला वाटले हा देह आत्मा कसा होईल ? हा देह तर विनाशी आहे. त्याने तसे प्रजापतींना विचारले. ते म्हणाले, २ २ वर्षे ब्रह्मचर्य धारण करुन मग मला हा प्रश्न विचारायला ये. असे ३ वेळा त्याला सांगितलेले आहे. २ २ X ३ = ९ ६ तीन वेळा तो शंका घेऊन आला. शेवटच्या वेळेला आल्यानंतर, आणखी ५ वर्षे ब्रह्मचर्य पालन करुन ये, म्हणाला, आणि नंतर त्याला आत्मस्वरुपाचे ज्ञान झाले आहे. म्हणजे १ ० १ वर्षे ब्रह्मचर्य धारण करुन राहिल्यावर त्याला ते ज्ञान मिळाले. अशी योग्यता नसेल तर शब्दाचा अभिप्राय निराळाच वाटतो. सद्गुरुंच्या शब्दांचा योग्य तो अर्थ समजतच नाही.

म्हणजे देवांनासुध्दा गुरुभक्तीचे ज्ञान प्राप्त होते. म्हणून गुरु भक्ती हे मुख्य साधन आहे, मनुष्याला.

गोदावरी तीरावर राहाणाऱ्या वेदधर्मा ऋषींना पुष्कळ शिष्य होते. वेदधर्मा ऋषींनी या शिष्यांची निष्ठा कशी आहे हे एक दिवस पहायचे ठरवले. स्वत:चे प्रारब्ध जाणणारे ते

ज्ञानी महात्मे होते. त्यांनी शिष्यांना सांगितले, 'तपश्चर्येने माझे पुष्कळसे पाप गेले आहे. थोडे भोगायचे शिल्लक राहिले आहे. त्यामुळे माझ्या शरीरात व्याधी निर्माण होणार आहे. त्या व्याधिरुपाने ते भोगायचे आहे. त्यासाठी मी काशीत जाऊन राहाणार आहे. तेव्हा तिथे माझे रक्षण (सेवा, शुश्रुषा) करायला तुमच्या पैकी कोण यायला तयार आहे?' प्रथम सगळे शिष्य म्हणाले, 'आम्ही येऊ', तेव्हा वेदधर्मा ऋषी म्हणाले, तिथे आपली जेवाखायची उत्तम सोय आहे. केव्हा तरी गुरुंजवळ जायचे आणि थोडा वारा घालून यायचे असे नाही. माझ्या संबध शरीरातून कुष्ठरोग वाहाणार आहे. माझ्या अंगावर माशा येऊन बसणार. त्या दूर केल्या पाहिजे. माझे अंग स्वच्छ धुवून काढले पाहिजे. मला भिक्षा मागून अन्न आणून दिले पाहिजे. ही सगळी सेवा करायची. कोण माझे रक्षण करणारा आहे? हे त्यांनी सर्वांच्या समोर मांडले.

सगळे गप्प बसले. ही सेवा काही शक्य नाही. कठीण आहे. दीपक नावाचा एकच शिष्य मात्र ही सेवा करायला तयार झाला तो म्हणाला, दोष शिल्लक ठेवणे योग्य नाही. कारण तो दोष मोक्षाला विघ्न उत्पन्न करेल. तेव्हा तुमचे जे प्रारब्ध आहे. ते मी माझ्या देहाने भोगीन. म्हणजे नुसती सेवा करायची तयारी नाहीये. गुरुंचे सगळे भोग भोगायची तयारी आहे. म्हणजे केवढी उच्च भक्ती आहे!

वेदधर्मा म्हणाले, ह्या भोग भोगण्यास प्रतिनिधी चालत नाही आणि पापभोगाचा प्रतिनिधी कोणी होणार नाही. पुण्य भोगणारे पुष्कळ तयार होतील. देणारेही तसेच पाहिजेत. पुण्य घेऊन जा, बाबा. तसे देतात म्हणा शेवटी. ज्ञानी मनुष्य आपला देह सोडायच्या वेळेला दुसऱ्याला भोग देऊ शकतो असे म्हणतात. साधू, सत्पुरुष देह ठेवायच्या वेळी त्यांचे धन वगैरे जे काही असेल ते मुलाबाळांना मिळते. सगळ्या कर्मातून तो मुक्त होणार आहे. त्याची मनोभावे सेवा करणारे जे भक्त आहेत त्यांना पुण्य जाते आणि तो सत्पुरुष मोकळा होतो. ही अशी वाटणी केलेली आहे. तेव्हा मला स्वत:लाच तो भोग घ्यायचाय काशीमध्ये जाऊन. शक्ती असेल तर माझे रक्षण कर.

वेदधर्मा मोठे तपस्वी पुरुष केवढे तप केलेले. केवढे ज्ञान मिळवलेले. केवढ्या सिद्धी मिळाल्या होत्या. शिष्याला लगेच त्यांनी कृतार्थ केले ना! म्हणजे हे ज्ञान स्वयंसिद्ध आहे. पण अशा स्थितीमध्येसुध्दा एकदम कुष्ठरोग झाला. अंध जाले. दीपक त्यांची सेवा करु लागला. गुरुंच्या शरीरारवर व्रण झालेले, जखमा झालेल्या, त्याच्यातून रक्त, पू वाहात होता. त्या व्यथेमध्ये कार्याकार्याकडे लक्ष लागत नाही. विरुध्द

आचरण करु लागले. बोलू लागले, शिष्याला मारु लागले. सेवा करायला लागल्यानंतर एकदम म्हणायचे, 'भिक्षा मागून आण. मला भूक लागली आहे.' बरं भिक्षा मागतोस? वाटेल तसे बोलायचे. आणि त्याने जर सांगितलेले ऐकले नाही तर मारावे त्याला.

पण दीपकाच्या मनाला एकदासुद्धा खेद नाही कांही नाही. म्हणजे सेवेच्या वेळेलाच ज्ञान झाले आहे. देह तादात्म्य गेले त्याचे ना! देह तादात्म्य असताना गुरु बोलले, मारले तर लगेच राग यायला हवा त्याला. पण त्याला राग आला नाही. म्हणजे इतकी कर्तव्य निष्ठा, गुरुभक्तीचे साधन इतक्या कठोरपणाने पालन करतो आहे, की मानापमान नाही. जर मनाला वाटले मी इतके करतो, तरीसुध्दा ह्यांना पसंत पडत नाही? असा केव्हाही त्याच्या मनांत विचार आलेला नाही. दीपकाने मागून आणलेली भिक्षा, हे कसले आणलेस अन्न, असे सांगून गुरुंनी ती फेकून द्यावी. चांगले पक्वान्न घेऊन यायला सांगावे, बरं बाबा, निघाला भिक्षा मागायला. तेवढ्यात म्हणाले, 'थांब माझी देहशुध्दी तू केली नाहीस कुठे जातोस? ह्या सगळ्या माशा चावतायतात.' बरं बाबा राहिलं. नाही जात भिक्षेला. त्यांने अंग स्वच्छ करायला सरुवात केली की म्हणावं, 'काय कळत नाही तुला? मला इतकी भूक लागलेली असताना हेच करीत बसलास तू?' असे पुन्हा त्यावेळेला बोलायचे. लवकर अन्न आण, याचना करुन त्याला भिक्षा आणावी लागत होती त्याला आणि ह्यांनी ती फेकून द्यावी. आमचे गुरुमहाराज आजारी आहेत त्यांना परत भिक्षा द्या, असे मागूनच आणावे लागेल की नाही. त्यावेळेला भिक्षा देणारे चांगले भेटले तर ठीक, नाहीतर त्यांचे पुन्हा शिव्याशाप खायचे. नाही तर दुसऱ्या घरी जायचे. म्हणजे किती छळ आहे हा जेवण वगैरे झाल्यावर एखादे वेळेला म्हणावे दीपका, 'दमलास रे का. तू फार सेवा केली नीज बाबा तू.' जर दीपकने अंग टाकले की म्हणावे, 'अरे भूक लागली.' म्हणजे चालला लगेच भिक्षा मागायला. बाहेरचे शिव्याशाप खायचे, गुरुचे खायचे.

पण दीपकाचे अंत:करण शुद्ध आहे. निराशा नाहीये. तितिक्षा, देहात्म विवेक वगैरे सगळा अभ्यास झाला आहे. **मग ज्ञान व्हायला काय वेळ लागणार?** इतका छळ केला तरी दीपकाच्या मनामध्ये काही खेद नाही. स्वत:च्या देहाकडेसुद्धा लक्ष न देता अहोरात्र सद्‌गुरुंची सेवा करतो आहे. त्याला स्वत:ला जेवायला कुठला अवसर मिळणार. गुरु म्हणाले, 'नीज जरा, दमलायस.' पण कुठले निजायला. लगेच पुन्हा हांक मारलीच. आपले सद्‌गुरुनाथ हे सर्व देवांचे नियामक आहेत ही बुद्धी त्याची आहे.

आणि सेवा करतो आहे. क्षुधा, तृष्णा सगळे गेलेले आहे. मनोनिग्रह, इंद्रियनिग्रह सगळा झालेला आहे. अशी सेवा चालली आहे. सद्‌गुरुंच्या चरणाचे तीर्थ हेच गंगाजल आहे. सद्‌गुरु हे साक्षात् विश्वेश्वर आहेत, आनंदनिधी आहेत, ही खात्री मनामध्ये ठेवून आपले मन त्याने इतरत्र कुठेही जाऊ दिले नाही.

सद्‌गुरु महाराज ही त्याची परीक्षा पहाताहेत. असा एक उद्देश दिलेला आहे. **शिष्याची परिक्षा पहाण्याकरता असे क्लेश भोगताहेत**. त्या गुरुभक्तीमुळे पवित्र झाला आहे. ईश्वरसाक्षात्काराची योग्यता त्याला मिळाली आणि विश्वेश्वर त्याचेजवळ आले. विश्वेश्वरांनी दर्शन दिले. म्हणाले, तुला वर देण्याकरता मी आलोय. तुला पाहिजे तो वर मागून घे. तुझे कल्याण होईल. दीपक म्हणाला, 'मला काही वर बीर नको, आपले कुष्ठ दूर व्हावे अशी जर गुरुमहाराजांची इच्छा असेल तर मी त्यांना विचारुन येतो.' **रोजच्या रोज गुरुंचे शिव्याशाप कशाला खायचे त्यापेक्षा ते बरे व्हावेत असा वर तो परस्पर मागू शकला असता** पण नाही त्यांना विचारुन येतो, म्हणाला. पण तसे मनांत नसल्यामुळे, गुरुमहारांजांची तशी इच्छा असेल तर वर तसा मागतो, म्हणाला. आत येऊन गुरु महाराजांना विचारले, 'विश्वेश्वर वर द्यायला आलेत. तुमचे कुष्ठ बरे व्हावे म्हणून वर मागू का?' ते म्हणाले, 'नाही. **भोग भोगूनच प्रारब्ध सारायचे असते**. मला तसा वर नको. ईश्वराच्या वराने बरे व्हायचे नाही. माझ्या सेवेबद्दल तुला भीती वाटायला लागली की काय? मग आलासच कशाला सेवा करायला?' शंकराच्याजवळ येऊन सांगितले, 'गुरुमहाराजांची इच्छा नाहीये. त्यांचे क्लेश शांत करण्याकरता मी वर मागणार होतो. त्यांना तशी इच्छा नाही मलाही इच्छा नाही.' विश्वेश्वरांचा हा पहिलाच प्रसंग आहे. **सगळे मागणारेच असतात. अर्थार्थी असतात**. हा अर्थार्थी नाही. म्हणजे केवढी योग्यता त्या दीपकाची आहे.

खिन्न झाले विश्वेश्वर. निर्वाण मंडपात सगळे विष्णु वगैरे देव बसले होते तिथे आले. त्यांनी सर्वांना सांगितले. वेदधर्मा ऋषी अतिशय रागीट आहेत. रोगी झालेले आहेत. आणि त्यांचा शिष्य मात्र उत्तम आहे. त्यांची सेवा करण्यात क्लेश मानत नाही काही नाही. वर देण्याकरता मी गेलो पण केवळ गुरुंची इच्छा नाही म्हणून मी वर देत असतानाही घेतला नाही. **सर्व व्यवहारापासून दूर झालेला आहे. उपरति ज्याला म्हणतात**. शंकर, विष्णु सगळ्या देवांना कौतुक वाटत आहे. एवढा हा गुरुभक्त कोण आहे असे वाटून त्याला पहाण्यासाठी विष्णु आपण होऊन आलेले आहेत. हे मोठे

साधन आहे. कोण आहे असा दीपक हे पहाण्याकरता आलेत. म्हणाले, ''बाळ मी वर द्यायला आलोय. वर मागून घे. तप आहे, अष्टांग योग आहे. मननादिक सत्कर्म आहेत. उपवास आहे, व्रत आहे, अशा कोणच्याही धर्माने मी काही दर्शन देत नाही. **माझे दर्शन, गुरु, सद्विप्र यांचा जो भक्त आहे**. माझ्याकडे ज्यांचे अंत:करण लागलेले आहे. असा जो झालेला आणि जी पतिव्रता, पतिनिष्ठ स्त्री आहे. तिला मी दर्शन देतो. अत्यंत कष्टाने तूं सद्गुरुंची सेवा केलेली आहेस. त्यामुळे माझ्या मनाला संतोष झालेला आहे. तुला काय मागायचा तो वर मागून घे.''

दीपक म्हणाला, 'सद्गुरु महाराज हे देवदेव आहेत. सगळ्या देवांचे देव आहेत. त्यांच्यापासून ज्ञान मिळणार आणि मोक्षही तेच देणारे आहेत. तेव्हा दुसऱ्या कोणाकडे मला काही मागायचे नाही. आपल्यासारखे देव इथे यायला लागले म्हणजे आमची बुद्धी योग्य आहे असेच झाले की नाही!' मनाचा काय विश्वास आहे वा, वा, इतकी सेवा मनापासून करतो आहे पण मनावर विश्वास नाही वाटला. तो म्हणतो, 'हृषिकेश आपण आहात. इंद्रियांचे अधिपती. विश्वेश्वरांना तसेच परत जावे लागले. तसे परत जाणं जर आपल्याला बरं वाटत नसेल तर माझ्या **चित्तामध्ये सद्गुरुंची स्थिर भक्ती रहावी** दुसरा वर मला नको.' इतकी भक्ती असताना देवांनी आपल्याकडे लक्ष दिले पाहिजे हे सुचविले आहे त्याने. तुम्ही (विष्णु) सगळ्या इंद्रियांचे अधिपति आहात ना! मागितले तेवढाच वर देव देत असतात. आपण होऊन जास्ती काही देत नाहीत.

पण इथे मात्र त्याला आपण होऊन देताहेत. विष्णु म्हणाले, गुरुभक्ती तुझ्याकडे आहेच ती काय द्यायची. तूं न मागितलेले मी देणार आहे. तुला भक्ती आणि मुक्ती मिळेल. तुझी उत्तम कीर्ती होईल. तुझ्या चरित्राचे चिंतन करणाऱ्याचाही ताप दूर होईल **देवाच्या वराने त्याला विषय भोग मिळाले. त्यामुळे त्याला आसक्ती निर्माण झाली नाही**. सुदामजींना जरी संपत्ती दिली तरी ते आसक्त झाले नाहीत. तपश्चर्येने मिळवलेली संपत्ती मात्र आसक्ती निर्माण करते,. **अध:पात करते**. भगवान म्हणाले, **'जो भक्त सदगुरुंची सेवा करतो. त्यांच्याजवळ ज्ञान मिळवतो त्याच्या संन्निध मी असतो. अशा भक्ताला कालापासूनही भीती नाही. सर्व सिद्धी त्याच्या दासी होतील.'** असे सांगून भगवान् श्रीहरि गुप्त झाले.

तो आत आल्यावर वेदधर्मा ऋषींनी विचारले, 'काय रे विष्णुजवळ काय मागितलेस

तू ? काय दिले त्यांनी ?' तो म्हणाला, 'मी काहीच मागितले नाही, त्यांनी जे जे देतो सांगितले ते मी ऐकले आणि आलो.' झालं. परिक्षा संपली,सद्‌गुरुंनी त्याच्या मस्तकावर हात ठेवला. त्याला तत्क्षणी सर्व ज्ञान झाले. स्मरण करणाऱ्यांचासुद्धा ताप दूर करण्याची योग्यता दीपकाच्या ठिकाणी आली. तो जीवनमुक्त झाला. वेदधर्मा ऋषींचे पाप शिल्लक होते असे म्हणता येईल का ? **काशीक्षेत्राचे माहात्म्य वाढवण्यासाठी त्यांनी कुष्ठरोग घेतला. काशीक्षेत्राचे माहात्म्य इतके आहे की कितीही पाप असले तरी काशीमध्ये ते जाते. प्रारब्ध संपते आणि शिष्याचा गुरुभाव किती आहे याची परिक्षा करायची** केवढी परीक्षा आहे ही! **शिष्याचा भाव पक्का करायचा आहे. त्याकरता वेदधर्मा ऋषींनी कुष्ठरोग घेतला.**

ब्रह्मदेव कलीला म्हणाले, अशा पुष्कळ गुरुकथा आहेत की ज्या वक्ता आणि श्रोता यांच्या पापांचा नाश करतात. तेव्हा भूलोकावर जा पण अशा गुरुभक्ताकडे नजरसुध्दा टाकू नकोस. तुझी अवस्था काय होईल याचा विचार कर. त्याला ताकीद दिली.

सिद्ध सांगतात, नामधारका, हे वेदधर्मा म्हणजे लौकिक गुरु आहेत. ज्ञानी झालेले आहेत, ईश्वराभिन्न आहेत. पण त्या लौकिक गुरुंचाही महिमा एवढा आहे की इतर देवांकडून त्याचा शिष्य वर घ्यायलाही तयार नाहीये. हा परमात्मा (नरसिंहसरस्वती) गुरुस्वरुप घेऊन आलेला आहे. त्रिमूर्ती स्वरुप आहे. सात्विक वृत्ती धारण करुन दृढ भक्तीने सद्‌गुरुंचे जे भजन करतात, ते गुरुभक्त कृतकृत्य होऊन जातात. संशय घेणाऱ्यांना काहीही मिळत नाही. तेव्ह नामधारका, तुला जर कल्याण व्हावे अशी इच्छा असेल तर दृढ श्रद्धेने आणि संशय मनात न आणता सद्‌गुरुंचे भजन कर. मनुष्यरुपाने तेच आलेले आहेत. म्हणजे भवसमुद्र पार करुन जाशील.

## अवधूत चिंतन श्रीगुरुदेवदत्त

नामधारकाने दोन प्रश्न केले होते. **गुरु हे देवापेक्षाही श्रेष्ठ आहे का ? त्यांचे महत्त्व का ?** त्याबद्दल वेदधर्मा ऋषींच्या कथेत ब्रह्मदेव व कलीचा संवाद सांगितला. आता हा त्रयात्मा आहे. त्रैरुप आहे. **ह्याने मनुष्यरुप का धारण केले ?** हा प्रश्न आहे. स्वत: परब्रह्म असताना तो मानवरुप कां झाला ? हा नामधारकांचा प्रश्न ऐकून सिद्धांना फार आनंद झाला.

सिध्द म्हणाले, गुरुंची भक्ती तुझ्या चित्तात उत्पन्न झाली. मोठा धन्य आहेस तूं ईश्वराचा

तुझ्यावर अनुग्रह आहे. आतापर्यंत कोणीही हा प्रश्न मला विचारला नाही. इतका मी भूमीवर फिरलो पण कोणीही मला सद्‌गुरुंचे चरित्र विचारले नाही. म्हणून माझा बोधाब्धी तुझ्या भक्ती चंद्राने अगदी भरुन आलेला आहे. अनंताच्या लीला अनंत आहे म्हणतात. त्यांचे स्मरण होण्यालाही प्रश्न पाहिजे. आपल्या बुद्धीचे परिमाण जेवढे असेल तेवढे स्मरण होण्यालासुद्धा प्रश्नांची जरुरी आहे. तो प्रश्न तू केल्यामुळे मला आनंद झाला आहे. कलीयुगामध्ये पुष्कळ नास्तिक मर्त्य आहेत म्हणतात. भगवंताच्या कथा श्रवण करणे म्हणजे हा भवाब्धी तरुन जायला नौका आहेत. हे नास्तिकांना कळत नाही म्हणतात. म्हणून ते या समुद्रात बुडतात. समुद्राचे त्यांनी रुपक केले आहे.

अज्ञान म्हणजे हे जग आहे. तृष्णा म्हणजे त्या समुद्राच्या लाटा आहेत. वाढलेली आशा म्हणजे या लाटा आहेत. या समुद्रात असणारे मगर वगैरे जलचर प्राणी म्हणजे कामक्रोधादिक विकार आहेत. भोग म्हणजे ध्वनी. समुद्राचा आवाज म्हणजे ध्वनी. काही आनंदाचाही शब्द आहे. सुख भोगाच्या वेळेला 'आनंद' शब्द आहे. आणि दुःख भोगामुळे 'हाय, हाय' हाही शब्द आहे. असा ध्वनी आहे. ही गुरुकथा म्हणजे नौका आहे. नावाडी म्हणजे सद्‌गुरु आहे. ईश्वरकृपा हा अनुकूल वारा आहे.

सिध्द नामधारकाला म्हणाले, तुला ही सगळी साधनं मिळाली. काही प्रयत्न न करता भवसमुद्रातून तूं लवकरच तरुन जाशील. म्हणून सद्‌गुरुंच्या कथा मी सांगतो. असा उपक्रम करुन सांगताहेत. **हे गुरुचरित्र भीमा अमरजा संगमावरील अश्वत्थ वृक्षाखाली बसून सांगितलेले आहे. हे गुरुचरित्र कसे आहे?** तीन प्रकारचे लोक आहेत. संसारी विषयासक्त, मुमुक्षु आणि मुक्त. हे गुरुचरित्र सर्वांनाही उपयोगी पडणारे आहे. हे गुरुचरित्र पठण केले म्हणजे जी इच्छा असेल ती पूर्ण होते. म्हणजे विषयी लोकांनाही उपयोगी आहे. मुक्तांना आनंद देणारे चरित्र आहे. म्हणून त्यांचे जीवनभूत आहे. किंवा जीवनाचे साफल्य करणारे आहे. वेदांत, गुरु, आणि ईश्वर हे तिन्ही या गुरुचरित्रात आहेत. त्यांचे सेवन ज्ञानी माणसानेसुध्दा केले पाहिजे. ज्ञान प्राप्त होण्यापूर्वी ज्ञान मिळवण्याकरता करायचे. ज्यांच्यामुळे आपण ज्ञानी झालो त्यांची सेवा सोडायची नाही, कृतघ्न होऊ नये म्हणून नंतरही सेवन करायचे. अशा रीतीने ज्ञानी माणसाचेसुध्दा जीवनसाफल्य करणारे आहे. असे हे चरित्र वाणी आणि मन यांच्या पलीकडे आहे. सांगणे कठीण आहे. यथामति थोडेसे मी ते सांगणार आहे. असा उपक्रम करुन सुरवात केली.

ब्रह्मदेव रात्री निजले आणि त्रैलोक्याचा प्रलय झाला. ब्रह्मदेवांचे आयुष्य संपल्यानंतर महाप्रलय होतो आणि ब्रह्मदेवही त्यात जातात. तर हा आहे **नैमित्तिक प्रलय.** प्रलयाच्या वेळेलासुध्दा शेष शिल्लक राहिलेला आहे म्हणून त्याला अनंत म्हणतात. त्या शेष शय्येवर असणारा नारायण निरिच्छ आहे. जग आता पुन्हा तयार करायचे आहे. ईश्वराने ईक्षण केले, विचार केला आणि माया कार्यक्षम झाली पुन्हा. नंतर ब्रह्मांडातून उत्पन्न होणारा स्त्रष्टा-ब्रह्मदेव त्याला प्रगट केले. सृष्टी तयार करायची असल्यामुळे ब्रह्मदेवाला अगोदर उत्पन्न केले. ब्रह्मदेवांनी सात मानस ऋषी उत्पन्न केले. पहिली सृष्टी आहे ती मरिची, अत्री, क्रतु, पुलस्त्य, पुलह, अंगिरा आणि दक्ष. आणखी पुन्हा सनतकुमार, सन्क सनंदन ह्यांनाही मानस सृष्टीमध्ये घेतले आहे. त्या सात ऋषींपैकी पहिले अत्री आहेत. मोठे श्रेष्ठ तपस्वी दत्तात्रेय ह्यांचे पुत्र झाले.

जाता जाता त्यांनी  हे ही सांगून दिले. ईश्वराने जग निर्माण केले मग जग खरे नाही का ? खरं मानायला काय हरकत आहे ? नाही, म्हणाले, सृष्टी सांगायची नाही त्यांना. काही नाही हे शेवटी सांगायचे. म्हणून ते पुढे नाही म्हणून सांगायाचे ते जग अगोदर दाखवतात. असं असं झालं. आणि शेवटी ते नाहीये. एक आपले तत्व आहे. अध्यापक फळ्यावर सर्व मांडून दाखवतात. त्यांच्या मनात आले की फळा पुसून टाकायचा. तेव्हा दत्तात्रेयांचे चरित्र आता वर्णन करायचे. सात ऋषींपैकी अत्रीऋषि मोठे बुद्धीमान. ऋग्वेदाच्या ५ व्या मंडलाचे द्रष्टे आहेत. सर्व प्रथम जेव्हा सूर्यग्रहण लागले, सर्वत्र अंधार पडला तेव्हा अत्रींनी ते शोधून काढले म्हणतात. हा राहू आलेला आहे, जाणार आहे, जाईल, म्हणाले. इतर कोणाही ऋषींना हे कळले नाही पण अत्रीऋषींनी ते सर्व शोधून काढले. आयुर्वेदही अत्रीऋषींनी केलेला आहे.तो ऋग्वेदाचा उपवेद आहे. तपोधन ज्यांना म्हणतात अशा अत्रींच्या स्त्रीला पातिव्रत्य हेच भूषण आहे. दुसरे अलंकार तिच्याजवळ नाहीत. पातिव्रत्य हेच अलंकार आहेत. ती त्रैलोक्यामध्ये प्रसिद्ध झालेली आहे. ती अनसूया चालू लागली म्हणजे भूमी सुध्दा मृदू होत असे. सूर्य, अग्नी हे शीतल होत. वारा देखिल मंद वाहात असे. म्हणजे या देवांनासुध्दा भीती कां वाटली ? याचे त्यांनी थोडे वर्णन केलेले आहे.

सूर्य, अग्नी, वायू वगैरे देवांची सगळी कामे अगदी व्यवस्थित चाललेली आहेत. ती ईश्वराच्या भीतीने चाललेली आहेत म्हणतात. तर ईश्वर हा धर्मस्वरुप आहे. धर्मस्वरुपी ईश्वराच्या भीतीने हे सगळेही देव आपापली कामे व्यवस्थितपणे करतात. तो धर्म त्या

अनसूयेने आपल्याजवळ घेतलेला आहे. धर्माकडे तिचे लक्ष आहे. धर्माचा अंगिकार करुन धर्माने ती वागणारी असल्यामुळे हे देव तिलाही भ्यायला लागले. म्हणजे धर्मशील जो आहे त्याची भीती देवांना वाटते मग मनुष्यांना वाटली तर नवल काय ? हिने जर कोणाला सांगितले जा, इंद्राची जागा घे, तर इंद्राला आपली जागा खाली करावी लागेल. म्हणून सगळे देव भ्यायला लागले आणि विष्णुंना शरण गेले.

एकदा नारदांनी ब्रह्मा, विष्णु, महेशांना अनसूया कशी धर्मशील आहे ते सांगितले. ती साध्वी, अतिथींबद्दल अत्यंत आदरभाव बाळगणारी आहे. ब्रह्मा, विष्णु, महेशांच्या ज्या स्त्रिया होत्या त्यांच्याही कानावर ही गोष्ट गेली. त्यांना ते सहन झाले नाही. त्यांच्या मनात अनसूयेबद्दल अत्यंत मत्सर उत्पन्न झाला. मूर्च्छित पडल्या त्या. आपणच पतिव्रता आहोत असं त्या समजत होत्या. सावित्री, लक्ष्मी आणि पार्वती. ह्या तिघीना अत्यंत दु:ख झालेले पाहून त्या देवांनी त्यांचे समाधान केले आणि आम्ही जाऊन तिचे सत्व हरण करुन येतो, असे सांगितले, जर ती अतिथीधर्माचे पालन करु शकली नाही तर तिला शाप देऊन यायचे त्यांनी ठरवले. काय, आता, अनसूयेने त्यांचे काय बिघडवले होते ? धर्माचरण करणारी बिचारी साध्वी स्त्री. रामांचे चरित्र वर्णन करताना तिथे दिलय त्यांनी सीते, सीते करीत फिरावे लागले त्यांना, कुठे गेली सीता ? ह्याचे त्यांनी तात्पर्य दिलय, स्त्रीच्या आसक्तीत सापडणारा कोणीही असला तरी त्याची अशी गती होती. हे दाखविण्याकरता राम फिरले.

तसं इथे दिलय. स्त्रियांच्या आसक्तीत सापडलेले तिन्ही देव त्या सतीची परीक्षा करायला निघाले. म्हणजे जीवात्मा आणि ईश्वर यांच्यात संघर्ष सुरु झाला आहे. जीवाची परीक्षा आहे की ईश्वराची ? हा मोठा प्रश्न आहे. आले ते तिघे देव अत्री ऋषींच्या आश्रमात. अनसूयेने त्यांचे स्वागत केले. बसायला आसन दिले. त्यांचे पाय धुतले. वारा घातला. वास्तविक कुटुंब प्रमुख जो असेल त्याने अतिथींचे स्वागत करायचे. पण इथे अनसूयाच विचारते आहे. ती म्हणाली, अत्री ऋषी तपश्चर्येला गेले आहेत.

तप याचे दोन अर्थ केले आहेत. एक तप म्हणजे उपोषण, वगैरे करणे. हे बाहेरचे तप झाले. 'तप संतापे' असा एक अर्थ सांगितला त्यांनी. दुसरा अर्थ 'तप अलोचने' म्हणजे ध्यान करणे. ध्यानयोगाला महत्त्व आहे. मन आणि इंद्रिये ही एकाग्र होणे. दुसरीकडे विषयांकडे न जाणे. हे सर्वांपेक्षा मोठे तप आहे म्हणतात. तर बाह्य इंद्रिये

आणि अंत:करण यांचे पूर्ण समाधान करुन चिंतन करणे म्हणजे तप आहे. तोच ध्यानयोग आहे.

ते देव म्हणाले, आम्ही ऋषींची किती वेळ वाट पहायची ? ते केव्हा तप संपवून परत येतात कोणाला ठाऊक. ध्यानाला बसलेले आहेत. ते काही आमच्यासारख्या जीवांचे ध्यान नाही, एक मिनीट झाले की संपले. जरा कुठे दार वाजले लगेच आमचे लक्ष तिकडे जाणार. तसं नाही. तुकाराम महाराज सात सात दिवस भजन करीत बसायचे. अन्न पाणी काही नाही. त्रयमूर्ती म्हणाले, 'आम्हाला फार भूक लागली आहे. लवकर आम्हाला जेवायला वाढा.' तिने आत जाऊन पाने वाढली. आता ही सत्व परीक्षाच पहायची आहे. राग येतो का, आम्हाला नग्न होऊन तू भिक्षा द्यावीस अशी आमची इच्छा आहे. हे तुम्हाला पसंत नसेल तर आम्ही दुसरीकडे जातो.

हे ऐकून ती हसली. म्हणे हे बालक म्हणजे अज्ञानी आहेत. अशी मागणी बालकाप्रमाणे आहे. पण माझ्यावर काही परिणाम होणार नाही. तपस्वी ऋषींच्या संगतीमुळे मी पवित्र आहे. काम मला काही करु शकणार नाही. म्हणजे इतका कामादि शत्रुंचा जय आहे. इंद्रिय जय आहे. आणि यावेळी जर मी माघार घेतली. ह्यांचे ऐकले नाही तर शाप देऊन निघून जातील. म्हणजे धर्माचर विचार किती कठीण आहे. पतिव्रता स्त्रीने असे वागायचे का ? नाही, असे मी करु शकत नाही. पण तिने सांगतिले, अतिथी हा मुख्य धर्म आहे. माझ्या मनावर काही परिणाम होणार नाही. यावेळी स्वत:चा निर्णय स्वत:च घेतला पाहिजे. आता धर्मशास्त्र कोणाला विचारायला जाणार ? ह्या त्रैमूर्तींना शाप द्यायला अवसर द्यायचा नाही.

तिने वस्त्र काढून टाकले. जगाची उत्पत्ती, संरक्षण, संहार करणारे हे तिघेही बालक झाले. तिला आश्चर्य वाटले. पुन्हा वस्त्र परिधान केले. आणि एकदम तिच्या स्तनातून प्रसूती झाल्यानंतर वाहाते तसे दूध व्हायला लागले. मग तिने त्या बालकांना स्तनपान दिले. आनंद झालेला आहे. ते बालकही दुग्धपान करु लागले. परीक्षा घेण्याकरता आले पण त्यांनाच बाल व्हावे लागले. ब्रह्मदेव दमले होते म्हणे. जगाची उत्पत्ती करणे किती कठीण काम आहे ना ! त्या त्या जीवांची कर्म पाहून त्याप्रमाणे त्या त्या शरीरामध्ये जन्म द्यायचा. सगळं आणखी व्यवस्थित काम चाललेले आहे. दमल्यामुळेच कि काय पण त्या पतिव्रतेचे दुग्धपान करुन अत्यंत शांती ब्रह्मदेवांना मिळाली. विश्वाचे रक्षण

करण्याची क्रिया किती कठीण आहे. अतिशय दमल्यावर पतिव्रतेचे पवित्र दूध पिऊन त्यांना चांगली विश्रांती मिळाली. विश्व संहार कर्मामुळे दमलेले हर हे सतीचे दूध प्राशन करुन तृप्त झाले.

बर हे इतकं झालं. अनसूयेची काय एकंदर स्थिती ? हे बालक कोण आहेत हे तिने ओळखले. स्वधर्माचरणाने त्यांचे बल तिला समजले. त्यांना दूध पाजून पाळण्यात निजवले आणि गायनातून त्यांचे चरित्र वर्णन करु लागली. इतक्यात वनांतून अत्री महर्षी आले. म्हणजे अरण्यामध्ये ही एकटीच राहात असली पाहिजे. आसपास आणखी आश्रम असतील नाही असे नाही. अत्री महर्षींनी अनसूयेचे गायन ऐकले. पत्नीच्या मुखातून झालेला सर्व प्रसंग ऐकला आणि स्वत:च्याही ध्यान प्रभावाने हे तिघे खरे कोण आहेत हे जाणून त्यांची स्तुती केली आहे,.

मुख्य विष्णु धरुन अत्रींनी त्रैमूर्तीची स्तुती केली. विश्वसर्ग, स्थिती आणि प्रांत. उत्पत्ती, स्थिती आणि प्रलय यांना कारण असणारे विश्वसाक्षी आणि विश्वमय. विश्वरुपही तेच बनलेले आहेत. विश्वाचा आद्यही आहे. आणि विश्वाचा आपल्यामध्ये लय करुन घेणाराही तोच आहे. अशा प्रकारच्या परमात्म्याला म्हणजे विष्णुला माझा नमस्कार असो. त्यात त्यांनी जीव व ईश्वर दोन कसे आहेत हे दर्शवणारी ऋचा दिली आहे. परस्परांना सहाय्य करणारे पक्षी आहेत. ते समान आहेत. तत्त्वज्ञानाने संसारवृक्षाचा नाश करता येतो. वृक्ष म्हणजे शरीर. ह्या शरीरामध्ये हे दोन सुपर्ण म्हणजे पक्षी येऊन राहिले. याच ऋचेमध्ये जीव आणि ईश्वर वेगळे वेगळे आहेत असे सांगितलेले आहे. अर्थात जीव आणि ईश्वर एक नाहीये. वेदांताच्या सिद्धांताला त्यांचा इथे विरोध आहे. या शरीररुपी वृक्षावर ते दोन सुपर्ण एकमेकांच्या आश्रयाने राहातात. त्यापैकी एक जीवात्मा पिप्पल म्हणजे कर्माच्या फलाचा भोग सारखा घेत असतो. म्हणून तो बंधनामध्ये पडतो आणि दुसरा ईश्वर फक्त पहात असतो. सगळे जीव कर्माचे फल घेतात. भोगतात, पुन्हा आणखी वासनेने कर्म करतात. चाललय. ईश्वर मात्र काहीही त्या फलाकडे लक्ष देत नाही. फक्त तो साक्षी प्रेक्षक म्हणून असल्यामुळे मुक्त आहे. अशा 'विष्णुं वंदे' म्हणतात.

विष्णुंची स्तुती केली म्हणजे ब्रह्मदेव आणि शंकर यांची स्तुती केली नाही असा त्याचा अर्थ नाही. विष्णु म्हणजे व्यापक. एक जे परमात्म, परब्रह्म तत्व आहे त्याची स्तुती

केली. अत्री महर्षी म्हणाले, 'तुमचे दर्शन व्हावे म्हणून तपश्चर्या केली. आपण एक असतानासुद्धा तीन रुपाने दर्शन दिलेले आहे.' म्हणजे एकत्र ज्ञान घेऊनच त्यांनी सांगितले. तीही रुपं आपलीच आहेत. अध्यारोप आणि अपवाद हेच शिक्षण आहे. उपनिषदामध्ये संपूर्ण सृष्टीचेही वर्णन आहे. आकाश,वायु, वगैरे सृष्टी झाली सगळे आहे. पण हे जरी दिसणारे जग असले. अध्यारोप अपवादाने उत्पन्न झालेले. शेवटी जाणार आहे. हे जग वेगळे आहे. मी त्याला पहाणारा वेगळा आहे. ईश्वर निराळा आहे. हा जो भेद उत्पन्न होतो हा अहंकार आणि ममतेने उत्पन्न होतो. दुसरे त्यात काही नाहीये. हे सांगितले. ही स्तुती केली त्यांनी.

अत्री ऋषी स्तुती करताना ती तीन बालके पाळण्यामध्ये आहेतच पण आपली मूळची रुप धारण करुन ब्रह्मा, विष्णु, महेशांनी त्यांना दर्शन दिले. 'वर मागा' म्हणाला. त्यांनी अनसूयेला मोठेपणा दिला. काय तुझे भाग्य! मनालासुध्दा न समजणारे ब्रह्मा, विष्णु, महेश तुझ्या भक्तीने आले. तुला काय पाहिजे तो वर मागून घे.' असे अत्री महर्षींनी सांगितल्यावर तिने त्यांनाच पुढे केले आहे. स्वत: वर नाही मागितला. ही तीनही रुपे एकाच परमात्म्याची आहेत याची तिलाही जाणीव आहे हं! भेददृष्टी तिची नाहीये. ती अत्री महर्षींना म्हणाली, आपणच मोठे तपस्वी आहात. सृष्टीकार्य करण्याकरता एकच परमात्मा तीन रुप झाला. ब्रह्मदेवांनी आपल्याला उत्पन्न केलेले आहे. तेव्हा पुत्ररुपाने आपण तिघे आमच्याजवळ राहा अशी त्यांना प्रार्थना करा. पतिव्रतेचे मागणे योग्य आहे असे समजून त्यांनी तशीच प्रार्थना केली, आपण आमचे पुत्र व्हा.

मग विष्णु म्हणाले, मी माझेच दान तुला केलेले आहे. म्हणून दत्त हे नाव पडले. **आपणच आपले दान ज्याने केले तो दत्त.** दत्तक पुत्रांमध्ये दान करतात. जनक पिता निराळा असतो तो आपला पिता त्याला देतो. आपणच आपले दान करायची पध्दत इथेच आहे. ह्यांना दुसरा कोण दान करणार ? तेव्हा हा त्या पतिव्रतेचा प्रभाव आहे. हे तिघेही बालरुपाने त्या पाळण्यामध्ये आहेत. आणि आपली आपली रुपे धारण करुन आपापल्या स्थानाला गेले मग अत्रीमुनिंनी त्यांची नावे ठेवली. मी संपूर्ण माझे दान तुम्हाला केलेले आहे, असं म्हणाले ते. म्हणून दत्त हेच त्यांचे नाव ठेवले. चंद्र म्हणजे आनंद देणारा. ब्रह्मदेवांचे चंद्र हे नावं ठेवले. शंकराचा अंश अगदी उग्र म्हणून त्यांचे दुर्वास हे नांव ठेवले. दुर्वास म्हणजे फार दु:खाने वास ज्याचा आहे. त्यांच्या मनाप्रमाणे जो वागेल त्याच्याजवळ ते राहणार. ते फार कठीण परीक्षा घेतात. दुर्योधनाने सांभाळलेले

होते म्हणे त्यांना चार महिने. मारायचे. बोलायचे. कृष्णांनीसुध्दा सेवा केली त्यांची. त्या रुक्मिणीला गर्भवती असताना त्यांनी रथाला जुंपले होते. मग तो वर दिला. तिघांमध्ये भगवान दत्त साक्षात् आहेत. श्रुतीने ज्याच्या चरणाचा शोध करावा असा सच्चिदानंदस्वरुप भगवान आहे. तो तशा प्रकारच्या इष्ट जनांना योग आणि ज्ञान देतो.तो स्मरण केल्याबरोबर प्राप्त होतो. जरी रागीट असला तरी अनुग्रह करणारा आहे. वंशवृध्दी करणारा आहे.

दुर्वास ऋषींनी शाप दिला. भूदेव म्हणजे अंबरीष नावाचा राजा होता. द्विज म्हणजे क्षत्रियसुद्धा द्विजांमध्ये येतोच आहे. उपनयन झालेल्या ब्राह्मण, क्षत्रिय वैश्यांना द्विज म्हणतात. आपली आपली शरीर त्यांनी सोडली. पण हे दत्तरुप मात्र कायम आहे. लोकांवर अनुग्रह करायचा, लोकांचा उद्धार करायचा हे कार्य करण्याकरता दत्तात्रेय अवतार झालेला आहे. कार्य नेहमीच चालणार आहे. अनंत जीव आहेत. त्या अनंत जीवांचा उद्धार करण्याचे कार्य संपणारे नाही. म्हणून हे स्वरुप त्यांनी ठेवले.

आता नामधारकांचा प्रश्न आहे. दुर्वास ऋषींनी शाप देण्याचे कारण आहे ? आणि हा तो अव्यक्त परमात्मा आहे ज्याला जन्म नाही मृत्यु नाही. काही नाही. सगळे ब्रह्मादिक देवसुध्दा ज्याच्यापेक्षा कमी आहेत अशा या श्रेष्ठ परमेश्वराला शाप लागला तरी कसा ? अशा संशयआहे. सिद्ध म्हणाले, **अव्यक्त भगवानसुध्दा भक्ताधीन असल्यामुळे व्यक्त होतात भक्तीने बोलावले की ते येतात**. म्हणून व्यक्त रुपाने आल्यामुळे दुर्वासांनी त्यांना शाप दिला. शाप त्यांना लागला कसा ? ते पूर्ण सहिष्णु आहेत, म्हणून लागला, सिद्ध आता ती कथा सांगताहेत.

अंबरीष राजा मोठा भगवत् भक्त, अतिथींची सेवा करणारा होता. तो एकादशी व्रत करीत असे. त्याचा व्रत भंग करण्याकरता एकदा दुर्वासऋषी आले. त्यांचे सामर्थ्य कमी होत नाही ना! रोज किती पुण्यकर्म त्यांच्याकडून घडतात. कोट्याधीशाला एखाद्या लाखाच्या नुकसानांचे काही वाटत नाही. तसे आहे. दुर्वास ऋषींचे. द्वादशीला अंबरीषाकडे येऊन मला जेवायला दे, म्हणाले. राजा म्हणाला, 'आपण भोजनाला या, मी आपल्याला भोजन देतो.' दुर्वास म्हणाले, 'मी नदीवर स्नान करुन येतो,' आणि नदीवर स्नानाला गेले. त्या राजाची पारण्याची वेळ टळावी म्हणून ते नदीवरच थांबले. राजाने विचार केला दुर्वास ऋषी जेवण्यापूर्वी आपण द्वादशी सोडली तरी त्यांचा शाप

होईल. नाही जेवलं तर व्रतभंग होईल. एकादशीचे पारणे दुसऱ्या दिवशी ठराविक वेळेला व्हायला पाहिजे. ती पारणं वेळेवर झाली नाही तर व्रतभंग होणार. म्हणून राजाने थोडे पाणी घेतले. पाणी घेतले म्हणजे आपण त्या अतिथीच्या अगोदर जेवलो असेही होणार नाही आणि पाण्यानेच पारणे करायचे. म्हणजे एकादशी तो निर्जला करीत असला पाहिजे तो. दुर्वास ऋषी परत आल्यावर त्यांना समजल्यावर ते रागावले. मी इतका उपाशी असताना तूं पाणी का प्यायलेय माझ्या आधी ? आता पाणी पिणे हा काय दोष झाला का ? त्यांनी लगेच शाप दिला, प्रत्येक जन्मात तूं असा फिरत राहाशील.

अंबरीषाने भगवंताने स्मरण केले. देवाची सेवा करायची आणि पुन्हा पुन्हा जन्म घ्यायचे म्हणजे काय! कुलदेवतेचे त्याने स्मरण केले. भगवान विष्णु लगेच आले आणि दुर्वास ऋषींना म्हणाले, 'ऋषी महाराज, तुमचे वाक्य काही निष्फल जाणार नाही. त्याप्रमाणे जन्म घ्यावा लागणार. तो शाप तुम्ही मला द्या. तुमच्या वाणीमध्ये सामर्थ्य आहे. त्याचा शाप मला द्या. त्याला काही हरकत नाही. कारण ह्याला ते सहन होणार नाही. पुन्हा इतके जन्म घेणे, भक्ताचे कल्याण करण्याकरता मी ते सगळे सहन करीन. माझ्याकडे ती सहिष्णुता आहे. भक्त वात्सल्य माझ्याकडे आहे.'

दुर्वासांनी विचार केला, चांगलं आहे. मी शाप दिला म्हणून माझी लोक निंदा करतील. वैकुंठात राहाणारा हा भगवान भूमीवर येणार कसा ? त्याला काही निमित्त पाहिजे. अंबरीषाच्या प्रभावाने हा शाप होणार आहे. ह्या शापामुळे **भगवान भूमीवर येऊन लीला करतील आणि सर्व लोकांचे कल्याण होईल. म्हणून देवाला त्यांनी तुम्ही अनेक जन्म घ्याल, असा शाप दिला**. मग भगवंतानी अवतार घेतले. मत्स्य, कूर्म, वराह वगैरे अनेक अवतार झाले. त्या प्रत्येकाची पुराणेच व्यासांनी लिहिली आहेत. **त्या भगवंतांनी कलियुगातसुध्दा दीनांचा उध्दार करण्यासाठी दोन अवतार धारण केले. श्रीपादश्रीवल्लभ आणि नरसिंहसरस्वती हे दोन्ही अवतार अद्यपि आहेत. पापी लोकांना मात्र ते अवतार दर्शन देत नाहीत**. इथे त्यांनी एक शंका घेतलेली आहे. अवतार झाले म्हणता मग या कलीला त्यांनी का घालवले नाही ? कलियुगामध्ये दोन अवतार भक्तांच्या संरक्षणाकरता घेतले मग कलीलाच घालवून द्यायला पाहिजे होते. त्याला घालविता आले असते की नाही.

त्याला असे उत्तर दिले की कलीचा कालसुध्दा नियत आहे. तो आपोआपच जाणार आहे. या कलियुगामध्ये पुण्यकर्माचा नुसता संकल्प केला तरी सिद्धी होते असा कलीचा एक गुण आहे. म्हणून कलीला ठेवले. पापकर्म प्रत्यक्ष झाल्यानंतर त्याचा दोष आहे. नुसत्या संकल्पाने मानस पाप नाही. कलियुगामध्ये मानस पुण्याचे फार महत्त्व आहे. म्हणून ह्या दोन्ही अवतारांनी कलीला घालवले नाही. त्याचे रक्षण केले.

आता प्रत्येक अवताराची माहिती सांगतिली आहे. चैत्र शु. तृतीयेला अपरान्ह काळी मत्स्य अवतार झाला. त्या नंतर वैशाख पौर्णिमेला कूर्म अवतार झाला. राक्षसांनी समुद्रात नेलेले वेद कूर्माने ब्रह्मदेवांना परत आणून दिले. मनुचे रक्षण केले. समुद्रमंथनाच्या वेळेला तो पर्वत बुडायला लागला म्हणून भगवंतानी कूर्म अवतार धारण करुन तो पर्वत आपल्या पाठीवर घेतला. हा अवतार सायंकाळी झाला. भाद्रपद शु. तृतीयेला वराह अवतार झालेला आहे. तो हिरण्याक्ष आला होता. भूमी गेली होती आत. त्या भूमीलाही वर काढले आणि हिरण्याक्षाचा नाश केला. आजचा अवतार आहे तो वैशाख शु. चतुर्दशी. प्रदोष काळी नरसिंहरुपाने अवतार करुन हिरण्यकश्यिपूचा नाश केला. भाद्रपद शु. द्वादशीच्या दिवशी मध्यान्ह काळी वामनावतार झाला. आणखी बलीला बांधून ठेवले. दान करतो करतो म्हणाला, केले नाहीस, म्हणून त्याला बांधून ठेवले. वैशाख शु. तृतीयेला मध्यान्ह काळी परशुरामांचा अवतार झाला. त्यांनी कार्तवीर्यादिंचा नाश केला. चैत्र शुध्द नवमीला दशरथी रामांचा मध्यान्ह काळी अवतार झाला. त्यांनी रावणाचा नाश केला. श्रावण कृष्ण अष्टमीला श्रीकृष्णांचा अवतार झाला. मध्यरात्री जन्म घेऊन संपूर्ण भूभार दूर केलेला आहे. अश्विन शु. दशमीला सायंकाळी बौध्दावतार झालेला आहे. दया केली म्हणतात त्यांनी. सगळ्या दैत्यांना नास्तिक बनवून दया केली. नाही तर सगळे दैत्य यज्ञ करायला लागले होते. आणि यज्ञ प्रयोग करुन देव होणार होते. म्हणजे त्यांना दूर करणे कठीणच होते. प्रत्यक्ष धर्माचा प्रयोग राजस कर्मांनी करायचा. ती कर्म राजस असली तरी त्यांचे फल मिळणार की नाही? म्हणून अशा दैत्यांनी बुद्धी भ्रष्ट करायची. त्यांची बुद्धी बुद्धाने नास्तिक बनविली. काय हे ब्राह्मण यज्ञ काय करतात. यज्ञात पशू काय मारतात. या कर्मांना काय अर्थ आहे का? नास्तिकवाद असा बुद्धांनी मांडल्यावर दैत्य या यज्ञयागापासून आपोआप दूर झाले. बर झाले. तेव्हा बुद्धांनी ही सगळी कर्म बंद पडली आहेत. या

बौद्धवताराचे रोजच्या संकल्पनात स्मरण पण पूजा नाही. धर्मशास्त्राप्रमाणे, श्रावण शु.षष्ठीच्या दिवशी कल्की अवतार पुढे होणार आहे. हे दहा अवतार झाले.

प्रदोष काळी बुधवारी मृग नक्षत्र असताना मार्गशीर्ष पौर्णिमेला दत्तात्रेयांचा अवतार झाला. असे पुष्कळ अवतार झाले. आणि मग दत्तात्रेयांनीच कलियुगामध्ये सगळ्यांचा उद्धार करण्यासाठी दोन अवतार धारण केले. मग या क्रूर कलीला त्यांनी का दूर केले नाही ? इतका अनर्थ त्याने साधला असताना ? त्याचा काळ ठरलेला आहे, म्हणाले, त्याचा काळ संपला की तो आपोआपच जाणार आहे. म्हणूनच मनामध्ये जरी पाप विचार आले तरी त्याचे फल नाहीये, कलीयुगामध्ये हं ! मानसपाप पूर्वी होते. त्या जमदग्नीने नाही का त्या गंधर्वाची जलक्रीडा पाहून आलेल्या रेणुकेला आत पाऊल टाकू नकोस असें सांगितले. तिथेच थांब. तू पापी आहेस. मुलांना सांगितले. हिला ठार मारा. परशुरामांना आपल्या पित्याचा तप: प्रभाव माहीत होता. पित्याच्या आज्ञेप्रमाणे आपल्या कुऱ्हाडीने आपल्या चार बंधूंचा आणि मातेचा शिरच्छेद केला. जमदग्नी प्रसन्न झाले. काय पाहिजे वर मागून घे, म्हणाले परशुरामांनी प्रार्थना केली या सर्वांना जिवंत करा आणि मी मारले याचे स्मरण त्यांना राहू नये. हे मोठे आहे. कारण त्यांच्या मनात मी त्यांना मारले स्मरण राहिले तर घरात एकत्र राहाताच येणार नाही. तर स्त्रियांकडून मानसिकसुध्दा दोष घडू नयेत म्हणून त्यांनी हे केले. रागीट होते ते. तिथे त्यावेळेला ते मानसिक पाप. आता इथे कलियुगामध्ये मनाचा निग्रह झाला नाही तरी शरीराने पापकर्म घडू देऊ नये. आसनाचे महत्त्व फार आहे. इतके जरी झाले, तिथल्या तिथे एका जागी बसले तरी मनातले विचार निघून जातील. मनाच्या विचाराप्रमाणे जर एखाद्याने कृती केली तर त्याला त्याचे फळ भोगावे लागले. म्हणून शरीराच्या आसनबंधाला फार महत्त्व आहे. म्हणून चांगली इच्छा चांगले विचार करावेत. काशीस जावे नित्य वदावे म्हणतात ना.

हे तीन अध्याय आता संपलेले आहेत. चौथ्या अध्यायामध्ये २४ गुरुंपासून किती ज्ञान आपण मिळिवले हे दत्तात्रेयांनी यदुराजाला सांगितले. आणि प्रल्हाद व अलर्काला केलेला उपदेशही या चौथ्या अध्यायात आहेत. दत्तात्रेयांचे हे कार्य त्यांनी सांगितले. मग श्रीपादवल्लभ आणि नरसिंहसरस्वती. आज इथे पुरे.

**अवधूत चिंतन श्रीगुरुदेवदत्त**

यदुराजा आणखी श्रीदत्तात्रेय यांचा संवाद आहे. ज्ञानयोग प्रकरण चालू आहे. २४ गुरुंपासून जे ज्ञान मिळाले हे इथे दत्तात्रेयांनी यदुराजाला सांगितले आहे आणि प्रल्हादाला व अर्जुनाला. यदुराजा संचार करीत निघाला होता. मध्येच एक अवधूत वनामध्ये जमीनीवर पडलेले त्याला दिसले. त्याला आश्चर्य वाटले. एकटे निर्जन वनामध्ये, कांही चिंता नाही कांही नाही. श्री, आयु, कीर्ती यांची समृद्धी व्हावी, अशी सगळ्यांची इच्छा आहे. यदु अवधूतांना म्हणाला, आपण तर या सर्वांपेक्षा वेगळे दिसता. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यांच्यापैकी कोणत्याही पुरुषार्थाकडे लक्ष नाही तुमचे. हे लक्ष नाही म्हणजे सामर्थ्य नाही का अज्ञान आहे. अकर्तृत्व आपले जे आहे ते सामर्थ्य नसल्यामुळे की अज्ञानामुळे? सामर्थ्य आहे, उत्तम शरीर आहे. त्याचप्रमाणे मोठे ज्ञानी आपण दिसता, तरी अकर्ता कां? आणि या निर्जन वनामध्ये कशाकरता येऊन राहिलात? कांही इच्छा नाही म्हणजे इच्छेचे कार्यही नाही. कांही परिवार नाही, आणि आनंद आहे. हे कसं काय? असं यदुराजाने विचारल्या नंतर आपल्या बुद्धीनेच जे गुरु केले, त्या गुरुंपासून जे ज्ञान मिळिवलं ते ज्ञान अवधूत आता सांगताहेत.

**हेयोपादेय विवेक आहे.** हेय म्हणजे दोष. उपादेय म्हणजे गुण. काय टाकावे आणि काय घ्यावे? पृथ्वी हा पहिला गुरु. **आपला जो साधनमार्ग आहे त्यापासून केव्हांही चलीत होऊ नये.** सर्वही भूतं ही दैवानुग आहेत. आता दैवानुग म्हणजे ह्यांनी स्वत:चेच दैव घ्यायला पाहिजे ना. सगळीच भूतं दैवानुग आहेत, सगळं दैवानेच चाललेले आहे. त्यांनी तितिक्षा करायची आहे. सगळे भूतार्त होणे हे परेच्छा प्रारब्ध आहे. पण हे दैव कोणाचे? स्वत:चेच दैव घेतले पाहिजे. आपल्या दैवामुळे हे सगळे प्राणी आपल्याशी असे वागताहेत. असा विचार करून पृथ्वीप्रमाणेच आपल्या मार्गापासून बाजूला होऊन क्षमा धारण करावी. तसेच पृथ्वीपैकी पर्वत आणि वृक्ष यांच्याबद्दल सांगतात. आपली उत्पत्तीसुद्धा परार्थच आहे. प्रयत्नही **परार्थच** आहेत. असा भाव त्यांनी घेतला. नग म्हणजे पर्वत किंवा वृक्ष. पर्वत रत्न वगैरे काय असतील ती देतो. वृक्षही फळं, फुलं वगैरे आपले सगळेही देतो. आत्मज्ञानाचे अंग म्हणून हे सांगतात. व्यवहारामध्ये हे कसे शक्य आहे? सर्व संग असताना, हां, आता हा पृथ्वीप्रमाणे क्षमाशीलपणा झाला. पण विषयासक्ती असेल तर तो अंतर्मुख होणार नाही.

म्हणून वायुपासून काय शिक्षण घेतले हे सांगतात. अंतर्वायू (किंवा प्राणवायू) जे आहे त्याचे रसादिकाकडे लक्ष नसते. मन, वाणी हे जसे विषयाकृष्ट होत नाही. इंद्रियांना जे

प्रिय आहे त्याने संतोष मानू नये. प्राण वृत्तीनेच धारण करुन राहावे. आत्मा हा विषय भोग घेणारा पण विविध विषय धर्मांच्या ठिकाणी आसक्त नसलेला. त्यांच्या गुण दोषांशी याचा कांही संबंध नाही. वायू सगळ्या ठिकाणी वाहातो पण कोणाच्याही गुणदोषांशी त्याचा संबंध नसतो. वायुचा बाहेरच्या सर्व विषयांशी, पदार्थांशी संबंध असतो पण तो त्या सर्वांपासून अनासक्त अलिप्त असतो. असा वायुप्रमाणे संबंध ठेवायचा असेल तर **स्वरुपानुसंधान** करावे म्हणतात. पण त्यासाठी चित्त शुद्ध व्हायला पाहिजे म्हणजे सगळी साधनं आली. झालं, म्हणजे विषयांशी संबंध ठेवत नाही. त्याचप्रमाणे क्षमाशील आहे. विषयासक्त नाही. इतकं जरी असलं तरी आत्मज्ञान झालं पाहिजे. स्वरुपानुसंधान झाले नाही तर शांती मिळत नाही. त्याकरता आकाश गुरु. आत्मा हा, अहम् हा असा आहे. कालाने उत्पन्न केलेले गुण ज्यांच्या ठिकाणी आहे. तेज, जल, भूमी; तद्रुप जे पदार्थ ह्यांच्याशी ज्याचा स्पर्श नाही म्हणजे असंग आहे. असंग असा हा पुरुष आहे; आकाशाप्रमाणे वायुपासून उत्पन्न झालेल्या मेघाशी ज्याचा संबंध नाही. त्या आकाशाप्रमाणे तेज, जल आणि भूमी ही तीनच भूतं घेतली आहेत. पंचभूतं ही आहेत त्यात. **ह्या भौतिक भावाशी ज्याचा कांहीही संबंध नाही. असा आत्मा आहे.**

**हा जो प्रत्यगात्मा आहे जीव तो सर्व व्यापक आहे. आणि ब्रह्मरुप तो आहे. हे आत्मस्वरुपाचे अनुसंधान हेही पाहिजे.** आकाशाप्रमाणें. हा आपल्या पुरताच मी असा आहे, असंग आहे. कांही कशाशी माझा संबंध नाही म्हणजे मला हा आनंद मिळाला पण जगाचे काय करणार हा? त्यालाही आक्षेप आहेत. आपल्या पुरत असत, असे म्हणतात ज्ञानी लोक. तो जर स्वच्छत्वादि गुणयुक्त असेल तर जगत् पुनाति. असा ज्ञानी पुरुष लोकांशी मधुर भाषण करुन ज्याने संबंध ठेवलेला आहे तो त्या द्वाराने लोकांना पवित्र करतो. आणखी स्वत:ही पापरहित असतो. अग्नी छन्न असो, कुंडात झांकलेला असो, किंवा स्पष्ट झालेला असो, सकाम पुरुषांकडून अर्चन केला जाणारा; त्यांचे पूर्वी झालेले, पुढे होणारे असे सगळेही अघ (म्हणजे पाप) तो दूर करतो. अग्नी काष्ठाप्रमाणे आकार धारण करतो. तो जो आकारादि संबंध आलेला आहे हा प्रत्येक वेळी उत्पत्ती नाश आहे त्याला, तो दिसत नाही त्याप्रमाणे आत्मसंबंधी जो भूतं आहेत त्यांची उद्भवादि स्थिती ही दिसत नाही. पण वस्तुत: त्यांना त्या आहेत. उत्पत्ती आणि विनाश. म्हणजे तो आकार, तसा संबंध जरी आला तरी तो खरा नाही जाणारा आहे. सगळे देहादि.

आता चंद्र, चंद्राच्या ज्या कला आहेत, त्या रोज बदलतात. तसा देह विकारी आहे. आत्मा मात्र चंद्राप्रमाणे स्थिर आहे. सगळे ग्रह नक्षत्र हे जलरुप आहेत आणि तेजोगोल म्हणजे सूर्य आहे. म्हणजे चंद्राला स्वतंत्र प्रकाशच नाही असे म्हणतात. बाकीच्या ग्रह नक्षत्रांनासुद्धा स्वतंत्र प्रकाश नाही असे ज्योतिषशास्त्राप्रमाणे दिसतयं. चंद्राच्या कला म्हणजे चंद्राच्या एकेक भागावर सूर्याचा प्रकाश पडला म्हणजे त्या दिसतात. पूर्ण चंद्रावर सूर्यप्रकाश पडला म्हणजे पोर्णिमा झाली. चंद्राच्या कलांप्रमाणे देहाला वृद्धी क्षय होतो. आणि चंद्र मात्र ध्रुव (स्थिर) आहे. आत्मा व्यवहारामध्ये तो देहादिकांमध्ये तसा बद्ध आहे असे वाटते. अर्क मात्र स्वस्थ आहे आणि आप्य वगैरे चंद्रामध्ये आहे असे वाटते तसा आत्माही देहादिकांमध्ये बद्ध आहे असे वाटते. आत्मा स्वस्थ नाही. स्वरुपस्थ आत्मा कांही भासत नाही.

आता सूर्यापासून शिक्षण. उन्हाळ्यामध्ये सूर्य पाणी ग्रहण करतो. बाष्पाचे ढग बनतात. म्हणजे सगळा खेळच चाललेला आहे. मी इतकं मिळिवलं इतकं दान केलं, यातलं खरं कांहीच नाही. त्याच्यामध्ये कांही वृत्ती नाही. सगळ्या क्रिया अशा व्हायच्या म्हणजे कठीणच आहे. अहंकार नाही. त्या नंतर कपोताची कथा आहे. मग अजगरापासून काय शिक्षण घेतले ते सांगताहेत. अजगराप्रमाणें प्रारब्धानेच सगळ मिळतं ही वृत्ती होणं फार कठीण आहे. पूर्ण प्रारब्धानेच सगळं कार्य चाललेलं आहे. नंतर समुद्रापासून काय शिक्षण घेतले ते सांगितलय. समुद्राप्रमाणें गांभीर्य पाहिजे म्हणजे हर्ष शोकरहित व्हायला पाहिजे. सागराप्रमाणें प्रसन्न राहायला पाहिजे. स्त्रीरुपाने मोहित झालेला जीव पतंग ज्याप्रमाणें अग्नीकडे आकर्षिला जाऊन त्यात जळून जातो, तसा नाश पावतो. आता मधमाशीपासून काय शिक्षण घेतले ते सांगताहेत. त्यात एक त्यागाचा दोष आहे आणि एक गुणाचा दोष आहे. म्हणजे एकत्र राहाण्यातही आसक्ती असू नये. म्हणजे मधमाशीचे हे उदाहरण त्यांनी दोषरुपानेच दिले आहे. आता गजापासून काय शिक्षण घेतले ते सांगताहेत. गज खोट्या हत्तीणीच्या आकर्षणाने खड्यात सांपडतो. मधमाशा मध स्वत: न खाता संचय करतात पण तो मध शेवटी दुसराच कोणी नेतो.

आता हरणापासून काय शिक्षण घेतले ते सांगतात. हरिणासारखा कोणाच्याही हाताला न लागणारा प्राणी बांसरीचे मधुर स्वर ऐकून देह भान विसरतो आणि त्यावेळी शिकारी त्याला पकडतात. भक्तीगीते ऐकायला हरकत नाही पण इतर गाणी ऐकायची आवड असू नये असे म्हणतात. भक्तीगीते ऐकातानासुद्धा भगवत् गुणांच्या वर्णनात मन रंगले

तर ठीक नाही तर स्वर, चाल कशी आहे यात मन गुंतले तर ती गायनाचीच आसक्ती झाली.

नंतर माशाचे उदाहरण दिले आहे. गळाला मांसाचा तुकडा टोकाशी व नंतर विष लावलेले असते. मांसाच्या तुकडा खाण्याच्या आमिषाने मासे गळाकडे आकर्षिले जातात. अल्प भोजनाने जिव्हां जिंकावी. सक्तीने जेवण नाही. अनासक्तीने व्हावे. 'जितं सर्व जिते रसे'. ज्याने रस जिंकला त्याने सर्व जिंकले. रस जय झाल्याशिवाय जितेंद्रिय होऊ शकत नाही. एकेक गुण असले तरी कांही तरी कमतरता असतेच. पिंगला वेश्येपासून आशा न करण्याचा गुण घ्यायचा तर कुररापासून अपरिग्रहाचे शिक्षण मिळते. अपरिग्रहाच्या अभ्यासामुळे अनंत सुख मिळते. कुरराच्या दृष्टांतावरुन संग्रह न करण्याचे शिक्षण मिळते. पण मानापमान चिंता असेल तर पुन्हा दु:ख आहे. लहान बालक अज्ञानी असते त्याला मानापमानाची भावना नसते आणि तो आत्मानंदात निमग्न असतो. गुणातीत तो असल्यामुळे चिंतामुक्त असतो.

एक कुमारी कांडायला बसली. तिच्या हातात बऱ्याच बांगड्या असल्याने त्यांचा आवाज होऊ लागला म्हणून तिने शेवटी एकेक हातात एकेकच बांगडी ठेवली तेव्हां त्याचा आवाज येणे बंद झाले. याच्यावरुन असा बोध घ्यायचा की जास्ती लोक जमले म्हणजे कलह होतो. गप्पा गोष्टींमध्ये वेळ जातो. साधना एकट्यानेच केली पाहिजे.

मुंग्यांनी केलेल्या वारुळात सर्प सुखाने जाऊन राहातो. तो स्वत:चे घर बांधत नाही. आसनजय करुन प्राणायामाचा जर जय झाला तर एकाग्रता साधते. अभ्यासाने आणि वैराग्याने चित्त स्थिर होते. आसनजयामुळे श्वासजय होतो. श्वासजयामुळे मनोजय होतो. प्राणद्वारा मन निश्चल होते. वैराग्याचा उपयोग विक्षेप दूर करण्याकरता होतो आणि अभ्यासाने मन स्थिर होते. कर्मवासना गेली; लय, विक्षेपाला कारण रजोगुण तमोगुण गेले आणि सत्ववृद्धी झाली. ध्येयाकारता प्राप्त होते. आत्मज्ञान शेवटी झाले म्हणजे सगळ्या वृत्ती बंद होतात. मन इतके एकाग्र होते की वाद्य वाजत राजाची स्वारी गेली तरी त्याला कळत नाही. प्रेमाने, भयाने अथवा रागाने जरी ईश्वराचे ध्यान घडले तरी त्याचे फळ मिळते. शेवटी तो मुक्त होतो. कोळी आपल्याच शरीरातून द्रव काढूनच त्याचे जाळे विणतो आणि शेवटी स्वत:च ते जाळे खाऊन टाकतो. तसे मायेने उत्पन्न केलेले सगळे जग शेवटी संहार करुन ईश्वर पुन्हा एकटा राहातो. देहालाही गुरु

केलेले आहे. देह कोणाच्या तरी भक्षस्थानी पडतो. म्हणजे उत्पत्ती आणि नाश यांनी युक्त हा देह आहे म्हणून या देहाबद्दलही विरक्ती उत्पन्न होती. पुढे विवेक आणि वैराग्य दोन्ही उत्पन्न होते.

प्रल्हाद हा भगवंतांचा भक्त होता पण त्याला आत्मज्ञान मिळालेले नव्हते. तो फिरत फिरत दैवयोगाने दत्तात्रेयांना भेटला. वैराग्य संतोषयुक्तम अशा अवधूतांना त्यांनी पाहिले. ह्या दोन गुणांमुळे प्राण, अर्थ चिंतारहित हे होते. प्राणांची म्हणजे मी जिवंत कसा राहीन ही चिंता नाही आणि धन कसे मिळेल, कसे वाढेल, राहील वगैरे चिंता नाही. प्रल्हादाने त्यांना विचारले, तुम्ही अरण्यामध्ये राहाता, तुम्हाला जीवनाची कांही चिंता नाही का ? कोणाचीही भीती नाही, प्राणचिंता नाही, आणि अर्थचिंता नाही. प्राणचिंता आली कि अर्थचिंता आलीच ना ! जेवायला मिळाले नाही तर कसे होईल म्हणजे धन मिळवायला पाहिजे. धन मिळवायचे म्हणजे कर्म टाकता येत नाही, उद्योग केला पाहिजे.

कष्टरुप जो संसार त्याला मुख्य कारण प्राण आणि अर्थ याच्याकरता करावे लागणारे कर्म. ते सोडून द्यायचे. ते करायचे नाही. त्याकरता वैराग्यदायक अजगरापासून घेतलेले शिक्षण आणि मधुकरापासून घेतलेले शिक्षण संतोषदायक. आत्मा आनंदरुप आहे. मग काय बाहेर प्रयत्न करायची जरुरी नाही. आनंद स्वतःचेच स्वरुप आहे. सध्या आपल्याला आत्मरुप हे दुःखरुप आहे असे वाटते आपल्याला. अनेक प्रकारच्या चिंता, कष्ट असतात. आपण दुःखीच आहोत असे जे वाटते ते अविद्येमुळे. ते रुप नाही. सुषुप्तीच्या वेळी कुठे दुःख असते ? म्हणजे दुःख हा जर आत्म्याचा कायमचा धर्म असता तर सुषुप्तीच्या वेळेलाही त्याचा अनुभव आला असता पण तसा येत नाही. म्हणजे दुःख हे त्याचे खरे स्वरुप नाही. पाणी तापल्यानंतर ते गरम लागते पण थोड्या वेळाने ते निवल्यावर त्याचा मूळचा स्वभाव थंड तो अनुभवास येतो. मग आत्म्याचे मूळ सुखरुप कां दिसत नाही ? त्याचा अनुभव कां येत नाही ? हा एक प्रश्न आहे.

सारखे कर्म, प्रयत्न करण्याची निवृत्ती झाली पाहिजे. सगळ्या क्रिया जर सुटल्या, मनापासून सुटल्या पाहिजे मात्र, नाही तर मनांत मनोराज्य सगळी चालायची आणि बाहेरून सर्व क्रियाबंद असे चालणार नाही, हे त्याचे स्वरुप प्रकाशन करणारे आहे. आनंदरुप आत्मा कसा आहे ते समजते.

सगळे भोग हे अशाश्वत आहेत. हे सगळे पाहून कांहीही उद्योग करायचा नाही हे ठरविले मी. त्याच्यासारखे दुसरे हित नाही. मग आता तो स्वरुपानंद कसा प्राप्त होतो ते सांगतो. मनोवृत्ती कमी करायची. एकेक एकेक कार्य करुन कारणाचे ध्यान करायचे म्हणजे कार्याचा विलाप करायचा. मनोवृत्ती, अहंकार, त्याच्यानंतर महत् तत्व, त्या नंतर माया आणि शेवटी स्वस्वरुप. त्यानंतर वाग् व्यापार बंद करुन केवळ मनोव्यापार शिल्लक ठेवणे. वाणीचा मनामध्ये निग्रह करायचा म्हणजे काय ? नुसत्या वाणीचा नाही. सगळी इंद्रिय आणि इंद्रियांचे विषय ह्या सगळ्यांचा मनामध्ये निरोध करायचा. म्हणजे इंद्रिय, त्या इंद्रियांचा त्या विषयांशी होणारा व्यापार, मनोव्यापार सगळा बंद करायचा. इंद्रियांचे हवन करायचे म्हणजे इंद्रिय व्यापार बंद करणे, विषयाचा संबंध बंद करणे. परत्व म्हणजे आंतरत्व, सूक्ष्मत्व, व्यापकत्व आणि प्रत्यक्त्व. इंद्रियांपेक्षा अर्थ हे पर आहेत. अर्थापेक्षा परम् मन: मनापेक्षा पर बुद्धी आहे. बुद्धीपेक्षा पर म्हणजे अत्यंत आंतर, अत्यंत व्यापक आणि अत्यंत सूक्ष्म असा तो एक पुरुष आहे.

मी आत्म्याला जाणतो असें सांगायचे नाही. तो जाणू शकत नाही. आम्ही ब्रह्माला जाणतो असे जे सांगतात त्यांना ब्रह्म समजले नाही. ते कांही कोणाचे विषय नाही. मी ब्रह्म जाणले असें म्हटलं तर जसे एखाद्या वस्तूचे ज्ञान व्हावे तसा विषय झाल्यासारखे झाले. ब्रह्मरुपच आहे ते.

जनकाने एक हजार गायी अलंकार घालून उभ्या केल्या. आपल्याला कोणी तरी सर्वज्ञ मनुष्य भेटावा अशी त्याला इच्छा होती. त्यांच्या उपाध्यायाने सांगितले, ''जो कोणी सर्वज्ञ असेल त्याने ह्या गायी घ्याव्यात. अशी राजेसाहेबांची इच्छा आहे.'' कोणी उठले नाहीत. मग याज्ञवल्क्यांनी आपल्या शिष्याला सांगितले, ''ह्या गायी घेऊन जा.'' मग एकेक उठून म्हणू लागले याज्ञवल्क्यांना म्हणाले, ''तुम्ही काय स्वत:ला सर्वज्ञ समजता का ? स्वत:ला ब्रह्मज्ञानी समजता काय ?'' याज्ञवल्क्य म्हणाले, ''ब्रह्मज्ञानी पुरुषाला मी नमस्कार करतो.'' मी ब्रह्मज्ञानी आहे असे ते म्हणाले नाहीत.

आता कार्तवीर्याजुनाला योग सांगितला. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, दया, आर्जव, क्षमा, धृती, मिताहार, शौच हे दहा यम सांगितले. तप, संतोष, आस्तिक्यभाव, सिद्धांत श्रवण, पूजा, दान, जप, व्रत वगैरे दहा नियम सांगितले आहेत. थोडे वाढिवलेत त्यांनी. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधी हा अष्टांग योग

सांगितला. यम, नियम हे स्वाभाविक आहेत. कर्तव्य म्हणून करायचे. पण आसनापासून सहा अंग म्हणजे षडंग योग सांगितला. समाधी, शेवटचे अंग हे फल मानले आणि योग म्हणजे सातच अंग. असे काहींचे मत आहे. समाधीचे सविकल्प समाधी आणि निर्विकल्प समाधी हे दोन भाग केले. सविकल्प हे अंगच मानल्यामुळे अष्टांग योग झाला. शेवटी यांचा सिद्धांत असा.

सगळे विषय मनांत काढून टाकून केवळ आत्मचिंतन करण्याकरता हे सांगितले. नेहमी ज्याचे अस्ति असे भान होते तो आत्मा आहे. श्रुतीमध्ये दोन्ही सांगितले आहे. वृध धातूचा अर्थ वृद्धी असा होतो. वृद्धी म्हणजे उत्कर्ष. सगळ्या दृष्टीने उत्कर्ष आहे म्हणून त्याला ब्रह्म असे म्हटले. पूर्वीच्या सृष्टीकालामध्ये झालेली सगळी कर्म अद्यापि परिपक्व झालेली नाहीत. तशीच शिल्लक आहेत. प्रलयकालात ती माया विशिष्ट ब्रह्मामध्ये राहातात. सगळी कर्म, अजून ज्यांचे फल मिळायला अवकाश आहे अशी आणि हळू हळू ती परिपक्व होतात. त्याला अविद्या असे म्हटले आहे. 'अविद्या सबलम् ब्रह्म' झालं त्यावेळेला. त्या सर्व कर्मांनी युक्त असलेले, कर्म आहेतच. बरं आता पक्व कर्माचे फल द्यायचे आहे आता, सृष्टी करायच्या वेळेला. त्या वेळी मी सर्व उत्पन्न करतो अशी इच्छा पहिल्या प्रथम झाली. मायेपासून महत् तत्व, महत् तत्वापासून अहंकार म्हणजे सृष्टी, अहंकार तत्वापासून सूक्ष्म भूतासहित आकाशादि भूतं उत्पन्न झाली.

आता इथे काय सांगितले, साक्षात् आत्म्यापासून अव्यक्त म्हणजे माया मानली, त्याच्या नंतर महत् तत्व, त्याच्या नंतर अहंकार, त्याच्यापासून आकाशादि तयार झाले. साक्षात् आत्म्यापासून आकाश, वायू वगैरे क्रमाने उत्पन्न होतात आणि इथे तुम्ही आत्मा, त्याच्या नंतर अव्यक्त म्हणजे माया, त्याच्या नंतर महत् तत्व, त्याच्या नंतर अहंकार, त्याच्या नंतर भूतं. हे कसं काय ? आत्मा हा प्रकृती आहे. प्रकृती आत्मा कसा होईल ? साक्षात् मायेपासून कांहीच उत्पन्न होत नाही. शक्ती आहे ती.

एक ब्रह्म घेतले. ब्रह्मापासून मायाशक्ती असल्याशिवाय कांही होणार नाही. म्हणून मायाही घेतली. हे मध्येच तुम्ही महत् तत्व व अहंकार कुठले आणले ? तर ते म्हणाले, मायेतच आहेत. माया घेतली कि त्यांचे कार्य तयारच आहे. पण स्पष्टीकरणाकरता म्हणून दाखिवले त्यांनी. कशी कशी ती माया बदलत गेली. महत् तत्वरुप झाली. अहंकाररुप झाली. पंचभूतरुप झाली. हे सांगितले आरंभवाद काय आहे. परिणामवाद

काय आहे, त्याचे खंडन काय आहे हा सगळा विचार केला नाही. हे सगळं विस्तारीत होईल म्हणून सोडून दिले. हे सर्व ब्रह्मसूत्रभाष्यामध्ये आहे. म्हणजे काय झालेलं आहे; ती जी शंका त्यांनी घेतली आत्मन: आकाशसंभूत: म्हणता आणि तुम्ही मध्ये किती तरी आत्मा, नंतर अव्यक्त, माया, त्याच्या नंतर महत् तत्व, नंतर अहंकार, नंतर भूतं असं कसं सांगितलत ?

तर आत्म्यापासूनच झाले आहे याचा अर्थ असा की आत्माच शक्तीरुप झाला. मायारुप झालेल्या ब्रह्मापासून महत् तत्व झाले. महत् तत्सरुप झालेल्या ब्रह्मापासून अहंकार झाला. अहंकाररुप झालेल्या ब्रह्मापासून पंचभूतं झाली. म्हणजे ब्रह्मापासून हे सर्व झालं असा अर्थ आलाच. तत्वरुप धारण करुन ते उत्पन्न झाले. आकाशामध्ये एक गुण आहे शब्द. वायूमध्ये स्पर्श आला. त्याचा स्वत:चा गुण स्पर्श आकाशाचा षट् शब्द आला. आकाश, वायू आणि तेज. आकाश, वायू यांचे दोन गुण म्हणजे शब्द आणि स्पर्श हे दोन आले आणि तेजाचा रुप हा स्वत:चा गुण आला. म्हणजे तीन गुण आले. एकेक गुण वाढत गेला. चौथे भूत म्हणजे जल. त्या जलामध्ये पूर्वीचे आकाश, वायू आणि तेज यांचे शब्द, स्पर्श आणि रुप हे गुण आले स्वत: जलाचा गुण म्हणजे रस. पृथ्वीमध्ये पहिले चार गुण आणि पृथ्वीचा गंध हा गुण आला. असे पांचही गुण त्याच्यामध्ये आलेले आहेत.

या पंचभूतांपासून जगत झाले. कार्यसहित जी पंचीकृत भूतं. मूळ अविकृत भूतं आणि विकृतं म्हणजे त्यांची कार्य आणि तत्सहित जी पंचीकृतं भूतं. पंचीकृत भूतं म्हणजे उरु आत्मवर्ष म्हणजे स्थूल असा आत्म्याचा देह असतो. समष्टी शरीर म्हणजे विराट स्थूल शरीर. त्यानंतर सगळी स्थूल सृष्टी म्हणजे विराट देह. आता व्यष्टी शरीराचे वर्णन करताहेत. इंद्रियांनी अर्थाचे ज्ञान होणे ही जागृती अवस्था आहे. जागृत अवस्थेमध्ये ज्ञान होते. स्वप्नावस्थेमध्ये इंद्रियच नसतात. ज्ञान, ज्ञेय, ज्ञाता हे सगळं त्यावेळी मनच बनून जाते. म्हणून इंद्रियांनी अर्थ ज्ञान होणारी अवस्था म्हणजे जागृतावस्था. जागृतीमध्ये कार्य करणारा जीवात्मा वेदांतशास्त्रात विश्व नांवाने ओळखला जातो. सूक्ष्म देह हा सुद्धा भौतिकच आहे. संपूर्ण पंचभूतं आणि त्यांचे कार्य. हा लिंग देह. त्याचा अभिमानी म्हणजे हिरण्यगर्भ. सूक्ष्म समष्टी शरीर अभिमानी.

स्वप्नावस्थेचे वर्णन आहे. ध्यानाचा अभ्यास सुरु झालेला असतानासुद्धा तमोगुण वगैरे कुठे गेलेले असतात ? एखाद्या वेळेला तमाचा उद्रेक झाल्यानंतर झोप येती. त्या

वेळेला पुन्हा सावध करावे लागते. त्याला झोप येऊ द्यायची नाही. जागा आहे पण मन दुसऱ्या विषयांकडे जायला लागले. त्या विषय वृत्ती सोडून त्या मनाला विक्षेप वृत्तीतून बाजूला द्यावे. लय, विक्षेप आणि कषाय. कांही समजेनासे झाले तर तीही वृत्ती दूर करण्याचा प्रयत्न करायचा. ध्यान न करता करता लय गेला, विक्षेप गेला, कषाय गेला तरी सम स्थिती प्राप्त झाली. मग तिथूनही घालवायचे काय त्याला ? नाही, तिथे थांबायचे, म्हणतात. तिथून घालवायचे ठरवले, निग्रह करायला सुरवात केली आणि जे मिळवायचे तेही नको म्हटले तर ? म्हणजे शून्यवादच येणार शेवटी. कांही हाताला लागायचे नाही. लयही नाही आणि विक्षेपही नाही अशी अवस्था कायम ठेवावी. दुसरा कोणचा विषयही येत नाही आणि झोपही येत नाही.

रसास्वाद हे एक मोठे विघ्न आहे. **आम्हाला असा दृष्टांत झाला, आम्हाला असं, असं दिसतं. अमूक दृष्य दिसलं. हे खोटं असं नाही. त्याला अनुभव येतात. पण तो रसास्वाद घेऊ नये म्हणतात. पुढे जे जायचयं ते मोठं फल आहे तिथं जाईपर्यंत हे मनात आणायचेसुद्धा नाही. तिथूनही मनाला रसास्वादापासून काढलं पाहिजे. रसास्वाद हा मोठा दोष आहे. आपले आपण समजून घेऊन दुसऱ्याला सांगतो आपण. असा प्रकाश दिसला, अमूक दिसलं, काय करायचे हे सगळे सांगून ? रसास्वादाच्याही पुढे गेले पाहिजे.**

कोणचाही संग प्रज्ञेमध्ये राहून उपयोग नाही. तेव्हां समाधी अवस्था प्राप्त होते. शेवटी आत्मस्वरुप समजलं समप्राप्त ते चित्त झालं आणि कृतकृत्यता झाली. प्रारब्ध गेलं नाही. संचित कर्म गेली. क्रियमाणाचा संबंध सुटला. तत्वज्ञान झाल्यानंतर क्रियमाण कर्मांचा संबंध नाही. मी अमूक केल नाही, तमूक केल नाही. वगैरे कांही नाही. पापांचा संबंध नाही. अहंकारच कमी झाला ना! पुण्याला ''अध'' म्हटले आहे. पूर्वीचेही पुण्यपाप नाही पुढचेही नाही. अहम् आणि आत्मा अत्यंत बळकट ग्रंथी आहेत. तो जात नाही. प्रमात्र भाग जात नाही. कर्तृत्वभाव, अहम् कर्ता. त्यात ''अहम्'' अंतःकरणाचा पहिला अध्यास आहे. अविद्या प्रथम आहे. पण पहिला अहम्-अहंकार अध्यास आहे. त्या अहंकाराला बाजू करुन त्याचाही साक्षी मी आहे असा जर आत्मा बाजूला झाला तर हृद्ग्रंथी गेल्या. साक्षात्काराने ते होते. अहंकार गेला पाहिजे. अहंभाव नाहीसा झाला पाहिजे. शुद्ध खरा अहम् समजला पाहिजे. म्हणजे तो हृद्ग्रंथी गेला आणि मग संशय जातात सर्व.

काय आहे! ज्ञान झाले की लगेच देह पडत नाही. कारण प्रारब्ध सुरु झाले ना! ज्ञान होण्याच्या पूर्वी. ते बंद करता येत नाही. बाण सोडायच्या वेळेला विचार करुन अगोदर सोडला जाणार नाही. किंवा सुटला त्याने काम केलं तर तेही बंद करता येणार नाही. पण सुटल्यानंतर त्याला जी गती मिळालेली आहे ती मध्ये कशी बंद करणार? ते कार्य होणारच. घेतला तर पुन्हा ठेवून द्या. पण सोडल्यानंतर मात्र स्वातंत्र्य नाही. तो बाण जाणारच. आपोआप संपते ते. त्याला सुख दु:ख भोग नाही. प्रारब्ध हे त्याचे जे आत्म स्वरुपाचे ज्ञान आहे ते नष्ट करु शकत नाही. त्याला सुख दु:ख भोग देईल. तसे प्रसंग उत्पन्न करील. तत्वविचाराने, समाधीच्या अभ्यासाने तो लक्षही तिकडे देणार नाही. स्थितप्रज्ञतेने अशा प्रसंगांकडे दुर्लक्ष करील. नंतर पुढचा जन्म नाही. जन्म संपले त्याचे. प्रारब्ध विद्यालोप करु शकत नाही. सुख दु:ख प्रारब्ध देईल की. त्यात काय. कांही परिणाम होईलही थोडा फार. पण तो परिणाम घालवू शकतो. प्रारब्ध प्रतिबंध नसेल तर याच जन्मात ज्ञान होते.

हां, तो एक सिद्धांत मुद्दाम सांगितला आहे. **देहातून शेवटी त्याचे लिंग शरीर बाहेर पडते,** सूर्यद्वारा तो ब्रह्मलोकाला जातो, वगैरे असे कांही नाही. खरा जो मुक्त झालेला आहे त्याचा इंद्रियलय, प्राणलय इथेच होतो. तो सूर्यद्वाराने जात नाही. तापलेल्या लोखंडावर जर पाणी टाकले तर ते दुसरीकडे वाहूनही जात नाही. बरं तिथेही दिसत नाही. तिथेच विलीन झालं ते. तसं आत्मज्ञान झाल्यावर या ठिकाणी अध्यस्त असलेले देह, इंद्रिय सगळी इथेच लीन होऊन जातात. म्हणजे देहातून प्राणाचे उत्क्रमण झाले असे नाही. इथेच ते विलीन होऊन जातात. हे महत्वाचे आहे.

भीष्माचार्यांचे असेच झाले. समोर श्रीकृष्ण उभे राहिले आहेत. त्यांचे भीष्माचार्य चिंतन करतात. स्तुती करताहेत. करता करता तिथंच प्राण विलीन झाले. कुठं गेले नाहीत कांही नाही. सूक्ष्म शरीर कांही राहातच नाही नां. सगळच लीन होऊन गेलं.

मूर्धन्य-सुषुम्न नाडीतून प्राण बाहेर पडतो, सूर्यकिरणांच्या द्वारा ब्रह्मलोकापर्यंत जातो, ब्रह्मदेवांबरोबर मुक्त होतो. तसं या ज्ञानी मनुष्याला तिथपर्यंत काही जाणं येणं नाही. इथंच सगळं दिलेलं आहे. संपल सगळे. त्या दोन गती सांगितल्या आहेत ना. उत्तरायण पक्षात गेला कि अग्नीलोकांतून त्या गतीने तो जातो. दक्षिणायनात गेल्यावर धूममार्ग का असं काही तरी म्हणतात. पण तो या कोणत्या मार्गाने जातच नाही इथेच सगळे विलीन होते ना! ते उपासक त्या मार्गाने जातात आणि मुक्त होतात. ज्ञानी माणसाला

अमूकच मार्गाने जायला पाहिजे असे नाही. सगळे ऐच्छिक आहे. मोक्ष म्हणजे कांही स्वर्गासारखे एखादे स्थान आहे बुवा, तिथे जाऊन राहायचे असे नाही. स्वत:चं स्वरुप, बाकीची सगळी जी आलेली उपाधीरुपे ती इथल्या इथेच विलीन होऊन जातात. आपले मूळ स्वरुप प्रगट झाले.

ब्रह्म अहम् असच आहे. ईश्वर: अहम् हे उपासकाचे आहे. ज्याची उपासना चालू आहे तत्वस्वरुप तो होतो. हे ही आहे. उपास्यरुप प्राप्त होणे ही उपासनेची परम सीमा झाली. परंतु हा तसा नाही. सर्वज्ञ मी आहे, ईश्वररुप आहे असे म्हणत नाही. ब्रह्म अहम् आहे. मूल ब्रह्म.

कार्तवीर्यार्जुनाला हा योग सांगितला आहे. निर्गुणाचेच ध्यान सांगितले आहे. आरंभाला तो दत्तात्रेयांचा उपासकच होता. त्या अवस्थेमध्ये त्याला सर्व सिद्धी मिळाल्या. नंतर तो कंटाळून सिद्धी परत करायला आला. नको बाबा, घ्या काढून घ्या. मग त्याला अष्टांग योग सांगून आत्मसाक्षात्कार करून दिला. बाहेरचे सुख दु:ख द्वंद्व संपले.

**।। अवधूत चिंतन श्री गुरुदेवदत्त ।।**

एका श्लोकामध्ये पुढच्या सगळ्या अध्यायात काय आहे ते सांगितले आहे. ब्राह्मण स्त्रीची भक्ती पाहून दत्तात्रेय हे श्रीपादरुपाने तिचे पुत्र झाले. आणि आपल्या बंधूंचे कल्याण केले. नंतर आपण संचाराला बाहेर पडले. इथे आरंभाला दिलय त्यांनी. आत्मतत्वाचा साक्षात्कार एकमेव अद्वितीयम् असे जे ब्रह्मतत्व आहे त्याचे प्रत्यक्ष ज्ञान होते. कोणाला ? साधन चतुष्ट्यसंपन्न जे आहेत अधिकारी आणि श्रवण, मनन, निदिध्यासन व समाधी अशा क्रमाने साक्षात्कार होतो. संसारासक्त लोकांचे तिकडे लक्ष नाही त्यांना काय होतं, कर्मयोग आहे. उपासनायोग आहे. अंत:करण शुद्धी कर्मयोगाने होते आणि उपासनेने चित्ताची एकाग्रता होते. हे अगोदर होते आणि नंतर साधन चतुष्ट संपत्ती आपोआप येती म्हणतात.

म्हणून श्रवण, मनन, निदिध्यासनाकडे ज्यांचे लक्ष नाही त्यांना कर्माचा उपदेश आहे. कर्माचे अधिकारी ते आहेत. गती म्हणजे ज्ञान. अधिगच्छति म्हणजे ज्ञान मिळिवतो. तर कर्माच्या गती म्हणजे कर्म कोणचे, अकर्म कोणचे, विकर्म कोणचे हे समजणे फार कठीण आहे. भीष्म, द्रोणसुद्धा द्रौपदी वस्त्रहरणाच्या वेळेला गप्प बसले ना. त्यांना कांही निर्णय करताच आला नाही. काय करायच ? त्या एका कल्याण अंकात

लिहिलयं भीष्म कां गप्प बसले तर ते म्हणे म्हणाले, धर्मराज तिचा एवढा पती असताना तो स्वस्थ बसला आहे तर आम्ही काय निर्णय घ्यायचा ? असं कांही तरी लिहिलंय त्या अंकात. म्हणजे कर्मानुष्ठान कोणच्या कर्माचे करायचे समजत नाही. त्यामुळे कर्माचे तत्वज्ञान हे जर समजले नाही, कर्म, विकर्म जर कळले नाही तर कर्महीं विकर्म होईल, विकर्मही कर्म होईल. म्हणून हा सगळा विचार करून भगवंताच्या प्रीतीकरता कर्मानुष्ठान केले म्हणजे सात्विक मनुष्यावर भगवंताचा प्रसाद होतो. हा विषय ह्या ५ व्या अध्यायात मांडायचा आहे.

नामधारक म्हणतो, ''पुराणात सांगितलेले मत्स्य, कर्मादि अवतार मी ऐकले आहेत. आपण जे श्रीपादवल्लभ, नृसिंहसरस्वती ह्या अवतारांचा उल्लेख केला तो विस्ताराने सांगा.'' सिद्ध म्हणाले, सावध होऊन ऐक. पापनाशक कथा भगवंताच्या आहेत. श्रोता आणि वक्ता दोघांचेही पाप घालवणाऱ्या आहेत. प्रत्येक युगामध्ये धर्माचे, साधूंचे संरक्षण करणे आणि दुष्टांचा नाश करणे या करता अवतार धारण करतात. दुसरे कांहीही प्रयोजन नाही.

तर आता इथे एक विचार मांडला आहे. साधूंचे तेवढे संरक्षण करायचे, दुष्टांचा नाश करायचा म्हणजे ईश्वराच्या ठिकाणी विषमता आली. आणि निर्दयताही आली. दुष्टांना मारायचे म्हणजे काय ? सिद्ध म्हणाले, नाही. गुणदोषांचा तो नियामक आहे ना ! दोष घालविण्याकरता त्याला शासन आहे. जसे माता लालनही करेल आणि ताडनही करेल. म्हणजे माता निर्दय नाहीये. मिळवायचे कांही राहिलेले नाही. दरिद्रीही माणसे जगामध्ये आहेत. पण सात्विक आहेत. संपत्ती नाही त्यांच्याकडे ज्यांची बुद्धी अगदी दुर्बल आहे असा सगळ्यांच्या प्रेमानेच महाराज प्रगट झाले आणि भक्ती वाढवण्याकरता. अवतार धारण करुन जे चमत्कार घडतात त्यामुळे लोक आपोआप इकडे वळतात म्हणून ते चमत्कार दाखवायचे.

पाचशे वर्षांपासून दत्तात्रेयांचे अर्चन आहे. आंध्र प्रांतातील पीठापुरात राहाणारा ब्राह्मण राजा आणि त्याची स्त्री सुमती दोघेही दत्तात्रेयांचे अर्चन करणारे होते. एके दिवशी अतिथी वेषामध्ये दत्तात्रेय आले आणि अन्नाची त्यांनी याचना केली. त्या दिवशी श्राद्धाचा दिवस होता. हाच विचार आहे हे कर्म झाले कि अकर्म झाले. अधर्म झाला कि धर्म झाला. श्राद्धाचे ब्राह्मण जेवण्यापूर्वी तिने अतिथीला भिक्षा घातली. अतिथीला देणे

त्याच्या विरुद्ध वागू नकोस. त्याला अनुमती दे. महापुरुष असेल तो. त्याला कोणी अडवून उपयोग नाही. तो स्वतंत्र आहे. त्याला इच्छा असेल त्या प्रमाणे तो वागेल.

केवढे भाग्य आहे हे! भिक्षा घालायला किती लोक जातात पण असे उदाहरण पहायला मिळत नाही. एखादाच असणार असा. त्यांना आनंद काय झाला, सहज "आई" काय म्हणाले तिला आणि तेच तिने बरोबर सांगितले. ती म्हणाली, तुमचे संबोधन तुम्ही सिद्ध करा. दत्तात्रेय वर प्रदान करुन गुप्त झाले. पतीपत्नी दोघांनाही आनंद झाला. ती म्हणाली, हा एक अपराध घडलाय असे वाटतयं मला. ते ब्राह्मण म्हणाले, पितरांचे अन्न तयार करुन ब्राह्मणांना जेवायला घालायचे आणि शेवटी विष्णूला अर्पण करायचे ते. स्वतः विष्णूंनीच अन्न तुझ्याकडून ग्रहण केलय. असे कर्म घडणे फार कठीण आहे. देवाच्या कृपेने होऊन गेले. रुपांतर करुन दत्तात्रेय याचकाप्रमाणे दुपारच्या वेळी आपल्या भक्तांचा उद्धार करण्याकरता फिरत असतात. म्हणून त्या वेळी अतिथीची अवश्य पूजा करावी. अन्नदान करावे. भक्तीमार्गाने किती उद्धार झालेला आहे. भक्ती करणारे काय नुसते आपले भजन करत बसतात. संतांनी भक्तीमार्गाचा प्रसार करून लोकांना निष्क्रिय बनवले आहे असे आरोप करतात लोक. पण या स्त्रीने जगावर उपकार केले आहेत. कुल तर पवित्र झालच पण भगवंताचा अवतार हिच्यापासून झाल्यामुळे जगाचा उद्धार होतोय ना! हे तिचे उपकार आहेत. फार चांगले केलेस.

वास्तविक आता श्राद्ध करायची जरूरी आहे काय? पितरांचा जिथे उद्धार झाला तिथे श्राद्ध कशाला करायचे? भगवंताला अन्न अर्पण केले म्हणजे श्राद्ध झालेच आहे. पण नाही. ज्ञानाच्या दृष्टीने भगवान प्रसन्न झाले, त्यांनी अन्न घेतले म्हणजे श्राद्ध झाले. पण काय होईल की श्रेष्ठ पुरुषांनी असे आचरण केले तर लोकही तसेच वागतील. तेही म्हणतील कोणत्या तरी अतिथीला अन्न देऊ म्हणजे श्राद्ध झाले. प्रत्यक्ष श्राद्ध विधी करायची गरज नाही. सध्या तसे करतात ना. श्राद्धाच्या दिवशी अनाथ विद्यार्थी गृहाला १०० रु. द्यायचे आणि विद्यार्थ्यांना जेवायला द्यायचे, पण ते शास्त्रीय दृष्ट्या श्राद्ध कसे होईल? म्हणून लौकिक दृष्ट्या दत्तात्रेयांना देऊन उरलेल्या अन्नाने त्याने श्राद्ध केले.

हे भागवत मत आहे. त्या माध्वांच्या सांप्रदायात अगोदर नैवेद्य दाखवतात मग वैश्वदेव करतात. अगोदर विष्णूना नैवेद्य दाखवायचा मग इतर देवांना आहुती द्यायच्या. ते भागवतात दिले आहे. पुन्हा दुसरे असे आहे की विष्णूला एकदा नैवेद्य दाखवल्यानंतर

दुसऱ्या देवतांचे यजन करायचे नाही. तुम्ही तर म्हणता विष्णूंना दिलेल्या अन्नाने यजन करायचे. हे कसं काय ? स्मार्तांसाठी अगोदर सर्व देवांना वैश्वदेवाने आहुती द्यायच्या मग सगळं, नैवेद्य वगैरे भागवत जे आहेत त्यांच्याकरता अगोदर नैवेद्य मग वैश्वदेव वगैरे आहे.

सुमतीला पुढे मुलगा झाला. त्याचे ज्योतिष्य पाहून ज्योतिषांनी सांगितले, तुम्हाला पुण्याचा कल्पवृक्ष मिळाला आहे. ही लक्षणे जीवाची नाहीत. हा साक्षात् दत्तात्रेयच जणू आहे. ज्याची तुम्ही पूजा करता त्यानेच तुमची भक्ती पाहून अवतार घेतला आहे. तेव्हां आईवडिलांनाही आनंद झाला. श्रीकृष्णाच्या चरणावर जशी चक्र, ध्वजांग वगैरे लक्षणे होती तशी लक्षणे या बालकाच्या पायावर पाहून त्याचे ''श्रीपाद'' हे नांव ठेवण्यात आले. म्हणजे नुसते पायच सुलक्षणांनी युक्त होते आणि बाकीची अंग नव्हती असा नाही: इतरही अवयव उत्तम गुणांनी युक्त होते. सूर्य किरण चंद्राला मिळताता ना! त्यामुळे चंद्रही वाढत जातो, पोर्णिमेपर्यंत.

आता या श्लोकात बराच विचार केला आहे. जातकर्मादि संस्कार सगळे झाले. पुढे ८व्या वर्षी उपनयन झाले. तिन्ही वेद पढिवले त्यांनी. सगळ्यांना आचार, व्यवहार आणि प्रायश्चित ही तीन शिकवायची असतात. १५-१६ वर्षे झाल्यावर आपला पिता विवाहाचा विचार करतोय समजल्यावर श्रीपादांनी त्यांना विवाह करायचा नाही असे सांगितले. याच्यावर विचार केल्याय त्यांनी. तीन नाही तर दोन, दोन नाही तर निदान एका वेदाचा अभ्यास करून गृहस्थाश्रमात प्रवेश करावा असे मनुने सांगितले आहे. श्रुती सांगते प्रजातंतु विच्छिन्न करायचा नाही. प्रजा निर्माण करायची. ब्राह्मणाला तीन ऋण असतात. तो यज्ञ करुन देवऋणातून मुक्त होतो, अध्ययन करुन ऋषी ऋणातून मुक्त होण्याकरता प्रजोप्तत्ती झाली पाहिजे. एखादे वेळी पुत्र झाला नाही तर मुद्दाम पुत्रकामेष्टी यज्ञ करावा. आणि त्याने पुत्र उत्पन्न करुन त्या ऋणातून मुक्त व्हायचे. प्रयत्न करायला सांगितलाय. मुलगा झाल्याशिवाय उत्तम लोक मिळत नाही अशी श्रुती आहे. असे असताना श्रीपादांनी विवाह करण्यास नकार दिला हे योग्य झाले काय ? हे शास्त्राच्या विरुद्ध झाले नाही का ? श्रीपादांनी सांगितले, मी आता सर्व संन्यास करुन इथून निघणार आहे. योगश्री बरोबर माझा विवाह होणार आहे. अध्यात्म योग प्राप्त करुन घेण्याकरता श्रीगुणयुक्त अंतरंग संपत्ती आहे ती माझी श्री आहे. तिच्याबरोबर माझा विवाह होणार. पित्याने विचारले, ज्ञानमयी संपत्ती घेण्यापेक्षा कर्ममयी

संपत्ती कां घेत नाही ? त्याने निदान अंत:करणशुद्धी तरी होईल.

श्रीपाद म्हणाले, मला कर्ममार्गाने जायचे नाही. कर्म हे प्रेय आहे श्रेय नाहीये. ह्या सगळ्या वासना असतातच. त्यांच्याकरता गृहस्थाश्रम आहे. कोणचीही साधने नकोत, स्वर्गादि लोक नकोत असे ज्याला मनापासून वाटतय त्याने संन्यास घ्यायला हरकत नाही. मनाची तयारी नाहीये. ज्याला सगळ्या वासना आहेत त्याने आपलं मुकाट्याने कर्ममार्गाने जावे. कर्म संन्यास आहे, वेदाध्ययन करणे वगैरे ही संपत्ती नकोय मला. चित्तशुद्धीसाठी लागणारी साधन चतुष्ट्य संपत्ती सगळी माझ्याकडे आहे की, आता काय मिळवायचे ?

कर्मकांडात सांगितलेले विधी निषेध हे ज्याच्या मनांत वासना आहेत त्यांच्याकरता त्या श्रुती आहेत. विरागी जो आहे त्याच्यासाठी नाहीत. स्त्रीसंग हा 'रागात्। प्राप्त:।' आहे. अमिष सेवन, मांस सेवन आणि मद्य सेवन. त्याकरता त्यांनी सांगितले, विवाह, यज्ञ, आणखी स्त्रीभोग त्याच प्रमाणे यज्ञातल्या अमिषाचा शेष भाग घ्यावा. स्त्रीसंग ज्याला पाहिजे त्यांनी विधिवत् विवाह करावा आणि तो भोग घ्यावा. ही शास्त्राने व्यवस्था लावलेली आहे. इच्छा असणाऱ्याला, विराग्याला तर कांहीच नाही. विरागी म्हणजे निरिच्छ. रागी या शब्दाचा अर्थ होतो इच्छा, वासना मनांत असणारा. पत्नीबद्दल द्वेष उत्पन्न झाला किंवा ती नावडती झाली म्हणून ऋतौ भार्यामुपेयात चे उल्लंघन करु नये त्या रुपाने असे सांगतात. विरक्ताला दोष नाही. वाजसनेय शाखेमधल्या लोकांना इतर 'लोक' नको असतात. आत्मा हाच लोक त्याना हवा असतो. आणि तो मिळवण्याकरता ते संन्यास घेतात. प्रजा वगैरे घेऊन आम्हाला काय करायचय. आत्मा हाच आमचा लोक आहे. हीच आमची प्रजा आहे. सगळ्या एषणा सोडून देऊन संन्यास घ्यायचा. ज्ञानयोग हीच माझी श्री (पत्नी) आहे. तिच्याबरोबर मी विवाह केलेला आहे.

श्रीपादांचे हे बोलणे ऐकून त्याच्या मातापित्यांच्या नेत्रात अश्रु आलेले आहेत. ते म्हणाले, ''आपण निघून गेल्यावर आम्ही जगायचे कसे ? पाणीच गेले तर पाण्यातील कमळे किंवा मासे जिवंत कशी राहतील ?'' दत्तात्रेयांनी सांगून ठेवले होते की तुम्हाला पुत्र होईल त्याच्या इच्छेच्या विरुद्ध तुम्ही जाऊ नका. त्यामुळे श्रीपादांना आग्रह करुन ठेवून घेता येईना. त्यांच्या विवाहाचा हट्ट करता येईना. आपण जरी साक्षात् विष्णू असलात तरी पुत्ररुपाने आम्हाला दिसलात मग या दु:ख समुद्रात कां लोटून जाता ? असे त्यांच्या आईने विचारले. ती पुढे म्हणाली, आमचे आता वय झाले, भवपाशातून

सोडवणारी आपली स्मृती ही आता आपण निघून गेलात म्हणजे दूर होणार. कारण ही दोन जी अंध व पंगू आपली भावंडे आहेत त्यांच्याकडेच आम्हाला लक्ष द्यावे लागणार.

सिद्ध सांगताहेत, मातेच्या प्रार्थनेप्रमाणे त्यांनी (दत्तप्रभूंनी) आपल्या दोन्ही बंधूंच्या मस्तकावर सुखकारक असा हस्त ठेवला. त्यांचा हस्तस्पर्श होताच त्या दोन्ही भावांचे उत्तम शरीर झाले. पंगुत्व, अंधत्व, सगळे गेले. नुसते शरीर चांगले झाले नाही तर बुद्धीही उत्तम झाली. ते दोघेही ज्ञानी झाले. सिद्ध म्हणतात, यांत आश्चर्य नाही कांही. सहज चमत्कार घडला.

मातेलाही त्यांनी आपले रूप दाखिवले. त्या दृष्टीने पूर्वी कधी न पाहिलेले ते स्वरुप मातेला पहायला मिळाले. पूर्वी वास्तविक तिने दत्तात्रेयांचे रुप पाहिले होते पण मायेच्या आवरणामुळे तिला विसर पडला. 'माया ही दैवी माया आहे, अत्यंत अद्‌भुत अशा प्रकारची अलौकिक माया आहे त्या मायेने मोहित होऊन आपल्या रुपाचा मला विसर पडला. आपण माझे पुत्रच आहात म्हणून मला शोक होतोय.' मातेने अशी प्रार्थना तळमळीने केली. "अनंत ब्रह्मांडे ज्याच्या उदरामध्ये आहेत तो आपला पुत्र कसा होईल. तेव्हां हे मायेचे आवरण होऊ नये." ती पुढे म्हणते, "जग दिसले तरी चालेल पण हे आपल्या स्वरुपाचे आवरण नको."

ईश्वर नाही किंवा ईश्वर भासत नाही ही दोन प्रकारची आवरणं आहेत. दिसत नाही. तर हे आवरणच जन्म मरणादि संसाराला कारण आहे. ईश्वर नाही हे असत्वावरण आणि ईश्वर हा भासत नाही. यामुळे जन्म मरण, संसार येतो. जग दिसले, त्याच्याशी व्यवहार केला म्हणजे त्यामुळे संसार उत्पन्न होत नाही. कारण प्रत्यक्ष ज्ञान झाल्यावर कांही काळ विक्षेप राहतो म्हणतात. जगाचा आभास कांही काळ राहतो. असे त्यांनी उदाहरण दिलेले आहे. म्हणजे काय आहे, गडद अंधारात दोरी पडलेली असताना तिच्या ठिकाणी साप आहे असा भास झाला. पाहाणारा घाबरला. भीती उत्पन्न झाली. थरथर कांपायला लागला. दिवा कोणीतरी आणला आणि ही रज्जूच आहे हे प्रत्यक्ष ज्ञान झाले. तरीसुद्धा ती भीती आणि कंप जायला थोडा वेळ लागतो. अधिष्ठानाचे, रज्जूचे ज्ञान झाल्याबरोबर सर्प गेला, आवरण गेले. पण सर्पाचे जे कार्य आहे भीती, कंप वगैरे ते थोडा वेळ राहातेच की नाही. धडकी भरलेली आहे. पण ते पुढे आपोआप नाहीसे होते. तेव्हां जगदाभास, जगत् विक्षेप जो आहे तो आपोआप नाहीसा होतो. प्रत्यक्ष आवरण उपयोगी नाही.

श्रीपादांनी मातेला सांगितले, "जे रुप तूं पाहिलेस त्याचेच मनांत चिंतन कर." म्हणजे हे जे प्रत्यक्ष दिसलेले रुप होते त्याचेच ध्यान करायला सांगितले आहे. निर्गुण निराकार निराळे. अखंड त्याचे ध्यान चालले पाहिजे. म्हणजे माया समुद्र पार करून माझ्यामध्ये तूं विलीन होशील. मुलांनाही आशीर्वाद दिलेला आहे. दीर्घ आयुष्य आहे. तुम्ही आईवडिलांची सेवा करण्यास उत्सुक असणारे आहात. तुम्हाला पुत्र, पौत्र, ऐश्वर्य, समृद्धी पुष्कळ मिळेल.

आपल्या बंधूंना ते सांगताहेत, उत्तम प्रकारे मातापितरांची सेवा करा. गृहस्थाश्रमी सत्पुत्राचे खरे दैवत म्हणजे मातापिताच आहेत. ब्रह्मचारी गुरुंच्या आधीन आहे. हे मुख्य अवतार कार्य आहे. म्हणून सज्जन ज्या ठिकाणी राहतात असे जे गोकर्ण क्षेत्र आहे त्या ठिकाणी ते गेले. त्या क्षेत्रात प्रत्यक्ष गणेशांनी शिवलिंगाची स्थापना केली आहे.

श्राद्धाकरता केलेले अन्न श्राद्धापूर्वी दुसऱ्याला दिल्यावर ते विकर्म घडले. तो अधर्म झाला. बरं, घरात श्राद्ध आहे. ते श्राद्धाचे अन्न द्यावं तरी विकर्म आहे. अधर्म झाला. भुकेलेला अतिथी घरी आला त्याला आमच्या घरी आज श्राद्ध आहे, भिक्षा घालायला वेळ आहे, आता मिळणार नाही हे सांगणेसुद्धा विकर्म, अधर्म आहे. देणंही विकर्म आणि न देणंही विकर्म आहे.

सुमतीने विचार केला न देण्यापेक्षा दिलेले बरे. अतिथीला दिले म्हणजे कांही आपण खाल्ले नाही. अतिथी म्हणजे साक्षात विष्णू आहे या भावनेने तिने भिक्षा घातली. त्यामुळे तिला श्राध्दाचे तर फळ मिळालेच पण इतरही अनंत फल मिळाले. पण ही बुद्धी तशी त्यावेळेस सुचली पाहिजे. ती जर भिक्षा घालू का नको या संशयातच पडली असती तर ती वेळ गेली असती. कोणचे तरी कर्म करावे. अदानापेक्षा दान हे कर्म तिने केले. म्हणजे बंधनातून मुक्त झाली ती. नाही तर काय करावे, काय नाही, या संभ्रमात पडली असती दत्तात्रेय निघून गेले असते. श्राद्ध झाले असते तरी अतिथीला विन्मुख पाठवल्याचा दोष लागला असता. म्हणून अदानापेक्षा दान चांगले आहे. **करावे किंवा न करावे असे वाटले तर करावे. कर्म चांगले. हे ह्या अध्यायाचे सार आहे.**

।। अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ।।

आता ९ वा अध्याय आहे. बराच मोठा आहे बरंका. त्या सायंदेवाच्या गावांत दत्तप्रभू आलेले आहेत. नामधारक विचारतो आहे, दत्तप्रभूंनी संन्यास घेतल्यावर आपल्या जन्मभूमीला का गेले ? संन्याश्याने आपल्या जन्मभूमीला जावे का ? त्यांचे शिष्य कोण कोण झाले ? पुढे त्यांनी काय काय कार्य केले ?

संन्यासाश्रम पूर्वाध्यायामध्ये सांगितला. संन्यासी पुरूषाने आपल्या जन्मभूमीला येणं बरं नाही असं नामधारकाला वाटलं. सिद्ध म्हणाले, (कारंजा) जन्मभूमी सोडताना तीस वर्षांनतर परत तुला भेटायला येईल असे दत्तप्रभूंनी आईला सांगितले होते. दिलेला शब्द खरा करण्याकरता ते कारंजाला आले. मातेच्या दर्शनाकरता आलेले आहेत. कारण माता ही संन्याश्यालासुद्धा वंद्य आहे. ज्ञानी माणसाने नेहमी खरं बोललं पाहिजे. संन्यास घेतलेल्या पुत्राला पित्याने नमस्कार केला पाहिजे. त्याने पित्याला नमस्कार करायचा नाही. पण माता दिसल्यावर मात्र त्या संन्याश्याने मातेला नमस्कार केला पाहिजे हे मातेचे विशेष महत्व आहे. अनुभूतीमध्ये हे आहे वाटतं. उपाध्यायांपेक्षा आचार्य १०० पट श्रेष्ठ (उपाध्याय् उपनयन इ. कर्म करणारा) आचार्यांपेक्षा १०० पट पिता श्रेष्ठ. आणि पित्यापेक्षा सहस्त्रपटीने माता श्रेष्ठ आहे. अशा मातेला दत्तप्रभूंनी शब्द दिला होता म्हणून ते परत कारंज्याला आले. जन्मभूमीत कांही दुसऱ्या कोणाला भेटायला आले नाहीत.

आता दत्तप्रभूंची शिष्य परंपरा पहा. जसे ज्येष्ठ पुत्रांचे नांव घेत नाहीत तसे जेष्ठ शिष्यांचे नांवही घेत नाहीत. त्यामुळे दत्तप्रभूंचे ज्येष्ठ शिष्य बालसरस्वती म्हणून आहेत. त्यांच्या मूळ नांवाचा उल्लेख कुठे केलेला नाही. पित्याने पुत्राला सांगायचे ते वेदाध्ययन कर. पुत्राने कबूल करायचे, मी वेदाध्ययन करीन. तुमच्याप्रमाणे मीही यज्ञानुष्ठान करीन. आणि त्या त्या लोकाला जाईन. असे मुलाने पित्याला वचन द्यायचे असते. पुण्यकर्म करण्याकरता पुत्र हा पित्याचा, आत्माच प्रतिनिधी म्हणून आहे. तसाच शिष्यही गुरूंचा प्रतिनिधी म्हणून आहे. गुरूशिष्य परंपरेला विद्यावंश असे म्हणतात. ह्या विद्यावंशात अब्रह्मवित कोणी नसतो. बालसरस्वती-कृष्णसरस्वती - उपेंद्र सरस्वती - ज्ञानज्योति सरस्वती - सदानंद सरस्वती - माधव सरस्वती आणि सिद्ध. ह्यांचे 'सिद्ध' हेच नांव आहे. दुसरे नांव नाही. प्रत्येकाच्या नांवाच्या शेवटी 'सरस्वती' येते. दक्षिण मठाला 'सरस्वती' संप्रदाय आहे. परमगुरू कृष्णसरस्वती या दक्षिण मठाच्या सांप्रदायाचे होते. इतरही अनेक शिष्य होते.

दत्तप्रभू जन्मभूमीमध्ये आले. सात वर्षे तेवढे गप्प बसले. आपले खरे स्वरूप कांही प्रगट केले नाही. पुढे प्रगट केले. आता इथे आल्यांतर मातापिता, बंधू भगिनी सर्वांची भेट झाली. त्या प्रत्येकाने बोलावल्यावर प्रत्येकाच्या घरी जाऊन पूजा ग्रहण केली. आपली खरी शक्ती प्रगट केली. जन्मल्यापासून मुंज होईपर्यंत सात वर्षे ओंकाराशिवाय दुसरा शब्द उच्चारला नाही. ओंकाराचा उच्चार हा सुद्धा एक चमत्कारच आहे. नरसोबाच्या वाडीला अरण्यात मात्र १२ वर्षे राहिले. तिथेही काही नाही. परळीला एक वर्ष राहिले. तिथे गुरुभक्ती सांगून एका ब्राह्मणाचा उद्धार केला. कारंज्यामध्ये प्रत्यक्ष पित्यानेच दत्तप्रभूंची पूजा केल्यावर त्यांच्या मातेला पूर्व जन्माचे स्मरण झाले. ती पतीला म्हणाली, एका कुपुत्राची मी माता होते आणि आत्महत्या करायला मी निघाले होते. तेव्हां माझे रक्षण ह्यांनी केले. तेच हे श्रीपादवल्लभ आहेत. माझ्याप्रमाणें तुला मुलगा होईल ही प्रतिज्ञा केली. ती खरी करण्याकरता स्वत:सारखा दुसरा कोणी नाही म्हणून स्वत:च पुत्र झाले.

मग ती दत्तप्रभूंना म्हणाली, ''आपण श्रीपादवल्लभ आहात. माझे पुत्र नाही. आपण माझा उद्धार करा. लोकांमध्ये माझे पुत्र म्हणून प्रसिद्ध आहात. या लोक व्यवहाराला अनुसरून जर तुम्हाला वागायचे असेल तर मी तुमची माता आणि तुम्ही माझे पुत्र हा जो संबंध आपला आहे हा संबंध तुम्ही लक्षात ठेवा आणि माझा उद्धार करा.'' तीही मोठी विचारी होती.

हे काय आहे, म्हणाले, सगळं. काळ एक आहे. म्हणजे सगळ्या गुणांचा क्षोभ उत्पन्न होतो, सृष्टी निर्मितीच्या वेळेला आणि गुणांपासून सगळे पदार्थ निर्माण होतात. त्या नंतर दैव. पूर्वजन्माचं कर्म. क्रिया. क्रिया म्हणजे कर्म हे निमित्त आहे. आणि तेच फलाभिमुख झाले. अभिव्यक्त झाले म्हणजे त्याल दैव असे म्हणतात. ईश म्हणजे जीव असा अर्थ घेतलाय त्यांनी. त्यानंतर आत्मा. प्रत्येक पदार्थाचा स्वभाव आणि संस्कार. ते सगळे संस्कार घेणारा जीव. नंतर सूक्ष्म भूतं. शरीरे असू म्हणजे प्राण. आत्मा म्हणजे अहंकार. आणि वैकृत सोळा पदार्थ त्या अहंकारापासून झाले.हे सगळे पदार्थ संसारात आहे. हे सगळे लिंग देहात आहेत. कर्मामुळे देह, देहामुळे कर्म पुन्हा कर्मामुळे देह असे सारखे चाललेले आहे. ही सगळी तुमची मायाशक्ती आहे. सूक्ष्म शरीर घालवा एकदा.

दत्तप्रभू म्हणाले, ज्या कुलांमध्ये संन्यासी झालेला आहे, त्याच्या २१ पिढ्या तरून जातात, दुर्गतीला गेलेल्या पितरांनाही अमृत म्हणजे सद्‌गती मिळते. या तुमच्या कुळामध्ये ह्या मुलाने संन्यास घेतल्यामुळे आता कांही शिल्लक राहिलेले नाही. सगळे पूर्ण झालेले आहे. संपत्ती आहे, संतती आहे, सगळं आहे. संसारातली कांही काळजी नाही. पुढे तुम्हाला काशीत मुक्ती मिळेल. हाही वर देऊन टाकला. ऐहिक, पारमार्थिक, पारलौकिक सगळं कल्याण झालेलं आहे.

दत्तप्रभूंच्या भगिनीने घेऊन त्यांना विचारले, ''पुढे माझी काय गती होणार आहे ? या भवसिंधूपासून मला फार भीती वाटते. आपणच माझे सद्‌गुरू आहात. आपणच माझा उद्धार करा.'' दत्तप्रभूंनी तिला सांगितले, ''स्त्रियांना पतिसेवा हीच तारक आहे. दुसरे कांही नाही. म्हणून पातिव्रत्य धारण करून राहा म्हणजे भवासागर तरून जाशील. पूर्व जन्मामध्ये तूं एका पतीपत्नींमध्ये एकमेकांबद्दल द्वेष निर्माण केलास. चहाडखोरपणा केलास. खोटच याचे त्याला, त्याचे ह्याला केलेस. हा एक दोष आहे आणि रागाच्या भरात गायीला लाथ मारलीस. या दोषांचा परिणाम म्हणजे तुझा पती यती होईल आणि तुझ्या अंगाला कुष्ठ होईल.'' आता ह्या जन्मातले हे फळ सांगितले त्यांनी. ते ऐकून ती अतिशय खिन्न झाली. दत्तप्रभू तिला पुढे म्हणाले, ''अगदी शेवटी शेवटी होणार आहे. तुला श्वेतकुष्ठ जरी झाले तरी तुला माझे दर्शन होऊन तुझा तो रोग जाईल कांही पती तर तुझा संन्यास घेऊन निघून जाईल. तो काही परत गृहास्थाश्रमात येणार नाही पण तुझे श्वेतकुष्ठ मात्र जाईल.

मग या सगळ्यांची अनुज्ञा घेऊन दक्षिण दिशेला जायला निघाले. संचार करीत करीत ते गौतमी नदीच्या तटावर आले. गौतमाने तिला भूलोकावर आणले म्हणून तिचे नांव गौतमी पडले. गोहत्या दोष जाण्याकरता त्याला, गौतमीला भूलोकावर आणावे लागले. या गोदावरीत स्नान करून माधव संज्ञक नांवाच्या ब्राह्मणाला जन्ममृत्युच्या फेऱ्यातून सोडवले. म्हणजे हे गोदातटी भेटलेले माधवसरस्वती वेगळे आणि प्रयागाला भेटलेले माधव विप्र वेगळे. ह्यांना संन्यास कांही दिलेला नाही. पण ह्यांना संसारातून मुक्त केले. ह्यांनी स्तुस्ती केलेली आहे.

ह्या गोदावरी तीरावरून पुढे निघाले. वाटेत नदीमध्ये आत्महत्या करण्यासाठी आलेला ब्राह्मण दिसला. त्याने आपल्या कंठात बुडून मरण्यासाठी मोठी शिळा बांधली होती. दत्तप्रभूंनी त्याला विचारले, '' कां, बाबा, देहत्याग करण्याचे साहस तूं का करतो

आहेस ?'' तो आपल्या रोगाला इतका कंटाळा होता कि त्याने विचारले, ''तुम्ही जाणून घेऊन काय करणार आहात ? काय माझा रोग बरा करणारा आहात का ?'' त्याला काय माहिती आपल्याला विचारणारे कोण आहे. त्रासून गेला होता बिचारा. तो म्हणाला, ''अन्न माझे वैरी झाले आहे. अन्न घेतले रे घेतले कि भयंकर पोटशूळ उठतो. आता हे दु:ख सहन करणें अशक्य झाले आहे. तेव्हां मी कसा व कशासाठी जिवंत राहू ? म्हणून मी आत्महत्या करण्यासाठी निघालेलो आहे.''

अन्नाशिवाय जिवंत तरी कसे राहायचे ? असे त्याने विचारले. त्यापेक्षा मरण येणं बरं असं मला वाटतं, म्हणाला. आता आपल्या कर्माची आठवण त्याला झाली. तो म्हणाला, ''मी कोणालाही कधी अन्नदान केले नाही. या जन्मातही नाही आणि पूर्वीच्या जन्मातही नाही. गाईचा, विप्राचा घास मी घेतला. मातापिता, गुरूंची निंदा केली. ईश्वराचे अर्चन केले नाही. अतिथींना घालवून दिले. मातापित्यांना सोडून स्त्रीसह मिष्टान्न भक्षण केले. मला इतके कष्ट का आले ? जन्म फुकट गेला माझा.''

महाराज म्हणाले, ''भिऊ नकोस. पथ्यकारक अन्न मी तुला औषध म्हणून देतो. मी भिषक आहे.'' एवढं त्याला आश्वासन देऊन महाराज थांबले. एक ब्राह्मण तिथे आला. गाणगापुराकडून इकडे आला. त्या वासर ब्रह्मेश्वरला होता तो. म्हणाला, मी कौण्डिव्य गोत्री ब्राह्मण असून माझे नांव सायंदेव आहे. महाराज सायंदेवाला म्हणाले, ''हा ब्राह्मण पोटशूळाने त्रस्त होऊन आत्महत्या करायला निघाला आहे. त्याला मी दिव्य औषध देणार आहे. ह्याला तूं उत्तम पक्वान्न करून जेवायला घाल.'' सायंदेव म्हणाले, ''ह्याला जर मी अन्न खायला घातले तर मरेल हा. महिना पंधरा दिवसातून एकदा जरी अन्न खाल्ले तरी आत्यंतिक पोटशूळाची व्यथा ह्याला होते. ह्याला अन्न देऊन ब्रह्महत्येचे पातक लागेल.'' महाराज म्हणाले, ''पाहू या. पुढे काय होतं ते पाहू, जेवायला घाल तू ह्याला. मी उत्तम वैद्य आहे. रोगाची चिकित्सा मला माहिती आहे. खीर, उददाचे वडे वगैरे कर. अनरसे वगैरे करून ह्याला जेवायला घाल.''

सायंदेव म्हणाला, ''आपल्या आज्ञेप्रमाणे ह्याला जेवायला घालतो. पण आपण आपल्या शिष्यांसह आमच्या घरी भिक्षेला यावे. आपल्याला मी शरण आलो आहे.'' असे त्याने उत्तम आणि मनाचा मोठेपणा दाखविणारे भाषण केले. ते ऐकून महाराजांनी त्याच्या घरी यायचे कबूल केले. सायंदेवांने महाराजांना त्यांच्या शिष्य परिवारासह

घरी आणले. महाराजांना उत्तम आसनावर बसून पत्नीसह देवताबुद्धीने महाराजांची पूजा केली. साक्षात परमात्मा असे कळले नाही त्याला. पण महाराज वेदज्ञ आणि संन्यासी आहेत. अर्थात हे शास्त्राप्रमाणें देवच आहेत असे मानायला हरकत नाही. अशी त्याची भावना झाली. वेदज्ञाच्या ठिकाणी सर्व देवतांचा निवास असतो. दंड कमंडलु घेऊन संन्यास दीक्षा घेतली आहे. संन्यासी म्हणजे साक्षात् विष्णूचे रूप आहे. महाराज देव आहेत अशी सायंदेवाने कल्पना केली. भ्रमच आहे तो. खरे ज्ञान झालेली नाही. खरेदेव आहेत अशी बुद्धी करणे हे ज्ञान झाले. **परंतु हे ज्ञान जरी त्याने कल्पनेने केले असले तर त्याचे त्याला फळ मिळाले.**

महाराजांच्या पाना भोवती रांगोळ्या काढल्या, त्यांची पूजा केली. सगळे उपचार त्याने केले. कांही कमी केले नाही. रूद्र, पुरूषसूक्ताने महाराजांची पूजा केली. सायंदेव कवी होते त्यामुळे गीतानेही महाराजांची स्तुस्ती केली. त्या नंतर तीर्थांची पूजा केली. सदगुरूंच्या पायाचे तीर्थ हे पापहारक आहेत. अतिथींचा सत्कार कसा करायचा हे सगळ ह्यांनी मांडलेले आहे **अगोदर किती प्रेमाने आमंत्रण द्यायचे. आल्यानंतर त्यांच्या विषयी भावना कशी असावी. हे साक्षात् परमात्मा आहेत अशी भावना ठेवायची. सगळ्या उपचारांनी पूजा करायची. नंतर स्तोत्र पठण करायचे आणि अन्न समर्पण करायचे. ते सुद्धा आदराने मधुरपणे सांगायचे. ''सावकाश होऊ द्या.'' चतुर्विध अन्न द्यायचे. वैद्यकामध्ये सांगितलय, मधुर भोजन असावे. तसेच सात्विक असावे. भव्य संयुक्त म्हणजे गव्य, दुग्ध, अज्य, दधि नवनीत. आता चतुर्विधम–भक्ष्य, भोज्य, लेह्य, शोष्य असे चार प्रकारचे अन्न आहेत.** दातांनी तोडून खायचे पदार्थ म्हणजे भक्ष्य, जिभेने फक्त घ्यायच्या पदार्थाला भोज्य म्हणतात. 'या जिव्हायां निखिप्य रस्वास्वादेने क्रमशो' हे लेह्य झाले. आणि ऊसासारख्या पदार्थाचा रस तेवढा घेऊन चोथा टाकून देतो त्याला शोष्य असे म्हणतात.

त्या गुरु पंक्तींमध्ये जेवल्यामुळे त्या ब्राह्मणाची पोटदुखी दूर होऊन त्याला आरोग्य मिळाले. सिद्ध म्हणतात, ''पोटशूळ जाणे म्हमजे कांहीच नाही. जन्माला येणे हाच मोठा रोग आहे. तोसुद्धा ज्याचे भक्त घालवतात त्यांना पोटशूळ घालवणे सहज शक्य आहे. हा रोग जाऊन त्याचे कल्याणच झाले आणि तो महाराजांचा शिष्य झाला. घरदार सगळे सोडून तो सद्गुरूंची सेवा करू लागला.'' सायंदेवांनीही महाराजांची

स्तुस्ती केली. आपल्या चरण कमलांच्या वंदनाने माझा जन्म सफल झाला. माझे पितरही मुक्त झाले. मी कृतार्थ झालो आहे. "**म्हणजे आदरपूर्वक अतिथींची सेवा कशी करावी हे सांगितले आहे.**"

म्हणजे इथे (श्रीवासुदेवनिवासात) सुद्धा तसे योग आहेत. घरी अतिथीला बोलावून आदर सत्कार करणे निराळे. पण महाराजांनी आश्रम करून ठेवलेला आहे. तिथे येणाऱ्या अतिथींना कंटाळायचे नाही. आदरभाव ठेवायचा. वाणीचा उपयोग करायचा. ते कांही कोणाला पैसा खर्च करायला सांगत नाहीत. आपला पैसा देतात, अभिषेक, पूजा वगैरे करतात. फक्त त्यांना "या, बाबा, करा देवाचे" असे जरी केले तरी पुष्कळ होते. त्याचेही फळ मिळते. केवळ अतिथी. रोज येणारे आणि इतर संन्यासी वगैरे येणारे निराळे. त्यांना स्नानसंध्या वगैरे करायला सहाय्य करायचे. त्यामुळे सगळ्या पितरांचाही उद्धार होतो.

गंगा ही पापांचा नाश करते. चंद्र हा ताप दूर करतो. कल्पतरू दैन्य म्हणजे दारिद्रय दूर करतो. पण आपल्या दर्शनाने पाप, ताप आणि दैन्य ही तिन्ही जातात असे सायंदेव म्हणाले. अशी त्यांची निष्ठा होती. वाऱ्याला एखादा कापूस उडवून न्यायला वेळ लागतो काय? तसं आपल्या नुसत्या दर्शनाने पाप, ताप आणि दैन्य जाते. आपण साक्षी आहात. म्हणजे निर्विकार आहात. आपण सर्वांच्या अंतर्यामी आहात. निरूपाधिक रूपाने साक्षात परमात्मा आहात. मनुष्यरूपानेच साधूंचे संरक्षण करण्याकरता अज अव्य: असूनही अवतीर्ण झालेले आहात. आपले शुद्ध दास्य मला द्या. आपली निष्काम भक्ती घडावी. श्रद्धा सहित दास्य द्या. आणि ते माझ्या वंशोवंशी टिकावे. 'वंशोवंशी अर्चन घेऊनीया रक्षी।', अशी गुरूभक्तांनी नारायणस्वामींची आरती केली आहे. त्यात शेवटी गुरूभक्त हे म्हणतात, वंशोवंशी आमच्याकडून आपले अर्चन घडावे. आपण आमचे रक्षण करावे. कुळालाही द्या, म्हणतात.

सायंदेवांनीही अशीच प्रार्थना केली आणि आता त्यांच्यावर आलेले संकट ते महाराजांना सांगताहेत. मला एक मानसिक व्यथा आहे ती ऐका. ज्याची मी नोकरी करतो तो अत्यंत कठोर यवन आहे. प्रत्येक वर्षी एका ब्राह्मणाला तो ठार मारतो. आणि आज त्याने मला ठार मारण्यासाठीच बोलावले आहे.

सायंदेवांनी त्या ब्राह्मणाचा पोटशूळ गेल्याचे पाहून महाराजांच्या सामर्थ्याबद्दल त्यांच्या

मनात विश्वास उत्पन्न झाला ना. आणि तो पोटशूळही लगेच गेला. काही दिवस औषध घ्या म्हणजे जाईल असे नाही झाले. त्यामुळे आपलीही व्याधी सायंदेवांनी महाराजांना सांगितली. **महाराजांची सेवा घडण्या करता जिवंत रहावे असे म्हणताहेत ते. महाराज म्हणाले,** ''मनांत कोणताही संशय न आणता त्या क्रूर यवनाकडे जा. तो तुझी पूजा करील आणि आनंदाने तूं परत येशील. तूं परत येई पर्यंत आम्ही इथे थांबतो. तूं जा.'' त्याप्रमाणे मनांत कोणतीही भीती न बाळगता सायंदेव यवनाकडे गेले. त्याप्रमाणे मनांत कोणतीही भीती न बाळगता सायंदेव यवनाकडे गेले. तिकडे त्या यवनाला असी भ्रांती झाली की कोणी तरी ब्राह्मण आपल्यावर शस्त्राने प्रहार करतो आहे. मग त्या यवनाने सायंदेवांना वस्त्र, भूषणे वगैरे देऊन आदराने परत पाठवले. सायंदेवांची सगळी मानसिक व्यथा गेली. आनंदाने गुरुमहाराजांच्याकडे आले. गरूडाच्या पिल्लाला सर्प खाऊ शकतो का ? सिंहाच्या छाव्याला हत्ती मारू शकतो का ? **अंतक (मारेकरी) गुरुभक्ताकडे दृष्टीसुद्धा टाकू शकत नाही मग हा यवन काय करणार आहे ? तूं आमचा दास आहेस.** पुन्हा १६ वर्षांनी तुला आमचे दर्शन होईल. असे सायंदेवांना सांगून महाराज परळी वैजनाथला येऊन गुप्त रूपाने राहिले.

हे लौकिक चमत्कार लोकांच्यात भक्ती वाढावी म्हणून केले. अर्थार्थी होऊन कां होईना लोकांनी यावं. मागायला कां होईना पण या, भक्ती करा. लोक प्रत्युपकारी आहेत. म्हणजे आपण त्यांच्यावर उपकार केला तर ते आपल्यावर उपकार करतात. **स्वतः होऊन अगोदर सेवा करीत नाहीत. चमत्कार पाहून लोकांचा विश्वास बसला म्हणजे ते आपोआप येतात. या हेतुने भगवंताच्या पदांचे ते भजन करतील, त्यायोगे निर्मलत्व त्यांना प्राप्त होऊन आणि त्यामुळे पुढे ते मुमुक्षु, बनतील. त्यानंतर त्यांना वैराग्य प्राप्त होऊन ते अभ्यास करतील. पुढे ध्यान, धारणा करून त्यांना सद्गुरुंचा महाप्रसाद मिळतो. सद्गुरुंचा महाप्रसाद म्हणजे अज्ञान दूर होणे, जीव आणि परमात्मा ह्यांचे ऐक्य काय आहे याचे त्यांना ज्ञान होते. महावाक्यांचे ज्ञान होते. आणि आत्मज्ञान होऊन त्यांना चिरशांती आणि आनंद प्राप्त होतो.**

हा विषय आज इथे आटोपलेला आहे. टीकेमध्ये सात ज्ञान भूमिका दिलेल्या आहेत. टीकेत पुष्कळ विषय आला आहे. परळीची कथा पुढे सांगताहेत.

५३ वा श्लोक आहे. सुद्गुरुसे: महाप्रसाद: असे मागच्या श्लोकात म्हटले आहे. अविद्या दूर करणारे ज्ञान प्राप्त होणे हा खरा मोठा महाप्रसाद आहे. देवाप्रमाणे गुरुवर ज्याची भक्ती आहे त्याला ज्ञान होते. ''तत्वमसि'' या महावाक्याच्या उपदेशाने जीव आणि ईश्वर यांच्या ऐक्याचे ज्ञान होते. निदिध्यासनाने प्रत्यक्ष ज्ञान होते. जात, देह भेद गेला. हृदयग्रंथी भेद झाला. ''अहम्'' गेला. तत्वज्ञानी पुरूषाला जगांतले कोणतेही पदार्थ आनंद देत नाहीत. नगरातल्या स्त्रियांचा एकांत आहे त्याला कुग्राम ललना पाहून कांही वाटत नाही. आत्म्याशिवाय दुसरे कांहीच रमणीय नाही. योगवासिष्ठात ७ योगभूमी सांगितल्या आहेत.

शुभेच्छा ही पहिली भूमी. पहिल्या तीन भूमिका ज्ञानाच्या पूर्वी आहेत. जागृतावस्थेत ४ थ्या भूमिकेवर ज्ञान होते. ती स्वप्नासारखी. त्याला ब्रह्मवित् ही संज्ञा आहे. ५ व्या भूमिकेवर गेलेल्या ज्ञानी माणसाला ब्रह्मविद्वर आणि ६ वी गाढ निद्रा. त्याला जग काहींच नाही. समाधीची भावना ज्याची आहे, त्याला ६ व्या भूमिकेवर उत्थान असते. ७ व्या भूमिकेवर तो जीव सदैव समाधी अवस्थेतच असतो. जीवनमुक्ताला कांहीही पाहून विस्मय नाही. सूर्याचे किरण एकदम थंड झाले म्हणा चंद्राचे किरण अगदी उष्ण झाले किंवा अग्नीच्या ज्वाळा खालून बाहेर पडू लागल्या तरी जीवनमुक्ताला विस्मय होत नाही. कांही नाही. शांत असतो. पूर्वीसारखा त्याचा सगळा व्यवहार बंद झाला. म्हणजे आपण ब्रह्मरूप आहोत हे त्यांना कळले आहे. ब्रह्मात्मभाव ज्याला समजलेला आहे, तो पूर्वीसारखा संसारी राहात नाही. दुसरा कोणीच माझ्याशिवाय नाही. पण अशा माणसांनी लौकिक क्रिया आणि शास्त्रीय क्रिया सोडल्या तर प्रत्यवाय येईल की. पण त्यांना प्रत्यवाय नाही कांही. आत्म्याशिवाय त्यांना दुसरे कांही दिसत नाही. सद्गुरूंचा स्पर्श, दृष्टी आणि त्यांचे नामसंकीर्तन याचा महिमा आहे हा. भ्रमराचे ध्यान केल्यामुळे पेशस्कार जसा भ्रमररूप होऊन जातो तसे अभ्यास वैराग्याने जीव ईश्वरस्वरूप होऊन जातो. अभ्यास, वैराग्याने त्याचे मन निश्चय झालेले असते.

तत् पदार्थ म्हणजे जीव कसा आहे एवढे अनुमानाने कळेल. पुढचे मग ते सगळे आपल्या बुद्धीनेच ठरवून घ्यायचे.

नामधारक म्हणतात, तेजस्वी, भक्तवत्सल, सर्व भूतांचे स्वामी ते गुप्त कसे झाले ? शिष्य मंडळी कुठे राहिली ? ते ऐकण्याची मला इच्छा आहे.

सिद्धांनी सांगितले, सगळेच लोक आता शिष्यत्व पत्करायला येतील त्यापेक्षा आपण एकांतात रहावे असे महाराजांनी ठरवले. शिष्यांची परीक्षाही पहायची आणि परंपराही वाटेल त्याला द्यायची नाही. म्हणून महाराज गुप्त झाले.

उपनयन संस्कार झाल्यावर द्विजत्व प्राप्त झाले. मग वेदाभ्यास करणाऱ्या या ब्रह्मचारी बटूने १ २ वर्षेपर्यंत सूत्र, मेखला, दंड धारण करून राहावे. सायंकाली आणि प्रात:काली त्याने अग्नीकार्य करावे. संध्यावंदनादि कर्म आणि अग्नीची उपासना करावी. आणखी भिक्षा मागावी. गुरूंची भक्तीभावाने सेवा करावी. दिवसा निजू नये. आणि याचना करून आणलेली भिक्षा गुरूंना अर्पण करून त्यांनी दिलेल्या अन्नाचेच भोजन करावे. मग समावर्तन करावे. अनाश्रमी राहू नये. दुसरा आश्रम घेतला नाही तर प्रत्यवाय होईल. म्हणून स्नातक (म्हणजे वेदाभ्यास झाल्यावर) विवाह करावा. सामर्थ्य असेल तर यावज्जीव त्याने ब्रह्मचारी राहावे. मग सूत्रकारांनी सांगितल्याप्रमाणें पाणिग्रहण करून अग्निहोत्र घ्यावे. यज्ञादित करावे पोष्य वर्गाचे पालन करावे. धर्माचरण करावे.

आता वानप्रस्थाश्रम. सगळी संपत्ती पुत्राला अर्पण करून भार्येला घेऊन किंवा एकटयाने गांवाबाहेर जावे. नैसर्गिकरित्या उगवलेले फल वगैरे खाद्यपदार्थ खावेत. आपले अंत:करण शुद्धी होईपर्यंत वनामध्ये राहावे. भार्येची आज्ञा घेऊन संन्यास घ्यावा. विरक्त जो असेल त्याने ब्रह्मचर्यातून गृहस्थाश्रमातून, कोणत्याही आश्रमातून संन्यास घ्यावा. त्याला कांही ब्रह्मचर्याश्रम-गृहस्थाश्रम - वानप्रस्थाश्रम - संन्यासाश्रम असा क्रम नाही.

सूत्र, यज्ञोपवीत, शिखा आणि सगळ्या एषणा (इच्छा) टाकून द्याव्यात. तीन वेळा स्नान कूटिचक संन्यासाला आरंभी सांगितले आहे. विविदिषु (ज्याला ज्ञान मिळवायचे आहे) अशा संन्याश्याचे धर्म सांगताता. जप, भिक्षा, अटन, ध्यान, शौच, अर्चन हे सगळे त्याने करावे. स्त्रीकथा, लौल्य, यान, अहस्वाप म्हणजे दिवसा झोप घेऊ नये. खाटेला स्पर्श करून नये, विद्याभ्यास त्याने सारखा करावा. त्यात प्रमाद म्हणजे दिवास्वाद. वेणु, दंड, कमंडलु त्याने धारण करावा. सारख्या तीर्थयात्रा कराव्यात. फक्त वर्षा ऋतुमध्ये कुठे फिरू नये. तीन दिवस त्याने एका ठिकाणी राहायला हरकत नाही. ज्याचे मन स्थिर झाले आहे व ज्याला प्रवास करण्याचे सामर्थ्य राहिलेले नाही अशा संन्याशाने एखाद्या तीर्थक्षेत्री जाऊन राहावे.

म्हणुन सगळ्या गृहस्थाश्रमी शिष्यांना त्यांच्या घरी पाठवून संन्यासी शिष्यांना महाराज म्हणाले, काशी, प्रयाग, श्रीरंग, श्रीशैल्य, नैमिषारण्य, कुरूक्षेत्र, बद्रिनारायण, गोकर्ण, कांची, अयोध्या, मथुरा, द्वारावती, अवंतिका, करवीरपूर, गंधर्वपूर, हरिहरक्षेत्र, देवकन्यका (कन्याकुमारी) कार्तिकस्वामींचा आश्रम, रामेश्वर, पुष्कळ तीर्थ आहेत, नद्यांचे संगम पापहारक आहेत. प्रत्येक १ २ वर्षांनी गुरु निरनिराळ्या राशीला जातो त्या त्या वेळी ती तीर्थयात्रा करावी. कन्येला गुरू आल्यावर कृष्णेमध्ये, सिंहेला गुरू असताना गोदावरीमध्ये, तुळा राशीला आल्यावर मलप्रभेत, अशी सर्वत्र तीर्थ जातात. त्या वेळी त्या त्या नद्या गंगास्नानाचे पुण्य देणाऱ्या असतात. सर्व ठिकाणी यथाविधि स्नान इ. करा. नद्या ग्रीष्मकाली रजस्वला असतात नवीन पाणी आल्यामुळे तीरावर राहणाऱ्या लोकांना त्या नदीशिवाय दुसरा पर्यायच नसल्यामुळे त्यांनी त्याच नदीत स्नान केले पाहिजे पण इतरांनी मात्र करू नये - ३ दिवस. विहीरींना एक दिवसांचा विटाळ असतो.

सगळी तीर्थयात्रा करून बहुधान्य संवत्सरात तुम्ही श्रीशैल्याला या. आम्ही त्या वेळी तिथे येऊ. त्यांच्या आज्ञेप्रमाणे बाकीचे सगळे शिष्य तीर्थयात्रेला गेले. मी तेवढा महाराजांची सेवाकरण्याकरता राहिलो, असे सिद्धांनी सांगितले.

यदु आणि सहस्त्रार्जुनाला त्यांनी ज्ञान आणि योग पूर्वी सांगितले. त्याचप्रमाणे मलाही हे गृहस्थ योग सांगितले. ते तुला मी सांगेन.

आता इथे शेवटी त्यांनी थोडा विचार केला आहे. नामधारकाने सिद्धांना विचारले, ''महाराजांनी सगळ्या शिष्यांना तीर्थयात्रेला कां पाठवले ? ध्यान उत्तम लागून उपास्य देवतेची सहज पूजा होणे हे सर्वात उत्तम आहे. योग धारणेने मध्यम पूजा होते. प्रतिमा पूजा ही सर्वात खालच्या प्रकारची असते. पण तीर्थयात्रा तर प्रतिमा पूजेपेक्षाही अधम म्हटले आहे.''

पापी लोकांना प्रायश्चितादिकांनी पापक्षय झाला की ज्ञान होते. स्वच्छ आरशामध्ये आपले प्रतिबिंब दिसते. ज्यांना योगाभ्यास करता येत नाही, यज्ञयागादि करता येत नाहीत, अशा मुमुक्षुंना पापक्षम्य होण्याकरता तीर्थयात्रा करायलासांगितल्या आहेत. त्या शिवाय ज्ञान होणार नाही. सर्व कर्म ही पापक्षय होऊन ज्ञान उत्पन्न होण्याकरता आहेत. बरं आणखी पुन्हा शंका आहे. शास्त्राने यज्ञ, दान, तप ही कर्म सांगितलीत.

मग तुम्ही तीर्थयात्रा कशा सांगितल्या ? गंगा वगैरे नद्याचे जल जे आहे ते तीर्थ आहे. जसा कर्मानुष्ठानाने पापक्षय होतो तसा ह्या नद्यांत स्नान केल्याने पापक्षय होतो. म्हणून श्रीरामांनीसुद्धा तीर्थयात्रा केल्या. असे त्यात दिले आहे.

नामधारकाने विचारले, शिष्यांना तीर्थयात्रेला पाठवून स्वत: महाराज कुठे राहीले ? आचार्यांच्यापासून **जर विद्या मिळाली तर चांगले कल्याण होते** या श्रुतीचा अभिप्राय सांगण्याकरता पुढची कथा आहे.

सिद्ध सांगताहेत. महाराज एक वर्ष वैजनाथाजवळ राहिले आणि मीही त्यांची सेवाकरण्याकरता तिथे राहिलो. एक दिवस एक मंदबुद्धीचा ब्राह्मण आला. महाराजांना नमस्कार करून म्हणला, महाराज, मोक्षाचा उपाय आपण मला सांगा. मोक्षसिद्धीकरता मी पुष्कळ कष्ट केले. तथापि मला मोक्षसिद्धीही प्राप्त झाली नाही आणि सन्मार्ग दाखवणारे गुरुही मिळाले नाहीत.

महाराज म्हणाले, गुरू मिळाले नसताना मोक्षसिद्धीकरता तूं कोणाच्या आज्ञेने कष्ट केलेस ?

त्या ब्राह्मणाने सांगितले, 'मोक्षसिद्धीकरता मी एक गुरु केले होते. पण ते अतिशय रागीट होते. सेवा करताना त्यांनी मला पुष्कळ त्रास दिला. म्हणून मी त्यांना सोडले.'

महाराज म्हणाले, ''अरे ! अरे ! गुरू हा आपल्या मातापित्या प्रमाणें असतो. याचा द्रोह कधीही करू नये. तूं फार वाईट गोष्ट केलीस. तुझा धिक्कार असो. आमच्या समोरून निघून जा. कारण गुरूद्रोही माणसाचे तोंडही पाहू नये. ते कधीही कल्याण करणारे होत नाही. मुखावलोकनही करायचे नाही मग भाषण वगैरे दूरच राहीले.''

आता इथे टीकेमध्ये शंका केली आहे. गुरु जर गर्विष्ठ असेल, कार्याकार्य समजावून घेत नसेल, अन्यायाने वागणारा असेल त्यालाही शासन करणे न्याय्य आहे असेही स्मृती सांगते. अशा गुरुंचा जर मी त्याग केला तर मी दर्शनाला अयोग्य कसा ठरतो ? असे त्या ब्राह्मणाने विचारले.

महाराज म्हणाले, गुरुकृपा कशाने होते ? प्रणिपात, परिप्रश्न आणि सेवा. गीतेमध्ये सांगितले आहे. हे ज्याच्याकडे आहे त्याच्यावरच गुरूकृपा होते. तूं जे सांगतोस त्या

स्मृतीमध्ये ''अपि'' शब्द घातला आहे. म्हणजे प्रत्यक्ष गुरूचा त्याग करावा असे नाहीये. ''अपि'' शब्दाने. ज्याच्याजवळ परिप्रश्न नाही, सेवा नाही, प्रणिपात नाहीत, असे दोष आहेत अशा शिष्याचा त्याग करावा असा त्याचा अर्थ आहे.

त्रिशती काव्यातही असंच दिलं आहे. हाच अभिप्राय मांडलेला आहे. ''अपि'' शब्दाने गुरुचा नसून दुर्वृत्त वागणाऱ्या शिष्याचा त्याग सांगितला आहे. शिष्याच्या त्यागाचे विधान आहे. अशी कांही वाक्य आहेत - 'मातरम् अपि गच्छेत' पण गंगातीरावर प्रतिग्रह करून नये ह्याचा अर्थ काय मातरम् गच्छेत हा आहे काय ? तर गंगा प्रतिग्रह करून नये इतका दोष आहे. किंवा दुसरं, पुत्र मांस जरी खाल्ल तरी चांगले पण राजाचा प्रतीग्रह घेऊ नये. इथे राजप्रतिग्रह त्याज्य आहे. तसं गुरोरपित्याग: याचा अर्थ शिष्याचाच त्याग केला पाहिजे, असा आहे.

हां, इथे तो ब्राह्मण सांगतोय. सेवेच्या इच्छेने त्या गुरूंनी मला फार त्रास दिला. ''सेवार्थी पीडयामास'' असं तू म्हणालास. म्हणजे सेवाही पीडा वाटली तुला. तूं सेवा करावीस असे गुरूंना वाटतेपण तुला ती पीडा वाटतेय म्हणजे आळशी आहेस तूं. म्हणजे तुला सेवा करायला नकोय. आळसाने तुझी बुद्धी दूषित होऊन तूं गुरूंचा त्याग केला आहेस म्हणून तुझे मुख पहायचे नाही.

बरं त्या ब्राह्मणाने विचारले, खऱ्या गुरूंचे ज्ञान कसे व्हायचे आणि गुरूंची खरी सेवा कशी करायची ? ते आपण मला सांगा. अज्ञानाने माझा गुरूद्रोह झालेला आहे. माझा उद्धार करा.

महाराज म्हणाले, गुरूंना कोणाची उपमाच देता येत नाही. त्याला दृष्टांत मिळत नाही, त्रिभुवनात. परिस लोखंडाचे सोने करतो पण लोखंडाला परिस बनवित नाही. पण सद्‌गुरू मात्र आपल्या शिष्याला गुरुच करून टाकतात. म्हणून ते ब्रह्मा, विष्णू व शिवरूप आहेत. तुझ्यासारख्या आंधळ्यांना सद्‌गुरूंचे स्वरूप कधीच कळणार नाही. तशीच त्यांची सेवा कशी करावी हेसुद्धा तुला कधी कळणार नाही. हे महाराजांनी त्याला सांगितले पण त्याची उपेक्षा केली नाही.

महाराज म्हणाले या संबंधात पूर्वी घडलेले एक वृत्त सांगतो. द्वापारयुगात धौम्य नांवाचे ऋषी होऊन गेले. त्यांचे तत्पर अशा प्रकारचे तीन शिष्य होते. बैद, अरूण आणि उपमन्यु अशी त्यांची नावे होती. त्यांनी सेवाधर्माचा फार चांगला अभ्यास केला होता.

त्यांचा गुरुभाव कसा आहे हे पाहण्यासाठी धौम्य ऋषी एक दिवस त्यांना म्हणाले, आमच्या शेताला पुरेसे पाणी मिळत नसल्याने पीक जगत नाही. तुमच्यापैकी कोणी तरी जाऊन त्या शेताला पाणी देण्याची व्यवस्था करा.

हे ऐकून अरूण नांवाचा जो शिष्य होता त्याने शेताकडे जाऊन शेताला पाणी द्यायची व्यवस्था केली. पाटाचे पाणी जे दुसरी कडे वाहात जात होते त्याला अरूणने बांध घातला आणि शेताकडे वळवले. पण त्याचा प्रयत्न कांही सफल झाला नाही. पाण्याच्या प्रवाहाला वेग असल्याने ते अडविण्यासाठी लावलेले दगड वगैरे वाहून जाऊ लागले. शेताला पाणी मिळेना. त्याने विचार केला असे जर झाले तर गुरू माझा धिक्कार करतील. शेवटी गुरुंसाठी प्राणत्यागही करायचा त्याने विचार केला आणि तो स्वत:च त्या प्रवाहात आडवा झोपला आणि स्वत:च्या शरीराने पाणी अडवले. त्यामुळे ते शेताकडे जाऊ लागले.

धौम्य ऋषी त्या शेताकडे आले. शेतात पाणी दिसले पण अरूण कुठे त्यांना दिसेना. मोठ्या प्रेमाने त्यांनी ''बाळा ये'' असी हांक मारली. अरूण पाण्यात झोपला असल्याने प्रत्युत्तर देऊ शकला नाही. किती वेळ तिथे राहावे लागले असते कोणास ठाऊन ! धौम्य ऋषी आले म्हणून बरे झाले. शेवटी तेच अरूणला शोधत शोधत तिथे आले आणि मोठ्या वात्सल्याने त्याला वर उठवले आणि प्रसन्न होऊन त्याच्यावर पूर्ण कृपा केली म्हणजे विद्या, विनय वगैरे सगळे गुण त्याला दिले. आणि मग तो आपल्या घरी गेला. सर्वजण त्याला पूज्यभावाने पाहू लागले.

दुसरा बैद म्हणून जो शिष्य होता त्याला धौम्यऋषींनी सांगितले, ह्या शेतातले सर्व धान्य घरी घेऊन ये. हे पहा, 'सस्य' म्हणजे काय केवळ एका अर्थाचे शब्द नाहीयेत. शेतात जोपर्यंत आहे. तोपर्यंत त्याला सस्य म्हणायचे. कोंड्यासहीत निघाल्यावर त्याला धान्य म्हणायचे. त्याचा कोंडा काढून टाकला म्हणजे त्याला तांदूळ म्हणायचे. आणि शिजिवल्यानंतर त्याला अन्न म्हणायचे. किती शब्द आहेत ! संस्कृत भाषेमध्ये. प्रत्येक अवस्थेला वेगळा वेगळा शब्द आहे.

महाराजांनी त्या बैदाला शेतातले धान्य घरी आणायला सांगितले. पक्षांपासून पीकांचे रक्षण केले आणि पीक तयार झाल्यावर त्याची मळणी वगैरे करून बैद ते धान्य घरी आणण्यासाठी बैलगाडी पाहू लागला. धौम्यऋषींच्या कडे गाडी होती पण त्याला

जोडायला एकच रेडा होता. बैदाने ते धान्य त्या गाडीत भरले. एका बाजूला रेडा व दुसऱ्या बाजूला स्वत: जू खांद्यावर घेऊन गाडी ओढू लागला. पण वाटेत एका ठिकाणी चिखल होता त्यात गाडी व रेडयाबरोबर हा ही रूतून बसून पडला. धौम्यऋषी तिथे आले. हा सगळा शक्तीपातच आहे. लगेच त्याला ज्ञानी करायचे म्हणजे काय. पण बैदाने जी गुरुसेवा करताना मरण पत्करण्याची जी तयारी दाखविली त्यावर ते प्रसन्न झाले. आणि त्यांच्या कृपेने इह परत्र, दोन्ही ठिकाणी तो श्रेष्ठ ठरला.

धौम्यऋषींनी उपमन्यूला गायी चरायला घेऊन जायला सांगितले. थोडे जेवण मिळाल्याने उपमन्यूला भूक लागायची. वनात कांही ब्राह्मणांचे आश्रम होते. तिथे भिक्षा मागून आपले पोट भरत होता. त्याला धौम्यऋषींनी विचारले, तुझे शरीर इतके पुष्ट कसे झाले ? तू वनांत जी भिक्षा मागतोस ती इथे आणून देत जा. तो पुन्हा भिक्षा मागून आणून स्वत:चे पोषण करू लागला. तेही धौम्यऋषींनी समजले. त्यांनी दोन्ही भिक्षा त्यांच्या आश्रमात आणून देण्यास सांगितल्या. उपमन्यूने गुरुंच्या आज्ञेचे पालन केले. पण त्यामुळे त्याला भूक लागल्यावर अन्न मिळेना. मग तो गायीची वासरे गायीचे दूध पीत असताना जे खाली पडेल त्यावर भूक भागवू लागला.

ते समजल्यावर धौम्यऋषींनी त्याला त्या बद्दल विचारले. त्याने खरे ते सांगितले. ते म्हणाले अरे, उष्टे दूध पिऊन तुझी बुद्धी भ्रष्ट होईल की. म्हणून तेही त्याने बंद केले. पण भूक राहीना. शेवटी त्याने रूईच्या झाडांचा चीक पिण्यासाठी म्हणून एका द्रोणात घेतला आणि तो पिताना डोळ्यात गेला व ह्याची दृष्टी गेली. चालताना रस्ता न समजल्याने एका विहीरीत पडला. गायी सगळ्या घरी गेल्या. तो न परतलेला पाहून धौम्यऋषी त्याला शोधायला बाहेर पडले आणि हांका मारल्यावर उपमन्यूंने ''ओ'' दिली. मग त्याला वर काढला. अश्विनी कुमारांचे स्मरण केले आणि त्यांनी प्रगट होऊन ह्याला गेलेली दृष्टी पुन्हा मिळवून दिली. म्हणजे धौम्यऋषींकडे हे सामर्थ्य नव्हते असे नाही. पण देवतांचेही महात्म्य आहे ना. नंतर उपमन्यू वर धौम्यऋषींची कृपा होताच तो लगेच कृतकृत्य झाला. पुढे त्या उपमन्यूची योग्यता एवढी वाढली की त्याचे शिष्यही त्याच्यासारखे झाले. उत्तंक किंवा उपासक नावाचा उपमन्यूचा शिष्य पुढे मोठ्या प्रसिद्धीस पावला. परिक्षित राजाला तो तक्षक चावला आणि त्याचे प्राण गेले. जन्मेजय राजालाही राग आला त्याच्या पित्याला मारले म्हणून. मग या उत्तंक ऋषींच्या मदतीने त्याने सर्पसत्र सुरू केले. त्या बरोबर हजारो सर्प त्या कुंडात येऊन

पडू लागले. मग जन्मेजयाने विचारले, तो तक्षक कुठे आहे ? कोणी तरी सांगितले, तो इंद्राकडे स्वत:चे संरक्षण करणयासाठी गेला आहे. उत्तंक म्हणाले, इंद्रासहित त्या तक्षकाला आणा. ''इंद्राय स्वाहा, तक्षकाय स्वाहा'' इंद्राला यावे लागले.

मग बृहस्पतींनी येऊन जन्मेजय राजाची समजूत घातली. ह्याला मारून तुझा मेलेला बाप जिवंत होणार आहे का ? म्हणाले. तेव्हा ते सर्पसत्र थांबले. हा गुरुप्रसाद आहे. गुरुंचा संतोष झाला तर हा प्रसाद होतो. नाही तर होत नाही. तेव्हां तू गुरूंना शरण जा. त्यांचा प्रसाद म्हणजे, शांती, मोक्ष तुला मिळेल. ज्ञानप्राप्ती आणि शांती प्राप्त होणे हा खरा प्रसाद आहे. मोक्षही प्राप्त होतो.

तो ब्राह्मण म्हणाला, ''महाराज भिन्न धातू झाले तर ते एक करता येतात. मोती फुटल्यावर त्याला एक करता येत नाही. त्याचप्रमाणे हृदयाचे सुद्धा ऐक्य होत नाही. दुभंगलेली मने पुन्हा जुळत नाही. माझ्या गुरूंचे आणि माझे हृदयच भिन्न झाले आहेत म्हणून मी त्यांच्याकडे कांही जाणार नाही. इथे तुमच्या समोरच प्राणत्याग करतो.'' त्याला पश्चाताप झाल्यामुळे त्याचा झालेला निश्चय महाराजांनी पाहिला आणि त्याच्या मस्तकार हात ठेवला. आणि त्याला सांगितले, ''गुरूंचे स्मरण कर''. त्या प्रमाणे त्याने आपल्या गुरूंचे स्मरण केले. पण महाराजच त्याला त्याच्या गुरूंच्या स्वरूपात दिसले. आणि त्याच्या डोळ्यात प्रेमाश्रु आले. त्याने महाराजांना हात जोडून नमस्कार केल्यावर त्यांनी आशीर्वाद दिला की हा संसारसागर तरून जाऊन तुला मोक्षाची प्राप्ती होईल.

आता त्याच्यावर महाराजांनी थोडा विचार केला आहे. शुभाशुभ कर्म जे असेल ते भोगलेच पाहिजे. कल्प कोटी काळ जरी गेला तरी तेकर्म भोगल्याशिवाय संपत नाही. मग महाराज याला असं कसं म्हणाले की सर्व कर्म भोगाचा काल तू लवकर तरून जाशील. संचित कर्म तर किती तरी आहेत. क्रियामाण कर्म तर सारखी होतातच आहेत. त्यात भर पडली आहे. मग हा सगळा कर्म भोग भोगल्याशिवाय कसा जाईल ? हा लवकर कसा संपेल ?

त्याला उपाय सांगताहेत, ''माझे जे रूप तूं पाहिले आहेस त्या रूपाचे स्मरण करून सर्व क्रिया माझ्याकरताच करत रहा. देव आणि गुरु ह्यांना एकच मान. त्यामुळे सगळा कर्मभोग संपून जातो.'' मग महाराजांनी त्याला स्वात्मसुख दिले. आणि नंतर

जिव्हा छेदून घेतलेला एक द्विजपुत्र आला होता त्याचाही उद्धार केला. संतापाने, पापाने दग्ध झालेले जे जीवईश्वर बुद्धीने श्रीगुरूंच्या जवळ जे येतात त्यांचे पाप, दु:ख दूर होऊन आत्मानंद प्राप्त करून घेतात. गुरूभक्ती 'सम्यक् प्रत्यय' म्हणजे उत्तम आत्मज्ञान (निर्गुण आत्मतत्वाचे ज्ञान) होते हेपूर्वी सांगितले. निर्गुण निराकार आत्मा आहे असे जरी सांगितले असलेतरी मंद बुद्धीच्या मंडळींना ते पटत नाही. त्यांना सगुणाबद्दलच सांगितले पाहिजे.

हां, हा एक विषय आहे, **मंद बुद्धीच्या लोकांसाठी सगुणाचे प्रतिपादन केले पाहिजे.** ब्रह्मज्ञानी पुरूषाचे मन इतर कोणाच्याही विषयाकडे जात नाही. ते विषयांपासून आपोआपच निवृत्त होते. पण अनेक जन्माचा विषयाचा अभ्यास (संवय) असल्यामुळे विषयाची तृष्णा एकदम जात नाही. **विषय वासना सगळ्या दूर होण्याकरता ईश्वराभिन्न श्रीगुरूंची सेवा सांगायची आहे.** मागच्या अध्यायात गुरूसेवेचे फळ काय मिळते ते सांगितले. आपल्या इष्ट देवतेची इतर उपासना केल्यानंतर अनायासे गुरूंची उपासना घडते. ऐहिक वगैरे सर्व सुख प्राप्त होते. हे सांगण्याकरता हा अध्याय आहे.

नामधारकाने विचारले, ''जिव्हा छेदन केलेला कोण आला होता ? श्रीगुरूंनी त्याचा उद्धार कसा केला ?''

सिद्धांनी सांगितले, ''करवीर क्षेत्रामध्ये एका विद्वान ब्राह्मणाचा मुलगा दैवयोगाने अज्ञानी झाला. गांवातली मंडळी त्याला म्हणू लागली की शिंग आणि शेपूट सोडले तर तुझ्यात आणि बैलाच्यात कांही अतंर नाही. पशुप्रमाणेच वागतो आहेस तूं. तू गवत खात नाहीस हे त्यांचे भाग्य नाही तर तूं त्यांचेही गवत खाल्ले असतेस. अशी निंदा करू लागली. विद्या हा असा निधी आहे कि जो कोणी हरण करू शकत नाही. शिष्यांना अर्पण केला म्हणजे तो वाढत असतो. **विद्यानिधी ज्याच्याकडे आहे तो श्रेष्ठांमध्येसुद्धा पूज्य होतो. दरिद्री माणसाला तो धनवान् करतो. आईवडिलांप्रमाणे संरक्षण करते, हित पाहाते आणि उपदेश करते अशी विद्या आहे.तू विद्याविहीन असल्याने तुझा धिक्कार असो.''** हे सगळे ऐकून त्या मुलाला फार वाईट वाटले. भुवनेश्वरीच्या मंदिरात येऊन बसला. जेवण खाण त्याने बंद केले. तिथे तीन दिवस राहून त्याने देवीची पूजा केली. तरी देवीचा प्रसाद त्याच्यावर झाला नाही. म्हणून त्याने प्रथम आपली जीभ तोडून देवीच्या चरणी अर्पण

केली आणि आता जर देवी प्रसन्न झाली नाही तर मस्तक तोडून अर्पण करायचे त्याने ठरवले. हे पाहून देवीने त्याला स्वप्नात दर्शन देऊन सांगितले, ''पलिकडे कृष्णातीरावर एक संन्यासी महाराज आहेत त्यांची तूं सेवा कर'' म्हणजे ईश्वराच्या उपासनेन त्याला गुरूची प्राप्ती झाली. मोठ्या धैर्याने तो पलिकडे आला. अश्रुंनी त्याचे सगळे शरीर भिजून गेले होते. त्याने नमस्कार केल्यावर श्रीगुरूंनी त्याच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवला. परिसाला लागलेले लोखंड जसे सुवर्ण होते,मानस सरोवरात स्नान केल्यावर कावळाही हंस होतो, तसे श्रीगुरूंच्या हस्तस्पर्शाने त्याला जिव्हाही मिळाली आणि ज्ञानही प्राप्त झाले. त्याचे सर्व शरीर, इंद्रिय वगैरे आत्मज्ञान प्राप्तीला योग्य असे झाले. श्रीगुरूंनी ती योग्यता त्याला प्राप्त करून दिली.

ह्यात आश्चर्य वाटण्याचे कांही कारण नाही कारण वज्रांकुश, ध्वजांकित असे ज्यांचे चरणकमल जे आपल्या मस्तकावर धारण करतात त्यांचे सर्व अज्ञान दूर होऊन ते सर्व ज्ञानसंपन्न होतात. भगवंताच्या चरमकमलांचे ध्यान करणारे जे भक्त आहे. त्यांचा प्रसाद झाला तरी सुद्धा बुद्धीतले अज्ञान दूर होते. मग साक्षात श्रीगुरूंच्या प्रसादाने अज्ञान दूर झाले तर नवल काय? गुरुंचे भक्तसुद्धा एखाद्या जीवाचा उद्धार करू शकतात. त्याचा उद्धार झाला. श्रीगुरुंच्या आज्ञेने तो घरी गेला आणि गृहस्थाश्रम करून ऐहिक व आमुष्मिकी दोघांची प्राप्ती झाली. म्हणजे ऐहिक सुख तर मिळालेच पण आत्मज्ञानाची योग्यताही प्राप्त झाली.

तिथून श्रीगुरू निघून दक्षिणेला आले. कृष्णावेणी पंचनदी संगम पाहिला. त्यांनी इथे राहायचे ठरविले. मोठ्या महाराजांनी टीकेत सांगितले की पंचनदी संगम म्हणजे आज्ञाचक्र आहे. आणि कृष्णापंचमी संगम म्हणजे चित्त शक्ती. जीवनशक्ती योगी पुरूष ब्रह्मरंध्रापर्यंत जाऊन तिथेच थांबतो. तसं इथे महाराज थांबले.

वेणी आणि कृष्णेचा त्या माहुलीला संगम झाला आहे वाटतं. कृष्णावेणीचा संगम म्हणजे हरिहराचा संगम आहे आणि त्यांचा पुन्हा वाडीला पंचनदी बरोबर संगम होतो. त्या संगमाजवळील एका औदुंबराखाली भगवान् राहिले. ह्या स्थानाला त्यांनी कुरूपुर म्हटले आहे. कुरूंदवाडीलाही कुरूपुर म्हणतात. त्या वेळेला इथे कांही गांव नव्हते. अरण्यच होते. हे स्थान कुरूक्षेत्रापेक्षाही अधिक पुण्यकारक आहे. हा संगम म्हणजे साक्षात् प्रयागच्या संगमा इतका महत्वाचा आहे. आणि कृष्णेच्या तीराने खालच्या बाजूला ७-८

मैलावर गेले की जुगुळ म्हणून एक गांव आहे. तिथे विरूपाक्षेश्वराचे मंदिर आहे. हे स्थळ काशी पेक्षाही श्रेष्ठ आहे.

इथे राहाण्याचे आणखी कारण सांगताहेत. एक तर मोठा औदुंबर कल्पवृक्ष होता. त्या वेळेला ५०० वर्षापूर्वी महाराज आले तेव्हां होता. आता गेला तो. आता वरच्या बाजूला नवीन वृक्ष लावला आहे. त्या वेळेला कांही मंदिर नव्हते कांहीच नव्हते. पलीकडे विश्वेश्वरतुल्य असे अमरेश्वरांचे स्थान होते. चौसष्ठ योगिनी त्या तिथे राहात होत्या. म्हणजे रागद्वेषादि विकार असलेला मनुष्यसुद्धा तिथे अमर होऊन जातो. असं हे स्थान माहात्म्य आहे. गंगा यमुनेच्या संगमाचे वर्णन आहे. सीत आणि असित, शुक्ल आणि  कृष्ण असं त्या गंगेचे पाणी शुक्ल दिसते आणि यमुनेचे पाणी काळे दिसते. तशा इथे पंचगंगा आणि कृष्णा या दोन नद्या. या संगमावर माघ महिन्यामध्ये स्नान करणारा पुरूष किंवा स्त्रीला स्वर्गप्राप्ती होते.  कृष्णा नदी ही शुक्लतीर्थाजवळच तेवढी पश्चिमाभिमुख झाली आहे.  तिथून पूर्वेला अमरेश्वर आहे. या दक्षिणाभिमुख वाहाणाऱ्या नदीत महापाप घालवणारी असंख्य तीर्थ आहेत. सुवर्ण चोरी करणारा, सुरापान करणारा, गुरू द्रोह करणारा आणि अशांशी संपर्क ठेवणारा महापापी या संसर्ग दोषातून कोणाची सुटका होत नाही. सगळा संसंर्ग आहे. कर्माप्रमाणे पाप करण्याची बुद्धी होते तशी पापकर्माचे फल नष्ट करायचीही योजना ईश्वराने करून ठेवली आहे. तर पंचमहापापीही या तीर्थात स्नान केल्यावर त्या पापांपासून मुक्त होतो. मुमुक्षुला इथे मोक्ष मिळतो. भक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण होतात.

मग इथे महाराज पादुकारूपाने राहिले. पुढची आता कथा सांगताहेत. महाराजांनी पूर्व दिशेला असणाऱ्या अमरापूरमध्ये येऊन एका आचार संपन्न विप्राच्या घरी भिक्षेची याचना केली. त्या दिवशी त्याच्या घरात अन्न नव्हते. फक्त घेवड्याच्या शेंगांची भाजीच केली होती. तो ब्राह्मण कोरान्न भिक्षा मागून आणत होता. त्यावरच त्याचा उदरनिर्वाह चालला होता. त्याच्या पत्नीला अतिथी बद्दल अत्यंत आदरभाव होता. पण त्या दिवशी धान्यच न मिळाल्याने अन्न नव्हते. पण मग त्या भिक्षुरूपी ईश्वराला कसे पाठवायचे ? म्हणून शिजवलेली घेवड्याच्या शेंगांची भाजीच फक्त दिली. ती अत्यंत भक्तीभावाने दिलेली भाजी घेऊन महाराज परत निघाले. जाताना दारात त्यांना तो घेवड्यांच्या शेंगांचा वेल दिसला. तो त्यांनी उपटून टाकला. आणि आपल्या स्थानावर आले. तो वेल म्हणजे त्या कुटुंबाचे जणू जीवनच होते. ज्या दिवशी धान्य भिक्षा

मिळणारच नाही. त्या दिवशी शेंगाची भाजी खाऊन पाणी पिऊन राहता येत होते. त्यामुळे त्या बाईला वाईट वाटले. तिचा पती परत आल्यावर ती त्याला म्हणाली या अतिथीने जिच्यावर आपला योगक्षेम चालला आहे ती वेल का बरे तोडली ? मी काही भिक्षा देण्यात कपट केले नाही. अगदी शुद्ध मनाने भिक्षा घातली. तो ब्राह्मण म्हणाला, तू काही बोलू नकोस कारण प्रत्यक्ष दोष करणारा तर दोषी आहेच पण ज्याने अमूक दोष केला असे सांगणारा ही दोषी होतो. म्हणून दुसऱ्यांच्या पापाचा उच्चार करून नये. त्यासाठी स्वतंत्र माणूस नेमलेला असतो. तो अमूक एका माणसाने अमूक एक पाप केले. असे सांगतो, प्रायश्चित्त घेताना म्हणून परदोषाचे आविष्करण करू नकोस. अकार्य करून सुद्धा आपल्या स्त्रीचे, अनाथ मातापितरांचे, बालकांचे, पालन करावे. अशी स्मृतीकारांची आज्ञा आहे. अशी मला गृहस्थाश्रमी माणसाला आज्ञा असतानाही काही बोलत नाही. आणि तू कशाला उगीच बोलतेस त्याला ? तुला त्याला बोलायचा अधिकार नाही. मी सुद्धा दु:ख करीत नाही. मग तू कशाला दु:ख करतेस ? तू भार्या आहेस, तू पोष्य वर्गात आहेस. तूला बोलायचा अधिकार नाही. आपल्याला सुख दु:ख देणारा दुसरा कोणीही नाही. सर्वही जीव हे स्वतंत्र सूत्रात बाधले गेलेले आहेत. त्यामुळे दुसऱ्याने दु:ख दिले असे म्हणायचे नाही. असे असूनही 'आम्ही असं केलं, आम्ही तसं केलं' अशा अहंकारात हे जीवसापडतात. पण कोणीही स्वतंत्र नाही. संपूर्ण जग हे ईश्वराधीन आहे. ज्याला जे सुख दु:ख प्राप्त करून घ्यायचे ते ईश्वरापासून मिळते. त्याच्यामध्ये कोणीही बदल करू शकत नाही. तो परमात्मा आपल्याला आयुष्य, अन्न देत असतो.

म्हणजे अशाही वेळेला त्या ब्राह्मणाचा ईश्वरावर दृढ विश्वास आहे तो म्हणतो, ''परमात्मा समदृष्टीचा असून आपल्याला तारक आहे.'' असे आपल्या पत्नीचे त्याने समाधान केले आणि महाराजांनी तोडलेल्या वेलाची मुळेसुद्धा तो उखडून टाकण्यास गेला. ते मूळ काढताना खणल्यावर त्याला सुवर्ण द्रव्यांनी भरलेला एक घट सापडला.

यावर खाली टीकेमध्ये एक शंका घेतली आहे. ''सुवर्ण द्रव्यांनी भरलेला घट सापडला म्हणजे त्याच्यावर महाराजांचा प्रसाद झाला असे कसे म्हणता येईल ? कारण धनामुळे तर पुढचे सगळे अनर्थ उत्पन्न होतात.'' बरोबर आहे. ''शुचीनाम श्रीमताम् गेहे...'' भगवान म्हणतात ''श्रीमंतांच्या घरात योगभ्रष्ट जीव जन्माला आला की आपल्याला आश्रमाला विहित अशी कर्मे करतो. आपापल्या, त्याच्याकरता द्रव्याचा विनियोग

करतो. म्हणजे त्या द्रव्याचा विनियोग तो त्या सत्कर्माकडे, पुण्यकर्माकडे करत असल्यामुळे हे धन हा त्या प्रसादच झाला. चांगली कर्मे तो करीतच राहील. विषयभोगी किंवा कृपण लोक जे आहेत त्यांच्याकडून मात्र अशी पुण्यकर्मे घडत नाहीत. हा उत्तम शास्त्रज्ञ विद्वान ब्राह्मण होता. त्याला मिळालेल्या धनाचा उपयोग काही भोगासाठी करणार नाही.''

तो सुवणद्रव्याने भरलेला मिळालेला घट त्याने आपल्या पत्नीला दाखविला आणि तिला घेऊन तो महाराजांकडे आला. त्यांना सर्व वृतांत सांगितला तो ऐकून महाराज त्याला म्हणाले, ''हे सर्व गुप्त ठेवा. लोकांच्यात प्रगट करू नका, नाहीतर ही श्री स्थिर राहणार नाही.'' अशी भीती घातली. म्हणजे श्री रहावी म्हणून तरी गप्प बसतील. ''आम्ही सांगतो आमची आज्ञा.'' असे म्हणाले नाहीत महाराज. आणखी पुढे आशीर्वाद दिला, ''तुम्हाला सर्व ऐश्वर्य मिळेल, पुत्र-पौत्र प्राप्ती होईल. तुम्ही आरोग्य संपन्न व्हाल. आणि शेवटी तुम्हाला मोक्ष मिळेल. आता आपल्या घरी जा.''

आता नामधारकाने विचारले, ''महाराज 'प्रभु' म्हणजे स्वत: पूर्ण शक्ती संपन्न. स्वत: दुसऱ्याला अर्थपूर्ण (धनाने भरलेला) घट देणारे आणि स्वत: भिक्षा मागतात हे कसे काय ? आणि औदुंबर हा कल्पवृक्ष कसा ?'' ''विभुती योगामध्ये अश्वस्थ हा सर्व वृक्षात पूज्य सांगितला आहे. मग महाराज औदुंबर वृक्षाखाली का राहीले ?'' असे नामधारकाचे दोन प्रश्न आहेत.

सिद्ध सांगताहेत, ''भिक्षु म्हणजे परिव्राट, संन्यासी. संन्याश्याने कोरडी भिक्षा मागायची नाही. ज्या घरात नैवैद्य वैश्व देव झालेला आहे. त्या घरात भिक्षा मागायची. व शिजवलेले अन्न घ्यायचे. त्याच्यावरती निर्वाह करायचा अशी श्रुती आहे. सगळ्या ऐषंणा सोडून देऊन संन्याश्याने भिक्षा मागावी. संन्यासी हा ज्ञानी असावा असे अपेक्षित आहे म्हणुन महाराज स्वत: जरी प्रभु असते तरी लोक शिक्षणार्थ त्यांनी श्रुतीप्रमाणे त्यांनी आपला आचार ठेवला. आणि ही शंभु वृत्ती आहे. 'शम्' म्हणजे सुखम् भवती अस्य तस्य:- ज्या वृत्तीने सुख होते कोणावरती अवलंबून नाही ना! काय मिळालं, नाही तर नाही. दुसऱ्या घरी हा एक अर्थ झाला नाही तर दुसरा अर्थ शंभु म्हणजे शंकराप्रमाणे वृत्ती''.

आता सिद्ध द्त्तप्रभु, औदुंबर वृक्षाखाली कां राहिले याचं कारण सांगताहेत - औदुंबर

वृक्षाचा अनुभव त्यांना आला. नृसिंह अवतार घेऊन हिरण्यकश्यिपूचे पोट त्याने फाडले त्याच्या पोटातील विष नृसिंहाच्या नखामध्ये भिनले तेव्हा त्याने त्याची बोटे औदुंबराच्या फळात खुपसल्यावर तो विष प्रभाव शांत झाला. म्हणुन प्रेमाने तेथे राहीले. आणि त्याने वर ही दिला. हा औदुंबर वृक्ष कुठेही असो हा कल्पवृक्ष सर्वांचे पाप, ताप, दैन्य वगैरे दूर करणारो होईल आणि स्वत: लक्ष्मीच्या आश्रयाने राहील. भगवंताच्या या वरामुळे औदुंबर हा कल्पवृक्ष झाला. विश्वात्मा ज्या ठिकाणी राहतो आहे त्या ठिकाणी वेद, तीर्थ, देव सगळे तेथे राहतात. म्हणून पृथ्वीवर औदुंबर हाच कल्पवृक्ष झालेला आहे. भगवंताच्या वराने.

आता इथे वाडीमध्ये मात्र दत्तप्रभु भिक्षा मागत नव्हते. त्या ब्राह्मणाचा उद्धार करायचा म्हणून त्याच्या घरी गेले. पण रोज मात्र भिक्षा मागायला जात नव्हते. विश्वाचे पोषण जो परमात्मा करतो. त्याला भिक्षा कशाला मागायला पाहिजे. इच्छेप्रमाणे रूप धारण करणाऱ्या योगिनींनी त्यांचे अर्चन केले. रोज त्याच भिक्षा दान वगैरे करीत होत्या. अमरापुर मध्ये राहणाऱ्या अज्ञानी लोकांना महाराजांचे महात्म्य कळले नाही. त्यांनी अज्ञानाने एकमेकांना विचारले, कुठेही भिक्षा न मागता हे संन्यासी कसे जिवंत राहिले ? याचा शोध केला पाहिजे. म्हणुन ते महाराजांच्या वर गुप्त पाळत ठेवू लागले पण मध्यान्ह काली त्या लक्ष ठेवणाऱ्यांनाच भीती वाटू लागली. आपण लवकर घरी जाऊया असे वाटून ते घरी गेले. महाराजांची लीला कोण जाणायला समर्थ आहे? त्यांच्या ह्या संशयी वृत्तीमुळे महाराजांची लीला कळली नाही. आणि ते घरी निघून गेले. पण गंगानुज म्हणुन जो होता त्यालासगळे कळले. तो काही महाराजांची परीक्षा पाहणारा नव्हता. तो शेतकरी होता. एक दिवस तो महाराजांच्या दर्शनाकरीता आला असता आश्चर्यकारक दृष्य पहायला मिळाले. दुथडी भरून वाहणारी कृष्णा नदी एकदम दुभंगली. आणि त्या दुभंगलेल्या मार्गाने भगवान दत्तप्रभु आत गेले. हा गंगानुज ही त्यांच्या पाठोपाठ गेला. आत दिव्य नगरी त्याला पहायला मिळाली. सर्व योगिनींनी सिंहासनावर बसलेल्या महाराजांचे अर्चन केले, भिक्षा केली. आणि त्यांचे एकदम गंगानुजाकडे लक्ष गेले, " कोण तु, इथे कशा करता आलास ?" असे त्यांनी विचारल्यावर तो म्हणाला, "माझे नाव गंगानुज असून आपल्याला पाहण्याकरिता मी आलोय." अगदी सरळ मनाने त्याने सांगितले. तो पुढे म्हणाला, "आपण साक्षात सर्वेश्वर परमात्मा आहात. पण माझे सुदैव म्हणुन मला आपले दर्शन झाले. आपल्या

मायेमुळे ज्यांचे चित्त मोहित झाले आहे. ते सगळे आपल्याला फक्त मनुष्य समजतात. मनुष्य दृष्टीने आपल्याकडे पाहणारे संसार सागरातच मग्न होतात.'' अशी त्याने प्रेमाने स्तुती केल्यावर महाराज त्याला वर देत म्हणाले, ''मी इथे असेपर्यंत या ठिकाणी तुला जे दिसले ते कोणालाही सांगायचे नाही.''

तेवढे मात्र त्याने ऐकले. महाराज असेपर्यंत कोणाला काही सांगितले नाही. पण महाराज निघून गेल्यावर सगळ्यांना सांगितले. त्याला खुप आनंद झाला त्याच्या शेतात भरपूर पीक आले. लोकांमध्ये मानसन्मान मिळाला आणि आत्मज्ञानही मिळाले. आत्मानात्म विवेक प्राप्त झाला. तो रोज महाराजांच्या दर्शनाला येत असे एक दिवस असाच आला असता अज्ञानाने त्रिस्थळी यात्रा कुठे आहे असे महाराजांना विचारले. काशीत त्रिस्थळी यात्रा नाहीये. पण लगेच म्हणाला, ''मला काहीच माहित नाही. कोणची यात्रा कशी आहे ती तेवढी मला सांग.'' महाराज म्हणाले, ''हा कृष्णपंचगंगा संगम हा प्रयाग आहे. कृष्णेच्या प्रवाहात खालच्या बाजूला जुगुळ (युगालय) म्हणुन जे आहे ते काशी आहे. आणि करवीर क्षेत्र म्हणजे गया आहे. हे तर तुला दाखवतोच पण जे खरे मुळ काशी, प्रयाग, गया आहे ते ही दाखवितो. हे जवळचे ही दाखवतो आणि ते उत्तरेकडचे ही दाखवितो.'' गंगानुजाने काही इच्छा न करता हे सगळे होतय त्यांनी गंगानुजाला सांगितले, '' माझ्या या पादुकांना घट्ट धर. म्हणजे तुला नेऊन दाखवतो.'' त्याप्रमाणे पादुंकांना धरल्यावर क्षणार्धात त्याला त्रिस्थली यात्रेला नेऊन आणले. म्हणाले, ''दुसरीही त्रिस्थली अशीच आहे. दोन्ही ठिकाणी दर्शनाने, स्नानाने, श्राद्धाने मोक्ष मिळतो. तिथे जी कर्मे करायचीत ती इथे केली तरी तेच फल मिळणार आहे. उत्तम आचरण केलेस तर तुला मुक्ती मिळेल.'' आणि हे योगीशाचे वचन ऐकून तो गंगानुज शेतकरीही मुक्त झाला. भगवंताची लीला पाहून त्याचे ध्यान करून तो कर्मबंधनातून मुक्त झाला.

आता वाडीक्षेत्राचा महिमा वाढला. हळुहळु लोक जमायला लागले. सज्जन, दुर्जन सगळेच येणार आता म्हणुन महाराजांनी विचार केला. साक्षात प्रगट रुपाने इथे न राहता गुप्त रूपाने रहावे. दुसरीकडे कुठेतरी जावे. महिमा वाढला म्हणजे काय, तो नित्यच आहे त्यात कमी जास्त होण्याचा प्रश्नच नाही. मग महिमा वाढला असं कसं म्हटलं ? सच्चिदानंद ब्रह्माला कर्माने वृद्धी ही नाही आणि क्षय ही नाही. पण सगुण ब्रह्म जे आहे तिथे हे थोडे आहे. ''लोकांना यथायथा अनुभव: तथा तथा महात्मयम्'' होते

की नाही. प्रारब्ध हे देवांनासुद्धा आहे. सगुण देवालय झाली. आता तुमचे माती गणपती मंदिर आणि मोदी गणपती मंदिर गणपतीय आहे. पण मोदी गणपती मंदिरात सारखे कार्यक्रम चालु असतात. पण या माती गणपती मंदिरात केव्हातरी एखादा कार्यक्रम असा तर असला. नाहीत तर नाही. तर काय आहे की सगुण ब्रह्माकडे लोक जातात. एकाचा अनुभव पाहून दुसराही जातो. असा महिमा वाढला म्हणायचा पण ईश्वराचा महिमा वाढतही नाही आणि कमी ही होत नाही हेच खरे आहे. लोक व्यवहार दृष्टीने स्थान महात्म्य आहे. लोक सांगत जातात. एकाच्या पाठोपाठ दुसऱ्याचे कार्य झाले की महिमा वाढला म्हणायचा, व्यवहार दृष्टीने.

महाराजांच्या मनात दुसरीकडे कुठेतरी जावे असा विचार आला. हे समजल्यावर त्या योगनी शोक करायला लागल्या. त्या म्हणाल्या, ''आम्हाला टाकून महाराज, आपण कुठे जाता ?'' महाराज म्हणाले, ''लोकदृष्टया जरी मी दुसरी कडे जात असलो. तरी मी इथेच राहणार आहे.'' परमात्मा 'विभुः' म्हणजे व्यापक आहे ना ! मग त्याला जाणं येणं कुठले असणार ! तो सगळीकडेच आहे. मनुष्यरूप धारण केल्यामुळे लोकांच्या दृष्टीने इथे नाही म्हणजे दुसरीकडे कुठेतरी गेले असे आहे. 'अमरेश्वर' या ठिकाणी आहे. अन्नपुर्णा या ठिकाणी आहेत. विघ्नेश्वर आहेत. तुम्ही सगळ्या योगिन्या आहात; भक्तांच्या इच्छा पूर्ण करणाऱ्या तेव्हा तुमच्या संतोषा करीता मी ही इथेच राहीन आता या पुढे हे क्षेत्र सुप्रसिद्ध होईल. पुष्कळ लोकांचा निवास इथे होईल. आणि या ठिकाणी सर्वलोकांना सुख प्राप्त होईल. सध्या अरण्य आहे पण पुढे पुष्कळ लोक इथे येऊन राहतील. या स्थानात सर्वांना अत्यंत आनंद आणि परम सुख प्राप्त होईल आणि सन्निपात, कुष्ठ, श्लेष्म, गुल्म वगैरे त्या त्या देशांमध्ये उत्पन्न झालेले **रोग चिकित्सा न करता क्षेत्रामध्ये राहून पापक्षय झाला की हे रोग निघून जातातच. चिकित्सा करायची गरज नाही**. वंध्येला पुत्र प्राप्ती होईल तर भीतीग्रस्ताला अभय मिळेल. दरिद्री मनुष्याला, मुमुक्षाला मोक्ष मिळेल. जो जो जी इच्छा करील त्याची ती ती इच्छा पूर्ण होईल. चंद्र ग्रहण, सूर्य ग्रहण, किंवा सूर्य संक्रांतीला इथेच स्नान केले असता त्या माणसाला सहस्त्र गोदानाचे फल मिळेल. हे फल तर नुसत्या स्नानाने प्राप्त होते. म्हणजे लगेच पापक्षय होऊन जातो. त्यानंतर अल्पजप आणि अर्चन केले असता. कोटी जप फल मिळते. नुसतीच स्तुती नाहीय. या स्नानाचे महात्म्य आहे काही काही श्रद्धेने सांगतात की सवड नसल्यामुळे सांगतात, कोणस ठाऊक ? पण इथे रूद्राचे एक

आवर्तन केले की...केल्याचे फळ मिळते. आहे तसे सांगितलेय. पण तसं कबूल करून न करणं बरं नाही. ते केलं पाहिजे. पण आहे, त्याचं फल सांगितलय. प्रदक्षिणा घातल्या तर अश्वमेध यज्ञ केल्याचे फल मिळते. श्राद्ध केले असता दुर्गतीला गेलेल्या पितरांनाही सद्‌गती मिळते. असे योगिराज महाराजांनी त्या योगिनींना सांगितलं.

त्या कल्पवृक्ष औदुंबराखाली आपल्या मनोहर पादुकांची स्थापना केली. या ठिकाणी कोणीही येऊन अष्टतीर्थात स्नान करून पादुकांचे अर्चन करावे. त्याचप्रमाणे अमरेश्वर योगिनींचे ही अर्चन करणाऱ्यांची इष्ट सिद्धी होईल. असे सर्व योगिनींना आश्वासन देऊन भगवान भीमातटावर गेले.

तीर्थांचे महात्मय आहेच आहे. नाही असे नाही.

## अवधूत चिंतन श्रीगुरूदेवदत्त

महाराज तिथून गेल्यावरही तिथे कार्य चालू आहे मग असताना काय होईल ? जाणे येणे हे लौकिक दृष्टीने आहे. तीर्थे आहेतच ते. त्या ब्राह्मण स्त्रीच्या मृत पुत्राला जिवंत केल्याची कथा आहे ही. आता इथे थोडासा मोठ्या महाराजांनी उपक्रम केलेला आहे. **सद्‌गुरूंचा अनुग्रह ज्यांच्यावर झालेला आहे असे विषय तृष्णावान लोक, यांना सुद्धा गुरूप्रसादाने एहिकामुष्मिकसिद्धी होती. हे समजवण्यासाठी गंगानुजाचे चरित्र, छिन्न जिव्ह, ब्राह्मणाचे चरित्र वगैरे सांगितले. आता भक्त वात्सल्य दाखविताहेत. भक्त वात्सल्य हे लोकांची देवांच्या भजनाकडे प्रवृत्ती व्हावी म्हणून आहे.**

नामधारक विचारताहेत, ''भगवान गंधर्वपुराला गेल्यानंतर वाडीक्षेत्रात येऊन भजन करणाऱ्याची कार्यसिद्धी कशी झाली ? कोणापासून कार्यसिद्धी होत होती ?'' हा व्यावहारिक प्रश्न आहे. महाराज गंधर्वपुराला गेले. म्हणजे इथे नाहीत असे समजण्यासारखे आहे. मग इथे येणाऱ्यांची कार्यसिद्धी होण्यासाठी महाराजांनी कोणाची नेमणूक केली होती का ?

सिद्ध एक सिद्धांत सांगताहेत, चिदात्म्याला कुठे जाणे येणे नाही कारण तो सर्व व्यापक आहे. 'स्थिती' म्हणजे गमन थांबणे. **गतीच नाही तर स्थिती कशी असेल ? त्यांना झोपही नाही. हे मुद्दाम सांगितले, त्यांनी.** परमात्मा अवस्था त्रयातीत आहे. पण

त्यांनी सगुण रूप धारण केल्यामुळे सगुणाचे धर्म त्यांच्या ठिकाणी असणार ना! **परमेश्वराने सगुण रूप धारण केले तरी त्यांचे ऐश्वर्य कधीही जात नाही.** सत्य, ज्ञान, आनंद, एकरस अशा आत्मरूपाने अवतीर्ण झालेले श्रीगुरू म्हणजे गुरूसाक्षात परब्रह्मच आहेत. हेच सिद्ध सांगताहेत. **त्याना देहादि उपाधीचा काही संपर्क नाही. मनुष्य अवतार घेतला** त्या प्रमाणे गाणगापुराला गेले असे म्हणायचे कुठे गेले, कसे गेले, झोपले की नाही, भिक्षा केली की नाही हे आकार पाहून सांगायचे. ब्रह्म सर्व व्यापक असून एका ठिकाणीच आहे तरीही धावणारे जी मन, अंत:करण इंद्रियं वगैरे या सगळ्यांचे अतिक्रमण करून ते जाते, असे उपनिषदामध्ये वर्णन केलेले आहे. तसेच ते श्रीगुरू सर्वांप्रमाणे वागतात. पण शरीर दुसरीकडे गेले म्हणजे तेही गेले असे म्हणता येत नाही.

तो कसा आहे तर एका ठिकाणीच आहे पण धावणाऱ्यांच्याही पलिकडे जातो. तो सद्‌गुरू आमच्या भावनेप्रमाणे भासतो. अमूक केले अमूक बोलले तमूक ठिकाणी गेले या भावनांचे फल आहे. आहेत श्रीगुरू असे म्हटले तर आहेच आहेत. नाही म्हटले की नाही जशी भावना करू तसे फल व्यवहारातही आहे आणि परमार्थातही आहे.

ब्रह्म नाही मग सगळच नाही. काहीच नाही. वर्णश्रमादी आचार नाही, कर्म नाही, भक्ती नाही, काही नाही. या मनुष्याचे अनात्म्याचे ज्ञान करून घेण्याकडे लक्ष लागलेले आहे.

शिरोळ गावांत राहणारी एक ब्राह्मण स्त्री तीचे काही पुत्र जन्मून मेले. म्हणून त्याचे कारण शोधण्यासाठी गावातील शास्त्रज्ञ पुरूषांना शरण गेली. सद्‌गुरूंनीच त्या ब्राह्मणाच्या बुद्धीला प्रेरणा केली आणि तिचे दैव काय आहे ते सांगण्यास प्रवृत्त केले. आपली भक्ती आता वाढायला पाहिजे ना! **त्या ब्राह्मण स्त्रीला पुत्र प्राप्ती करून दिली म्हणजे इतरांनाही तिच्याकडून सद्‌गुरूंचे महात्म्य समजेल,** असे श्रीगुरूंना वाटले. त्या प्रमाणे शास्त्रज्ञ ब्राह्मणांनी ज्योतिष शास्त्राचा आधार न घेता नुसते तिला पाहून सांगितले.

**आता सामान्यत: अपत्य का होत नाहीत हे सांगताहेत.** पूर्वी केलेले दोष आता ऐका. ब्रह्म हत्या हा एक दोष आहे, त्यानंतर गर्भपात अथवा लहान अर्भकाची हत्या हा एक दोष आहे. गाय, अश्व हत्या करणारा दुसऱ्यांचे द्रव्य हरण करणारा, ब्रह्मस्व ग्रहण करणारा - जबरदस्तीने अथवा चोरी करून सुवर्ण चोरी करणारा यापैकी

कोणतेही पाप केले कोणी असेल त्याला पुढच्या जन्मात अनपत्य दोष प्राप्त होतो. त्याच्या पापाचे फल मिळते. **पुढच्या जन्मात तर अशी भोगावी लागतातच पण अत्यंत उत्कट पाप असेल तर या जन्मातही फळे भोगावी लागतात.**

या स्त्रीच्या सेवेचे फळ या जन्मात मिळाले की अत्युत्कट पुण्य झाले तीचे. लोह, अश्म दारू काष्ठ यांचे चूर्ण खाल्ले तरी प्रयत्नाने पचवता येईल पण ब्रह्मस्व हे कोणीही करणार नाही. तो सर्वात मोठा दोष आहे. एखाद्या ब्राह्मणाने कोणाला द्रव्य दिले आणि तो परत मिळण्यापूर्वीच जर त्या ब्राह्मणाला मृत्यु आला तर तो ब्राह्मण पिशाच्च होऊन आपले द्रव्य परत न देणाऱ्यांचा वंश नाश करतो. दोष घडले असल्यामुळे त्याला तसे करता येते. वाटेल त्याच्यावर तो पिशाच्च आक्रमण करू शकत नाही. या ब्राह्मण स्त्रीने कर्म केले असल्यामुळे तो पिशाच्च तिलाच त्रास द्यायला लागला. पिशाच्चाला सुद्धा स्वातंत्र्य नाहीये ना! शास्त्रज्ञ मंडळींनी त्या ब्राह्मणीला सांगितले, ''पूर्व जन्मात शौनक गोत्रातील एक ब्राह्मणाचे तू द्रव्य घेतले होतेस आणि ते परत करण्यापूर्वीच त्याला मृत्यु आला. तोच पिशाच्च होऊन तुझ्या मुलांचा नाश करतो आहे. **प्रारब्ध कर्माचा भोगानेच क्षय होतो. दुसऱ्या कुठल्या उपायाने नाही.** त्यामुळे तुला हा भोग भोगलाच पाहिजे.'' हे ऐकून एखादा कर्णशूल व्हावा तसा तिला भास झाला. आणि ती त्या ब्राह्मणाला म्हणाली, ''माझ्यावर कृपा करा आणि या दोषातून माझी मुक्ती कशी होईल ते मला सांगा.'' ब्राह्मणाने तिला सांगितले, ''त्या पिशाच्चाचे तू नवऱ्या करवी और्ध्वदेहिक कर आणि एक महिनाभर तूं व्रत कर.''

आता स्त्रीला त्या पतीकडून नारायण नाग बनवून, त्रिपिंडी श्राद्ध वगैरे प्रायश्चित विधी करून घेण्यास सांगितले. म्हणजे तिला स्वतंत्र काही कर्म करता येत नाही. असा तिचा निषेध केला का ? नाही, पतीला सांगून त्याच्याकरवी एखादे कर्म केले म्हणजे स्त्रीच प्रधान ठरली असा त्याचा अर्थ नाही. कारण **धर्म, अर्थ, काम या त्रिवर्गाच्या ठिकाणी स्त्रीला स्वातंत्र्य नाही. ती विचारायला आली नाही. त्यांनी तसे सांगितले. कोणाचे व्रत तिला करायला सांगितले ?**

कृष्ण पंचगंगा नदीमध्ये स्नान करून गुरूपादुका आणि औदुंबर वृक्षाचे तू अर्चन कर. नंतर ब्राह्मण भोजन करून शौनक गोत्रातील ब्राह्मणाला शंभर द्रव्य तू दे म्हणजे तू दोषातून मुक्त झालीस. ती स्त्री म्हणाली, माझ्याजवळ काही शंभर द्रव्य नाही. एक महिनाभर मी पादुकांचे आणि औदुंबराचे अर्चन करीन. तोच परमात्मा माझे रक्षण

करील. ती त्या प्रमाणे अर्चन करू लागली. तिला तीनच दिवसात फल मिळाले. ते पिशाच्च तिला भीती दाखवून आपले द्रव्य मागू लागला. तिला औदुंबर वृक्षाखाली महाराज बसलेले दिसले. महाराजांनीही या दोघांकडे पाहिले. महाराजांनी त्या पिशाच्चाला विचारले, ''काय रे, अधमा या स्त्रीला तूं का त्रास देतो आहेस?'' तो म्हणाला, तुम्ही या स्त्रीचा पक्ष घेणे बरे नाही. तुम्ही संन्यासी आहात. हिने माझे द्रव्य घेतले आहे ते मी मागतो आहे.

महाराज म्हणाले, हिला भीती दाखवून या अमंगल योनीतून तुझी सुटका कशी होईल? ज्यामुळे तुला सद्गती मिळेल असा उपाय तुला सांगतो तो ऐक. गेल्या जन्मात हिने तुझे द्रव्य घेतले आहे. आणि या जन्मात तिलाफळ भोगण्याची पाळी आली. पण ह्या जन्मात ती दरिद्री कुटुंबात जन्माला आली व सासरचेही दारिद्रय असल्यामुळे हिने तुझे द्रव्य कसे परत करायचे? ती पतीकडून तुझे और्ध्वदेहिक कर्म करवील आणि तुझ्या गोत्रातील ब्राह्मणाला ती मिळेल तेवढे द्रव्य देईल. हे इतकं झाले म्हणजे तुला मोक्ष मिळेल.

म्हणजे स्पेशल केस म्हणतात तशी आहे ही. हा निर्णय स्वत: दत्तप्रभूंनीच दिला. यमाला विचार, शास्त्र काय आहे हयाचा विचार करीत बसले नाहीत ते. महाराज त्याला पुढे म्हणाले, हे तुला पटत नसेल तर जा. हिचे रक्षण मी करणार आहे. मग तू पक्षपात म्हण की आणखी काही म्हण. पण त्या पिशाच्चाला सद्बुद्धी सुचली. तो म्हणाला, आपल्या चरणांचे दर्शन झाल्यामुळे मी कृतार्थ झालो. माझी दुष्कर्म निवृत्ती झाली असे मी समजतो. आपली इच्छा असेल तसे करा. महाराज त्या ब्राह्मणीला म्हणाले, आमच्या दोघांचा संवाद तूं ऐकला आहेस त्या प्रमाणे कर. त्यामुळे ह्या पिशाच्चालाही सद्गती मिळेल आणि तुझी ही वंशवृद्धी होईल. त्या ब्राह्मणीने महाराजांनी सांगितल्याप्रमाणे सर्व केले. पिशाच्याचा प्रतिबंध दूर झाला. मृत्यु आल्यावरसगळे देणे घेणे संपले, त्यांच्या पुढे कांही नाही. हा संशय या कथेने दूर केला. मरणानंतर पिशाच्च झालेल्या त्या ब्राह्मणाला महाराजांनी मुक्त केले.

दुसऱ्या दिवशी रात्री महाराज तिच्या स्वप्नात आले. तिच्या पदरात दोन फळे टाकून म्हणाले, ''आता ब्राह्मण भोजन करून ही फळे भक्षण कर'' हे सर्व स्वप्नातच झाले. जागी झाल्यावर स्वप्नात महाराजांनी दिलेली फळे प्रत्यक्ष तिच्या ओटीत मिळली. ती भक्षण केल्यावर यथावकाश गर्भिणी झाली. पुढे प्रसूत झाल्यावर तीला दोन मुले

झाली. त्यांचे त्या दोघांनी जात कर्म वगैरे केली. पुढे ती मुले मोठी झाली. आठवेवर्ष लागल्यावर पित्याने त्यांची मुंज करायची ठरविले. अचानक काय झाले की जेष्ठ पुत्राला सनिपात झाला. हा झाला म्हणजे दृष्टी जाते, ऐकायला येत नाही, सारखी व्यथा होते. (मोठ्या महाराजांनी खालच्या टीकेत हे सर्व सविस्तर दिले आहे.) शेवटी तो सनिपातज्वर वाढून तो मुलगा गेला.

ती ब्राह्मणी शोकाकुल होऊन म्हणू लागली, ''बाळा कुठे गेलास ? कि निजतोस ? माझे दूध वाया जातय. लवकर जागा हो.'' तिच्या बुद्धीवर परिणाम होऊन ती भ्रमिष्टासारखे तो मुलगा जिवंत आहे असे समजूनच बोलू लागली. ''अरे, जेवण तयार आहे ते जेवून घे आणि मग खेळायला जा. तुझे मित्र तुला बोलावत आहेत. चल, उठ, तूं उठला नाहीस तर मी प्राण देईन. या आधी मला पांच मुले झाली पण तूं त्या सर्वांत मला प्राणप्रिय झालास. तूं गेलास तर मी तरी जिवंत कशाला राहूं ? आजपर्यंत तूं मला कधीही दु:ख दिले नाहीस. तुझे मुख पाहून मला सर्व दु:खाचा विसर पडला. या दु:खाच्या सागरात मला लोटून तूं कुठे जातोस ? आम्हाला असे अकाली सोडून जाणे हा तुझा धर्म नाही. वृद्धापकाळी तुझ्या शिवाय आमची काळजी घेणारे कोण आहे ?''

गांवातली सगळी मंडळी येऊन तिला सांगू लागली, ''देव, ऋषी वगैरेंनाही जिथे मृत्यु चुकला नाही तर माणसांची काय कथा ? कालाच्या ओघात अवतारही गेले. तूं या सगळयाचा विचार कर. प्रत्येक गोष्टीला श्रुती प्रमाण मुख्य आहे.''

आता ती म्हणते, ''पिशाच्चापासून उत्पन्न झालेले माझे भय ज्यांनी दूर केले आणि मला देवाने जे स्वत: फल दिले ते फल विफल कसे झाले ? तीही आता चिडलेली आहे.'' ती विचारते, ''जर देवाचे वचन खोटे ठरत असेल तर कशाला देवाचे भजन करता ? बिभिषण, ध्रुवांनी परमेश्वराचे वचन खरे कसे समजायचे ? ईश्वराचे वाक्य निर्बाध आहे, खरे आहे हे कां समजावे ? या मुलासह त्या परमेश्वराची किर्ती घेऊन मी लोकांतराला जाणारा आहे.'' दहन संस्कार करण्यासाठी ती मुलाचे शव देईना. त्या शिवाय कोणी जेवायला जाईना. अचानक एक जटाधारी तपस्वी पुरूष त्या वेळी तिथे आले आणि तिला म्हणाले.

''मुलाबद्दल शोक करण्याचे तुला कारण नाही. मुलगा हा शोकाच विषय होऊ शकत

नाही. समोर दिसणारा देह हा तुझा मुलगा आहे की जीवात्मा ? खरे काय असेल ते सांग. देह म्हणजेच जर मुलगा असेल तर षट्कोशांचा देह तर तुझ्या समोरच आहे. याच्याकरता दु:ख करण्याचे कारण काय ? ज्या देहातून जीव जो निघून गेलेला आहे तो पुत्र आहे. कारण जीव आंत असेल तरच देहाला चेतना आहे. तो जीव म्हणजे परमेश्वराचा अंश आहे. त्याला जन्मही नाही आणि मृत्युही नाही. सर्व व्यापी तो आहे.

**आत्मस्वरूप दोन प्रकार आहे**. एक व्यवहार विशिष्ट आत्मा. त्यात व्यवहार तीन प्रकारचा. सुषुप्ती, जागृती आणि स्वप्न ह्या तीन अवस्था. सुषुप्ती अवस्थेमध्ये याच्या उपाधीपासून बाजूला झालेला जीव आपल्या मूळ रूपामध्ये परमानंदात विलीन होतो. तो आपल्या मूल स्वरूपाला प्राप्त होतो.

स्वप्नावस्थेत सगळी साधनं म्हणजे इंद्रिय विलीन झालेली आहेत. केवळ मन तेवढे आहे. त्या वेळी नदी, पर्वत, मनुष्य, पशु वगैरे सगळे पदार्थ दिसतात. तिथे आत्मा वासनारूप संस्कार घेऊन तो परत जागृतीमध्ये येतो. **केवळ मनानेच सर्व सृष्टी निर्माण करून तो त्यावेळी स्वप्नात असतो.**

आता जागृती अवस्था, जागृत स्वप्न आणि सुषुप्ती या तीन उपाधीमध्ये असलेला जो आत्मा त्याचे हे स्पष्टीकरण आहे. आता केवल आत्मा म्हणजे नेहमी भासणारा आत्मा. देश, काल, वस्तु परिच्छेद ही मर्यादा ज्याला नाही असा अनंत ब्रह्म आत्मा. तो सर्व व्यापी आहे. म्हणजे परिच्छेदसहित आहे.

असं असताना तूं कोणाद्दल शोक करते आहेस हेच समजत नाही. काल म्हणजे क्षोभक: काल जगाचे कारण आहे. गुणांमध्ये क्षोभ उत्पन्न करणारा काल. सात्विक, राजस, तामस ही त्रिविध कर्म. यांच्यापासून हा उत्पन्न झालेला जीवत्मा त्यांच्याबद्दल हा माझा पुत्र वगैरे सगळी भावना मिथ्या आहे. हे मायेने उत्पन्न झालेले जग स्थिर कसे मानता येईल ? जसे गारूडयाचे मायाजाल असते तसे हे जग खोटे आहे. नदीच्या प्रवाहात दोन लांकडे एकत्र येतात पुन्हा एकमेकांपासून दूरवाहत जातात. हा माझा पुत्र आहे मी त्याची जननी आहे हीसगळी कल्पना खरी आहे, असे जर तुला वाटत असेल तर पूर्वीच्या जन्मांत तूं त्याची माता होतीस कां ? तो तुझा मुलगा होता का ? हे सांग.''

नुसता देह नाही नुसता जीव नाही. काल–कर्म – गुणांच्यापासून उत्पन्न झालेल्या जगामध्ये देहाभिमानी असा तो माझा मुलगा आहे. असे ती म्हणते. पण हे जर खरे असेल तर पूर्व

जन्मात तू कोणाची कोण होतीस ? आणि पुढच्या जन्मात तुझा आणि त्याचा काय संबंध येणार आहे ?

ती म्हणाली, जन्ममृत्युमुळे उत्पन्न होणारे त्याचे दुःख पाहून मला शोक होतोय. हे तिने शोकांचे कारण सांगितले.

महाराज म्हणाले, जन्ममृत्यु तर कालवशात टाळताच येत नाहीत. दिवस आणि रात्री प्रमाणे जन्म आणि मृत्यु सारखे चालूच राहणार. बाल्यावस्थेतून प्रौढावस्थेत जाणारा जीव एकच असतो. तो जेव्हा म्हणतो, मी लहानपणी असे असे केले, आता मी मोठा झालो आहे, म्हणजे तो आणि मी एकच आहे. तसा देहांतरामध्येसुद्धा तोच जीवात्मा आहे. कशावरून ? तर जन्माला आल्यावर मातेच्या स्तनातील दूध प्यायला कोणी शिकवले ? हा तर जीव नवीन जन्माला आलाय ना ! ही जी त्याची स्तन्यपानाकडे प्रवृत्ती होते ती पूर्वीच्या (पूर्व जन्माच्या) अनुभवाने होत असली पाहिजे. दूध प्यायल्यानंतर क्षुधा शांती होते हा अनुभव आहे. त्याचे स्मरण त्याला होत असले पाहिजे. आणि म्हणून तो दूध पितो. म्हणजे देहांतरात गेलेला तोच जीवात्मा आहे. या स्तन्यपान प्रवृत्तीमुळे.

**मग हे संपायचे केव्हां ? हा भ्रम कधी संपायचा ?**

**गुरूप्रसादाने प्रयत्न करणारा जो आहे त्याचा भ्रम लौकरच नष्ट होतो. जर गुरू प्रसाद झाला नाही तर मृत्युकडे जातो.** जन्माला आला की मृत्युकडे जातो. मृत्यु झाला की पुन्हा जन्माला जातो असे सारखे चालायचे **आमरण उपासना करायचा प्रयत्न केला पाहिजे.**

**प्रयत्न कशाला करायला पाहिजे ? जन्म निश्चित येणार ना ?**

मनुष्य जन्मच येईल असेकांही सांगता येत नाही. कारण अनंत भोग्य कर्म आहेत. त्या कर्माच्या फलाचा भोग घेण्याकरता जन्म येणार. कोटयावधी खालच्या योनी आहेत. वरच्या देवादिकांच्या योनीमध्ये उपासना वगैरे कांही घडत नाही. भोग घेण्यातच तिथला काळ जातो. अशा भ्रमण करणाऱ्या जीवाला कदाचित मनुष्य देह लाभेल. त्यात पुन्हा पुण्य असेल तर आरोग्य असते. सर्व इंद्रिये व्यवस्थित काम करतात. जन्मापासून पंगु, अंध असा देह मिळाला तर काय उपयोग आहे ? बरं, भिल्ल, म्लेंछ वगैरेंचा जन्म मिळून काय उपयोग आहे ? तिथे परमार्थाशी संबंधच येणार नाही.

चांगल्या जातीत जन्मला तरी गर्भावस्थेपासूनच त्यालायातना भोगाव्या लागतात. आईने घेतलेल्या आहाराप्रमाणे त्याचे पोषण होते. त्या वेळी शक्ती, बल, प्रज्ञा सगळे विरूद्ध आहे. त्यातून पुढे मोठ्या कष्टाने तो जन्माला येतो. गर्भावस्थेचे नुसते वर्णन ऐकले तरी तिथे राहणे अशक्य आहे, असे वाटते पण जीव तिथे दहा महिने राहातो. असा हा कष्टप्रद जन्म मिळाल्यावर दु:ख करीत बसण्यापेक्षा पुढचा तरी जन्म येऊन नये म्हणून प्रयत्न करावा. जन्म-मृत्युचा शोक करीत बसू नये. ते अटळ आहे.

तिचा सगळ्यांना एकच प्रश्न आहे. तोच ती महाराजांना विचारते आहे. वेदांत वगैरे आत्ता मला कांही सांगू नका. महाराजांनी प्रसाद फल दिले असताना असे कसे झाले? त्यांचा प्रसाद व्यर्थ कां गेला? आणि असेच होणार असेल तर देवावर विश्वास कां ठेवावा? मग ते तपस्वी म्हणाले, ते आम्हाला काय सांगतेस? तुला जिथे वर मिळाला तिथे जाऊन सांग. आम्ही जातो.

त्या प्रमाणे ती स्त्री मुलाचे शव घेऊन महाराजांच्या पादुकांच्या स्थानात आली आणि त्यावर शिर आपटून घेऊन आक्रोश करीत विचारू लागली, हे असे कां झाले. मध्यरात्र झाली तरी दहन करायला तिने शव दिले नाही. शेवटी कंटाळून बाकीची ब्राह्मण मंडळी घरी गेली. ते दंपती फक्त तिथे राहिले. शेवटी गुरू महाराज प्रगट झाले आणि त्यांनी त्या मुलाला जिवंत करून तिलासांगितले, प्राण हा वायू असतो. ह्याचा प्राणवायू कुठे बाहेर गेला होता तो मी परत आणून याच्या शरीरात ठेवला. आता तूं शोक करू नकोस. ह्याच्यावरती टीकेमध्ये किती तरी विचार केलेला आहे. प्राण म्हणजे वायू आहे की प्राण म्हणजे प्रत्यक्ष जीवात्मा आहे यावर मोठ्या महाराजांनी खाली टीकेमध्ये पुष्कळ विचार केला आहे. तो उद्या पाहू आज पुरे.

।। अवधूत चिंतन श्रीगुरूदेवदत्त ।।

शेवटी विचार केलाय जीव स्वरूपाचा. प्राण म्हणजे वायू आहे. तो बाहेर गेला होता पुन्हा मी आणून या शरीरामध्ये पूर्वीप्रमाणें ठेवलेला आहे. म्हणून तूं शोक सोडून दे. असे महाराजांनी तिला सांगितले.

हा आता विचार इथे पुष्कळ आहे. ईश्वर किंवा आत्मा हा परोक्ष म्हणून दाखवला आहे. परोक्ष म्हणजे न दिसणारा. सर्वज्ञ, सर्व जगाला उत्पत्ती, स्थिती, लय करणारा असा ईश्वर हा कांही प्रत्यक्ष नाही म्हणून त्याला 'स:' म्हटले आहे. तोच वायू हा बाहेरचा

'वायू' असा अर्थ इथे घ्यायचा नाही. वायू म्हणून एक सूत्रात्मा सगळया लिंग शरीरांचा नियामक. हिरण्यगर्भ ज्याला म्हणतात तो. आणि 'एष:' पुन्हा. 'स:' म्हटलंय आणि एष: म्हणजे प्रत्यक्ष. हा जो आत्मा आहे अहम् म्हणून भासणारा तो स्वयं प्रकाश आहे आणि अपरोक्ष आहे. तोच वायू म्हणजे आत्मा तोच हा म्हणजे अहम् म्हणून भासणारा तोच प्राण आहे.

आता प्राण शब्दाच्या अर्थाबद्दल सुद्धा वेगळे वेगळे विचार आहेत. प्राणोनाम म्हणजे आत्मा एवं. तोच आत्मा आहे. तर 'प्राण' शब्दाचा अर्थ 'आत्मा' कसा केला असा विचार आहे. म्हणून प्राण म्हणजे क्रिया वगैरे करणारा, हा शरीराच्या आंत असलेला प्राणवायू आहे हा क्रियाशील आहे. इंद्रियांच्या सगळ्या क्रिया त्याच्यावर अवलंबून आहेस. मग हालचाल ज्याचा गुण आहे असा प्राण म्हणजे आत्मा कसा होईल ? त्याला क्रिया नाही. छांदोग्य उपनिषदामध्ये सातव्या अध्यायात आहे वाटतं हे.

सनत्कुमारांच्याकडे नारद गेले. आणि मला कांही तरी उपदेश करा, म्हणाले, तुम्ही काय शिकलात म्हणून सनत्कुमारांनी विचारले. नारदांनी ते काय शिकलेत याची सगळी यादी सांगितली. सनत्कुमार म्हणाले, ''ही नुसती नांवच आहे. त्यात काय शिकण्यासारखे आहे.'' म्हणजे इतकं सगळं शिकून एका शब्दात त्यांनी हेकरून टाकले. मग काय केलं. नाम, त्याच्या पुढे निरनिराळे पदार्थ सांगून शेवटी ''आशा'' नावांच्या पदार्था पर्यंत सांगत गेले; सनत्कुमार. पुढचा पदार्थ मागच्या पेक्षा श्रेष्ठ. असा सगळा उपन्यास करून शेवटी आशेच्या पुढे प्राण म्हणून एक पदार्थ सांगितला आहे. आशेपेक्षाही तो श्रेष्ठ आहे.

'सर्व क्रियाकारक फलभेदजातं प्राण एव'

पृ. ७६९ छांदोग्यो. खं. १५

हे क्रिया, कारण, फल हे सगळेही पदार्थ प्राणामध्येच अंतर्भूत आहेत. हे सांगण्याकरता ते सांगताहेत आता :-

प्राण: प्राणेन याति प्राण: प्राणं ददाति
प्राणय ददाति। प्राणो हं पिता प्राणो
माता प्राणो भ्राता प्राण:
स्वसा प्राण आचार्य: प्राणो ब्राह्मण: ।।१।।

पृ. ७३६ छांदोग्यो. खं. १५ अ. ७

सगळंच तो आहे. बंधू, माता, पिता सगळेच प्राण आहे. तर हे करूं काय ?
सगळ्यांना प्राण कसं म्हणायचे ? तर हे सांगताहेत -
सति प्राणो पित्रादिषु पित्रादिशब्द -
प्रायोगातदुत्क्रांतौ च प्रयोगाभावात्
पृ. ७७० छांदो खं. १५ अ. ७

शरीरात प्राण असेपर्यंत हा पिता, ही माता, हेबंधू, ही बहिण वगैरे प्रयोग होतो. प्राण गेला की संपले. त्याला कोणी पिता, माता म्हणत नाहीत. म्हणजे मुख्य प्राण आहे.

पिता माता वगैरे जेष्ठ मंडळींच्या बद्दल अयोग्य असे वर्तन करणाऱ्याला लोक म्हणतात.

पितृहा वै त्वमसि मातृहा वैत्वमसि
भातृहा वै त्वमसि स्वसृहा वै
त्वमस्याचार्यहा त्वै त्वमसि ब्राह्मणहा
वै त्वमसीति ।।२।।

पित्याच्या किंवा मातेच्या विरूद्ध वर्तन करणारा तूं पितृघातकी किंवा मातृघातकी आहेस, भ्रातृघातकी आहेस असे त्याला लोक म्हणतात म्हणजे त्याच्यात प्राण असे पर्यंत त्याच्या विरूद्ध कोणी वागलेपुत्रादिक वगैरे तर त्याला असे म्हणतात.

प्राण तिथे असल्यामुळे तूं पित्याला मारलेस, मातेला मारलेस, भावाला मारलेस असे बोलतात. जर त्या प्राणाचीच उत्क्रांती झाली तर याच मुलाचे अग्नीमध्ये हवन करतात. त्या वेळेला तूं पितृघातकी आहेस असे म्हणत नाहीत. जिवंत असताना थोडे जरी विरूद्ध वागला तरी पितृघातकी आहेस वगैरे म्हणतात. आणि तो प्राण जेव्हां जातो तेव्हां कांही बोलत नाही.

म्हणजे प्राण हा मुख्य आत्मा आहे. तो शरीरात असे पर्यंत सगळे काय होते. तोच सर्वस्व आहे. या प्रमाणे सगळीकडे प्राणच कार्य कर्ता आहे हे पाहणारा किंवा या प्रमाणे चिंतन करणारा तो सर्वांपेक्षा श्रेष्ठ ठरतो. बरं म्हणजे या ठिकाणी प्राण म्हणजेच आत्मा बाहेर गेला होता तो त्या मुलाच्या शरीरात परत आणून ठेवला असे मोठ्या महाराजांनी सांगितले आहे. आता नुसता आत्मा नाहीए तो. सगळा लिंग शरीर अभिमानी जीव

असा 'जीव' याचा अर्थ घेतला आहे.

बरं आता आणखी एक शंका. प्रत्यगात्मा जन्माच्या वेळेला नवीन कुठून येत नाही. किंवा अंत:काली तो इथून जात नाही. अखंड आहे तो. म्हणजे जाणे येणे त्याला नाहिये. मग बाहेर गेला होता आंत आणून ठेवला असे कसे म्हणता ? त्यांच्या चाकाच्या मधल्या दांड्यावर आरे बसवलेले असतात. त्या प्रमाणे प्राणामध्ये मन, इंद्रिय, बुद्धी इ. सगळी असतात त्या दांड्याप्रमाणे प्राण हा मुख्य आधार आहे. हा जो सगळ्या सूक्ष्म शरीराचा अभिमानी लिंगात्मा आहे (किंवा जीवात्मा आहे) त्याच्यामध्ये बह्माने प्रवेश केला. नामस्वरूपात्मक जगत् हे अभिव्यक्त करायचे आहे. त्या करता ती परादेवता जीव स्वरूपाने या लिंग संघातामध्ये येऊन थांबली. म्हणजेच जीव त्या ठिकाणी चेतन झाला. म्हणून जीवरुपाने ती परादेवताच आलेली आहे. आली म्हणजे तिला येणे जाणे असते असा त्याचा अर्थ नाही. तिथे त्या ठिकाणी ती अभिव्यक्ती झाली. बाहेरून आंत येणे. असला प्रवेश नाही या ठिकाणी. वानराने आंत उडी मारली तसं नाही. ही परादेवता या उर्ध्वदाराने आंत जीवरूपाने अभिव्यक्त झाली. गर्भात असलेल्या लिंग शरीरामध्ये सगळी चेतना सुरू झाली. जीव आणि परादेवता ब्रह्म एकच आहे. जीवरहित हे शरीर मृत झाले. जीव मृत झाला नाही. जीववियोग झाला म्हणजे मृत्यु झाला. प्रतिबिंबरूप जो जीव तयार झाला. तो अर्थात मर्यादित झाला. तेव्हां ते अंत:करण बाहेर गेले म्हणजे अंत:करणातील प्रतिबिंबही बाहेर गेले. अंत:करण म्हणजे सगळे सूक्ष्म शरीर. सूक्ष्म शरीर म्हणजे ज्ञानेंद्रिय, कर्मेंद्रिय,मन, पंचप्राण हे सगळे बाहेर जातात. जीव बाहेर गेला म्हणजे त्या अंत:करणातील प्रतिबिंबही बाहेर गेले. तो कुठे (त्याच्या कर्मानुसार) जायचे असे तिथे जातो. तो गेल्या बरोबर शरीराराला मृत्यु आला अस म्हणतात. जेव्हा जीव बाहेर गेला म्हणजे प्राण बाहेर गेला असे बोलताना ते बोलले, म्हणाले. आत्मा कांही बाहेर जात नाही येत नाही.

सुबंधू गेला होता त्याच्या भावाने त्याला परत शरीरात आणून ठेवले अशी कांही कथा आहे. ''हा मुलगा मेलाच नाही'' म्हणाले. ''प्राण कसा आहे ते आणखी तुला सांगतो. प्राण गेला की इतर कोणी इंद्रिय जिवंत राहात नाहीत. पण प्राण असला व इतर एखादे इंद्रिय निकामी झाले तरी जीवात्मा जिवंत राहातो. ज्याची वाणी गेली आहे तो जिवंत राहतो. मुक्या माणसाला आपण सगळी कामे करताना पहातो. तो फक्त बोलत नाही एवढेच म्हणजे वाणी गेली तरी मरण येत नाही. म्हणजे जो गेल्यावर कांहीच क्रिया

व्यवहार नाही तो मुख्य आहे. वाणी मुख्य नाही. दृष्टी गेलेला अंधसुद्धा जिवंत असतो. बहिराही ऐकू आले नाही तरी जिवंत असतो. हात तुटला, पाय तुटला तरी माणूस जिवंत राहतो. कर्मेंद्रिये, ज्ञानेंद्रिये सगळी गेली या जीव संघाताला घेऊन जेव्हां प्राण जातो तेव्हां मृत्यु येतो. म्हणजे प्राण मुख्य आहेत.''

सगळं स्वप्नात पाहिल्यावर तिची झोप गेली. आणि तो मुलगा जिवंत होऊन उठून बसलेला पाहिला तिने. तिला हर्ष आणि शोक दोन्ही झाले. एवढ्यात प्रात:काल झाला आणि त्या शवाचे दहन करण्यासाठी ब्राह्मण मंडळी आली. दत्तप्रभूंचे प्रत्यक्ष दर्शन झाले नसले तरी या प्रसंगावरून इथे पादुकांच्या ठिकाणी मोठी शक्ती आहे याची मात्र सर्वांना कल्पना आली. त्या दंपतीने स्नान करून पादुकारूपी ईश्वराची यथाशक्ती पूजा केली, आरती केली. ब्राह्मणांचीही संभावना करून ते आपल्याला घरी गेले. मुलगा मोठा बुद्धिमान, आरोग्यसंपन्न व दीर्घायुषी झाला. असे आणखीही जे जे जीव इथे आले त्यांचे मनोरथ पूर्ण झाले. म्हणून शेवटी सांगताहेत - त्या कृष्णातीरावरती नरसिंह सरस्वती निरंतर जागृत आहेत. आज रविवार आहे. सुट्टी आहे. ऑफिस बंद आहे असे नाही कांही. दत्तप्रभूंना कधीही सुट्टी नाही. बाकीचे देव निद्रिस्त होतात पण दत्तप्रभूंचे तसे नाही. दत्तप्रभू सज्जनांच्या भक्तीवर आसक्त होतात. त्यांच्यावर विश्वास ठेवतात. दृढ भक्तीने जे कोणी त्यांची पूजा करतात त्यांच्या इष्ट कामना त्वरित पूर्ण होतात. ही सती याचे प्रत्यक्ष उदाहरण आहे.

नामधारक सिद्धांना विचारतो, ''दत्तप्रभूंनी भीमातीरावर (गाणगापुरला) आल्यावर पुढे काय काय लीला केल्या ? ते आपण मला सांगा.'' सिद्ध म्हणाले, ''वांझ महिषीने दूध दिले. राजाने सेवा केली. राक्षसाला गती दिली. त्रिविक्रम भारतींना विश्वरूप दाखविले.'' इथे आता सिद्ध सांगताहेत. पाठी मागच्या अध्यायात तत्वज्ञानाचा उपदेश दत्तप्रभुंनी त्या स्त्रीला केला. तिच्या बुद्धीत कांही सुधारणा होते का बघू या, म्हणाले. त्या स्त्रीचे आपण उपदेशाने **संसारातून मन बाजूला होते की नाही पाहिले पण तसे कांही झाले नाही. मग भक्त वात्सल्य दाखवले.**

आता इथे वेगळीच लीला दाखवताहेत. राजा बरोबर शिकारीला जायचे, पालखीत बसून वनभोजनाला जायचे. रागद्वेषादिक कोणचेही विकार ज्याच्या मनामध्ये नाहीत असा महात्मा सगळ्या जगाला पवित्र करु शकतो. तो कधी दूषित होत नाही. आणि

संन्यास घेऊनही रागद्वेषादिक मनामध्ये आहेत असा संन्यासी कधी कृतार्थ होत नाही. हे त्रिविक्रम भारतींच्या उदाहरणावरून दिसून येते.

सिद्ध पुढे सांगतात. कृष्णा पंचगंगेप्रमाणे भीमाअमरजा संगम गाणगापुरला आहे. तिथेच सगळ्या जगाचा उद्धार करणारे दत्तप्रभु राहिले. प्रथम त्यांनी आपले रुप प्रगट केले नाही. पुढे एक दिवस एका ब्राह्मणाच्या घरी गेले आणि भिक्षा मागितली. त्याचा उद्धार करायचा होता. त्या वेळेला श्रीमंत लोक जे गांवात होते ते महाराजांचा उपहास करु लागले. दीन, भाविक, सत्शील ब्राह्मणाने दिलेली भिक्षा महाराजांना प्रिय आहे. सूर्य हा ढगांनी आच्छादित झाला तरी त्याचा प्रकाश कांही झाकला जात नाही तो सगळीकडे जातोच की. किंवा कस्तुरी झांकून ठेवली तरी तिचा सुगंध लपत नाही. तसे ईश्वराचे गुण आहेत. तो कितीही गुप्त राहिला तरी त्याचे गुण लपून राहू शकत नाही.

महाराज ज्या ब्राह्मणाच्या घरी भिक्षेला गेले होते तो दरिद्री होताच पण त्याच्याकडे जी दांत पडलेली वृद्ध व वंध्या महिषी होती. त्या वेळी तो ब्राह्मण भिक्षेला गांवात गेला होता. महाराजांना ती स्त्री म्हणाली, माझे पती भिक्षा घेऊन आले की मी आपल्याला भिक्षा घालते. महाराज म्हणाले, आम्हाला या म्हशीचे दूध दे. ती ब्राह्मण स्त्री म्हणाली ही म्हैस वंध्या आहे. आम्ही तिचा उपयोग भार वाहाण्याच्या कामासाठी करतो. तिच्या नाकात वेसण घातले आहे. हिच्या पासून आमचा योगक्षेम चालू आहे. जन्मापासून ही म्हैस एखाद्या रेड्याप्रमाणे काम करते आहे. ती दूधबिध कांही देत नाही.

महाराज तिला म्हणाले, ''बाई, खोटे बोलू नकोस. लवकर जाऊन धार काढून आम्हाला दूध दे.'' महाराजांनी सांगितल्याप्रमाणे त्या स्त्रीने त्या म्हशीचे दूध काढताच दूध मिळाले. त्या स्त्रीला मोठे आश्चर्य वाटले. तिने ते दूध थोडेसे गरम करून महाराजांना दिले. दूध घेऊन महाराज गडबडीने संगमावर गेले. तो ब्राह्मण घरी आल्यावर त्याला हे सर्व समजले. लगेच त्याने आपल्या स्त्रीला बरोबर घेतले, महाराजांच्याकडे तो आला. महाराजांची पूजा वगैरे करुन इष्टवर प्राप्ती झाल्यावर तो आनंदाने घरी परतला. दुसरे दिवशी भार वाहाण्याच्या कामाला लावण्यासाठी नेण्याकरता गावांतले शेतकरी लोक त्या ब्राह्मणाकडे आले. त्याच्या पत्नीने सांगितले, ही दूध देणारी म्हैस असल्याने ही कांही मी भार वाहाण्याच्या कामाला देणार नाही.

त्या शेतकऱ्यांनी हे लगेच राजाला जाऊन सांगितले. त्या ब्राह्मणाकडे राजा आला व

ब्राह्मणाने हे खरे आहे असे सांगताच राजा आपले चतुरंग सैन्य, इतर लवाजमा घेऊन संगमावर महाराजांच्या दर्शनाला निघाला. येऊन महाराजांना म्हणाला, मी अत्यंत दीन आहे. माझे संरक्षण करा. महाराज म्हणाले, मी वनांत राहाणारा दंडी संन्यासी आहे. आणि तूं इतकी सेना घेऊन एवढ्या आनंदाने कशाला आलास आमच्याकडे ? तो राजा म्हणाला, महाराज, आपण माया नर आहात. आपण खरे मनुष्य नाही. आपण साक्षात् परमेश्वर आहात. तेव्हां अरण्य सोडून आपण माझ्या नगरात येऊन ते पवित्र करा.

हे ऐकून सर्व पवित्र करणारे महाराज, त्या राजाच्या नगरात आले. सूर्य, इंद्र वगैरेंसारख्या यांची पावन शक्ती आहे. छत्र, चामर घेऊन राजाने महाराजांना मिरवणुकीने नगरात आणायला  सुरवात केली. महाराजांना पालखीत बसवून राजा पायी चालू लागला ब्राह्मण हे वेदघोष करताहेत. स्तुतिपाठक स्तोत्र करताहेत. बाकी सगळे जय घोष करताहेत. नगराच्या पश्चिम दिशेला आले असता महाराजांना एक ब्रह्मराक्षस दिसला. तो दुसऱ्या कोणाला दिसला नाही. तो नरभक्षक राक्षस महाराजांचे दर्शन झाल्याबरोबर शांत झाला. झाडावरून खाली उतरून त्याने महाराजांना नमस्कार केला. 'मला या कुयोनीतून मुक्त करा' अशी त्याने प्रार्थना केली. महाराजांनी त्याच्या मस्तकावर हात ठेवला. त्या बरोबर त्याने मनुष्यरुप धारण केले. महाराज त्याला म्हणाले, 'संगमावर जाऊन स्नान कर म्हणजे तूं मुक्त होशील.' महाराजांच्या आज्ञेप्रमाणे त्याने महाराजांना नमस्कार केला, संगमावर जाऊन स्नान केले आणि ते भौतिक शरीर टाकून दिल्यावर कर्म बंधनातून तो मुक्त झाला.

राजाने हे सर्व पाहिले. महाराजांची वारंवार स्तुती करून त्यांना गांवात आणले आणि एक मठ बांधून त्यात त्यांची राहायची सोय केली. तो राजा ईश (गुरु) पूजा, आरती आणि गायन करुन तो राजा आपले सांसारिक दु:ख घालवत होता. महाराजांच्याकडे रोज येऊन त्याने महाराजांची पूजा, आरती करण्यास तसेच गायन सेवा करण्यास आरंभ केला. त्यामुळे त्याचा सांसारिक ताप सगळा दूर झाला. एखाद्या माणसाला स्फोटक होऊन वेदना होत असताना त्या माणसाने जर गायन एकाग्र चित्ताने, आवडीने श्रवण केले तर त्या वेदना कमी होतात. तशी ही सांसारिक वेदना हा राजा विसरत होता. म्हणजे ईश्वराच्या भजनाने मनांत रागद्वेषादि कोणचेही विकार मनांत राहात नाहीत.

महाराज संगमावर स्नान करुन तिथे आन्हिक करीत. गांवात भिक्षा घेत आणि मठामध्ये राहात होते. **लोकांना मार्गदर्शक मिळावे व त्याप्रमाणे लोकांनी अनुकरण**

**करावे म्हणून महाराज रोज संगमावर शास्त्रविहित नित्यकर्म करत असत.** भक्त वात्सल्यामुळे भगवान राजाच्या आधीन झाले. हे सर्व त्रिविक्रम भारतींच्या कानावर गेले. त्रिविक्रम भारती मोठे ज्ञानी संन्यासी जवळच्याच गांवात राहात होते. त्यांना असे वाटले, महाराज संन्यासी असून हे राजाबरोबर वनांत जाणे वगैरे संन्यासाश्रमाच्या विरुद्ध आचरण करताहेत. हे वास्तविक त्रिविक्रम भारतींच्या अल्पबुद्धीचे द्योतक होते. ते महाराजांची निंदा करु लागले. महाराज दांभिक आहेत असे ते म्हणू लागले.

सर्वसाक्षी सद्गुरुंना त्रिविक्रम भारती आपली निंदा करताहेत हे समजले. एक दिवस त्यांनी राजाला सांगितले, 'आज आपण त्रिविक्रम भारतींच्या कुमसी गांवाला जाऊन त्यांच्या सारख्या निंदकाला शिक्षा करायची आहे.' हे ऐकून राजाने जायची तयारी केली. उत्तम पालखीत बसवून छत्र, चामर ढाळत महाराजांना त्याने कुमसी गांवाला आणले. तिथे काय झाले की त्रिविक्रम भारती नरसिंहाचे ध्यान करत होते. पण भगवंतांच्या मायेनं त्या दिवशी त्यांचे मन कांही स्थिर होईना. त्यांनी ईश्वराची स्तुती करायला सुरुवात केली. वास्तविक पहाता त्यांचा ध्यान करण्याचा अभ्यास चांगला होता. पण त्या दिवशी त्यांचे मन चंचल होऊन ध्यान कांही लागेना.

ते प्रार्थना करु लागले, 'हे नरसिंह ईश्वरा, आपण प्रसन्न व्हा. आपण भक्तांच्या इच्छा पूर्ण करणारे आहात. आज ध्यानामध्ये आपले सामीप्य कां नाही ? आपण दया करा.' त्रिविक्रम भारती अशी प्रार्थना, स्तुती करत असताना दत्तप्रभु त्या नदीतीरावर आले आहेत. हे त्याला ध्यानात दिसले. त्यांच्या चित्ताला अत्यंत ताप झाला आणि अचिंत्य, अव्यक्त रुप असलेल्या परमेश्वराला पहाण्यासाठी त्रिविक्रम भारती आले. महाराजांनी आपल्या योगमायेने त्रिविक्रम भारतींचे मन आवृत्त केल्यामुळे त्यांना ते सैन्य, राजा, महाराज, सगळेच संन्यासी दिसू लागले. त्रिविक्रम भारतींना विवेक राहिला नाही. हे सर्व दृश्य आश्चर्य चकित होऊन पाहू लागल्यावर भगवान म्हणतात, 'तू ज्याचा धिक्कार केलास तोच मी दांभिक, भ्रष्ट संन्यासी आहे. संन्यास घेऊन तूं काय सोडलेस ? नृसिंहाचे तूं ध्यान करतोस. यतिधर्माचे तूं उत्तम शिक्षण घेतलेले आहेस. संन्याशांमध्ये तूं प्रसिद्ध आहेस. पण तूं कशाचा संन्यास केलास ? सूत्र आणि शिखा त्याग केला, दंड धारण केला म्हणजे संन्यास झाला का ? रागद्वेषांनी तुझे अंतरंग भरलेले आहे. हा कसला संन्यास ! नुसता संन्यासी वेष धारण करणारा धर्मज्ञ असू शकत नाही. दांभिकाचे

लक्षण काय असते ते मला सांग. ते समजून घेण्याकरता मी तुझ्याकडे मुद्दाम आलो आहे. दांभिक कोणाला म्हणतात ते सांग. तुझ्यावर नृसिंहांचा प्रसाद आहे त्यांना स्मरुन सांगा.'

२८व्या श्लोकामध्ये 'संन्यस्त' याचा थोडा विचार केला आहे. संन्यासाचे मुख्य कार्य श्रवण, मनन, निदिध्यासन करायचे. ते करुन अपरोक्ष ज्ञान मिळवायचे. समाधी अवस्थेत राहून जीवनमुक्तावस्था प्राप्त करुन घ्यायची. डोळ्याने कांही पहायचे नाही. कानाने कांही ऐकायचे नाही. (अनावश्यक असे).

महाराज म्हणाले, 'संन्यास घेणारा मुक्त होतो असें फक्त तूं सांगतोस. संन्यास घेऊन साक्षात्कार करुन घेतलेला वाटेल तसा जरी वागला तरी त्याला कर्मबंधन नाही अशीही श्रुती आहे. स्त्रियांना घेऊन जाईल, मोठ्या यानांत जाईल, त्याला कांही प्रतिबंध नाही. तोही जीवनमुक्त असू शकतो.'

'काय झालेले आहे, सांख्य जे आहेत आत्मज्ञानाबद्दल सांख्यांचे मत सांगताहेत. आत्मा हा द्रष्टा आहे. देहापेक्षा निराळा आहे. हे सांख्यांनी समजून घेतले. परंतु शेवटी आगम सिद्धांत सोडून भेदच मानला. अनेक आत्मे आहेत असे मानून बसले. शुद्ध आत्मस्वरुप त्यांनी सांगितले आहे. उदासीन आहे, ज्ञानरुप आहे, स्वयंप्रकाशी आहे वगैरे सगळे सांगितले. **पण शेवटी सांख्य म्हणतात, आत्मे अनेक आहेत. हे त्यांचे म्हणणे श्रुतीच्या विरुद्ध आहे.**'

'कणाद वगैरे नैय्यायिक म्हणाले, आत्मा एक द्रव्य आहे. उदाहरणार्थ, छाटी सारखे शुभ्र वस्त्र रंगाने रंगवले. आता ते वस्त्र लाल झाले म्हणतो आम्ही. रक्त गुण त्याच्या वरती आला. तसा आत्मा नऊ गुणांनी युक्त आहे. बुद्धी, ज्ञान, सुख, दुःख, इच्छा. हे सगळे आत्म्याचे गुण आहेत. तो आत्मा या गुणांनी युक्त आहे. आत्मद्रव्य अशा प्रकारच्या गुणांनी युक्त आहे असे ते मानतात. म्हणजे त्यांना शुद्ध आत्मा सापडलाच नाही.'

आता मीमांसक काय म्हणतात पहा. मीमांसकांना वेद मान्य आहेत. त्यांचे मन मात्र बाह्य विषयांकडे गेलेले आहे. त्यामुळे काय झालं, मीमांसक उपनिषदे वाचायला लागले. ते वाचून ते म्हणाले, जग नाही, कशाचा कांही संबंध नाही. काहीच नाही. म्हणजे आपला सगळा नाशच करुन घ्यायचा का? इतके सगळे विषयांनी भरलेले

चांगले जग आहे, त्या विषयांचा उपभोग घ्यावा; वाटलं तर यज्ञ याग करुन स्वर्गामध्ये जावे आणि हे काय सांगतात. आत्मज्ञान म्हणजे सगळे संपूनच जायचे. म्हणजे स्वत:चा नाश करण्याकरता उपनिषदे वाचायची काय ? म्हणून मीमांसकही बाजूला झाले.

त्यामुळे काय झाले, जीवात्मे कर्म करतात, स्वर्गलोकाला जातात. नरकात जातात. इथे येतात. असे रहाटगाडे सतत चाललेले आहे. अशा लोकांच्या प्रमाणें तुला राहायचे आहे कायं ? संन्यास घेतला आहेस. आत्मनिग्रह कर. तूं संन्यासी आहेस. शास्त्राचे, उपनिषदांचे रहस्य समजून घेऊन खरे आत्मज्ञान करुन घे. आता दांभिक म्हणजे कोण हे सांग.

त्रिविक्रम सांगताहेत, 'हे भगवंता, ईश्वरा, हे मायया, माझी बुद्धी सगळी मारली गेली. माझ्या तोंडून एक शब्द निघत नाही. मी आपल्याला शरण आलेलो आहे. माझ्या अपराधाची क्षमा करा. जे कांही थोडे पुण्य माझ्या हातून घडले असेल म्हणून आपले तेज आपले स्वरुप साक्षात् पहायला मिळाले. आपणच साक्षात् नृसिंह आहात.'

त्रिविक्रम भारतींनी अशी शरणागती पत्करल्यावर तो सगळा देखावा बंद झाला. महाराजांनी आपले मूळ रुप प्रगट केले. सैन्य, मंत्री, राजा सगळे दिसू लागले. सैन्यामध्ये महाराज आहेत. राजा वारा घालतो आहे. महाराजांचे विश्वरुप त्रिविक्रम भारती आपल्या नेत्राने पाहू शकला नाही. त्यावेळी अगोदर दिव्यरुप दाखवले आणि मग संन्यासीरुप दाखवले. दोन्ही रुपे पहाणे कठीण आहे. दिव्य दृष्टीने त्याला दाखवले. महाराज त्याला म्हणाले, ''तुझ्या ध्यानयोगाच्या अभ्यासाने मला आनंद झाला. आता माझे लौकिक स्वरुप पहा.'' नंतर शांत संन्यासीरुपाने भगवान् पालखीत बसलेत असे त्याला दृष्य दिसले. मग त्रिविक्रम भारती सावध झाला. आणि भगवानाना त्याने प्रार्थना केली.

अर्जुनाचे आणि भिल्लरुपी शंकरांचे युद्ध झाले होते ना! शेवटी अर्जुन दमला. त्याने प्रदोष पूजा करताना वाहिलेली बिल्वपत्र त्या भिल्लरुपी शंकरांच्या मस्तकावर दिसू लागली. त्यावेळी अर्जुनाने अशी प्रार्थना केली. शरीराने, वाणीने, पुष्कळ बोलला शंकरांना, 'तूं कोण, तुला कोण विचारतय. मी कोण आहे तुला माहिती नाही' वगैरे बोलाचाली झाली. शेवटी शंकरांची क्षमा मागितली. तसे त्रिविक्रम यती म्हणताहत, ''मी आपला अपराध केल्याबद्दल आपली क्षमा मागतो.''

सर्व दु:ख हरण करणारा तो हरि. म्हणजे हरि हे नांव उच्चारताना सर्वही दु:ख घालविणारा आहे या भावनेने ते नाम उच्चारल्यानंतर त्याचे लगेच फळ मिळते. त्या नामोच्चाराने सर्व दु:ख जातात.

त्रिविक्रम भारती म्हणाले, ''मी या अविद्या प्रवाहामध्ये बुडायला लागलो आहे. भवसागर पार करायला ज्ञानरुपी नौकेला आपल्या कृपारुपी वाऱ्याची आवश्यकता आहे. वारा अनुकूल लागतो ना! आत्मा आणि परमात्मा यांचे अखंड एक रुप आहे. ते म्हणजे तट आहे. त्या नदीच्या पैलतीरावर आपण मला घेऊन चला.'' महाराज म्हणाले, मोठे मोठे शास्त्रज्ञ सुद्धा ते आत्मस्वरुप जाणू शकले नाहीत तिथे तुमचा काय पाड! म्हणून त्रिविक्रम भारती म्हणताहेत, 'आपण आता मला पैलतीराला घेऊन चला.' तेव्हां महाराज म्हणाले, 'ज्ञानरुपी नौकेने अविद्यारुपी नदी पार करून पूर्ण स्वरुपाची तुला प्राप्ती होईल. तूं इथेच थांब.'

त्रिविक्रम भारतींचा सगळा अहंकार गेला. ते शरण आले. ज्ञान हीच नौका आहे. अविद्यारुपी नदी पार करणे कठीण आहे. आत्मरुप स्वयंप्रकाशी आहे. पण त्याच्यावर या अविद्येचे आवरण आहे. ते आवरण दूर होत नाही. किती जरी प्रयत्न केला तरी. आणि नंतर विक्षेप येतो. विक्षेप हे अविद्येचे कार्य आहे. अविद्येने आनंदस्वरुप झांकून टाकलेले आहे. सगळ्या जगामध्ये जो आनंद मिळतो तो या त्या महानंदाचा फक्त एक अंश आहे म्हणतात. त्या परमानंदाला विसरुन हा जो थोडासा आनंद मिळतो त्याच्याच पाठीमागे सगळे धावतात. असे हे आवरण आहे. आवरणरुपी अविद्याही गेली पाहिजे. आणि शिवाय विक्षेप. जगात नाना रुपे दिसताहेत. हा विक्षेपही बंद झाला पाहिजे. आवरणही गेले पाहिजे, विक्षेपही गेला पाहिजे.

ज्याला देशाची मर्यादा नाही, कालाची मर्यादा नाही, वस्तु स्वरुपाची मर्यादा नाही त्याला परंपाद म्हणतात. सर्व स्वरुपी असा तो आहे. या पदाला तूं पोहोचलास. ''जाशील'' असा भविष्य काल नाही. **नृसिंहांचे ध्यान करुन तत्वज्ञान विवेचनाची जी भूमिका तुम्ही मिळवली आहे ती सोडून खाली येऊ नका. कोणाची निंदा वगैरे करु नका. तसे केलेत तर खालीच याल. नृसिंहध्यान आणि तत्व चिंतनाच्या भूमिकेवर तुम्ही राहा.** अनात्म देहाचा कांही विचार करु नका. स्वत:च्या आणि दुसऱ्याच्या. मीच तेवढा कर्माचरण करणार दंडी संन्यासी आहे. दुसरे कोणी

करीत नाहीत असे समजू नका. **तुम्हाला माहीत आहे इतर कोण काय अनुष्ठान करतात ते? त्यांची निंदा आणि आपली स्तुती करु नका. मनांतून ते काढून टाका. कोणाची स्तुतीही नको आणि निंदाही नको**. सर्व ईश्वराचे स्वरुप आहे हे लक्षात घ्या.

त्रिविक्रम भारती म्हणाले, 'कर्माचा आग्रह कसा सोडणार? कर्म तर शास्त्राने करायला सांगितली आहेत. कर्म, उपासना चालू ठेवायला श्रुतींनी सांगितले आहे.'

महाराज म्हणाले, ते सगळं खरं असलं तरी तुला कांही स्वर्ग मिळवायचा नाही की कांही नाही. तुला कोणत्या एषणा ठेवायच्या नाहीत मग तुला कशाला कर्माचा एवढा आग्रह पाहिजे. हे तुला योग्य नाही. ज्याच्या मनांत कोणचीही एषणा नाही, फलाची आशा नाही त्याने कर्म कशाला करायची?

हे त्याच्याबद्दल सांगितले. ते पुढे म्हणाले, ''त्यामुळे उलट चित्त विक्षेप होईल. आज दंड तर्पण झालं नाही, अमूक झालं नाही अशी मनाला रुखरुख कशाला लावून घ्यायची. जे कर्म कराल त्यात गुंतून राहू नका. **लोक संग्रहाकरता कर्माचरण करायचे.** (स्वत: महाराज कर्माचरण त्या करता करीतच होते की) कर्माने विक्षेप होतो म्हणतात. जो पहिल्यापासून त्याच्या विमुख आहे. पुष्कळ वासना मनामध्ये भरलेल्या आहेत. अजून कांही ज्ञान भूमिकेवर गेला नाही. जिवंत राहाण्याची इच्छा आहे. संन्यासाश्रम आपण घेतलेला आहे. शेवटपर्यंत आपली सगळी उत्तम व्यवस्था व्हावी. आणि साधन जवळ कांहीच नाही.

**ज्ञान झाल्यानंतर आग्रहाने तुम्ही कर्म करायला लागलात तर चित्त विक्षेप होणार ज्ञान नसताना जर कर्म सोडले तर तो प्रत्यवाय होईल**. संन्यास घेतल्यावरही ज्ञान होईपर्यंत कर्म सोडायचे नाही. करीत राहायचे. ज्ञान झाल्यानंतर विक्षेप होऊ नये म्हणून आग्रह सोडायचा.''

असा त्रिविक्रम भारतीला उपदेश करुन क्षणार्धात सैन्य, राजा वगैरे सर्वांना घेऊन महाराज योगगतीने गाणगापुरला परत आले. आणि याच्या पुढे त्यांनी कर्ममार्ग सांगितला. इथून पुढे ५ अध्याय कर्मकांड आहे.

अशुद्ध मानस जे आहेत. त्यांचा पापकर्म क्षय होण्याकरता आणि वैराग्य उत्पन्न

होण्याकरता हे पुढचे ५ अध्याय आहेत. उन्मत्त ब्राह्मणांना वेदतत्व सांगितले. आणि अंत्यजाला ज्ञान देऊन त्या विप्रांना शिक्षा केली. इतका विषय त्याच्यामध्ये आहे. त्यागानेच मोक्ष मिळतो. कर्म संन्यास पूर्वक श्रवण मननादिकांनी जर ज्ञान उत्पन्न झालं तर ज्ञानानेच मोक्ष मिळतो, असा आचार्यांचा सिद्धांत आहे.

त्याच्या उलट कर्म बंधनात्मक आहे. कर्माचा जर मोक्षाला उपयोग नाही मग कर्मकांड कशाला सांगितले ? असे नामधारकाने विचारल्यावर सिद्ध म्हणतात, आत्तापर्यंत मोक्ष सिद्धीला आवश्यक तो ज्ञानयोग सांगितला.

स्वाश्रमाला अनुसरुन योग्य कर्म करा नाही तर पाप लागेल असे ९ व्या अध्यायात नामधारकान ऐकले होते ना सिद्धांना सांगताना. सिद्ध सांगताहेत - अविद्येपासून उत्पन्न झालेले कर्म अविद्येचा नाश कसा करील ? आपल्या उपजीव्याला विरोध होतो की नाही ! ज्याच्यापासून उत्पन्न झाले त्याचा नाश कसा करते ? हा नामधारकाचा संशय आहे.

सिद्ध सांगतात, ज्ञानाचे फल मोक्ष आहे. मोक्ष द्यायला ज्ञानाला कोणचे सहाय्य लागत नाही. ज्ञान झाले की मोक्ष मिळतो. पण ज्ञान उत्पन्न व्हायला कर्माची आवश्यकता आहे. ज्ञान उत्पन्न झाल्यावर ते एकटे मोक्ष देऊ शकते. पुढे दुसऱ्या कशाची मदत लागत नाही. अगोदर सगळी कर्म झाली पाहिजेत. कर्म ही संस्काररुप आहेत. किंवा विविदिषा उत्पन्न करतात. तीव्र ज्ञानाची इच्छा उत्पन्न झाली म्हणजे ज्ञान होते.

कर्म ही सगळी संस्कारुप कशी ?

गर्भधानापासून उपनयनापर्यंतचे सगळे कर्म संस्कार आहेत. आता ४ वेद व्रते आहेत. प्राजापत्य, सौज्ञ, आग्नेय, वैश्यदेव. ही ब्रह्मचाऱ्याने करायची असतात. स्नान म्हणजे समाव्रत. सहधर्मिणी संयोग; त्यानंतर देवयज्ञ, भूतयज्ञ, पितृयज्ञ, ब्रह्मयज्ञ, मनुष्ययज्ञ असे पंचमहायज्ञ आहेत गृहस्थाश्रमी माणसाला. त्यानंतर अष्टक, अन्वष्टक, पार्वण, श्राद्ध, श्रावणी, आग्रहायणी, चैत्री, अश्वयुजी, आश्वयुज्याख्य, सप्तपाकयज्ञ, तीन कुंडांचे अग्निहोत्र घेतल्यावर पुढचे यज्ञ. अग्नी स्थापन करायचा. त्या नंतर अग्निहोत्र. दर्शपूर्णमास. चातुर्मास्य, निरुढ प्रतिबंध... असे सात हविर्यज्ञ. त्या नंतर अग्निष्टोम म्हणजे सोगयाग असे सात सोम यज्ञ आहेत. असे एकंदर ४० संस्कार आहेत पण दैवी संपत्ती म्हणून वर्णन केलेले अमानित्व, वगैरे गुण यात धरुन एकंदर ४८ संस्कार झाले पाहिजेत. म्हणजे ब्रह्मलोक प्राप्त होतो.

हे सगळे (४८) संस्कार झाले म्हणजे ते चित्त ज्ञान ग्रहण करायला, ज्ञान धारण करायला योग्य होते.

वेदाध्ययन, यज्ञ, तप, दान वगैरे कर्म विविदिषा उत्पन्न होण्याकरता आहेत. ही जरी साधन चतुष्ट्य कर्म असली तरी त्यात आश्रमही येतो - संन्यासाश्रम. वेदांत ऐकावास न वाटणे हे महापापाचे लक्षण आहे. आत्मानात्मक विवेक वगैरे आवडत नाही. ईश्वरार्पण बुद्धीने केलेल्या कर्मानि ज्ञान प्रतिबंधक पाप गेल्यावर आपण वेदांत ऐकावा असे वाटते. ज्ञानाची इच्छा उत्पन्न होते. कर्म ही आत्मविमुक्तीला श्रवणाची रुची उत्पन्न करुन उपकारक आहेत. बहिरंग साधनं आहेत. साक्षात् कांही मुक्तीला कारण नाहीत. कारण अज्ञानाला ती कर्म अविरोधी आहेत. अज्ञान दशेतच करायची आहेत. ज्ञान उत्पन्न व्हायला शम, दमादि साधनांपेक्षा दुसरी साधनं लागत नाहीत. शमादि साधन उत्पन्न व्हायला बुद्धी शुद्धी असली म्हणजे झाले. आणि बुद्धी शुद्धीला नित्यकर्मापेक्षा दुसरे कांही लागत नाही. नित्य कर्मानि बुद्धी शुद्धी होते. अशी ज्ञानाची परंपरा आहे.

**अविद्येपासून उत्पन्न झालेले कर्म अविद्येला कसे नाहीसे करते?**

खेकडीची पिल्ले आपल्या नखांनी खेकडीणीचे पोट फाडतात आणि तिचा नाश करतात. पिल्ले झाल्यावर ती खेकडीण मरुन जाते. जे विरोधी असेल ते त्याचे घातक असते. गंज किंवा धुरळा बसलेले भांडे स्वच्छ करण्यासाठी मातीच/राखच घ्यावी लागते. मातीनेच ती तो गंज किंवा धुरळा, माती घालवायची. तसे अविद्येने उत्पन्न झालेल्या कर्मानेच अविद्या घालवायची. कर्तृत्वाभिमान आणि फलेच्छा न धरता केलेल्या कर्माला योग म्हणतात. अशा कर्मानि अविद्या दूर होते. **कर्मानुष्ठान न करणाऱ्याला प्रत्यवाय दोष लागतो आणि त्याला कधीही ज्ञान होत नाही. म्हणून कर्म करायची.**

कर्म करायला सांगितली की कर्म जन्मभर करावी लागतात. कुठले ज्ञान, कुठले श्रवण, कुठला संन्यास. कर्म सोडता येणारच नाही. अशीही श्रुती आहे. मृत्युनंतर यज्ञपत्रांसह त्या मनुष्याचे स्मशानात दहन करतात. म्हणजे शेवटपर्यंत अग्निहोत्र आहे. अग्निहोत्रादि कर्माचरणात व्यग्र असलेल्या मनुष्याला श्रवण करायला सवड कुठे आहे? श्रवण घडले नाही तर ज्ञान कसे होणार? संन्यास घेऊन श्रवण करावे हे कांही अनुष्ठान होणार नाही. संन्यास करताच येणार नाही. ज्ञानाचा उत्पादन काल कुठे आहे. संन्यास घेतल्यानंतर श्रवण व्हायचे, ज्ञान उत्पन्न कसं होणार? संन्यास करताच

येणार नाही. शमदमादि कार्यांनी चित्तशुद्धी झाली. वैराग्य उत्पन्न होईपर्यंत कर्म करायची. ही बहिरंग कर्म अंत:करण शुद्धीकरता आहेत. शमदमादि सगळी साधनं उत्पन्न झाली ही ज्ञानाची अंतरंग साधनं आहेत. कर्माचा अवधी संपला. शमदमादि उत्पन्न झाल्यावर संसार नको वाटायला लागला. संन्यास घेऊन श्रवण मननामध्येच सर्व आयुष्य घालवायचे. शमादि मिळाल्यानंतर कर्म सोडावीत. मग शम वगैरेही सोडून द्यावे. इंद्रियदमन वगैरे कांही नको. कर्मही सोडल; शमादि साधनांनी ब्रह्मप्राप्ती करुन घेणेही ज्याने सोडले त्याच्याशी संबंध ठेवू नयेत. शमादि साधन संपत्ती नसेल तर नुसता संन्यास घेऊन तो पतित होतो. पण शमदमादि साधन संपत्ती मिळाली तर ब्रह्मचर्याश्रमातून, गृहस्थाश्रमातून किंवा वानप्रस्थाश्रमातून संन्यास घ्यायला हरकत नाही. पण ही जर शमादिंची प्राप्ती झाली नसेल तर त्याने यावज्जीव कर्मच करीत राहिले पाहिजे. बुद्धी शुद्धीच नाही. म्हणजे कर्मकांड आणि हे उत्तरकांड यांचा कांही विरोध नाही.

कर्म केव्हांच टाकता येत नाहीत. अज्ञानी मनुष्य फलेच्छेने कर्म करतो. विद्वान हा अनासक्त आहे. ज्ञानी मनुष्याला कांही इच्छा नाही. तो निष्काम आहे. मग प्रयोजन नसताना प्रवृत्ती कशी होईल ? मूर्ख मनुष्यसुद्धा प्रयोजनावांचून कांही करीत नाही तर ज्ञानी मनुष्य प्रयोजनाशिवाय कसा राहील ? काय त्याला मिळवायचे आहे ? लोकसंग्रह हे प्रयोजन आहे ज्ञानी माणसाचे. ज्ञानी मनुष्य जसे अनुष्ठान करेल तसेच लोक वागतील. त्याने कर्म सोडली तर लोकही कर्म सोडतील. म्हणून कर्मयोगाचाच उपदेश केला आहे.

सिद्ध नामधारकाला म्हणतात, कर्मबंधरुपी महाराजांची लीला आहे ती ऐक. त्यामुळे तुझा भवबंध तुटेल. एक ब्रह्मद्वेषी क्रूर यवन राजा होता. आपल्या सभेमध्ये विप्रांना बोलावून तो त्यांना वेदपठण करायला लावायचा. अर्थासहित वेदांचे पठण करणाऱ्या विप्रांना तो पुष्कळ धन द्यायचा. लोभी, द्रव्यलंपट ब्राह्मण राजाकडे येऊन वेद म्हणून लागले. यज्ञयागात पशु वध करतात हे ऐकल्यावर तो यवन राजा वैदिक कर्मांची निंदाच करु लागला. ब्राह्मणांची आणि श्रुतींची निंदा करु लागला. आत्मतत्वक प्रतिपादक उपनिषदांची निंदा केली. तो म्हणाला, स्वर्ग प्राप्ती करणाऱ्या यज्ञयागात हिंसाच होते की. मग त्या यज्ञयागांचा उपयोग काय ? तुमचा सगळा धर्म मिथ्याचाराने भरलेला आहे. तुमचा देह आणि आमचा देह सारखाच आहे. मग वर्ण, आश्रम कुठले काढलेत तुम्ही ? जसे आम्ही वागतो तसे तुम्ही वागा. अचेतन दगडाला देव मानणे, अश्वत्थ

वृक्षाला देव मानणे वगैरे सगळे चुकीचे आहे.

एकदा दोन दरिद्री ब्राह्मण येऊन म्हणू लागले, सगळे वेद शास्त्र आम्ही जाणतो. आमच्या सारखे ज्ञानी कोणी नाही आणि कुठेही नाही. तुम्हाला माहीत असतील तर आमच्याशी वादविवाद घालायला बोलवा.

त्या यवन राजाने त्याच्या आश्रितांना, यांच्याशी वादविवाद करु शकतील असे विद्वान कोणी असतील तर घेऊन यायला सांगितले.

त्या लोकांनी सांगितले, असे कोणी नाहीत. राजाने त्या दोन उन्मत ब्राह्मणांची हत्तीवरुन मिरवणूक काढली. त्या दोघांची जैभ्य आणि औपस्थ सुखाची फार आसक्ती होती. या आसक्तीसाठीच ते वेदविक्रय करत होते. वेदज्ञ असून आपला अध:पात होतोय याची त्यांना शंकासुद्धा आली नाही. आम्ही विद्या मिळवण्यासाठी जे परिश्रम केले ते वादविवाद केल्याशिवाय सार्थकी लागणार नाहीत तेव्हां आम्ही सर्वत्र संचार करण्यासाठी निघतो, असे त्यांनी राजाला सांगितले. ब्राह्मण ब्राह्मणातच वाद सुरु झाल्याचे पाहून राजाला आनंद झाला. ब्राह्मणच ब्राह्मणांचा पराभव करताहेत चांगले आहे. प्रत्येक गांवातील ब्राह्मणांकडून जयपत्र लिहून घेत ते दोघे फिरु लागले. ते मोठे उत्तम वक्ते असल्यामुळे त्यांच्या पुढे कोणी टिकू शकत नव्हता. कांहीही उत्तर देऊन समोरच्या माणसाला ते निरुत्तर करीत. त्यात खोटेपणाही करीत. आक्रमक पवित्रा घेत. हा सगळा प्रकार पाहून खरेजे ज्ञानी होते ते यांच्याशी वादविवाद घालायला यायचेच टाळू लागले. यांच्या नादाला लागण्यात कांही अर्थ नाही असे त्यांना वाटले. त्यामुळे त्या दोघांचा एकतर्फी जय झाला असे होऊ लागले. असे ते फिरत फिरत त्रिविक्रम भारतींच्याकडे जयपत्र घेण्यासाठी आले.

त्रिविक्रम भारतींना तीन वेदांचे ज्ञान आहे असें त्यांनी ऐकले होते. त्यांनी त्रिविक्रम भारतींना सांगितले, तुम्ही जर खरे वेदज्ञ असाल तर आमच्याशी वाद घाला, नसेल तर आम्हाला जयपत्र लिहून द्या.

त्रिविक्रम भारती म्हणाले, तुमच्यासारखे वेदज्ञ पूज्य असतात. मी कांही तसा नाही. माझ्यासारख्या संन्याशाला जयपराजय दोन्ही सारखेच आहे. मग मला जिंकून तुम्हाला काय मिळणार ?

ते दोघे म्हणाले, 'ही बघा इतकी जयपत्रे आणली आहेत. तसे तुम्हीही जयपत्र लिहून द्या.'

त्रिविक्रम भारती म्हणाले, 'आमच्या गुरुंच्याकडे चला. तिथे जयपत्र देतो.'

ते उन्मत्त ब्राह्मण यतीचा मान न ठेवता स्वत: वाहानात बसून त्रिविक्रमांच्या मागे निघाले. श्रीगुरुंच्याजवळ मठात आल्यावर त्रिविक्रम यतींनी महाराजांची स्तुती केली आहे.

'हे भगवन् मायागुणांचा विलास म्हणजे संसार आहे. तो आपल्याला नाही. आपण निजानंदात निमग्न असता. आपण द्वैत अद्वैतशून्य आहात. त्रिविध परिच्छेदरहित आहात - देश, काल, वस्तु परिच्छेदरहित. आपल्याला सजातीय, विजातीय कोणताही भेद नाही. निंदा-स्तुती आपल्याला समानच आहे. शत्रु आणि मित्र आपण एकच मानता. भवसागरातून पतितांना आपण तारुन नेता. आपण सदैव प्रसन्न असता. आपण निश्चिंत आणि कृतार्थ आहात. सच्चिदानंदब्रह्मरुप आपण आहात. आपण ओंकाररुप आहात.'

हे ओंकाराचे वर्णन आहे.

'निर्गुणाय नम: म्हणतात. निर्गुणाला नमस्कार कसा करायचा? गुणरुपही आपण झालेले आहात. आपण आनंद मूर्ती आहात म्हणजे तो जो ब्रह्मानंद आहे तेच आपले रुप आहे. आम्हाला जसे आमच्या कर्मानुसार शरीर मिळाले तसे आपले शरीर भौतिक नाही. भक्तांवर असलेली आवरणरुप माया दूर करा म्हणजे आपण किती श्रेष्ठ आहात ते कळेल.'

विक्रम यतींचा सगळा अहंकार दूर झाल्याने त्यांच्याकडून अशी स्तुती घडते आहे. ते म्हणतात, आपण अनंत, अच्युत, भक्तवत्सल असून लोकांना अज्ञानामुळे आपले हे शुद्ध स्वरुप समजत नाही. घुबडाला सूर्य कसा आहे हे कधी कळते का? तसे अज्ञानी जीवांचे आहे. आपले खरेस्वरुप त्यांना कधीच समजत नाही. आपण अज्ञानरुपी अंध:कार दूर करणारे ज्ञानज्योतीस्वरुप आहात.

ते पुढे म्हणाले, 'हे दोन मत आणि द्विजांचा द्वेष करणारे ब्राह्मण आहेत. त्यांना शासन केले पाहिजे.' आणि ते दोघे त्यांच्याकडे कां आले वगैरे सांगितले.

दत्तप्रभुंनी त्या दोघा उन्मत्तांना विचारले, ''संन्याशाला जिंकून तुम्हाला काय मिळणार आहे ?''

त्या दोघांनी दत्तप्रभुंना खोटेच सांगितले, ''आम्ही राजाच्या आज्ञेने इथे आलो आहोत. तुमचा हा शिष्यच आम्हाला इथे घेऊन आला. तुम्ही संन्याशी. तुम्हाला वेदाचे ज्ञान काय असणार ?''

महाराज म्हणाले, ''राक्षस, असुर हे सगळे गर्वाने गेले - नाश पावले. तुम्हाला माहीत आहे की नाही ? वेद कोण जाणतो ? वेद अनंत अनादि आहेत. ते संपूर्णपणे कोणीही जाणू शकत नाही. वेद अपौरुषेय आहेत.''

चार्वाकाच्या मते वेदांचे तीन कर्ते आहेत - मुनि, भांड आणि निशाचर राक्षस. पण हे शास्त्रबाह्य मत आहे.

ब्रह्मदेवसुद्धा वेद जाणू शकत नाहीत. पूर्वी भरद्वाजऋषी सर्व वेदांचे ज्ञान करुन घेण्याच्या उद्देशाने ब्रह्मचर्याश्रमात तपश्चर्या करु लागले. तेव्हां ब्रह्मदेवांनी प्रसन्न होऊन भरद्वाजांना वेद दाखविले. अत्यंत तेजस्वी अशा तीन वेदांच्या राशी होत्या. भरद्वाजांना भीती वाटली इतके सगळे आपल्याला कसे घेता येईल. मग ब्रह्मदेवांनी आपल्या तीन मुठी भरुन त्यांना वेद दिले. त्यांचाही अभ्यास भरद्वाजांचा अजून पूर्ण झालेला नाही. तेवढासुद्धा अभ्यास अजून संपलेला नाही.

व्यासांच्या जवळ वैशांपायन, जैमिनी, सुमंतु आणि पैल या चार शिष्यांनी ऋगवेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद या चार वेदांचा अभ्यास केला. व्यास हे साक्षात् हरिच आहेत. त्यांच्यापासून मग सगळा श्रुतींचा प्रसार झाला. पूर्वीच्या युगांमध्ये आयुष्य जास्ती असल्यामुळे कांही ऋषींनी कांही वेदांचा अभ्यास केला. या कलियुगात एखाद्या शाखेचे अध्ययन करतात. पूर्वी आयुष्य पुष्कळ असल्याने एखादा संपूर्ण वेदाचे अध्ययन करु शकत होता. या कलियुगात एखाद्या शाखेचे अध्ययन करणारे स्वत:ला वेदज्ञ समजतात. आता कोणचीही सिद्धी किंवा सामर्थ्य मानवाजवळ नाही.

रोग दूर करणारा आयुर्वेद हा ऋग्वेदाचा उपवेद आहे. आता ऋगवेदाचे स्वरुप सांगताहेत.

काशीच्या सांगवेद विद्यालयामध्ये चारही वेदांचे फोटो आहेत. त्यांची रुपं कशी आहेत

याची त्यावरुन कल्पना येते.

उपासना करायची झाली तर मूर्तीचे ध्यान करायचे अगोदर. छंद आणि देवता यांचे स्मरण करुन मग मंत्राचे पठण करायचे.

त्रिविक्रम भारती म्हणाले, महाराज, आपल्या दर्शनाने मी धन्य झालो. आपण आज मला विश्वरुप दाखवलेत.

दीर्घाक्षर: ऋग्वेद: त्याची मान मोठी आहे. शाकला, बाष्कला, सांख्यायनी, आश्वलायनी, मांडुक्य अशा ५ शाखा आहेत.

पद,क्रम, जटा, घन, माला, दंड, क्रम वगैरे आठ विकृती आहेत.

निरुक्त, व्याहूती, ज्योती, छंद, शिक्षा, चक्रपक अशी ६ अंगे आहेत.

हे संपूर्ण ज्ञान आज कोणाला आहे ?

आज भारतवर्षामध्ये सगळे कर्मभ्रष्ट, हीन झाले आहेत. वेदविक्रय केल्यामुळे त्यांचे सगळे सत्वबल गेलेले आहे. तुम्ही आत्मवंचना करणारे आहात. तुम्ही ब्रह्मराक्षस व्हाल असा शाप दिला तरी ते उन्मत्त ब्राह्मण ऐकायला तयार नाहीत. ते वर महाराजांना म्हणाले, ''हे ऐकायला आम्ही आलो नाही. आमच्या बरोबर तुम्ही विवाद करा. जर तुम्हाला तशी शक्ती नसेल तर आम्हाला तुम्ही जयपत्र लिहून दिले पाहिजे.''

महाराज म्हणाले, ''बरयं, तुमच्या इच्छेप्रमाणे करु.''

लांबून एक अंत्यज जाताना पाहून महाराजांनी त्याला जवळ बोलावले. त्याच्या डोक्यावर भारा होता. भूमीवर सात रेघा काढल्या. त्याला एकेक रेघ ओलांडून येण्यास सांगितले. त्या रेघा ओलांडून आल्यावर त्याला आपल्या पूर्वीच्या सात जन्मांचे ज्ञान झाले. पहिली रेष ओलांडून आल्यावर तो म्हणाला, मी बुरुडमातंग आहे. दुसरी रेष ओलांडल्यावर तो म्हणाला, मी किरात जातीतला असून रावणी माझे नांव आहे. तिसरी रेष ओलांडून आल्यावर त्याने आपले गांगेय नांव सांगितले. चौथी रेष ओलांडल्यावर आपण शूद्र असल्याचे त्याने सांगितले. पांचवी रेषा ओलांडून आल्यावर, मी सोमदत्त नांवाचा वैश्य आहे, असे त्याने सांगितले. सहावी रेष ओलांडून आल्यावर गोवर्धन नांवाचा मी क्षत्रिय आहे असे तो म्हणाला आणि सातवी रेषा ओलांडून आल्यावर मी वेदशास्त्र संपन्न ब्राह्मण आहे, असे त्यांने सांगितले.

महाराजांनी त्याच्यावर मंत्रित भस्म टाकून आज्ञा केली, या ब्राह्मणांना वाद विवाद करायची पुष्कळ खुमखुमी आहे तेव्हां तूं यांच्याबरोबर वाद कर. आणि त्यांचा पराजय कर.

महाराजांचे हे शब्द ऐकताच तो संस्कृतमध्येच बोलू लागला. ते पाहून त्या दोघा उन्मत्त ब्राह्मणांची बुद्धीच भ्रष्ट झाली. थरथर कांपत ते महाराजांना शरण आले. आम्ही पापी आहोत. वाईट संगतीमुळे आमची बुद्धी भ्रष्ट झाली. आम्ही दुर्गतीला जातो आहोत. आपण आमचा उद्धार करा. अशी त्यांनी प्रार्थना केली.

श्रीगुरु म्हणाले. ''यवनांसमोर तुम्ही वेद पठन केलेत. चांगल्या विप्रांचा धिक्कार केलात. तुम्ही राक्षस व्हाल.'' झालं. ते लगेच राक्षस झाले. त्यांचा पहिला दोष म्हणजे त्यांनी म्लेच्छासमोर वेद पठन केले. इथे मोठ्या महाराजांनी म्लेंच्छ शब्दांची व्याख्या अशी केली आहे की जो गोमांस भक्षण करतो, धर्माच्या विरुद्ध भाषण करतो आणि ज्याने सर्व प्रकारचा आचार सोडला आहे तो म्लेंच्छ आहे. मग हिंदु असला असा माणूस तरी तो म्लेंच्छच. दुसरा दोष म्हणजे त्यांनी ब्राह्मणांचा म्हणजे साक्षात् देवांचाच धिक्कार केला. संन्यासी हे साक्षात् गुरुरुप आहे. त्यांचाही धिक्कार केला. त्यांच्या अपराधाचे फल म्हणून 'तुम्ही ब्रह्मराक्षस' व्हाल असा श्रीगुरुंनी त्यांना शाप दिला. ते म्हणाले, ''तुम्हाला पश्चाताप झाला पण फार उशिरा झाला. बारा वर्षांनंतर एक ब्राह्मण तुम्हाला भेटेल. तो वेदपठन करीत असताना त्याला कांही मंत्रांची विस्मृती होईल. त्याची तुम्ही त्याला आठवण करुन दिलीत की राक्षस जन्मातून तुम्ही मुक्त व्हाल.''

महाराजांचे हे बोलणे ऐकल्यावर लगेच त्यांना मृत्यु आला आणि ते भीमातीरावर एका झाडावर ब्रह्मराक्षस होऊन राहिले. पुढे बारा वर्षांनंतर तिथे एक ब्राह्मण मंत्रपठन करीत असताना एक मंत्र विसरला. त्या ब्रह्मराक्षस झालेल्या ब्राह्मणांनी ह्या ब्राह्मणाला तो मंत्र सांगितला. तो सांगताच ते राक्षस योनीतून मुक्त होऊन स्वर्ग लोकाला गेले. स्वधर्म त्याग करुन द्विज, गुरु यांचा अपमान करणारे राक्षस होऊन वनांत राहातात. पण ज्या वेळी अशा अपराधी जीवाला अनुताप होतो त्यावेळी त्याची शिक्षा थोडी कमी होते आणि या दोन ब्राह्मणांप्रमाणे शापातून किंवा शिक्षेपासून ते मुक्त होतात.

**।। अवधून चिंतन श्री गुरुदेवदत्त ।।**

वेदांचा अवमान आणि विप्रांचा धिक्कार केल्यामुळे त्या दोन ब्राह्मणांना दुर्गती मिळाली हे दाखिवले. धर्मत्याग केल्याने दुर्गती मिळते आणि प्रायश्चित्ताने त्याची शुद्धी होते. नामधारकांनी विचारले, अंत्यज असूनही भगवंताच्या अनुग्रहाने मी वेदशास्त्रज्ञ आहे असे तो म्हणाला, त्याचे पुढे काय झाले ?

सिद्ध म्हणाले, सद्‌गुरुंच्या प्रसादाने ज्ञानी होऊन त्या पतिताने विचारले, ''माझा असा अध:पात कां झाला ?'' श्रीगुरुंनी सांगितले, यंत्राप्रमाणे पुण्यपापाने कर्माने फिरणारा, आणि प्रकृतीच्या अधीन ज्याचे कर्म आहे अशा जीवाला त्याच्या कर्माप्रमाणे ऊर्ध्वगती अधोगती प्राप्त होते. गुरु, माता, पिता, पत्नी, मूल, धर्माचार, कुलाचार, ईश्वर यांना जो सोडतो - अकारण - आणि जीवाची जो हिंसा करतो, असत्यप्रिय, कन्या, अश्व आणि गायीची विक्री करणारा; घरामध्ये, गांवामध्ये, वनामध्ये आग लावणारा, अतिथींचा त्याग करणारा, द्विप्र, देवतीर्थ, वेदशास्त्रांची निंदा करणारा, तडाग, कूप इ. चा नाश करणारा; एकादशीच्या दिवशी भोजन करणारा; श्राद्ध दिवशी स्त्रीसंग करणारा, आपल्या बोलण्याच्या विरुद्ध आचरण करणारा. स्वत:चे पुण्य आणि दुसऱ्याचे पाप ज्याच्या मुखामध्ये आहे, दंभादिकांनी आपले सत्व दर्शवणारा; खल, हिंस्त्र, चोर, स्त्री यांची संगती करणारा; जारण मारण करणारा; ज्ञान नसताना वैद्यकीय चिकित्सा करणारा, मृत्युनंतर नरकात जाऊन चंडाल योनीत जातो.

त्यानंतर श्रीगुरुंनी ब्राह्मणाचे अपराध कोणते व त्यांची फले कोणती ते समजावून सांगितले. ते पुढे म्हणाले, जीवाच्या जितक्या जाती आहेत तितके नरक आहेत. ८४ लक्ष. त्यांच्यात मुख्य २१ नरक आहेत. जीवाला त्याच्या कर्माप्रमाणे या नरकांची प्राप्ती होते. या लोकामध्ये पुष्ट शरीर जरी असले तरी ते टाकावे लागते आणि यातना शरीर घेऊन तो पापी दुर्गम मार्गाने जातो. जाताना तृट, शीत, उष्ण वगैरेंची त्याला फार पीडा होते. यमलोकात जाऊन निरनिराळ्या भयंकर यातना भोगतो.

नंतर दुसऱ्या योनीमध्ये जन्माला जातो. जरी नरकामध्ये त्याने दु:ख भोगलेले असते तरी कांही पाप अंशत: राहाते. आता तो दुसऱ्या जन्माला कां जातो ? कारण अनेक योनींमध्ये उपभोग ज्यांचा घ्यायचा असतो अशी वेगळी वेगळी फळे असतात. त्यापैकी एकेक कर्महो अनेक जन्म घ्यायला लावते. वृक्ष योनीमध्ये गेल्यानंतर अतिशय अज्ञान असते. त्या योनीत उत्कर्षाला कारण कर्म शक्यच नाही. गर्भात गेला जीव पण

गर्भपात - गर्भस्त्राव झाला तर त्या जीवाला कर्मच नाही. त्यांना संसारप्राप्ती होणारच नाही म्हणून सगळी कर्म एका जन्मामध्ये संपत नाहीत.

**कांही लोक विचारतात, शरीरच गेल्यावर सगळी कर्मही जातात ना? काय शिल्लक राहाते?**

**त्याचे उत्तर असे आहे. कांही कर्म संचित रुपाने राहातात. शरीर पडल्या बरोबर** सगळी कर्म संपली असे मानायला पाहिजे. आपल्या शास्त्र सिद्धांतावर हा आक्षेप आहे. कांही कर्म तशीच शिल्लक राहातात. कांही कर्म आत्ताच सुरु झाली असे कसे म्हणता तुम्ही? सगळी कर्म ज्या शरीराच्या आश्रयाने झाली ते शरीर गेल्यावर ती सगळी कर्मही गेली असे म्हणायला पाहिजे. मृत्युनं सगळी कर्म संपली.

पण हे चुकीचे आहे. कारण सगळीच कर्म एक सारखी नसतात. जर सारखी असती तर एक गेले म्हणजे सगळी गेली असे म्हणता येईल. कारण देश, काल, निमित्त सगळ्यांना एक सारखेच आहे. मग सर्वांचा उपमर्द झाला असे म्हणता येणार नाही. कांही शिल्लक  राहातात. कुठे तरी कोणचे एखादे कर्म पूर्णपणें अभिव्यक्त होते. तेव्हां सगळी कर्म अभिव्यक्त होतात किंवा जातात असे म्हणता येत नाही.

काय आहे, पूर्वी मनुष्य जन्म आला, मोर, मर्कट वगैरे जन्म आले. त्या जन्मांचे संस्कार, वासना आत्म्यावर चित्तामध्ये झालेल्या आहेत. अनेक वासना त्यात आहेत. मग त्याला पुढे माकडाचा जन्म आला. तरी बाकीच्या वासना शिल्लक राहिलेल्या आहेतच की. वासनारुपाने कर्म आहेत. ज्या कर्माने मर्कट जन्म दिला तो मिळाल्याने बाकीच्या वासना संपून गेल्या असे म्हणता येणार नाही. **जशी मृत्यु नंतरही माणसाच्या वासना शिल्लक राहातात तशी कर्मही शिल्लक राहातात. पूर्वीच्या जन्मातील सर्व वासना गेल्या असत्या तर सर्व कर्म गेली असे म्हणता आले असते.** मर्कटच्या जन्मात त्याला कौशल्य मिळते. तो पूर्वीच्या जन्मातील वासनाच घेऊन जन्माला आलेला असतो. एका फांदीवरुन दुसऱ्या फांदीवर उड्या मारणे, आईच्या पोटाला घट्ट मिठी मारुन बसणे, वगैरे सगळे पूर्वीच्या वासनांचेच प्रतीक आहे ना! त्या सगळ्या वासना घेऊन तो जन्माला आलेला आहे. उड्या मारणे वगैरे अभ्यास कांही या जन्माचा नाही म्हणजे ही कर्म पूर्व वासनांच्या संस्कारातूनच घडताहेत. मागच्या जन्मात तो मर्कटच होता असे म्हणता येणार नाही. या आधीचा जन्म दुसरा कोणचा

असेल. त्या पूर्वी कधी तरी मर्कटाचा जन्म त्याला मिळाला असेल. त्या सगळ्या वासना आहेत. ज्या अर्थी अशा पूर्व जन्मांतील वासना आहेत त्या अर्थी कर्मही असली पाहिजेत.

**त्या जीवात्म्या बरोबर प्रज्ञा, संस्कार कर्म जातात. सगळ्या वासना ज्या अर्थी जात नाहीत त्या अर्थी सगळी कर्म संपत नाहीत.** त्या त्या वासनांप्रमाणे भूत, प्रेत, पिशाच्च वगैरे योनीत तो जीवात्मा जातो. गुरुद्रोह करणारा, विप्रांचा धिक्कार करणारा ब्रह्मराक्षस होतो. अतिथीला घालवून देणारा कोंबडा होतो. दुसऱ्याचे द्रव्य हरण करणारा उष्ट्र होतो. दुसऱ्याचे फल, पत्र चोरणारा वनचर होतो. दुसऱ्याचे जल हरण करणारा चातक पक्षी होतो. मंत्राशिवाय भोजन करणारा कावळा होतो. दुसऱ्याचे गवत चोरणारा पशु होतो. मित्रद्रोह करणारा गिधाड होतो. अशा योनींमध्ये जाऊन शेवटी मनुष्य जन्मामध्ये आला तर रुग्ण होतो.

दुसऱ्याचे मन दुखवणारा, क्लेश देणारा हृदरोगी होतो. गुरु त्यागी महारोगी होतो. ब्रह्महत्या करणारा क्षयरोगी होतो. सुवर्ण हरण करणारा कुष्ठरोगी होतो. पुस्तक चोरणारा जन्मांध होतो. गणद्रव्य चोरी करणाऱ्याला गंडमाळा होतात. दुसऱ्याचे द्रव्य अपहरण करणारा अपुत्री होतो. वस्त्र हरण करणारा कुष्ठी होतो. अन्न हरण करणाऱ्याला गुल्म रोगी होती. तेल चोरणारा पशु होतो. मित्रद्रोह करणारा गिधाड होतो. अशा योनींमध्ये जाऊन शेवटी मनुष्य जन्मामध्ये आला तर रुग्ण होतो. तेल चोरणारा तोंड वाकड्या कुरुप होतो. गलत्कुष्ठी होतो. देवाचे द्रव्य हरण करणारा पांडुरोगी होतो.

त्रिविक्रम भारतींनी श्रीगुरुंना विचारले, **जीवाने केलेले पाप जाते कसे ?**

श्रीगुरु म्हणाले, **पश्चाताप आणि प्रायश्चित्ताने शुद्धी होते.** सभेमध्ये आपल्या पापाचा उच्चार करुन, ब्रह्मदंड घेतल्याने पापक्षय होतो. कृच्छ्र प्रायश्चित्त घ्यायला अशक्त असेल तर गोदान करावे. **अल्प पार, तीर्थक्षेत्रात १० वेळा स्नान केले असता दूर होतो.** एकदा बुडी मारुन यायचे, केस वाळेपर्यंत थांबायचे व तो वाळले की पुन्हा स्नान करायचे. असे दहा वेळा करायचे. किंवा २०० वेळा प्राणायाम केला असता अल्प पाप जाते. **सुवर्णदानाने किंवा सद्गुरुंच्या दर्शनाने महापापांचा नाश होतो.**

कायकृच्छ्र म्हणून एक प्रायश्चित्त आहे. त्याप्रमाणे तीन दिवस दिवसा जेवायचे नाही.

तीन दिवस सायंकाळी जेवायचे नाही. तीन दिवस अयाचित वृत्ती धारण करुन राहायचे.

गायत्रीकृच्छ्र म्हणजे १०,००० गायत्री जप करायचा. त्यानेही पापक्षय होतो.

किंवा एक सहस्त्र हवन करावे. किंवा १२ ब्राह्मणांना भोजन द्यावे. गोदानाचे मूल्य द्यावे. या सगळ्याला प्राजापत्य कृच्छ्र म्हणतात.

बारा दिवस १५ घास घ्यायचे. क्षीर वगैरेचा आहार घ्यायचा. बिल्व, अश्वत्थ, अब्ज, दर्भ, कमल पाण्यामध्ये टाकून ते घ्यायचे. तीर्थाटन करायचे. वाराणसी सोडून इतर तीर्थक्षेत्रामध्ये जप वगैरे अनुष्ठान केल्याने पापक्षय होतो.

रामेश्वराला समुद्रस्नान करावे. म्हणजे ब्रह्महत्यादि दोष जातात. मद्यपानाचा दोष जाण्यासाठी एक लक्ष गायत्री जप करावा. मद्यपान हे महापापांपैकी एक आहे. गायत्रीचा ८ लक्ष जप केल्याने गुरुतल्पगमनाचा दोष जातो. ७ लक्ष जप केल्याने सुवर्ण हरण केल्याचा दोष जातो.

चांद्रायण व्रतही करायला सांगितले आहे. पंचगव्य प्राशन केल्यानेही शुद्धी होते. पंचगण्यामध्ये सकुशोदक घालायचे. समंत्रक हवन करावे.

**दंपतीपैकी कोणी एकानेही पाप केले तरी दोघांना त्याचे फळ भोगावे लागते.**

**प्रायश्चित्त घेणारा जर हरिभक्त नसेल तर त्याची शुद्धी होत नाही.** सुरा भरुन एखादे पात्र जर नदीमध्ये ठेवले तर ते पवित्र होईल का ? तशी नुसती प्रायश्चित्त करुन कांही उपयोग नाही. प्रायश्चित्ताच्या जोडीला भक्ती पाहिजे.

त्या पतिताला श्रीगुरु म्हणाले, ''पूर्वीच्या जन्मात तूं मातापित्यांचा त्याग केलास म्हणून तुला हा अंत्यजाचा जन्म मिळाला.'' म्हणजे पाप फल कमी होता होता ७व्या जन्मात तो अंत्यज झाला आहे. म्हणजे ७व्या जन्मापूर्वी केलेले पाप आत्ता भोगावे लागले. श्रीगुरुंनी त्याला पुढे सांगितले, ''इथे संगमात तूं महिनाभर स्नान केलेस तर पुढच्या जन्मांत तूं मुक्त होशील.'' पण ही खात्री देऊनही तो अंत्यज ऐकेना. तो म्हणाला, ''पुढचा जन्म कशाला पाहिजे ? मला पवित्र करा आणि ब्राह्मणांच्यात सामावून घ्या.''

श्रीगुरु म्हणाले, ''तुझा देह पतित म्हणून वाढलेला आहे. तो अशुची आहे. त्यावर कोणतेच संस्कार झालेले नाहीत. विश्वमित्राने तपोबल मिळवून ब्रह्मर्षि पद मिळावे

म्हणून देवांच्याकडे याचना केली. देवांनी त्याला वसिष्ठांकडून ब्रह्मर्षि म्हणून घेण्यास सांगितले. पण वसिष्ठांनी दिले नाही. म्हणून विश्वामित्राने वसिष्ठांची १०० मुले मारली. शेवटी तो वसिष्ठांनाच मारायला धावला. पण त्याचवेळी त्याच्या मनांत विचार आला की आपण जर यांना मारले तर आपल्याला ब्रह्मर्षि कोण म्हणेल ? वसिष्ठांच्या आज्ञेने तप केले. तेही गेले. पुन्हा तप केले. आपले क्षत्रिय शरीर दग्ध केले आणि नवीन देह धारण केल्यावर वसिष्ठांनी त्याला ब्रह्मर्षि म्हटले.''

त्या पतिताने विचारले, ''एकदा परिसाने लोखंडाचे सोने झाल्यावर पुन्हा सोन्याचे लोखंड होते का ? तसेच माझे आहे. मी आता ब्राह्मण झालेलो आहे.''

श्रीगुरुंनी त्याचे सगळे पांडित्य ऐकले. त्याची बायका मुले आली. तो त्यांना ''मला शिवू नका, दूर राहा'' असे सांगू लागला. म्हणजे त्याला विप्रभ्रांती झाली. श्रीगुरुंने ते पाहून आपल्या शिष्यांना त्या पतिताला लगेच स्नान घालण्यास सांगितले. एका लोभी ब्राह्मणाला बोलावून आणले आणि त्याच्या हस्ते त्या पतिताला स्नान घातले. स्नान घातल्यावर त्याचे ते सगळे ज्ञान गेले. त्या बायका मुलांबरोबर तो आपल्या घरी निघून गेला.

त्रिविक्रमांनी विचारले, ''तो एवढा पतित असून केवळ आपण कृपा दृष्टीने त्याला ज्ञान दिलेत आणि नुसते स्नान घालताच त्याचे ते ज्ञान कसे नाहीसे झाले ?''

श्रीगुरु म्हणाले, ''त्याच्या अंगावर आम्ही जे भस्म टाकले त्यामुळे त्याला ज्ञान प्राप्ती झाली. कारण नुसत्या ब्राह्मण जन्मामध्ये नेऊनही भागत नाही ना! ते भस्म टाकल्यावर त्याचे ज्ञान तेजस्वी झाले. ब्राह्मण जन्मापर्यंत गेला तो. पण ते ज्ञान कसे येणार ? साधारण स्मरण झाले असते पण त्याला त्या दोन उन्मत्त ब्राह्मणांबरोबर वादविवाद करायचा होता ना! त्यासाठी भस्मक्षेप केला म्हणून ते ज्ञान झाले. ते भस्म धुतल्या बरोबर गेले. तो भस्म महिमा ऐक.''

श्रौत स्मार्त कर्मांच्या वेळेला भस्म धारण करणे आवश्यक आहे. - भस्माबद्दल रुची उत्पन्न होण्याकरता ही कथा सांगताहेत - एकदा वामदेव नांवाचे महामुनी वनातून जात असताना एक ब्रह्मराक्षस त्यांना खाण्यासाठी आला. वामदेवांच्या शरीराचा स्पर्श होताच तो शांत झाला. आपल्या सर्व जन्मांचे त्याला ज्ञान झाले. तो सांगू लागली की पूर्व जन्मांत मी मोठा राजा होतो. निरनिराळ्या जातीतील अनेक स्त्रियांचा मी भोग

घेतला. निरनिराळ्या मार्गांनी मी त्या स्त्रिया उपभोगासाठी आणल्या . माझ्या भीतीने माझ्या राष्ट्रातील लोक आपल्या स्त्रिया घेऊन दुसऱ्या देशात निघून गेले. मग शत्रुंनी माझे राज्य काबीज केले. मृत्यु नंतर मी पिशाच्च झालो. पुढे वाघ, लांडगा, डुक्कर, कुत्रा वगैरे जन्म मला मिळाले. शेवटी या जन्मात मी राक्षस झालो. या योनीत माझ्या तहान भूकेचे शमनच होत नाही. असा मी तुम्हाला खाण्याकरता आलो आणि तुमच्या स्पर्शाने मी एकदम शांत कसा झालो.

वामदेव म्हणाले, माझ्या शरीरावरील भस्माचा स्पर्श झाल्यावर तुला तुझ्या पूर्व जन्मांचे स्मरण झाले. हे भस्माचे माहात्म्य आहे. एकदा एकाला जारकर्म करताना मृत्यु आला. स्मशानात फिरून आलेला एक कुत्रा त्या माणसाच्या प्रेतावर बसला. त्या कुत्र्याच्या अंगाला जे चिता भस्म लागले होते ते त्या प्रेताला लागले. त्याला नेण्यासाठी यमदूत आले आणि भस्म स्पर्शामुळे शिवदूतही आले. आणि ते त्या माणसाला शिवलोकाला घेऊन गेले.

तो राक्षस म्हणाला, मला भस्मधारणविधी समजावून सांगा. मी जे कांही दान केले असेल, लोकांसाठी तळी, विहीरी खणल्या म्हणून आपले दर्शन घडले. वामदेव शंकरांच्या स्वरुपाचे वर्णन करु लागले. शंकरांच्या दहा हातात निरनिराळी आयुधं आहेत. अहि हे त्यांचे सूत्र आहे. त्यांची कांती श्वेत आहे. जटाभार आहे. त्यांच्या मुखावर स्मित विलसत आहेत. व्याघ्र चर्म त्यांनी परिधान केले आहे. त्यांच्या जवळ पार्वती व इतर गण बसलेत. ते पाहून सनत्कुमार तिथे आले. हात जोडून त्यांनी शंकारांना प्रार्थना केली.

'हे ईश्वरा, अनंता, आपला जय जयकार असो. हे जगन्निधान आम्हाला मुक्तीचे सोपे साधन सांगा. इतर मुक्तीची साधने दुष्कर आहेत.'

भगवान शंकर म्हणाले, ''यथा विधी भस्म धारण केल्यावर सुख प्राप्त होऊन जीव लवकरच जीवनमुक्त होतो. यज्ञकुंडातील भस्माने त्रिपुंड्र काढावेत त्रिपुंड्र काढायला 'अ'कार, 'उ'कार व 'म'कार असे तीन वर्ण प्रतीक असतात. त्रिपुंड्र हे ब्रह्मा, विष्णु, महेशाचे प्रतीक आहे. त्याचप्रमाणे विश्व, तैजस, प्राज्ञ ही तीन आत्मस्वरुपे आहेत. त्याचप्रमाणे इच्छा, द्रव्य आणि क्रिया या तीन शक्ती आहेत. गायत्रीचेही तीन छंद आहेत. लोकसुद्धा तीन भू, भुव: स्व: आहेत. ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेद असे तीन वेद आहेत. प्रात: मध्यान्ह आणि सायं असे तीन काल आहेत. असे तीन वेद

आहेत. प्रात:, मध्यान्ह आणि सायं असे तीन काल आहेत. असे हे प्रतिकात्मक भस्म सर्वांनी धारण करायला हरकत नाही. वर उल्लेखलेल्या सर्वांचे स्मरण त्रिपुंड्र धारण करताना अनायासे होते. अज्ञानी माणूसही भक्तीने धारण करु शकतो. याच्यापेक्षा दुसरे तारक असे कांही नाही.

परस्त्रीगमन, गोनिंदा, परपीडा, गृहदाह करणे, वेद विक्रय, नीचांकडून प्रतिग्रह घेणे इ. तसेच ज्ञान अज्ञान पूर्वक झालेल्या पापांपासून भस्म धारण विधीपूर्वक व श्रद्धेने करणारा मुक्त होतो. भस्म धारण आणि रुद्राक्ष धारण करणारा स्वर्गलोकातही पूज्य होतो. एवढेच काय पण पूर्व जन्मात झालेल्या व पुढील जन्मांत होणाऱ्या दोषांपासूनही भस्मधारण करणारा मुक्त होतो. तीर्थ स्नान व जपापेक्षा भस्म धारणाचे पुण्य अधिक आहे. भस्म धारण करणाऱ्याला शिवलोकाची प्राप्ती होते.

असे शंकर व सनत्कुमारांचा संवाद वामदेवांनी राक्षसाला सांगून भस्म लावण्यास दिले. ते त्या राक्षसाने विधीवत् धारण केले. त्याचे ते राक्षसाचे शरीर पडले. दिव्य शरीर त्याला प्राप्त झाले. शिवदूतांनी आणलेल्या विमानातून तो शिवलोकाला गेला.

त्रिविक्रम भारतींनी श्रीगुरुंच्या मुखातून हे सर्व ऐकले आणि त्यांची आज्ञा घेऊन ते कुमसी गांवाला परत गेले आणि श्रीगुरुंच्या आज्ञेप्रमाणें आचरण केले. हा कर्मविपाक ऐकायलासुद्धा भयंकर आहे त्यापेक्षा आपण आपले आयुष्य पुण्यकर्म करण्यात घालवावे. मनुष्य शरीर हे स्वर्ग, मोक्षाचे साधन आहे. त्यापैकी ज्याने एकही मिळवले नाही त्याने स्वत:ची आत्मवंचना केली.

**आता पुढे सतीचे चरित्र आहे.**

या पूर्वीच्या अध्यायात 'सत्कर्मच नेहमी करीत राहावे' असे सांगितले आहे. नामधारकांनी विचारले, 'सत्कर्म कोणती आणि त्यांचे आचरण कसे करावे ?' सिद्ध म्हणाले, 'श्रेय निराळे आहे आणि प्रेय निराळे. ती दोन्ही पुरुषाला बांधून टाकतात. असे कठोपनिषदामध्ये सांगितले आहे.'

अन्यच्छ्रयोऽन्यदुतैव प्रेयस्ते उमे नानार्थे पुरुष सिनीत: ।
तयो: श्रेय आददानस्य साधु भवति हीयते:थघि उप्रेयो वृणीते ।।१ ।।

द्वि वल्ली

श्रेय घेणाऱ्याचे कल्याण होते. आणि प्रिय गोष्टीकडे जो लक्ष देतो तो अर्थही होतो. अविद्या आणि विद्या अशा दोन सांगितल्या आहेत. अविद्या म्हणजे कर्म. हे प्रेय शब्दाने दर्शवले आहे. निरतिशय आनंद देणारी जी विद्या जिचे ज्ञान नांव आहे हे श्रेय शब्दाने सांगितले आहे. प्रेय म्हणजे कर्म आणि श्रेय म्हणजे ज्ञान. ज्यांचा कषाय - वासना इ. पक्व झालेला नाही त्यांना एकदम ज्ञान स्फुरत नाही. म्हणून चित्त शुद्धी करता ईश्वरोद्देशेन निष्काम कर्म - नित्य नैमित्तिक कर्म यथाविधान - कशी करावीत हे सांगण्यासाठी पुढचे १६, १७ व १८ असे तीन अध्याय आहेत. त्यापैकी दोन अध्यायात स्त्रीधर्माचे वर्णन आहे.

सिद्ध नामधारकाला म्हणतात, ही वित्तमयी जी कांही श्रृंखला आहे त्यातले तूं कांही घेतले नाहीस म्हणून तूं धन्य आहेस. गांवाजवळ गेला म्हणजे गांवाला गेल्यासारखेच असते त्याप्रमाणे तूं बहुतेक सर्व जिंकलेले आहेस. हा दुस्तर संसार सागर श्रीगुरुंच्या लीलांचे श्रवण करुन तूं लीलया पार करुन जाशील. भगवंताची लीला कोण सांगू शकेल ? किती आश्चर्यकारक गोष्टी सांगू ?

नामधारक म्हणाला - हे सिद्धा, तुला नमस्कार असो. आश्चर्यकारक कर्म करणाऱ्या विष्णुच्या चरित्राला सांगावे. अमृतपानाने तृप्ति होत नाही, तशी ईश्वर चरित्र ऐकून मला तृप्ति होत नाही. सिद्ध म्हणाला - हे वत्सा चांगले विचारिले. तूं पुण्यवान् आहेस. कारण संसार सागर तूं लीलेने जिंकिलास. विष्णुच्या चरित्राने तुझे चित्त वेधले. त्या योगाने मला आनंद होत आहे. भगवंताच्या लीला कोणीहि सांगू शकत नाही. त्या बहुत आश्चर्यकारक आहेत. ईश्वराच्या कृपादृष्टिने मुका बोलतो, आंधळा पाहतो व मरण पावलेला जीवंत होतो. हे नामधारका ऐक. माहूर गांवी एक गोपीनाथ नांवाचा ब्राह्मण द्रव्यवान होता. त्याचे बहुत पुत्र मरण पावले. पुढे श्रीदत्ताची सेवा करून एक पुत्र वांचला. श्रीदत्ताच्या प्रसन्नतेने चिरकाल वाचणाऱ्या मुलाचे नांव ब्राह्मणानें 'दत्त' हे ठेविले. तो पुत्र मनोहर, शोभनलक्षणी, बुद्धिमान, बहुत सात्विक, आई बापांच्या मृत बालकाचे दु:ख हरणारा, मोठा झाला. मुलाचे मौंज इत्यादि संस्कार केले. दैवयोगाने मुलाला स्वरूपवान, बुद्धि, गुण व स्वभावाने शोभणारी बायको मिळाली. उभयता दांपत्याचे प्रेम, परस्परांचे ठिकाणी उद्भवलेला रती व कामाच्या प्रेमासारखा, किंवा चक्रवाक् पक्षाप्रमाणे प्रेम असे. उभयता दंपती रूपवान होते व आम्ही चांगले रूपवान आहोत असे ते स्वत: मानीत होते. क्षणभर वियोग झाला तर तो वाईट योग समजत.

धर्माचरणी दक्षता त्यांनी ठेवावी. ते दोघे सर्वदा एकमेकांचे कल्याण चिंतित होते. नवऱ्यावर प्रेम करणाऱ्या त्या सतीला आळस व निद्रा मुळीच नसे. त्या पतिव्रतेला क्षणभर नवऱ्याचा वियोग झाला असतां नेहमीं अत्यंत दु:ख होत असे. तिला सुगंधी उटणें विस्तवासारखे ताप देई. वारा देखील अग्नि वाटे. चंद्रोदय सूर्याचे तापासारखा, सेज विंचवा सारखी, फुलाची माळ सर्पाप्रमाणे, दागीने कांट्यासारखे, गोड शब्द विषतुल्य, स्वादिष्ट अन्न तिखटाप्रमाणे (अथवा निंबासारखे), नवऱ्याचा वियोग असता, तिला वाटे. असें असताना प्रालब्धाने किंवा दंपतीची समानता सहन न झाल्यामुळे नवरा क्षयरोगी झाला. त्याचे शरीर दुबळे झाले. रुचि गेली. श्वासाने कफाने पीडला. सर्वदा दु:खाने झोप व जेवण वर्ज्य झाले. शब्द फार खोल झाला. तो ब्राह्मण (तिचा नवरा) जितके भोजन करी, तितकेच भोजन त्या पतिव्रताहि तितकी कृश झाली. त्या ब्राह्मणाची दुसरी पडसावली (छाया) तशी ती पतिव्रता होती झाली. त्या रोगी ब्राह्मणाजवळ वैद्यलोक दुर्गंधीच्या संशयाने जात नव्हते. पण त्या पतिव्रता स्त्रियेचे शोभन मन असल्यामुळे तिने त्याचा त्याग केला नाहीं. तिने नवऱ्याची सेवा करावी, स्नान घालून अंगाला उटणें लावावी, पाय व अवांतर शरीर दाबावे, औषध द्यावे. कर्म विपाकांत सांगितलेल्या शांति, देवता पूजन, होम, जप केले, औषधी दिल्या, दानें दिली. पण तो क्षयरोग थोडा देखील कमी पडला नाही. जिचे सोळा वर्षाचे वय त्या लावण्यवतीचा मंदहास्य हा प्रकाश व मुख परिपूर्ण चंद्रमा याप्रत ग्रासणारा तो क्षयरोग दुसरा ग्रह होता झाला. रोगाने पीडलेला तो ब्राह्मण व तश्याच प्रकारची त्याची बायको, या दोघांस आईबाप पाहावयाकारणे समर्थ झाले नाही. आईबापांनी निवारण केले. पण त्या पतिव्रतेने त्या नवऱ्याला टाकिले नाही. जसी प्रभा सूर्याला सोडून दूर होत नाही, त्याप्रमाणे सतीने केले. ब्राह्मण म्हणाला - हे पिता, हे आई, पूर्वीच्या जन्मी मी तुमचा शत्रु होतो. म्हणून मी तुम्हाला हे दु:ख दिले. उत्तम सात्त्विक धैर्याने वाचण्यास तुम्ही योग्य आहात. हे पतिव्रते, मी मागील जन्माचा तुझा शत्रु आहे. मला सोडून दे आणि लवकर पित्याच्या घरी गमन कर. हे प्राणा, मला कोणाचा आश्रय नाही. यास्तव मला टाकून द्यावयाकारणे तुम्ही योग्य होणार नाही. ह्या तुमच्या सुंदर शरीराची ही (मी) वाटेदारीण आहे. ह्या माझ्या शरीराचे तुम्ही प्राण आहा. तुमचा वियोग झाला तर मी जीवंत राहणार नाही. मग तुम्हाला खरोखर जीवहत्या लागेल. नेहमी माझे मुखाची शोभा वाढत आहे मग चंद्रावर शोभणारा कलंक (काळीमा) कोठून येणार (येणार नाही). याच प्रकारे तुमचे मुखाची शोभा वृद्धिंगत होत आहे. ज्या परमेश्वराचे ठायी (भक्ति करणारा) दु:खी,

सुखी होतो, जो पातकापासून संरक्षण करितो, त्या ईश्वराची मी स्तुती करते, तो तर देवाचाही देव आहे. अहो मामंजी, सासुबाई मी तुम्हाला वारंवार नमस्कार करिते, मी ऐकिते कीं, गाणगापुरी तो तारणारा श्रीसद्गुरु आहे. माझा नवरा (तेथे गेल्यावर) आरोग्यास पावेल, असे मला वाटते. नवऱ्याला बरोबर घेऊन मी जाते. तुम्हाला माझे म्हणणे रुचते काय ? सासरा व सासू म्हणाले, हे सम्राज्ञी, तुझ्या परिश्रमाने तो (मुलगा) जेथे जीवंत राहील तेथे जा. हे ऐकताच जवळ जाऊन सासरा व सासूला नमस्कार करून त्यांची आज्ञा घेतली व नवऱ्यासह ती पतिव्रता जाण्यास निघाली. त्या ब्राह्मणाला पालखीत बसवून हळूहळू चालणाऱ्या भोई लोकांकडून ती पालखी घेऊन मार्ग क्रमणास प्रारंभ झाला. मागून ती पतिव्रता चालत असे. ती पायाने गमन करी. गजगंडस्थलाप्रमाणे जीच्या स्तनाची काठिण्यता व स्थूलता, त्यायोगे जी कृश झालेली, तिने हाताने नवऱ्यास धरून ठेविले असून, तिच्या चालण्याने जमीन नम्र झाली होती. त्या समयी तिला हत्तीण मागून गमन करते, तद्वत शोभा आली. काही दिवसाने हळूहळू मार्गक्रमण करीत असता (गाणगापूराचे जवळ आल्यावर) त्याच वेळीं प्रारब्धाने तो तिचा नवरा मरण पावला. ती पतिव्रता प्राण देण्यास तयार झाली. पण दुसऱ्या लोकांनी तिचे निवारण केले. शोक हा अज्ञान अंध:कार, त्याने मुखकमल म्लान झालेली ती स्त्री बोलती झाली. हे नाथा, विप्रश्रेष्ठा, उठा, झोंप किती घेणार ? कालाचे अतिक्रमण करू नका. अन्हिक कर्म करा. हे वल्लभा, मला उत्तर काय कारणानें देत नाही ? तुमच्या आज्ञेचे उल्लंघन मी कधीहि केले नाही. तुमचे प्राण कोठे गेले ? व मन कोठे गेले ? पुष्कळ काळ वांचावयाकारणे प्राणाला परत आणा. प्राणाला परत न आणले तर स्वत:चे आईबाप, बायको यांच्या हत्येचा दोष तुम्हाला लागेल. विवाह केलेली मी प्रिया, मला सोडून कोठे जाता ? माझे ठिकाणी पुत्र उत्पन्न केले नाही. मग तुमच्या पितरांची ऋणांतून मुक्ति कशी होईल. हे ईशा, मी कोठे कसे राहावे, हे सांगितले नाही. तुमच्या आईबापाचे घरी कसे बरे गमन करूं. हे ईशा, तुम्ही जिवंत असतां सर्व दूर मी पवित्र होते. आज माझे मुख कोणीहि पाहणार नाही. लज्जा व उपहासाने युक्त भाषण, उत्कृष्ट शेज, शृंगारधर्मांने उत्पन्न होणारे भाव, विडा, उटणें इत्यादि तुम्हाला समर्पण केले, ते तुमच्या मनांत का बरे उरले नाही ? मोठ्या व उंच स्तनभाराचा पात होईल या भयाने भ्यालेला (बारीक) कटि प्रदेश, तो हा माझा देह, ही उत्तम सेज आहे. हे ईशा या देहावर सुखाने निजावे. जमीन दगडाने युक्त आहे तिच्यावर तुमचे निजणे काय म्हणून झाले ? ऋतुकाला वाचून (अस्पर्श दिवसा वाचून) तुम्ही निराळे निजला नाही, मग

आज कां बरे निजला. जसे तृषिताला मगराने पाण्यांत मारावे, थकलेल्यास झाडाने नष्ट करावे, चारा खावयास गेलेल्या गायीला हिंसकाने खावें, ईश्वर दर्शनास आलेल्या पुरुषास मंदिराने मारावे, सद्गुरुच्या दर्शनाला मी प्राप्त झाले असता तसे मला झाले. हे ईश्वरा, तुझा अंत नाही, तुझा जय असो. तूं कसे बरे केलेस! आरोग्य संपादनाच्या भयाने तूं माझा नवरा हरण केला आहे काय ? रोग हरण करण्यास सामर्थ्य तुला नाही, तर परत जा असे तूं सांगितले असतां (तुझ्या विरूद्ध) कोण बरे याचना करण्यास समर्थ आहे ? कोणी नाही. हे आई, गौरी, तूं उत्तम केलेस. नवऱ्यासह तुझी कीर्ति स्वर्गाला नेते. हे ईशे व्रतेश्वरी, तुझे सौभाग्य देणारे सामर्थ्य कोठें गेले ? माझी आठवण का बरे राहिली नाही. माझे मंगळसूत्र, हळद कुंकू चोरण्यासाठी मोठा चोर येथे कोठून आला ? माझी सौभाग्याची नाव संसारसमुद्रांत असलेली ती काळरूपी मत्स्यानें कशी भक्षण केली. मोठ्या स्तनाने जिची चोळी फाटून गेली, अशा त्या सतीने मागे सांगितल्याप्रमाणे नवऱ्याचे आचरण वारंवार आठवून शोक केला. त्या पतिव्रतेने नवऱ्याच्या प्रत्येक अंगास धरून मोहाने रडूं लागली. त्या वेळी तेथे कोणी एक साधू येता झाला. साधूचे अंगावर रुद्राक्षाचे भूषण होते. सर्व शरीराला भस्म लावले असून, हातांत त्रिशूळ, मस्तकावर जटा बांधलेली होती. तो पतिव्रतेला म्हणाला, हे बाळे, मेलेला जीव शोक केल्याने परत येत नाही. व्यर्थ उंच स्वराने कां बरे रडतेस ? उगी राहा. देह धारण करणारे जीवास मृत्यु येणार. मृत्यु देवांनाह भक्षण करितो. मृत्यूचा परिहार होत नाही. या संसार प्रवाहामध्ये, वृक्षावर पक्षी एकत्र होतात किंवा समुद्रांत लाकडे एकत्र होतात (पण लवकर सर्वांचा वियोग होतो) त्याप्रमाणे, नवरा, मुलगा, इत्यादि एकत्र होऊन थोड्या काळांत त्यांची तुटातूट (ताटातूट) होते. तूं यांचा संबंध शाश्वत मानीत असशील तर मागील जन्मी तूं कोणाची माता, कोणाची बायको होती ते सांग. ऐक्य भावामुळे कोणाचे कोणी संबंधी नाही. जीव चैतन्याचा अंश, सर्व व्यापक, अविनाशी व जन्मरहित आहे. ह्या पांच भूतांचे देहांत जीव प्रविष्ट झाला असतां ह्या देहावर नवरा, मुलगा आदि निश्चय करणे, तो जीवाचा वास्तविक निश्चय नाही. (मिथ्या आहे) लाकडाचे ठायी अग्नि असतो तद्वत प्रकृतिचे ठायी राहणारा पुरुष, बायको, नपुंसक यांच्या लक्षणाने रहित असलेला (जीव) त्याला (अज्ञानी मनुष्य) नवरा, मुलगा आदि म्हणतो. प्रकृतिच्या उत्पन्न झालेल्या गुणाला अनुसरणारा (जीव) शरीराचे तादात्म्याला प्राप्त झाला आहे. या कारणाने जीवाला सुख दुःखादि द्वंद्वाचा अनुभव वाढला आहे. तो अनुभव निर्मळ, अजन्मा, जीव याचे ठायी नाही. द्वंद्वापासून उत्पन्न

होणाऱ्या कर्माचा आश्रय करणाऱ्यास (जन्ममरण रूपी) संसार (देह धारण) आहे. देहाची उत्पत्ति कर्मापासून होते व देहापासून कर्माची उत्पत्ति होते. देह व कर्म हे दोन्ही अज्ञान भावामुळे होत असतात. ज्या विद्वानानें तत्त्व या तरवारीने देह व कर्म या उभयतांस कापून काढिल, त्या मनुष्याला हा भ्रम उत्पन्न होत नाही. ह्या जीवास अज्ञान हीच उपाधि आहे. जशी आकाशाला घटादि उपाधि असते, तद्वत ही उपाधि आहे. उपाधिचा नाश केला असतां जीवास आत्मभाव होतो. फुलाचे माळेवर कल्पित सर्प भासतो. माळेचे ज्ञान होताच सर्पाचा नाश होतो. तसा जीवाचा भ्रम सत्पुरुषाने दाखविलेल्या तत्त्वरूप दिव्याने नाश पावतो. तो पावेतो जीवास दिवस व रात्र ह्या सारखा जन्म व मरणरूपी भ्रम व त्याचा अंत शाश्वत आहे, जो पावेतो तत्त्व दीपक पाहिला नाही. यास्तव तत्त्वाचा विचार करवा. कातडे, रक्त, मांस, हाडे यांचा विकार असा देह त्या विषयी शोक केल्याने स्वार्थ कोठून उत्पन्न होईल? हे पतिव्रते सांग. हे पतिव्रते, शोकाला सोड. ज्या योगाने संसारात तरून जाशील, असा स्वार्थ साधून घे. तो काळ सांप्रत हा आहे. मनुष्य जन्म बेसावधपणाने निघून गेल्यावर त्याची वार्ता पुन्हा ऐकण्यास मिळणार नाही. साध्वी म्हणाली, नवऱ्यासह आरोग्य व्हावे या कारणाने येथे मी आले. सांप्रत दैवयोगाने ह्या मार्गात असतां नवरा मरण पावला. बाप व संबंधीहि अंतरले. तुम्हीच माझे सर्व आहात. दु:ख समुद्रांतून मला काढा. साधु म्हणाले - पतिव्रता स्त्रियांना नवरा हाच तारणारा आहे. पुरुषासारखे अनेक उपाय त्यांना नाहीत. देवांनी अगस्त्य पत्नी (लोपामुद्रा) ची स्तुति केल्याने तिने सांगितलेला पतिव्रता धर्म एक. विंध्याद्रि वाढूं लागला. त्या भयाने देवांना बरोबर घेऊन बृहस्पति विंध्याद्रिचे गुरु अगस्त्य ऋषि व त्याची पत्नि लोपामुद्रा जवळ येऊन म्हणाले, लक्ष्मी, सावित्री, पार्वती, अरुंधति इत्यादिक पतिव्रता स्त्रिया आहेत. त्यांच्या मध्ये उत्तमोत्तम तूंच सती आहेस. नेहमी छायेसारखी नवऱ्याची सेवा करण्यास तत्पर यामुळे हे जगत तुझ्या स्वाधीन आहे. (अशी योग्यतेची लोपमुद्रा, तिने सांगितलेला स्त्रियांचा धर्म ऐक) प्रेमाने सावलीसारखी निरंतर आपल्या नवऱ्याची सेवा करणारी, जिचे नवरा हाच अविनाशी व्रत आहे ती पतिव्रता होय. नवऱ्याच्या पायास पाण्याने प्रक्षालन करून ते पाणी तीर्थ समजून पतिव्रता सेवन करते. नवऱ्याचे उच्छिष्ट अन्न सतीचा प्रसाद आहे. नवऱ्याची सेवा साध्वीचे देवपूजन होय. नवऱ्याचा संतोष पतिव्रतेचे दागिने आहेत. नवऱ्याची आज्ञा पालन करणे सतीचा धर्म होय. नवऱ्याच्या स्वाधीन राहून अनुकूल वागणे ही सतीची देहयात्रा आहे. सासूसासरा आदिकांचा मान ठेवणे ही तीची लोकयात्रा होय. ती नवऱ्याला

ईश्वर समजते. वृद्ध, लहान आदि पोषण करावयास योग्य त्यांचे पोषण करणें हे सतीचे कर्तव्य आहे. नवऱ्याच्या आज्ञेवाचून किंचित् करू नये. नवरा उभा राहिला असता तर स्त्रीने दूर उभे राहावे. नवरा निजल्यावर निजून तो उठण्यापूर्वी उठावे. आनंदाने नेहेमी नवऱ्याची सेवा करावी. नवऱ्याला इष्ट पदार्थ द्यावे, स्नान करून घर सारवणे आदि करावे, नवऱ्याला इष्ट सामग्री पुष्प आदि देऊन त्याला गोड भोजन घालावे. नवरा संतापला असेल तर, त्याची प्रार्थना करावी. दुसऱ्याचे घरी जाऊं नये. आज्ञेवाचून आईबापाचे घरी जाऊं नये. नेहेमी दुसऱ्या माणसाशी भाषण करुं नये. सासूसासऱ्यादिकांजवळ हळू बोलावे. नवऱ्याशी मर्यादेने बोलावे. इष्ट वस्तु स्वत: नवऱ्याजवळ मागू नये. दुसऱ्याकडून मागून घ्यावी. वस्त्र व दागिने आदि नवरा स्वेच्छेने देईल त्याचा स्विकार करावा. नवऱ्याची निंदा करूं नये. तो भाग्यहीन, दरिद्री, वाईट स्वभावाचा असला तरी तो महादेवासारखा पूजनीय आहे. व्यभिचारिणीशी मैत्री करू नये. दीर आदिकाशी विभक्तणा आणूं नये. सौभाग्य करणारे हळद कुंकू आदि धारण करावे. नवरा परगांवाला गेला असतां अलंकार (दागिने) घालू नये. ऋतुकाळी (तीन दिवस) तोंड कोणास दाखवूं नये, वेदादि श्रवण करूं नये, चवथे दिवशी स्नान करून नवऱ्याचे मुख पहावे. नवरा गावी गेला असला तर सूर्यास अवलोकावे. नवरा गांवी गेला तर सासरा आदिकांच्या आज्ञेने राहावे. नवरा बाहेरून आला असता त्यास सामोरे जावे. लज्जा, हाव (हावभाव), रती, पादसंवाहन, आदिकरून नवऱ्यास संतुष्ट करावे. नवरा निजल्यावर निजावे. नवऱ्याचे नांवाचा उच्चार करू नये. जेवावयास दुसऱ्याचे घरी जाऊं नये. याचना कोणाजवळ केव्हाहि करूं नये. दु:खसमयीहि सुख मानून घ्यावे. नवऱ्याला दु:ख असता आनंद मानू नये. नवऱ्यासमोर उंच जागी आसनावर बसणे, खेळणे, हंसणे वर्ज्य करावे. नवऱ्याला उत्तर दिल्याने स्त्रीला कुत्रीचा जन्म येतो. सासू सासऱ्याला सोडणारी घूबडी होते. नवऱ्यावाचून गोड स्वादिष्ट खाणारी डुकरी व घुबडी होते. संतापून नवऱ्यास उत्तर देणारी मुकी होते. मला नवऱ्याने मारिले असे बोलणारी वाघीण होते. सवतीशी वैर केल्याने स्त्री ऐश्वर्याने रहित होते. व्यभिचार करणारी कृमी होते. नवरा मरण पावला असतां सहगमन करावे. अथवा विधवा धर्माने राहावे. प्रेत न मिळाले, अथवा गरोदर असतां लहान पोर असेल तर, विधवा धर्माचे पालन करावे. मस्तकाचे वपन करावे. पृथ्वीवर निजावे, एक वेळ जेवण करावे. विडा, गंध, फूले, चांगले वस्तुचे सेवन, मंगलस्नान सोडून द्यावे. हळद कुंकू इत्यादि सौभाग्य पदार्थाचा त्याग करावा. पांढरे वस्त्र परिधान करावे.

वैशाख, माघ, कार्तिक महिन्यांत स्नान, दान व्रतादिक आचरण करावे. अंगात शक्ति असतां चांद्रायण व्रत करावे. किंवा तूप, फळे, दूध इत्यादि सेवन करावे. नवरा असतां आपले आवडीचे पदार्थ जे असतील, ते प्रेमपूर्वक ब्राह्मणास अर्पण करावे. शास्त्रांत सांगितलेले मास व्रत करावे. जे जे पदार्थ वर्ज्य आहेत ते ऊन पाणी स्नानासाठी ब्राह्मणास द्यावे. तीर्थयात्रा करणाऱ्याचा संतोष करावा. मुलगा असता त्याचे आज्ञेने राहावे. नवऱ्यासारखी हरीची पूजा करावी. वडील माणसे, गाय, अतिथि, श्रेष्ठ ब्राह्मण यांची पूजा करावी. कांदा, लसूण आदि दुष्ट भोजन वर्ज्य करावे. हरिच्या लीलेत प्रेम ठेवावे. पुत्र नसल्यास पितरांचे तर्पण करावे. स्वभावाचे (चारित्र्याचे) पालन करावे. धर्माचे आचरण न केले तर स्वजनासह अधोगति प्राप्त होते. पतिव्रता ह्या धार्माच्या आचरणाने वाईट गतिला गेलेलाहि नवरा त्याला हठानें उद्धरून निश्चयाने स्वर्गाला घेऊन जाते, जशी घार सर्पाला धरून आकाशांत नेते. बृहस्पति म्हणतात, हे लोपामुद्रे, तेझेपासून पसरलेला पतिव्रताधर्म हा लोकी तारक आहे. साधू पतिव्रतेला म्हणाले - असा गुरुला सांगितलेला सती धर्म तुला मी कथन केला. यानंतर तुझ्या इच्छेप्रमाणे वागावे. प्रभा सूर्यामागून गमन करते, तसे नवऱ्यामागून सहगमन तूं करावे. जर तुझी इच्छा असेल तर कर. या सहगमनाने नवऱ्याला यमापासून ग्रहण करून स्वर्गाला जाशील व देव तुझे गौरव करतील. घरापासून स्मशानापावेतो प्रत्येक पावला पावलाला अश्वमेघ यज्ञाचे फळ तुला लागेल. साडेतीन कोटी केसांचा (रोमांचा) होम झाल्यामुळे प्रत्येक केसामागे कोटीकोटी वर्ष नवऱ्यासह स्वर्गी तुझे राहणे घडेल. रूपाने व लावण्याने युक्त बायका प्रत्येक घरी असतात. त्यांच्याशी काय करावयाचे आहे ? (कांहीनाही). एकच पतिव्रता तीन कुलाला पवित्र करते. आमचा त्रास पतिव्रतेला होईल या कारणाने पृथ्वी, वायू, सूर्य, अग्नि हे भितात. आमचे स्थान ही पतिव्रता हरण करील, या संशयानें देव नम्र होऊन उभे राहतात. पतिव्रतेचे केव्हढे मोठे सामर्थ्य आहे. ही पितरास तारणारी, पुण्यवान होय. तीन कुळासह जी नेहमी नीच योनीला जाणारी, त्या वाईट स्वभावाचे स्त्रियेला धिक्कार असो. पतिव्रता म्हणाली, विधवा धर्म पालन करणे, दु:खदायक आहे. तरुणपणा इत्यादि, या धर्मांत घात करणारे आहेत. हे गुरो, नवऱ्याबरोबर सहगमन करण्याविषयी माझे प्रेम निश्चयाने वाढत आहे. साधु म्हणाले, हे सती, चांगला विचार केला. तुला तो इष्ट आहे. तूं शोक सोड, तुझे प्रारब्ध उंच आहे. दीर्घायुषी, भीष्माचार्य, रावण प्रमुख सर्व काळाच्या स्वाधीन झाले. देवासहि काळ अजिंक्य आहे. सद्गुरुवांचून काळ दुर्धर होय. गुरुदर्शनाच्या इच्छेने तूं दुरून आली, यास्तव तूं एक

काम कर. हे पतिव्रते, स्नान करून पीतांबर नेस. प्रथम प्रायश्चित घेऊन, सपत्नीक ब्राह्मणाला सौभाग्याची वायने दे. हे सती, नवऱ्याच्या कानांत व गळ्यांत हा रूद्राक्षाला घाल. भस्म कपाळास व सर्वांगास लावून गुरुच्या चरणोदकाने प्रोक्षण कर. नंतर सहगमन करावे. असे सांगून भस्म व रुद्राक्ष देऊन तो साधू जाता झाला. पतिव्रतेन ब्राह्मणाला बोलावून उत्तम सौभाग्याची दाने आनंदाने बहुत दिली. समागमाला सेवक आणिले होते, त्यांना सती म्हणते घरी परत जा व 'स्वर्गी तुमच्या ठिकाणी मला महादेव-पार्वती आहेत, तेथे मी आनंदाने जाईन', असे आईबाप, सासूसासरा यांना सांगा. असे सेवकास सांगितले. नंतर ती पतिव्रता आणलेल्या नवऱ्याच्या शवापुढे हातांत अग्नि घेऊन हळूहळू गमन करणारी पार्वती सारखी शोभली. ती आनंद व स्वरूप याने युक्त होती. सर्व लोक तिची स्तुती करूं लागले. ही सोळा वर्षाची स्त्री स्वरूपाने युक्त, नवऱ्याचे सुख इला प्राप्त झाले नाहीं, तीन कुळाला उद्धारणारी, बहुत पुण्यवान आहे. अशी ती पतिव्रता चालू लागली. ती स्मशान भूमीला येऊन, कुंडात अग्निचा संस्कार केला. वायने द्रव्य आदि देऊन सुवासिनी संतुष्ट केल्यानंतर तिला गुरुवाक्याची आठवण झाली. तिने नवऱ्याचे अंगाला भस्म लावले, रुद्राक्ष घालून ब्राह्मणाची आज्ञा घेऊन, ती पतिव्रता श्रीगुरुच्या दर्शनाची इच्छा करणारी संगमाला येण्यास निघाली. ती परमेश्वराचे स्तवन करीत म्हणते. हे दाता, सर्वांच्या ईश्वरा, तूं साधूसहि आश्रय आहे. त्रिगुणात्मक होऊन, तूं ह्या जगाच्या उत्पत्ति, स्थिति, लयास कारण आहे. हे श्रीहरी, तूं दयेचा समुद्र अशी तुझी विस्तृत ब्रिदावली होय. माझ्यासारख्या स्त्रिया तुझ्याकृपेच्या लेशाने, चांगला नवरा, मुलगा सुख यांनी युक्त आहेत. हे अजन्मा, माझे मनोरथ पूर्ण झाले. नवरा व मुलगा यांनी सुखी होऊन मी आज तुमच्या यशाला घेऊन स्वर्गाला जाते. हे देवा, तुझे सामर्थ्याने मरण पावला तो जिवंत झाला, रोगी आरोग्याला गेला, भित्रा सुखी (निर्भय) झाला, दरिद्री द्रव्यवान् केला, अज्ञानाला सज्ञानी केले, मी आज नवऱ्यासह तुझ्या सायुज्याला जाते. असे प्रकाराने मार्गांत स्तवन करणारी काजळासह नेत्रोदकाने जिचे सुवर्ण घटासारखे स्तन व्याप्त झाले, ती हठाने नवऱ्यासह आपला उद्धार व्हावा अशी इच्छा करणारी वेगाने येऊन श्रीगुरुला नमस्कार करती झाली. येऊन नमस्कार करणाऱ्या त्या पतिव्रतेला श्रीगुरु भगवान् प्रसन्न होऊन म्हणाले, तूं सौभाग्यवती होऊन तुला आठ पुत्र होवोत. श्रीगुरुचा आशीर्वाद ऐकून लोकांना आश्चर्च झाले. सर्व वर्तमान त्यांनी सद्गुरुला निवेदन केल्यावर गुरु म्हणतात, माझे वाक्य व्यर्थ होणार नाही. इच्या नवऱ्याच्या प्रेताला येथे आणा. या

अवधीत ब्राह्मण आले. रुद्रमंत्राने त्याकाळीं त्यांनी श्रीगुरुचे पूजन केले. आणलेल्या प्रेताला श्रीगुरुने अमृत दृष्टिपूर्वक अवलोकन करून आपल्या जवळ ठेविले. श्रीगुरुने त्या विप्राला रुद्रमंत्राने मंत्रीत जलाने सर्व शरीराला स्नान घातले. तो विप्र एकाएकी झोपेतून उठावे तसा उठला. तेव्हा आनंदाश्रुने डोळे भरलेली ती पतिव्रता लज्जा व आश्चर्य युक्त त्या नवऱ्याला तो संपूर्ण वृत्तान्त प्रेमाने सांगती झाली. उभयता स्त्रीपुरुषाने हात जोडले व म्हणाले. आम्ही दोघे तुमच्या स्मरणास पराङ्मुख झालो. आमची दोघांची बुद्धि वाईट आहे. दोघेहि पापी आहोत. तरीहि तूं, दयासागर, हे सच्चिदानंद, आमचा नाश केला नाही. हे हरी, तूं जगाचा गुरु, जग हे तुझे शरीर, तूं परात्मा, जगाचा पालक आहेस, तूं जगाला पाहणारा, हे जग तुझ्या ठायीं राहिले आहे. संपूर्ण आनंदाचा तूंच ठेवा, आमचे संरक्षण कर. करणारा, न करणारा, व विपरित करणारा तूंच, धर्मार्थ, काम, मोक्ष देणारा आहेस - आम्ही दोघांनी अपराध केलेला आज संपूर्णपणें क्षमा करावा. असे प्रकाराने दोघांनी पुष्कळ नम्र होऊन आनंदाने नमस्कार केला. तो चमत्कार पाहून लोकांनीहि परमेश्वरास स्तविले. तेथें एक वंचक (फसविणारा) होता. तो गुरुला म्हणाला, मस्तकांत ब्रह्मदेवाची अक्षरे असतात किंवा नसतात. (क्षय होऊन मेला यामुळे) हा अल्पमृत्यु नाही, महामृत्यु हा आहे तर जीवंत कसा झाला ? श्रीगुरु सांगतात - ब्रह्मदेवानें या जन्मी याचे तीस वर्षाचे आयुष्य व पुढील जन्मी शंभर वर्षे आयुष्य लिहिले होते. पुढील जन्माची शंभर वर्षे वर्तमान जन्मी मागून घेतली. व या जन्माची तीस वर्षे भावी जन्मी ठेविली असे विपरित आचरण केले. ते गुरुचे भाषण ऐकून मिळालेले (एकत्र झालेल्या) लोकांनी मोठ्या स्वराने जय ध्वनि केला. तो आवाज देवाच्या कानाला विसावा देणारा व दोष हरणारा होता झाला. श्रीगुरु त्या स्त्री-पुरुषाला आशीर्वाद देतात. तुम्ही उभयता निरोगी, आयुष्यमान्, गुणी पुत्र, द्रव्य, यश यांनी युक्त व लोकांमध्ये वंदनीय व्हाल. श्रीगुरुचे वचनास ऐकून उभयतां स्त्री-पुरुषास आनंद झाला. त्यांनी स्नान करून गुरुचे पूजन केले. तेव्हां सूर्य अस्तास गेला. गुरुनें आन्हिक कर्म केले व सर्व लोकांसह मठाला येते झाले.

सिद्ध नामधारकाला म्हणाले - दुसरे दिवशी पतिव्रता स्त्री सद्गुरुला विचारती झाली. काल कोणी एक साधू येऊन तत्त्वज्ञानाने माझे आश्वासन करुन मला भस्म व चार रुद्राक्ष दिले. मला साधू म्हणाला - गुरु दर्शन करून तीर्थाने नवऱ्यास प्रोक्षण करावे, नंतर सहगमन कर असे सांगून गेला. तो कोण होता ? हा महिमा तीर्थ व रुद्राक्षाचा आहे

काय ? श्रीगुरु सांगतात - दुसरे रुप धारण करून हे पतिव्रते तुझ्या अंत:करणाची परिक्षा मीच केली. हे सुभगे तूं पुण्यवान आहेस. हे सती, हा सर्व तीर्थ आणि रुद्राक्षाचा महिमा होय. त्या रुद्राक्षाचे महत्त्व या लोकी कोणी सांगण्यास समर्थ नाही. महादेवाचे रुद्राक्ष अलंकार असून मोक्ष देणारे आहे. सुवर्णादि धातू व रत्नाने युक्त असलेले रुद्राक्ष श्रेष्ठ होत. हजार रुद्राक्ष धारण करणारा प्रत्यक्ष शिवस्वरूपी होय. रुद्राक्षावाचून पुण्याची प्राप्ति नाही. रुद्राक्षाच्या धारण करण्याने पापाचा क्षय होतो. महादेवाचे नांव (नम:शिवाय), रुद्राक्ष, भस्म यांनी युक्त पुरुष देवांनाहि दुर्धर होय. रुद्राक्ष जपाचे ठायी अधिक फल देणारे आहे. मनुष्य भस्म व रुद्राक्षावाचून पशुतुल्य आहे. रुद्राक्ष कण्ठामध्ये बत्तीस धारण करावे. मस्तकी चाळीस, दोन्ही कानांत बारा-बारा, दोन्ही भूजीं सोळा-सोळा, एक शेंडीत, एक भूमध्य भागी, दोन्ही हातांत बारा-बारा, उरावर एकशे आठ या प्रमाणे रुद्राक्ष धारण करावे. काश्मीर देशामध्ये भद्रसेन राजाचा मुलगा व त्याचे प्रधानाचा मुलगा होता. हे दोघे बालक असताहि अलंकारास दगड मानून रुद्राक्षाला ते आनंदाने धारण करते झाले. राजाने आग्रह केल्यावरून पराशर ऋषि रुद्राक्ष धारण करण्याचे कारण सांगते झाले. हे राजा, श्रवण कर. पूर्वी नंदि नांवाचे गांवी सुंदर वेश्या चंद्रासारखी कांति, पण पतिव्रता होती. हत्ती, घोडे, द्रव्य, सेवक यांनी युक्त धर्म जाणणारी, दान करणारी ती वेश्या असे. तिच्या नृत्य करण्याचे मंडपात हे दोघे (तुझा व प्रधानाचा पुत्र) रुद्राक्षाने युक्त एक वानर व एक कोंबडा होता. या वेश्येचे पतिव्रता धर्माची परिक्षा करावयासाठी महादेवाने सावकाराचे रुप घेतले व दिव्य कांकण आणि लिंग घेऊन निघाले. (मार्गाने जात असतां त्यांना पाहून) वेश्या तिच्या मैत्रिणीला म्हणाली. यास विचार की किंमत घेऊन किंवा रतिधर्माने लिंग व कांकण देतो काय ? मी तीन दिवस सतीधर्माने याची स्त्री होऊन याला रमवीन. मी पद्मिणी आहे. मैत्रिणीने त्याला विचारले. ते ऐकून तो वैश्य म्हणाला, व्यभिचार करणाऱ्या स्त्रियांचे ठायी खरेपणा कोठून असणार ? व्यभिचार हाच केवळ तुमचे कुळाचा धर्म आहे. वेश्या म्हणते, ही मी व्यभिचारिणी नाही पतिव्रताच आहे. खरोखर माझे विषयी प्रमाण हे लिंग होय. मी तीन दिवस सती भावाने सर्व प्रकार करून तुमचे सेवन करीन. वैश्य म्हणाला - हे माझे प्राणासारखे (लिंग) घे. या विषयी साक्षीदार सूर्यचंद्र आहेत. तुझे वाक्याप्रत तूं बळकट प्रेमाने वारंवार विचार करून पहा. वैश्य असे बोलून, त्या वेश्येच्या हातांत कांकण बांधून तिला लिंग दिले. तीने लिंग मंडपात ठेविले व पतिव्रता धर्माने ती त्याची सेवा करू लागली. उभयता रतिसुखांत असतां त्यावेळीं अकस्मात

अग्निने तो मंडप लिंगासह जळाला. यामुळे वानर, कोंबडा व वैश्य ते वेळी अग्निमध्ये शरीराला जाळते झाले. ती वेश्याहि नवरा मरण पावला या कारणाने दु:खी झाली. तिला तिच्या स्वजनांनी कुळाचारा विरूद्ध वागूं नको असा निषेध केला. तरी ती सहगमन करावयास तयार झाली. तिने दाने दिली. सूर्याला नमस्कार केला. ईश्वराचे ध्यान करून अग्निमध्ये प्रवेश केला. तेव्हा ज्यांना पांच मुखें व दहा भूजा आहे, असे महादेव प्रगट होऊन तिला म्हणाले. मी माया उत्पन्न करून तुझा धर्म, धैर्य या सर्वांची म्यां - ईश्वराने परिक्षा केली. तूं वेश्या असूनहि पतिव्रता आहेस. मी प्रसन्न झालो. इच्छित वर मागून घे. ती वेश्या म्हणाली, जीभेने व गुह्येंद्रियाने मिळणारे सुखाला मी कोठेहि इच्छित नाही. माझ्या स्वजनासह तुमचे सायुज्य मला द्यावे. महादेवाने तिच्या इच्छेप्रमाणे तिला दिले. तो वानर व कोंबडा हे दोघे तुम्हा दोघांचे पुत्रे असून पूर्वजन्माच्या संस्कारामुळे रुद्राक्षप्रिय, महादेवाचे भक्त, दगडासारखे अलंकार मानणारे हे आहेत. ऋषि वाक्यास ऐकून हे मुने, माझ्या पुत्राचे पुढी शुभाशुभ सांगावे, असे राजानें विचारले असता पराशर म्हणाले, निश्चयानें सात दिवसांत मुलास  मृत्यु येईल. ते ऐकून राजा फार दु:खी झाला. त्यानें ऋषिला नमस्कार करून प्रार्थना केली. तेव्हां पुनश्च पराशर ऋषि राजाला म्हणाले, हे राजा, भिऊ नको, रुद्र तारणारा आहे. ब्रह्मदेवाने जगाच्या वृद्धिसाठी धर्म व अधर्म उत्पन्न केले. धर्माचा स्वामी इंद्र, पुण्यवान पुरुषाला स्वर्गाला नेतो अधर्माचा स्वामी यम, तो पापाचरण करणाऱ्या पुरुषास खाली (नरकीं) नेतो. यमाचे साहाय्य करणारे कामक्रोधादि अनेक प्रकारच्या पापाला कारणभूत आहेत. ह्यांचे साहायाने यम पापी परुषाला नरकी टाकितो. बुद्धि, इंद्रिये, मन, यांचे ठायी राहणारे हे काम क्रोधादि, अल्पबल असूनहि भित्र्यांना जिंकितात. ज्यांनी बुद्धि, इंद्रिये, मनाला स्वाधीन केले, त्या पुरुषांना कामक्रोधादिक दृष्टिसहि पडत नाहीत. ब्रह्मदेवानें वेद उत्पन्न केले. त्यांतील दक्षिण मुखाने उत्पन्न झालेल्या यजुर्वेदापासून मुनिनी पापहरण करणारा महारुद्र प्राप्त करून घेतला. मुनिपासून शिष्यद्वाराने रुद्राचा प्रसार झाला. जेथे ब्राह्मण रुद्राला पठण करतात त्या देशात काम क्रोधादि संपूर्ण पाहावयाकारणे समर्थ नाही. त्यामुळे यमाचे नगर ओसाड झाले. यमानें ते वर्तमान ब्रह्मदेवाला सांगितले. ब्रह्मदेव म्हणाला, निजून रुद्र पाठ करतो, उभा राहून किंवा चालत असतांना, वाईट बुद्धि ठेवणारा (लोभी), उन्मत्त, भक्तिविरहित जो रुद्र पठण करील, तो पापी होय. त्याला बहूत शिक्षा करावी. त्याहून इतर रुद्राचा पाठ करणारे आहेत ते रोगी असो किंवा मरण पावले तरी त्यांना पाहू नकोस. संपत्ति, ज्ञान, आरोग्य आदिकांचे ते भागी

आहेत, असे ब्रह्मदेवाने यमाला सांगितले. ह्यास्तव मृत्युंजय (तुझ्या पुत्राला) तारणारा आहे. भय सोडून दे, श्रेष्ठ ब्राह्मणाकडून महादेवावर अतिरुद्राभिषेक केल्याने हे राजा, तो पुत्र दहा हजार वर्षांचा होईल. ते ऐकून, शीघ्र उत्तम ब्राह्मणाला पाचारण करून पाराशर ऋषिची आज्ञा घेतली. नंतर राजाने विश्वास ठेवून भक्तिनें जसा विधि सांगितला त्याप्रमाणे अनुष्ठानास प्रारंभ केला. अनुष्ठानाच्या सातवे दिवशी यमाचे चाकर हातात पाश व दंड धरणारे गुप्त देहाने तेथे आले. ते वेळी तो राजपुत्र मूर्च्छा येऊन जमिनीवर पडला. तेव्हां ब्राह्मणाने त्याच्या अंगावर. रुद्र संबंधी जलरूपी तीर्थ व मंत्राक्षता तयार करून टाकल्या. त्या योगाने महादेवाचे दूत उत्पन्न होऊन त्यांनी पराभूत केलेले ते यमाचे सेवक निघून गेले, नंतर राजपुत्र मूर्च्छा जाऊन उठला. राजाला आनंद झाला. ते वेळी त्याने ब्राह्मणांना भोजन घालून संतुष्ट केले. राजाने सभा करून श्रेष्ठ आसनावर पराशर ऋषिला बसवून त्यांची सेवा केली. त्या जागी वीणा वाजवीत व हरिला गायन करीत नारद ऋषि प्राप्त झाले. राजा, त्यांना समोर जाऊन त्यांचे पूजन केले व लोकांतील वृत्तांतास विचारता झाला. नारद म्हणाले, या जागी महामृत्यु तुझ्या मुलाला हरण करण्यासाठी आला. महादेवाच्या सेवकांनी दूतासह मृत्युचा पराभव केल्याने तो यमाकडे गेला. यमहि मृत्यु व सेवकास येऊन महादेवाच्या अनुचरास म्हणाला, परमेश्वराच्या आज्ञेने नियमित कर्म करीत असतां माझे ठायी विघ्न देणारे तुम्ही कोण ? (काय कारणाने विघ्न केले). महादेवाचे अनुचर म्हणाले, हे अंतका (यमा), आम्हाला विचारलेला प्रश्न चित्रगुप्ताला विचारून समाधान करून घे. यम चित्रगुप्ताचे कागदांत बारावे वर्षी अल्प मृत्युला तरून दहा हजार वर्षाचे आयुष्य होईल. असे पाहून यमाला भ्रांति झाली. त्याने महादेवाच्या सेवकांची क्षमा मागितली. नारद सांगतात हे राजा, म्यां हे अवलोकन केले. तुझा मुलगा पाराशर ऋषिंने वाचविला आहे. असे बोलून नारद स्वर्गाला गेले. पाराशराने राजा व प्रधान यांचे मुलास आशीर्वादाने संतुष्ट करून आपल्या आश्रमाप्रत गेले. गुरु म्हणतात हे पतिव्रते, तीर्थ व रुद्राक्षाचे हे माहात्म्य होय.

आता याच्या पुढे सीमंतिनीची कथा आहे.

ती सीमंतिनी म्हणाली, ''महाराज, आपली कृपादृष्टी माझ्यावर पडली व मी धन्य झाले. माझे कल्याण व्हावे म्हणून मला एखादा मंत्र सांगा.''

श्रीगुरु म्हणाले, ''स्त्रियांना मंत्र सांगू नये. **स्त्रियांना पती भक्ती हीच तारक आहे. स्त्रियांना मंत्र दिला तरी तो अनुपयुक्त होतो आणि शुक्राचार्यांप्रमाणे मंत्र**

**देणाऱ्याची हानी होते.** पूर्वी एकदा देवदैत्यांचे मोठे युद्ध झाले. शुक्राचार्यांनी इंद्राने मारलेल्या दैत्यांना आपल्या - संजीवनी - मंत्र सामर्थ्याने जिवंत केले. इंद्राने शंकरांना शरण जाऊन हा सर्व प्रकार त्यांच्या कानावर घातला. शंकरांनी शुक्राचार्यांना खाऊन टाकले पण ते शंकरांच्या मुत्राद्वारे बाहेर पडले.'' पुन्हा दैत्यांकडे येऊन शुक्राचार्य मृत दैत्यांना जिवंत करु लागले. यामुळ त्रस्त झालेल्या इंद्राने आपल्या गुरुंची प्रार्थना केली, ''हे गुरुमहाराज आपण आमचे रक्षण करा.'' गुरु म्हणाले, ''शुक्राचार्यांचा मंत्र जर तुम्ही कांही निमित्ताने भ्रष्ट केलात तर तुम्हाला निश्चित जय मिळेल. त्या दैत्यांचा उत्कर्ष होण्यापेक्षा मंत्राचे सत्व हरण करणे चांगले.'' हे ऐकून इंद्राने आपल्या मुलाला - कचाला सांगितले, ''शुक्राचार्यांकडे तू विद्यार्थी बनून जा. त्यांना संतुष्ट करुन मंत्राचे बल नष्ट कर.''

आपल्या वडिलांना नमस्कार करुन कच शुक्राचार्यांकडे गेला आणि म्हणाला, ''हे गुरु महाराज, मी आपला शिष्य आहे. मी नम्रपणे आपल्याला शरण आलेलो आहे. आपण माझे संरक्षण करा. मी शत्रु पक्षाचा आहे वगैरे समजू नका.''

शुक्राचार्यांची मुलगी देवयानी कचाच्या सौंदर्याने मोहित झाली आणि तिने आपल्या पित्याला कचाला शिष्य म्हणून स्वीकारण्यास सांगितले. ते ऐकून शुक्राचार्यांच्या मनांत कचाबद्दल प्रेम उत्पन्न झाले आणि त्यांनी कचाचा शिष्य म्हणून स्वीकार केला. कचाचे हे कपट इतर दैत्यांच्या लक्षात आले आणि कच एकदा समिधा आणण्याकरता वनांत गेला असता त्यांनी कचाला ठार मारले. तो घरी परतला नाही म्हणून देवयानीने शुक्राचार्यांना कच का अजून परत आला नाही असे विचारले. तेव्हां शुक्राचार्यांनी ध्यानाने सर्व जाणून मृत कचाला पुन्हा जिवंत करुन घरी आणले. कचाला पाहून देवयानीला आनंद झाला. दैत्यांनी पुन्हा एक दिवस त्याला ठार मारले आणि त्याचे मांस तुकडे करुन पशुंना खायला दिले. कच न दिसल्यामुळे देवयानीने पुन्हा पित्याची पहिल्या प्रमाणे प्रार्थना केली. शुक्राचार्यांनी आपल्या मंत्र सामर्थ्याने पुन्हा त्याला जिवंत केले.

आता मात्र दैत्यांनी त्याला ठार मारुन जाळला आणि त्याची राख शुक्राचार्यांना मधातून पाजली. दैत्यांवरच्या प्रेमामुळे सावधानता न बाळगून शुक्राचार्यांनीसुद्धा तो मध पिऊन टाकला. परत देवयानीला दु:ख झाले. शुक्राचार्यांनी ध्यानाने सर्व जाणले आणि

ब्रह्महत्या केल्याबद्दल दैत्यांना शाप दिला. देवयानीला सांगितले की आता तो त्यांच्या पोटातच असल्यामुळे त्याला जिवंत करता येणे शक्य नाही. त्याला जिवंत केले तर माझा मृत्यु होईल. माझ्या शिवाय तो दिव्य मंत्र कोणीच जाणत नाही.

पण देवयानीने आग्रह धरला की तो मंत्र मला सांगा आणि तुम्ही त्याला जिवंत करा. यात जरी तुमचा मृत्यु झाला तरी मी मंत्र सामर्थ्याने तुम्हाला जिवंत करीन. तुम्ही माझे ऐकले नाहीत तर मी प्राणत्याग करीन. तिच्यावरच्या प्रेमामुळे शुक्राचार्यांनी तो दिव्य मंत्र तिला दिला. शुक्राचार्यांनी कचाला जिवंत करताच त्यांना स्वत:ला मृत्यु आला व त्यांना देवयानीने मंत्र सामर्थ्याने जिवंत केले. त्यामुळे मंत्राचे सर्व सामर्थ्य नष्ट झाले. कचाचे काम झाले. तो शक्राचार्यांना म्हणाला, ''माझ्यामुळे तुम्हाला वारंवार त्रास होतो, हे दैत्य कांही मला जिवंत ठेवत नाहीत तेव्हां आपण मला घरी जायची अनुमती द्या.''

पण देवयानी म्हणाली, ''तुझ्याशी लग्न करण्याच्या इच्छेने मी तुला तीन वेळा जिवंत केले तेव्हां तू माझ्याशी विवाह कर.'' कच म्हणाला, ''गुरुकन्या ही बहिण आहे. आणि माझा प्राण तूं मला परत मिळवून दिल्याने तूं माझी माता झाली आहेस. त्यामुळे मी तुझ्याबरोबर विवाह करु शकत नाही. तेव्हां हा विपरीत आग्रह तूं सोडून दे.''

हे ऐकल्यावर देवयानीने त्याला शाप दिला. ''तूं मिळवलेली विद्या विसरुन जाशील.'' त्यानेही तिला शाप दिला, ''तुझा क्षत्रियाशी विवाह होईल. तुझ्या मुर्खपणामुळे तुझे मंत्र ज्ञान नष्ट होईल. तो मंत्र तेजहीन झाला आहे.'' शुक्राचार्यांचेही तेज लोप पावले. स्त्रियांनी मंत्र देऊ नये, असे सांगून श्रीगुरु पुढे म्हणाले, एखादे व्रत करावे.

त्या सीमंतिनीने प्रार्थना केली, ''महाराज, जर स्त्रियांनी मंत्र घेऊ नये असे आहे तर कल्याणकारी आणि आपल् स्मरण करुन देणारे असे एखादे व्रत सांगा मला.'' श्रीगुरु म्हणाले, ''हे साध्वी, सोमवार व्रत हे सुलभ आणि तारक आहे.'' सर्व व्रतात उत्तम असे व्रत आहे. ते आपल्याला चांगले स्थान प्राप्त करुन देते. हे व्रत कोणीही करु शकते. सीमंतिनीने या व्रताच्या प्रभावाने नाहीसा झालेला पतीसुद्धा परत मिळवला. ती कथा ऐका.

**सोमवार व्रत हे नित्यही आहे आणि काम्यही आहे. या व्रताचा फार चांगला प्रभाव आहे. यवनादि लोक सोडले तर बाकी कोणीही हे व्रत करु शकतो.**

**'सोमवार' या शब्दाचा अर्थ असा होतो - 'उमा' म्हणजे अध्यात्म विद्या - हैमवती, पार्वती तिच्या सहित शिव त्याचा वार**. आर्यावर्तामध्ये इंद्रिय निग्रह केलेला, बुद्धिमान, शूर राजा होता. ईश्वराच्या सेवेने सुलक्षणी पत्नी त्याला मिळाली. ज्योतिषांनी सांगितले, शांती, शीलवान वगैरे गुणांनी युक्त अशी ती स्त्री आपल्या पतीसह १०,००० वर्षे राज्य भोग घेईल. त्यातल्या एकाने सांगितले, हिला बालपणी वैधव्य येईल. राजा प्रथम आनंदी झाला होता पण हे ऐकून खिन्न झाला. पुढे शुक्लपक्षातल्या चंद्राप्रमाणे ती वाढू लागली. बाराव्या वर्षी पुढे आपल्याला वैधव्य येणार आहे हे ऐकून दु:खी झाली. एकदा ऋषीपत्नी मैत्रेयी त्यांच्याकडे आली असता आपल्याला बालपणीच वैधव्य येऊन नये म्हणून काय करावे, असे तिने मैत्रेयीला विचारले. मैत्रेयीने तिला सांगितले, ''तूं जर सोमवार व्रत केलेस तर शंकर तुझे रक्षण करतील. प्रत्येक सोमवारी मन, इंद्रिये आणि शरीराने शंकरांची सेवा कर. सोमवारी क्षणभर देखील निजू नये. दिवसा उपोषण करुन रात्री भोजन करावे. असे केल्याने कोणतेही संकट येणार नाही. व्रत जर सोडलं तर शंकर रागावतील. **शंकरांना अभिषेक केला म्हणजे पापक्षय होतो**. पीठ देवता वगैरेंच्या पूजनाने साम्राज्य मिळते. धूप दानाने सुगंध मिळते. दीपदानाने चांगली कांती मिळते व अन्नदानाने सर्व भोग मिळतात. तांबूल दानाने लक्ष्मी मिळते. नमस्काराने सगळे पुरुषार्थ मिळतात. जपाचे ऐश्वर्य मिळते तर ब्राह्मण भोजन घातले असता सर्व कांही मिळते. असे सोमवार व्रताचे माहात्म्य सांगून मैत्रेयी गेली.''

या मुलीचे पुढे काय व्हायचे असेल ते होईल आपण हिचा विवाह करुन टाकावा असे ठरवून नळ गोत्रातील चंद्रांगद राजाला त्याने आपली कन्या दिली. विवाहाच्या निमित्ताने गज, अश्व, दास-दासी, कांही गांवे वगैरे जावयाला भेट दिली. आणि राजाला मुलगा नसल्याने त्याने जावयाला आपल्या नगरात ठेवून घेतले आणि मुलाप्रमाणे वाढवले. तो जावई पुढे एकदा कालिंदी क्रीडा करीत असताना बुडाला. हे वृत्त त्याच्या सेवकांनी राजाला येऊन सांगितले. राजा नदीवर आला पण पुष्कळ प्रयत्न करुनही राजपुत्राचा शोध लागला नाही. सर्वजण दु:खी झाले. राजकन्येने पतीप्रमाणेच जल समाधी घ्यायचे ठरवले परंतु ब्राह्मणांनी तिला समजावले की तुझ्या पतीचे प्रेत मिळालेले नाही तेव्हां तूं असे करु नकोस. चित्रवर्म राजाने तिच्या मनाची समजूत काढली आणि तो तिला आपल्या राजधानीत घेऊन आला.

तिला जरी पती वियोगाचे दु:ख झाले तरी ती मैत्रेयीने सांगितलेले सोमवार व्रत करु लागली. त्या इंद्रसेन राजाला त्याच्या शत्रुंनी पकडून कारागृहात ठेवले. इकडे चंद्रांगदाला पाण्यात बुडाल्यावर नाग स्त्रियांनी त्यांच्या राजाकडे आणले. राजाने त्याला अमृत पाजून जिवंत केले. ते अलौकिक नगर ते नाग लोक पाहून चंद्रांगद आश्चर्यचकित झाला.

(इथे आता मोठ्या महाराजांनी खालच्या टीकेमध्ये विचार केला आहे. कर्मकांड चालू आहे आणि हे व्रतार्चन म्हणजे शंकरांची उपासना झाली. कर्मामध्ये उपासना कशी मध्ये आली? **देवतेचे ज्ञान संपादन करुन जर कर्म केले तर ते श्रेष्ठ ठरते.** नुसत कर्म केले तर तो जीव नकरात जातो. व्रत सांगायला सुरवात केली म्हणजे व्रत देवता किती प्रभावी आहे. शंकरांनी त्या चंद्रांगदाला कसे जिवंत केले वगैरे देवतेचा प्रभाव समजून देवतेचे ज्ञान झाले म्हणजे ते कर्म श्रद्धेने होईल. म्हणजे कर्मच सांगितलयं. पण प्रसंगाने देवतेच ज्ञान करुन दिले. ते कर्म चांगले. नुसती उपासनाही असू नये व नुसते कर्मही असू नये. दोन्ही मिळून असावे.).

नागराज वासुकीने चंद्रांगदाला विचारले. तूं कोण, कोणाचा भक्त आहेस. चंद्रांगदाने सांगितले, सत्कीर्तिमान नल राजाच्या वंशात जन्मलेल्या इंद्रसेनाचा मी मुलगा आहे. माझे नांव चंद्रांगद आहे. चित्रवर्म राजाचा मी जावई आहे. कालिंदी नदीत बुडालो असता मला इथे कोणी आणले मला समजले नाही. दैवयोगाने आपले दर्शन झाल्यामुळे माझे जन्म, कर्म सफल झाले. सृष्ट्यादिकांना कारण असलेला सर्वेश्वर चिन्मय परमात्मा, कैलास पर्वतावर मूर्तीमान असणारा शंभू आमचे कुलदैवत आहे.

इथे थोडी टीका आहे.

तो शंभु या जगाच्या उत्पत्ति, स्थिती आणि लयाला कारण आहे. तो प्रकृतीच्याही पलीकडे आहे. सर्वेश्वर तो आहे. अंतर्यामी आणि सर्वांचा तो नियामक आहे. तो जर सर्वांच्या अंतर्यामी आहे आणि सर्वांचा नियामक आहे तर मग तो जीवापेक्षा वेगळा आहे का? सर्व जीवरुपीही तोच आहे. मग त्याचे भजन कसे करायचे? भगवान् शंकर सगुण साकाररुपाने कैलासावर बसल्याने मूर्तीरुपाने त्यांची उपासना करता येते.

वासुकी म्हणाला, तूं पवित्र झालास या नगरात मानवांना दुर्लभ अशा सुखाचा उपभोग घे. हे नगर अमृत आणि कल्पवृक्षांनी परिपूर्ण आहे. या नगरात रोगराई नाही, शोक नाही, भीती नाही, निद्रा नाही. अशा या नगरात तूं राहा.

चंद्रांगद म्हणाला, मी नदीत बुडून मेलो असे समजून माझ्या मातापित्यांना अनावर शोक होऊन ते मृत्युही पावतील. याच वर्षी माझा विवाह झालेला आहे. त्यामुळे माझ्या वियोगाने शोकार्त होऊन माझ्या वधूलाही मृत्यु येईल.

हे ऐकल्यावर वासुकीने सांगितले, असं असेल तर जा. आणि त्याला नाना रत्नालंकार व मनोवेगाने जाणारे दोन घोडे दिले. सोबतीला आपला मुलगा बरोबर दिला. हे सगळे घेऊन चंद्रांगद तिथून निघाला आणि कालिंदी नदीच्या तीरावर प्रगट झाला. तो सोमवारचाच दिवस होता. निस्तेज झालेली सीमांतिनी आपल्या सखींसह कालिंदीच्या किनाऱ्यावर आली होती. तिला पाहून चंद्रांगदाने विचारले, तूं कोणाची कन्या आहेस ? इतकी शोकार्त कां झाली आहेस ? सीमंतिनीने आपल्या मैत्रिणींना आपला सगळा वृत्तांत कथन करण्यास सांगितला. त्यांनी सांगितले, ही चंद्रांगदाची पत्नी आहे. चित्रवर्म राजाची मुलगी आहे. तिचा पती नाहीसा झाल्यामुळे दु:खी होऊन सोमवार व्रत करते व स्नान करण्यासाठी इथे आली आहे. हिच्या सासूसासऱ्यांना तुरुंगात ठेवून त्यांचा शत्रु राज्य करतो आहे. सर्व पीडा जावी म्हणून ही सोमवार व्रत करते आहे.

चंद्रांगदाला पाहून सीमंतिनी गोंधळली. तिला वाटले हा तर आपल्या पतीप्रमाणे वाटतोय पण पती कसा परत येईल. मग पतीचे रुप घेऊन एखादा धूर्त, यक्ष वगैरे तर नाही ना आला. तिला दु:ख झाले. चंद्रांगदाने तिला सांगितले, तुझा पती तुझ्या पुण्याईने तीन दिवसांनी परत येईल. आणि तो आपल्या नगराला निघून गेला. मी परत आलोय असे शत्रुला कळिवले. त्याच्या पित्याची शत्रुच्या कारावासातून मुक्तता केली. शत्रुचा पराभव करुन राज्य परत मिळवले. आपला नाहीसा झालेला मुलगा परत आलेला पाहून त्याच्या माता पित्यांना अत्यंत आनंद झाला. त्यांच्या डोळ्यात प्रेमाश्रु आले. चंद्रांगदाने त्यांना सर्व वृत्तांत सांगितला. प्रजेलाही आनंद झाला. त्यांनी सगळे नगर सजवले. त्यात चंद्रांगदाने प्रवेश केला. नंतर वासुकीच्या पुत्राचा योग्य तो आदर सत्कार करुन त्याला नागलोकाला परत पाठवला. आपल्या सासऱ्याच्या राष्ट्रात जाऊन आपल्या भार्येचाही शोक दूर केला. वासुकीने दिलेली बहुमोल रत्ने, अलंकार सीमंतिनीला दिली आणि पुढे पुष्कळ काळ इंद्राप्रमाणे राज्याचा उपभोग घेतला.

हा व्रताचा प्रभाव आहे. तेव्हां तूं हे व्रत कर, असे श्रीगुरुंनी त्या सावित्रीला सांगितले. त्याप्रमाणे तिने व्रत केले. दर वर्षी येऊन श्रीगुरुंचे दर्शन घेतले आणि त्यांच्या कृपेने व त्या व्रत प्रभावाने सावित्रीला सर्व सुखं मिळाली.

जगन्मंगल असणारा मंगलरुपी मानवांच्या उद्धारासाठी, त्यांच्यावर अनुग्रह करण्यासाठी मानवरुप धारण करुन आपल्या संचाराने पृथ्वीलाही पवित्र करणारे असे श्रीगुरु आहेत. त्यांनी आपली लीला (पाप दूर करणारी) प्रगट केली. **सुवासिनी स्त्रियांना पातिव्रत्य हाच धर्म आहे. दुसरा कोणचा धर्म नाही.** पती गेल्यावर शक्य असेल तर सहगमन करणे हाच मुख्य धर्म आहे. ते शक्य नसेल तर वैधव्य पालन करुन राहावे. पूर्वीच्या अध्यायात सांगितल्याप्रमाणे असे जर धर्म पालन केले तर अपुत्री स्त्रीलाही स्वर्ग प्राप्ती होते. व्रताचरण करुन उपासनेने स्त्रियांना मोक्षसुद्धा मिळू शकतो. पती मृत्यु पावल्यावरसुद्धा हा एक विषय आहे मुख्य. **स्त्रियांना कुठेच स्वातंत्र्य नाही असे नाही.** ह्या उपासनेने होते.

नामधारक म्हणाले, मोहरुपी अंधकारामध्ये माझे मन अहंकाराने व्यापून गेले आहे. बोधरुपी अर्कोदयाने जागे झाले.

सिद्ध म्हणाले, विष्णु म्हणजे व्यापक. अशा सद्गुरुंच्या विषयी तूं जागृत आहेस. ऐकणाऱ्याचीसुद्धा तृप्ती होत नाही. तुझ्यावर श्रीमत् भगवंतांचा, हरिचा प्रसाद आहे. एका ब्राह्मणाने प्रतिग्रहाने परान्न घेणे सोडले आहे. दैवाने मिळेल त्याचा उपभोग घेत असे. तो शांत, सत्यवादी, अनासक्त होता. त्याची स्त्री राक्षसी प्रवृत्तीची होती. सगळे लोक आपापल्या स्त्रियांसह दुसऱ्यांच्या घरांमध्ये पक्वान्न भोजन करुन उत्तम वस्त्र धन प्राप्त करुन घेतात. त्याची स्त्री आपल्या पतीची निंदा करु लागली. एका धनिकाने पतीसह तिला भोजनाला बोलावले. काम, क्रोध, लोभ रहित अशा त्या पतीने तिला जेवायला येत नाही असे सांगितले. मग तिने हे श्रीगुरु महाराजांना जाऊन सांगितले, ''मी दीन आहे, माझ्याकडे धड वस्त्रही नाहीत, पतीसह तो धनिक मला जेवायला बोलावतो आहे. पती यायला तयार नाही. त्याला आपण माझ्याबरोबर त्या धनिकाकडे यायला सांग.'' त्या स्त्रीच्या इच्छेप्रमाणे जेव्हां दत्तप्रभूंनी त्या ब्राह्मणाला जेवायला सांगितले तेव्हां तो म्हणाला तो परान्न घेत नाही. पण महाराजांची आज्ञा असेल तर तो जायला तयार आहे. त्या प्रमाणें तो जेवायला गेला. पण प्रत्यक्ष जेवायला बसल्यावर त्या स्त्रीला असे दृष्य दिसले की कुत्री आणि डुकरे त्यांच्या पंगतीत येऊन पानातले अन्न खात आहेत. हे पाहून त्या स्त्रीचे अन्नावरील मन उडाले. खिन्न होऊन ते दोघे महाराजांकडे आले.

महाराजांनी तिला विचारले, ''परान्न खायचे सुख तुला मिळाले का ?'' ती म्हणाली,

“महाराज माझ्या पतीचा माझ्यामुळे नियम मोडला. माझ्यामुळे त्यांना त्रास झाला. आपण मला क्षमा करा.” महाराज म्हणाले, “तुझ्या अज्ञानाने पतीचा नियमभंग झाला. यापुढे तूं पतीची आज्ञा कधी मोडू नकोस.” त्या ब्राह्मणाने विचारले, “महाराज, या दुष्ट पत्नीने माझा परान्न न घ्यायचा नियम मोडला. मी यापूर्वी कधीही परान्न घेतले नव्हते. हे माझे पाप कशाने जाईल ?” महाराजांनी सांगितले, “ह्या परान्न सेवनाचा तुला दोष लागणार नाही. आपल्या स्त्रीचे चित्त कधी दुश्चित करु नये. आता या पुढे ती कधीही परान्नाची इच्छा करणार नाही. आणि तूंही या पुढे कुठे जाऊ नकोस.”

यावर त्या ब्राह्मणाने महाराजांना विचारले, “**कोणाकडे अन्न घ्यावे व कोणाकडे घेऊ नये हे आपण मला समजावून सांगा.**”

महाराजांनी त्याला सांगितले, “एखाद्या शास्त्रीय कर्मासाठी ब्राह्मणच मिळाला नाही म्हणून जर ते कर्म बंद पडण्याची वेळ आली तर आपण अवश्य जावे. उलट अशा वेळी भोजनाला न गेल्याने कर्मलोप होण्याचा दोष येईल. उदाहरणार्थ श्राद्धादि कर्माला ब्राह्मण मिळाला नाही म्हणून ते श्राद्धच राहात असेल तर मात्र अवश्य भोजनास जावे. इतर वेळी केवळ पक्वान्न मिळते आहे. या रसाभक्तीने जर भोजन केले तर दोष येईल पण कर्मलोप टाळण्याच्या उद्देशाने जेवण केले तर तो दोष नाही.”

सदाचारी वैदिक ब्राह्मण, श्वसूर, स्वजन, आपले आजोबा वगैरेंच्या घरी भोजन केले तर दोष लागत नाही. **आचारहीन, स्वधर्म सोडलेला, संकटग्रस्त, कृपण, लोभी, अशौच असलेला, आपल्या गुरुजनांना दु:ख देणारा, अशा माणसाचे अन्न घेऊ नये. सतत परान्न सेवन केले तर सेवन करणाऱ्याचे सगळे पुण्य अन्नदात्याला जाते. आणि त्याचे पाप परान्न सेवन करणाऱ्याकडे येते. त्याचप्रमाणे आमंत्रणाशिवाय जाऊन परान्न सेवन करणाऱ्याचे पुण्य यजमानाला जाते आणि यजमानाचे पाप ह्याला लागते. अमावस्येच्या दिवशी परान्न घेतले असता सगळ्या महिन्याचे पुण्य अन्नदात्याला जाते. विवाहीत कन्येला मुलगा झाल्यानंतर तिच्याकडे अन्न घ्यावे. सज्जनांकडून दान घेण्यास हरकत नाही. तीर्थक्षेत्री किंवा ग्रहणाच्या वेळेस दान घेऊ नये. ते दान अति निंद्य समजले जाते. उदाहरणार्थ - महादान, तुलादान, वगैरे यज्ञ करुन शिल्लक राहिलेले अन्न घ्यायला हरकत नाही. आपत्काली दान घेतले तर जपाने त्याचा परिहार होतो, दोष दूर होतो.**

आपत्ती आणि अनापत्तीमध्ये योग्य आचार ठेवणाऱ्याला रोग, दारिद्र, ऋण यांच्यापासून कधीच पीडा होत नाही. या उलट स्वाचार सोडणारे लोक इह आणि परलोकात दु:ख भोगतात. आचार हाच आद्य धर्म आहे. श्रुती, स्मृती आणि पुराण या तिन्ही प्रमाणांनी सांगितलेल्या आचारधर्माचे पालन करणे मनुष्याला हितावह आणि सुख देणारे आहे. कर्माचरणाने श्रेष्ठत्व प्राप्त होऊन नंतर ज्ञान आणि शेवटी मोक्ष प्राप्ती होते. देश, कालोचित अशा आचार धर्माचे नेहमी पालन करावे. त्रैलोक्य स्थापन करणाऱ्या ब्रह्मदेवांनी सुद्धा लौकिक आचाराप्रमाणे वागावे, मनाने सुद्धा त्याचे उल्लंघन करु नये सांगतात. पंचमहायज्ञादि नित्यकर्मे कधीही सोडू नये.

ज्यांच्या मनांत पुष्कळ इच्छा आहेत त्यांनी काम्य कर्म करावी. पण ज्ञानी महात्मे कशाचीच इच्छा न करता शास्त्राने सांगितलेली कर्म करीत असतात. ब्रह्मीभूत जे ज्ञानी महात्मे आहे त्यांच्या व्यतिरिक्त इतर सर्वांनी नित्य नैमित्तिक कर्म कधी सोडू नयेत. वैराग्यसंपन्न महात्मे काम्यकर्म करायची इच्छाच करणार नाहीत आणि त्यांना त्याची आवश्यकता नाही. बुद्धिपूर्वक आणि दु:संगाने ज्याने कर्मत्याग केला आहे तो प्रायश्चित्त घेऊन शुद्ध होतो.

यजन, याजन म्हणजे पौरौहित्य करणे. अध्ययन आणि अध्यापन करणे. अध्यापन, याजन आणि प्रतिग्रह हे उपजीविकेकरता आहेत. ब्राह्मणांनी स्नान, संध्या, जप, होम, वगैरे सगळे आचरण करुन याजन, अध्ययन, अध्यापन करावे. तीन क्रिया सांगितल्या आहेत. वैदिक क्रिया, तांत्रिक क्रिया किंवा वैदिक - तांत्रिक क्रिया किंवा अशी मिश्र क्रिया करावी.

**जानवे जर खाली पडले असेल, तुटलेले असेल तर ते टाकून यथाविधि नवीन यज्ञोपवित ग्रहण करावे. किंवा चार महिने झाल्यावर नवीन यज्ञोपवित धारण करावे. ते धारण करताना ब्रह्मा, विष्णु आणि महेश्वर यांना नमन करावे. आपेहिष्ठा... या मंत्राने मार्जन करुन गायत्री जपाने प्रोक्षण करावे.**

अग्नी, मंत्र, दर्भ, आसन आणि द्विज हे एक कर्म झाल्यावर विसर्जित करावेत. तेच दुसऱ्या कर्मासाठी वापरु नयेत.

ऋषी, छंद आणि देवता यांचे ज्ञान करुन घेऊन जप करावा.

रात्रीचा शेवटचा प्रहार म्हणजे ब्राह्म मुहुर्त. त्या ब्राह्म मुहुर्तावर उठावे. करदर्शन, भूमी

पूजनाचा श्लोक म्हणून प्रात:स्मरण करावे. नैऋत्य दिशेला वर्जित स्थळ सोडून शौच्यास जावे. आल्यावर मृत्तिकेने हात धुवावेत. चूळा भराव्यात, दांत घासावेत, प्रात: स्नान पाणी आणि गोमयाने करावे. मध्यान्ह स्नान मृत्तिकेने करावे. संन्यासी आणि ब्रह्मचारी यांनी त्रिकाल स्नान करावे. सुवासिनी स्त्रियांनी रोज मस्तकावर पाणी घेऊन स्नान करु नये. गृहस्थांनी घरी स्नान करताना शीतोष उदक घ्यावे. आपोहिष्ठा....मंत्राने पोक्षण करुन संकल्पपूर्वक स्नान करावे. तर्पण, अघमर्षण वगैरेघरात स्नान करताना करु नये. मंगल स्नान दीपावली वगैरे प्रसंगाने करायला हरकत नाही. पण एरव्ही शास्त्राने सांगितलेल्या दिवशीच अभ्यंग स्नान करायला परवानगी आहे. शास्त्राने विधवा, भिक्षुक आणि संन्याशाला अभ्यंग स्नान वर्ज्य आहे. पण नरसोबा वाडीला मात्र दिवाळीत जे कोणी संन्यासी असतील त्यांना कट्ट्यावर अभ्यंग स्नान देवाबरोबर घालतात. विवाह वगैरे मंगल दिवशी थंड पाण्याने स्नान करु नये तर पुत्राचा वाढदिवस, पर्वकाल, संक्रांती आणि श्राद्धदिवशी उष्णोदकाने स्नान करु नये. वांती झाल्यावर, **अशुची स्पर्श झाल्यावर दु:स्वप्न दर्शन झाल्यावर, रतीनंतर तसेच स्मशानादि निषिद्ध स्थानी जाऊन आल्यावर स्नान करावे असे सांगितले.** नदीत स्नान करताना प्रवाहाभिमुख स्नान करावे. वस्त्र पिळताना त्याच्या दशा उत्तरेकडे करुन पिळावे. प्रात:स्नान हे शुद्धी करणारे आहे. जलस्नान शक्य नसेल तेव्हां गौण स्नानं करायला सांगितली आहेत. त्या नंतर भस्म धारण विधी सांगितला आहे. मग संध्यावंदन. प्रत्यक्ष पाणी घेऊन आचमन करणे हा एक प्रकार आणि जवळ पाणी नसताना उजव्या हाताने उजव्या कानाला स्पर्श करावा असा दुसरा प्रकार आहे. आचमन कधी करायचे ते समजून घेतले पाहिजे. स्नान, दान आणि देवतार्चनाच्या आधी आणि नंतरही दोन वेळा आचमन करावे. तसेच झोपेच्या आधी, नंतर, शिंक आल्यावर, अशुद्ध भाषण ऐकल्यावर, किंवा अशुद्ध भाषण केल्यावर आचमन करावे. **संध्यावंदन झाल्याशिवाय कोणचेच धार्मिक कृत्य करायचा अधिकार प्राप्त होत नाही.** आता पहाटे नक्षत्र असताना केलेली संध्या उत्तम, नक्षत्र लुप्त झाल्यावर केलेली मध्यम आणि सूर्योदयानंतर संध्या करावी लागली तर प्रायश्चित्त म्हणून चौथा अर्ध्य घ्यावा. याचा अर्थ रोज उशिर करायचा आणि चार अर्ध्ये देऊन मोकळे व्हायचे असा नाही. सूर्यास्तापूर्वी केलेली संध्या उत्तम, सूर्यास्तानंतर केलेली मध्यम आणि नक्षत्रे दिसू लागल्यावर केलेली संध्या अधम समजावी. त्यानंतर प्राणायाम. सर्व कर्मांमध्ये प्राणायाम करावा. मग मार्जन आणि अर्ध्य. गायत्री जप मनाचे संरक्षण करणारा आणि पाप घालवणारा आहे. जप हा मानसिक केलेला सर्वात उत्तम समजला जातो. जप करताना माळ हातातून पडली

किंवा झोप आली तर प्रायश्चित्त म्हणून अधिक जप करावा. जप करताना दृष्टी नासाग्री असावी. गृहस्थाने १०८ वेळा गायत्री जप करावा. प्रसंगाने तो शक्य नसल्यास २८ किंवा १० तरी करावा. **पैसे घेऊन दुसऱ्याकरता गायत्री जप करु नये. ह मुद्दाम सांगितले आहे**. संध्या झाल्यावर गुरुंना अभिवादन करावे ते करताना **प्रथम आपल्या डाव्या हाताने कानाला आणि उजव्या हाताने डाव्या कानाला स्पर्श करावा.** आणि नंतर गुरुंच्या उजव्या पायाला आपल्या उजव्या हाताने आणि डाव्या पायाला डाव्या हाताने स्पर्श करुन वंदन करावे याला अभिवादन म्हणतात.

आपल्यापेक्षा वयाने लहान असलेल्या व्यक्तीला नमस्कार करु नये. पण जर ती वयाने लहान असलेली व्यक्ती ज्ञानाने थोर असली तर नमस्कार करायला हरकत नाही. अशौच असलेल्या व्यक्तीला नमस्कार करु नये. त्याच प्रमाणे आपल्याला अशौच आल्यावरही कोणाला नमस्कार करु नये. जे यज्ञ यागादि कर्म करताहेत त्यांना नमस्कार करु नये. विवाहानंतर स्मार्तािग्न घ्यावा. गृह्यसूत्रात सांगितल्याप्रमाणे होम करावा. पंचमहायज्ञ नित्य करावेत. कांही तरी दान नेहमी करावे. अमूक एकच दान द्यायला पाहिजे असे नाही. एखादे फल किंवा साधी सुपारीही चालते. नित्य कर्म झाल्यावर विष्णुचे स्मरण करावे म्हणजे आपल्या कर्मातील न्यूनता दूर होते.

नेहमी दुसऱ्याच्या घरी राहिले तर आपली लक्ष्मी जाते. घर गोमयाने सारवावे. गुरु, सूर्य, अंबु, अग्नी, तीर्थजल, आपल्या इष्ट देवाची मूर्ती अष्टविध प्रतिमा वगैरे पूजा केली तरी ईश्वराची पूजा होते. किंवा वेदज्ञ विप्राचेही अर्चन करावे. कलियुगात शाळीग्रामात विष्णुंचे सान्निध्य असल्यामुळे त्याचीही पूजा करावी. ज्याची पूजा केली जाते ती देवता प्रसन्न होते.

**देवाचे सान्निध्य ३ कारणांनी होते.**

१. भक्तांच्या तपोयोगाने, अर्चकाच्या तपामुळे

२. उत्तम प्रकारे अर्चन केले तर आणि

३. मूर्ती अथवा प्रतिमा सुंदर असली तर

पूजेला देवाच्या समोर बसावे. उजव्या हाताला पाण्याचा कलश ठेवावा. थोडे पाणी शंखात घेऊन पूजा स्थानात सर्वत्र शिंपडावे. आपल्या अंगावर तसेच पूजा सामुग्रीवरही प्रोक्षण करावे. यामुळे भूशुद्धी आणि भूतशुद्धी होते. त्या नंतर न्यास करावेत -

समंत्रक, कर, अंघ्रि, नाभि, हृदय, ग्रीवा, द्रोहो, मुखाक्षी हे पुरुष सूक्त मंत्राने न्यास करावेत. न्यास केल्यामुळे अर्चक देव होतो असे म्हणतात. पाद्य, अर्ध्य, आचमनीय हे तीन आपण त्या त्या वेळेस पळीने घालतो, पण ह्या ३ पात्रात अगोदर पाणी घालून ठेवावे. पाद्याकरता एक पात्र असावे. अर्ध्याचे पात्र प्रसिद्ध आहे.आणि आचमनाकरता एका भांड्यात पाणी घ्यावे. असे वस्तुत: आहे. नंतर ती प्रतिमा देवरुपच आहे असे समजून अर्चन करावे. सध्या मंत्र आणि तंत्र अशी संमिश्र पूजा आहे. सोळा मंत्रांनी सोळा उपचार भक्तीने अर्पण करायचे. स्त्री, शुद्र वगैरेंनी पौराणिक मंत्रांनी पूजा करावी. जर शक्य असेल तर स्नान झाल्यावर पंचामृत द्यावे. गंध अर्पण केल्यानंतर निरनिराळे अलंकार, भोग वगैरे द्यावे. आसनाकरता चातुर्विध अन्न द्यावे. आरंभाला घंटानाद करावा, स्नानाच्या वेळेस करावा, धूपदीप अर्पण करताना घंटानाद करावा. स्नान केल्यावर आचमन द्यावे. नैवेद्य दाखवल्यावर आणि वस्त्र अर्पण केल्यावर ही आचमन द्यावे. स्नानाच्या वेळेस शिवलिंग सोडून इतर देवांना शंखजल घातले तरी चालेल. महादेवांना मात्र घालायचे नाही. आपल्या घरातल्या बागेतून आणलेले पुष्प हे उत्तम. अरण्यातले मध्यम. आणि विकत घेऊन आणलेले हे अधम. निळे, लाल आणि शिळे फूल पूजेला वर्ज्य. तसेच सच्छिद्र व किड्यांनी खाल्लेले फूलही वर्ज्य आहे. आपोआप झाडावरून गळून पडलेली फुले घेऊ नयेत. डाव्या पायाचा किंवा डाव्या हाताचा स्पर्श फुलाला झाल्यास पाण्यात भिजवून घ्यावीत. कोभिदार, अर्क, धतु: कूटजै: ही फुले विष्णुंना वाहायची नाहीत. शंकरांना केवडा, बिल्व आणि श्वेत पुष्पे प्रिय आहेत. गणेशांना दूर्वा तर विष्णूना तुळस प्रिय आहे. श्रद्धेने केलेल्या पूजेने देव संतुष्ट होतो.

पूजेमध्येच पुरुष सक्ताने हवन करावे. प्रत्येक ऋचेने फुल अर्पण करावीत. आणि प्रार्थना करावी. नंतर यथाशक्ती गुरु मंत्राचा जप करावा. ब्राह्मणेतरांनी नाम संकीर्तन, श्रवण करावे. देवाचे चरण तीर्थ घ्यावे. ते प्रथम मस्तकावर धारण करावे. मग प्राशन करावे. मग अध्ययन करावे. **अध्ययन, अध्यापन, तदर्थ विचार आणि प्रवचन असे चार प्रकारचे अध्ययन आहे**. पुन्हा कांही मंत्रांची आवृत्ती करायची. त्याच्या अर्थाचा विचार केला. आणि प्रवचनाद्वरा स्पष्टीकरण करायचे. आपल्या वर्णाप्रमाणे उपजिविकेचे साधन सांगितले असेल त्याप्रमाणे उपजिविका करुन आपल्या पोष्य वर्गाचे पोषण करावे. पोष्य वर्ग म्हणजे अग्नी, धेनु, अतिथी पितर, पुत्र आणि भार्या.

मोठी आपत्ती आली असताना अनिंद्य वृत्तीने जीवन कंठावे. हीन म्हणजे सेवा/नोकरी

करुन जीवन कंठू नये. ब्राह्मणाला दान द्यायला परवानगी आहे. शिकवणे किंवा याजन म्हणजे दुसऱ्याकडून यज्ञयाग करुन घेणे अथवा आयाचित वृत्ती धारण करुन राहावे. यावर म्हणजे कोरान्न भिक्षा मागून आणून निर्वाह करावा. शील म्हणजे शेतात किंवा दुकानात पडलेले धान्याचे दाणे आणून ते शिजवून खावेत. पण कलियुगात हे वर्ज्य आहे. कलियुगात संग्रह करावा धान्याचा. तीन दिवस पुरेल, दुसऱ्या दिवसापर्यंत पुरेल एवढ्या धान्याचा संग्रह कलियुगात ब्राह्मणाने करु नये म्हणतात. रोज धान्य भिक्षा मागावी. बारा दिवस पुरेल एवढे धान्य संग्रह कलियुगात निषिद्ध आहे. पूर्वी हे सगळे होते. सहा दिवस पुरेल एवढे धान्य संग्रही ठेवायला हरकत नाही. जर यावर उदर निर्वाह झाला नाही तर क्षत्रिय अथवा वैश्य वृत्तीने राहाण्यास हरकत नाही. द्रोणाचार्यांनी क्षात्र वृत्ती घेतलीच होती. काय करणार मग ? त्यामुळे क्षत्रिय त्यांच्यावर रागावले होते.

नंतर मध्यान्ह संध्या. ब्रह्मयज्ञ करताना डाव्या मांडीवर उजवा पाय ठेवावा. हातामध्ये कुश आणि पाणी घेऊन डाव्या मांडीवर ठेवायचा. पाणी न घेता दर्भ घेऊनही ब्रह्मयज्ञ करता येतो. ओंकार आणि व्याहृतीसहित गायत्रीजप करावा. नंतर सांगवेदाचे पठण करावे. नंतर तर्पण करावे. अक्षता घेऊन देव आणि ऋषी यांच्या नावे तर्पण करावे. पितरांना तिलाने तर्पण करावे. आपल्या गृह्यसूत्रात सांगितल्याप्रमाणे,

कर्म म्हणजे संध्यावंदन, **अशौचामध्ये संध्या, अग्नी उपासना वगैरे सोडून मानसिक कर्म करावे.** यम, अग्नी, आणि पितृ - भरणी, कृत्तिका, मघा नक्षत्र, प्रतिपदा, षष्ठी, एकादशी, रविवार, आपली जन्मतिथी, घरात मंगलकार्य असेल त्या वेळेला तसेच विवाह झाल्यावर तिलतर्पण करु नये. श्राद्ध वगैरे सोडून इतर वेळेला मात्र तिलतर्पण करावे. उपनयन झाल्यावर सहा महिने तिलाने तर्पण करावे. नरक चर्तुदशीच्या दिवशी यमतर्पण करावे. यमतर्पण आणि भीष्मतर्पण जीवत्पिता असला तरी करायला हरकत नाही. अमा, युग, क्रांती-संक्रांत - वैधृती, व्यतिपात, महालय, अष्टका, अनष्टका, उर्वेघ अशी ९६ श्राद्ध आहेत आणि **नैमित्तिक श्राद्ध** म्हणजे गया वगैरे क्षेत्री गेल्यावर करायची श्राद्ध.

पुत्राला पुत्रत्व तीन कारणांनी येते. जिवंत असेपर्यंत त्याची आज्ञा मान्य करणे, श्राद्धाच्या वेळेस भूमी भोजन देणे आणि गयेला पिंडदान करणे. ही पुत्राची तीन कर्म आहेत. देवयज्ञ, भूतयज्ञ आणि पितृयज्ञ असे वैश्वदेवामध्ये तीन यज्ञ असतात. अग्नीमध्ये आहुती टाकून देवयज्ञ होतो. बली आहुतींनी भूतयज्ञ होतो आणि पितरांना आहुती देऊन

पितृयज्ञ होतो. स्वाध्यायामध्ये ब्रह्मयज्ञ केला जातो. मनुष्य यज्ञ धरुन पंचमहायज्ञ होतात. जाते, उखळ, घागर आणि झाडणे यांच्यामुळे पांच हिंसा होतात. या हिंसामुळे जीवाला स्वर्ग प्राप्ती होत नाही. त्यांचा परिहार व्हावा आणि आपल्यावर चांगले संस्कार व्हावेत म्हणून वैश्वदेव करावा. भूतांसाठी घराच्या बाहेर बलीचे घास काढून ठेवावेत. कोणाही अतिथीला ईश्वर समजून यथाशक्ती अन्न द्यावे. यतीला भिक्षा देताना प्रथम अंबु द्यायचे नंतर भिक्षा घालायची परंतु अंबु द्यायचे. अतिथीला अन्न थोडे दिले तरी अग्नीप्रमाणे असते तर थोडे जल दिले तरी सिंधुप्रमाणे असते. वैश्वदेवाच्या अग्निकुंडासमोर दिलेले बलीचे घास उचलून बाहेर नेल्याशिवाय जेवू नये. ते बलीचे घास आपण स्वत:च्या हाताने काढू नये. घरातल्या कोणाला तरी काढून बाहेर नेऊन ठेवण्यास सांगावे. हे सर्व झाल्यावर आपल्या पोष्यवर्गासह भोजन करावे.

आता भोजन विधी सांगितला आहे. गायत्री मंत्राने अन्नावर प्रोक्षण करावे. हात, पाय आणि अस्य हे आर्द्र असावेत. उजव्या हाताला चित्राहुती द्याव्यात. 'अहं वैश्वा नरोभूत्वा' या मंत्राचे स्मरण करावे. आपोशन घ्यावे. प्राणमंत्राने भोजनाला सुरवात करावी. हे सर्व मंत्र शास्त्रात सांगितले आहेत. एकादशीच्या दिवशी दोन वेळेस तर रविवार, अमावस्या वगैरेदिवशी रात्री जेवू नये. चर्तुदशी व अष्टमीच्या दिवशी दिवसा जेवू नये. प्राणाहुति घेतल्या नंतर पात्र धरावे आणि मौन धरावे शेवटपर्यंत धरले तरी हरकत नाही.

आता भोजनाला पात्र कोणचे असावे हे सांगताहेत. सुवर्ण, ताम्र, पत्रावळ वगैरे जेवण्यास घ्यावे. भूमीवर मंडल करुन त्यावर भोजन पात्र ठेवावे. विधवा, ब्रह्मचारी आणि संन्यासी यांनी तैजस पात्रात जेवावे. वल्ली, पलाश, पत्र, अर्क या पात्रात जेवण करु नये. जेवताना पाय पसरुन जेवू नये. बालकाला घेऊन जेवू नये. विवाहा शिवाय वधूला घेऊन जेवू नये. विवाहाच्या वेळेस ते बरोबर असले तर चालतात. दुर्जनांच्या पंगतीला बसून जेवू नये. अपरिचिताबरोबर भोजनाचा प्रसंग आलाच तर आपल्या आणि त्यांच्या मध्ये पाणी शिंपडून पंगती भेद करावा. पाकगृहामध्ये जेवू नये म्हणतात. तसेच अग्नीगृहात, देवघरात व असत् घरात जेवू नये. रात्र फार झाली असतानाही जेवू नये. रजस्वला स्त्रीची दृष्टी पडलेले अन्न, केस पडलेले अन्न सेवन करु नये. वाईट, स्थानात पिकवलेले धान्य भाजी वगैरे असत् अन्न असते ते घेऊ नये.

गाय, म्हैस यांचे दूध सत् म्हणजे चांगले असते. शेळी, वगैरे प्राण्यांचे दूध मात्र असत् असते ते घेऊ नये. **कांचेच्या भांड्यातून पाणी किंवा इतर द्रव पदार्थ सेवन**

**करु नये ते सुरापानासमान आहे.** तांब्याच्या भांड्यात गाईचे दूध ठेवले तरी ते अशुद्ध होते. दही आणि गूळ एकत्र घेऊ नये. केवळ मीठ वाढायचे नाही. म्हणून शेवटी वाढतात. श्वान, रजस्वला, पतितादिंचा शब्द कानावर पडल्यानंतर किंवा त्यांचे दर्शन झाल्यानंतर जेवण सोडून उठावे. तसेच पंगतही मध्ये सोडून कोणी उठला तर बाकीच्यांनी भोजन करु नये. उखळ, जाते वगैरेंचा ध्वनि ऐकल्यावर जेवू नये. तो थांबल्यावर जेवावे. आपले उच्छिष्ट ताटात सोडू नये. जेवताना प्रसन्न चित्त असावे.

संन्याशाने आठ घास भोजन करावे. वानप्रस्थाश्रमी लोकानी सोळा. गृहस्थाश्रमी लोकांनी बत्तीस घास घ्यावे. ब्रह्मचाऱ्याने आपल्याला पाहिजेत तेवढे घास घ्यावेत.

मधुर आणि द्रव प्रथम घ्यावे. आम्ल व कठिण पदार्थ जेवणाच्या मध्ये घ्यावेत आणि द्रव आणि पित्तादि पदार्थ शेवटी घ्यावेत. सर्व अन्नातला थोडा शेष ठेवावा. खीर, तूप आणि मीठ मात्र शिल्लक ठेवू नये. ते सर्वच्या सर्व खावे किंवा हाताला चोळावे. ते सोडून बाकी सर्व शेष ठेवावे. एकादशीच्या दिवशी भोजन करायचे नाही. रविवारी, अमावस्या किंवा पोर्णिमेला रात्री जेवायचे नाही. चतुर्दशी, अष्टमीला दिवसा जेवायचे नाही. उच्छिष्ट शेष राहिले अन्न भूमीवर एका बाजूला ठेवायचे, (ताटाच्या बाजूला किंवा ताटात). अगोदर आपोशन घ्यायचे आणि त्या आपोशनातले राहिलेले थोडे पाणी त्या काढून ठेवलेल्या भागावर अंगठ्याने सोडावे. त्यावेळी रौखे. हा मंत्र म्हणावा. (हा मंत्र द्विसाहस्त्रीत दिला आहे.) **आमच्या गोत्रातल्या कोणाला अन्न मिळाले नसेल त्याला हे अन्न मिळावे असे या मागचा संकेत आहे.**

हस्त, मुख आणि पाय हे धुवून हातात पाणी घेऊन ते चोळायचे ते डोळ्यांना लावायचे म्हणजे दृष्टी चांगली राहाते. (हे मंत्रही द्विसाहस्त्रीत दिले आहेत.)

तांबूल सेवन करायला सांगितले आहे. विडा तयार करण्यासाठी ५, ३ किंवा १ पान घ्यावे. विधवा आणि संन्यासाने तांबूल भक्षण करु नये. पानाचे देठ आणि शिरा काढाव्यात.

त्या नंतर दिवसभरात जो वेळ मिळेल त्यात पुराणादिकांचे मनन करावे. जेवण झाल्यावर एक प्रहराने निजावे. दोन प्रहर झोप घ्यावी. सर्व कर्म विष्णुंना अर्पण कराव्यात. कर्मयोग संपला. आता फारसा नाही.

श्लोक

सुमुहूर्तावर केलेल्या खाटेवर निजावे.

सुमुहूर्तकृतेतल्पेस्तुतन्निद्सुखशाय्यहीन्।
अगस्तिर्माधवश्चैवमुचकुंदोमहामुनि:।
कपिलोमुनिरास्तीक: पंचैतेसुखशायिन: ।।१८७५।।

हा श्लोक म्हणून रात्री झोपावे. सकाळी, मध्यान्ह काली आणि संध्याकाळी निजू नये. भस्मावर, धान्यावर, देवालयामध्ये आणि गोठ्यामध्ये निजू नये. स्मशान, रस्ता, वारुळ किंवा भयानक प्रदेश असेल त्या ठिकाणी निजू नये. उत्तरेकडे डोके करुन निजू नये. देवगुरुंच्यापेक्षा उच्च स्तरावर निजू नये. प्रवासात पूर्वेकडे पाय करुन निजू नये.

सकाळचे किंवा दिवसाचे जर एखादे नित्यकर्म कांही अडचणींमुळे राहिले असेल तर ते रात्रीच्या पहिल्या प्रहरात करावे. आणि रात्रीचे कर्म मध्य रात्री १२ वा. पर्यंत करायला परवानगी आहे.

सौरजप आणि ब्रह्मयज्ञ रात्री करु नये. संकटकालामुळे एखादे दिवशी एखादे वेळेला कर्मच घडले नाही तर प्रायश्चित्त घ्यावे. कर्म वैगुण्यादिक दोष असताना म्हणजे एखादेवेळी कर्म पूर्ण झाले नाही, संक्षेपाने झाले किंवा कर्म अजिबातच झाले नाही तर यथावत् प्रायश्चित्त घ्यावे. त्याशिवाय शुद्धी नाही.

ऋतु दर्शनानंतर चार दिवसांनी शुद्ध झालेल्या पत्नीबरोबर चांगल्या नक्षत्रावर समागत करावा. पहिल्या चार रात्री, श्राद्धाच्या आधीचा आणि श्राद्धाचा दिवस, एकादशी वगैरे दिवशी समागम करु नये. जन्मतिथी, चतुर्दशी, अष्टमी, रेवती, मघा या दिवशीही करु नये. दहा वर्षानंतर मुलगी रजस्वला होऊ शकते म्हणून त्यापूर्वी तिचा विवाह करावा. ऋतु (म्हणजे शास्त्राने सांगितलेल्या दिवशी) गमन करणारा नेहमी ब्रह्मचारीच राहातो. मनामध्ये द्वेषादिक ठेवून जो समागम करणार नाही आणि ऋतो समागम करणार नाही तो भ्रूण हत्या करणारा म्हणतात. ऋतुकालात बाहेरगांवी जाणाराही भ्रुणहत्या करणारा ठरतो. वंध्या स्त्री किंवा जिला लहान मूल आहे तेव्हां प्रवासाला जायला हरकत नाही. सोळा दिवस ऋतु असतो. असम दिवशी गमन केल्यास कन्या आणि सम दिवशी गमन केल्यास मुलगा होतो. गमन करण्याच्या वेळेस स्त्रीपुरुषांच्या राजस, तामस, सात्विक भावना जशा असतील त्यांच्याप्रमाणे बालकाचे चित्त तयार होते. म्हणून गमन

काली शुद्ध सात्विक भावना असावी.

मातापित्यांचे संरक्षण करणारा तो सत्पुत्र आणि ज्यांना पुत्र नाही त्यांचा अध:पात होतो - अज्ञानी मातापित्यांचा - हा सिद्धांत ज्ञानी माणसाला लागू नाही. पितरांना तारणार एकच. पुत्र सत्पुत्र असतो, ध्रुवादिकांप्रमाणे. धृतराष्ट्राला शंभर दुष्ट मुले झाली. त्यांच्यासारखी प्रजा वाढून उपयोग काय ?

असा हा ब्राह्मणाचा आचारधर्म पराशरांनी सांगितला. विचार आणि आचार घेऊन कर्म करणारा सुखी होतो.

अनाचारस्तुमालिन्यमत्याचारस्तुमूर्खता
विचाराचारमादायकर्मकुर्वन्सुखीभवेत् ।। १८ ८६ ।।

अनाचार म्हणजे कांही करायचेच नाही विधिनिषेधाचे पालन, वाटेल तसे वागायचे. कोणत्याही गोष्टीचा अत्याचार म्हणजे अतिरेकही करणे चांगले नाही. आचारधर्माचे पालन करणाऱ्याला इह लोकातील आणि परलोकातील सिद्धी मिळते. सर्व साधारणपणे कोणत्याही आचारहीन माणसाला दंड केला पाहिजे पण विशेषत: आचारहीन ब्राह्मणाला दंड केला पाहिजे.

गुरुमुखातून असे आचारधर्माचे ज्ञान प्राप्त करुन घेणारा इहलोकात इष्ट सुख घेऊन मोक्षाला प्राप्त झाला. कलियुगात लुप्त झालेला आचारधर्म दत्त प्रभूंनी या निमित्ताने प्रगट केला.

ज्ञानप्राप्ती होऊन लवकर सिद्धी व्हावी म्हणून महाराजांनी भक्तीयोग प्रगट केला. चित्तशुद्धी करता कर्मकांड सांगितले.

नामधारक उवाच ।।

कर्मयोगंज्ञानयोगसहायंचित्तशोधनं ।।
उत्कापिभगवान्कस्मात्कर्मयोगंजगौवद ।।१९ १ ।।

एवंपंचभिरध्याये:प्रोक्तानित्यक्रियायया ।। टीका

आत्तापर्यंत पांच अध्यायात नित्यकर्म सांगितली.

पवित्रत्वंयोग्यताचनान्यथेर्हाद्द्विजन्मन: ।

ज्या कर्माने पवित्रत्व येते, द्विज पवित्र होतो, त्याचे चित्त शुद्ध होते, आणि ज्ञान योग्यता मिळते, त्या कर्माचे सर्व ज्ञान या आधी दिले.

श्रद्धाभक्तिध्यानयोगादवोहीतिश्रुतेरियं।
शुद्धान्त:करणआनांचध्यानार्थभक्तिरुच्यते ।२। टीका

श्रद्धा, भक्ती आणि ध्यानयोगाने ज्ञान करून घे, अशी श्रुती आहे. म्हणून कर्मयोगाने आचरण करून ज्यांचे अंत:करण शुद्ध झाले आहे त्यांना ध्यान करता यावे म्हणून भक्ती सांगितिली आहे.

ऊनविंशेन्नपूर्तिवंध्याया:पुत्रसंम्भव:।
कश्यतेशुष्ककाष्ठस्य विस्तारश्चद्विजोद्धृति: ।।३।। टीका

ह्या एकोणिसाव्या अध्यायात, अन्नपूर्ति-भास्कर ब्राह्मणाची कथा- वंध्येला पुत्र झाला. आणखी शुष्क काष्ठाचा विस्तार होऊन ब्राह्मणाचा उद्धार झाला, हे सिद्ध सांगताहेत.

पूर्वकाण्डेसा रंसद्‌गतिदंवक्ष्ये सुखदस्तूभयत्रस:
उभर्यासिद्धिभाजस्तेय:आचा रंचरत्यमुमित्यादि
भिर्मोक्षमुत्कापिकिमर्थंभक्तियोगंतताने-
पितृच्छतिकर्मयोगमिति ।।१।। - टीका

कर्मानेच मोक्ष मिळतो असे तुम्ही पूर्वी सांगितलेत मग पुन्हा भक्तीयोग कशाला सांगता, असे नामधारकाने विचारले.

सिद्ध सांगतात, नामधारका, भक्तीयोग सगळ्यात उत्तम आहे. कर्मज्ञ असून जो भक्त नाही त्याचे कर्म फुकट जाते.

कर्मज्ञ आहे पण जो भक्त नाही त्याचे कर्म फुकट जाते. फलाची अपेक्षा न ठेवता ईश्वरार्पण बुद्धीने स्वाश्रमोचित कर्म घडली पाहिजेत हे प्रथम सांगताता. त्या नंतर संत महात्म्यांची सेवा केल्याने त्यांची कृपा होते. सज्जनांच्या धर्माबद्दल श्रद्धा उत्पन्न होते. नंतर भगवत् कथा ऐकायला मिळतात. त्यामुळे भगवंताबद्दल प्रेम उत्पन्न होते. त्यापासून स्थूल, सूक्ष्म देहापेक्षा आपण वेगळे आहोत हे ज्ञान उत्पन्न होते. पुढे दृढ भक्ती निर्माण होते. आणि मग भगवंताचे ज्ञान होते. शेवटी तो भगवत् स्वरूप होतो. असा क्रम आहे. अशी भक्तीची सर्व साधने त्यांनी सांगितली.

मग कर्मही तसेच आहे की ! असे नामधारक म्हणाल्यावर सिद्ध सांगतात, नाही कितीही तत्वज्ञान संपन्न मनुष्य असला आणि त्याने कितीही कर्म केले तरी ते व्यर्थ जाते भक्ती नसेल तर. नामधारक विचारतात, कर्माने पितृलोक मिळतो ना मग तुम्ही ते व्यर्थ गेले असे कसे म्हणता ? मोघ याचा अर्थ कांहीच फल नाही असा नाही. पण अशा भक्तीविरहित कर्माने मोक्षाचा लाभ होणार नाही. ही निरर्थकता आहे. नुसते कर्म करून पितृलोकाला गेला, पुन्हा इथे जन्मला हे काय करायचय ? पितृलोकाची प्राप्ती हे फल तसे नश्वरच आहे. इथे भूलोकावर जसे कर्माने मिळालेले फल संपून जाते तसे पितृलोक प्राप्ती हे सुद्धा ठराविक कालच टिकणारे फल आहे. भगवंताच्या प्रसादाने मिळालेले ज्ञान हे फल हे मात्र नित्य आहे.

मोक्ष हा भक्तीनेच प्राप्त होतो. चित्तशुध्दीला प्रधान असलेले कर्मकांड सांगून नंतर भक्तीयोग सांगितला. आता महाराज म्हणतात तीन उपाय आहेत. **कर्म, भक्ती आणि ज्ञान असे परस्परांना सहाय्यक असे तीन योगमार्ग आहेत. हे तीनही योग आचरण केले पाहिजेत. कोणत्याही एकाचे आचरण करून ब्रह्मप्राप्ती होत नाही.** आगमयुक्त आचार्य प्रसादाने अपरोक्ष ज्ञान, आत्मज्ञान उत्पन्न होईल. पण वाक्यापासून ते ज्ञान जरी झाले तरी ब्रह्माबद्दल असंभावना, विपरित भावना, ब्रह्म आणि मी वेगळा आहे असे समजणे, यामुळे चित्तशुद्धी न होता शब्दज्ञान आच्छादित होते. मलीन चित्ताला ते ज्ञान परोक्ष भासते. अपरोक्ष संस्कार आणि अपरोक्ष भ्रम; द्वैतभ्रम प्रत्यक्ष आहे. तो घालवण्यासाठी प्रत्यक्ष आत्मज्ञानच झाले पाहिजे. परोक्ष ज्ञानाचा इथे उपयोग नाही. भगवंताच्या भक्तीने चित्तशुद्धी होते आणि त्याच्या प्रसादाने अपरोक्ष ज्ञान होऊन मोक्ष अनायासे हातात येतो.

भक्त श्रद्धाळू आणि सात्विक पाहिजे. असा भक्त भगवंताला अत्यंत प्रिय असतो. भक्तीरहित कर्म करणारा मात्र जन्म मरणाच्या फेऱ्यात परत परत सांपडतो. कर्म चाललयं. चालणं, बोलणं, विचार करणं वगैरे ती सर्व आत्म्याचीच कर्म आहेत असे वाटते. पण ही आत्म्याची कर्म नाहीत. कारण आत्म्याला कोणचाच विकार नाही. क्रियाच नाही. चेतन आत्म्याच्या सानिध्यामुळे मन, बुद्धी, इंद्रिये वगैरेंना क्रिया उत्पन्न होतात. अचेतन इंद्रियांकडून आपोआप क्रिया होत नाहीत. पण त्याच्या सान्निध्यामुळे जरी अशा क्रिया झाल्या तरी ते त्याचे कर्म नाही ना ! क्रिया देहेंद्रियादिकांच्या आहेत. इंद्रिय, बुद्धी वगैरेंच्या क्रियांचा संबंध आत्म्याच्या ठिकाणी नाही. हे लक्षात घ्यावे.

वस्तुत: ते कर्म करीत नाहीयेत. जडाला कर्म करण्याची योग्यताच नाही. पण ती इंद्रियं आत्म्याच्या सान्निध्याने कर्म करताहेत. पण ते जड असल्यामुळे त्यांना कर्म नाही असे कोणीही म्हणेल. पण तिथे कर्म दिसते आणि आपल्याला वाटते हे देहेंद्रियादिकच सर्व कर्म करतात. त्यामुळे मला कर्माचे बंधन नाही. असे चिंतन करुन जीव मुक्त होतो.

श्रीगुरु भक्तीयोगगम्य आहेत. ते कसे ते ऐक. ते ऐकल्यानंतर त्या भगवंताच्या चरणी दृढ भक्ती निर्माण होईल. (मोठ्या महाराजांनी खालच्या टीकेमध्ये भक्ती शब्दाचे पुष्कळ अर्थ दिले आहेत.) ईश्वरानुरक्ती हा एक भक्ती शब्दाचा अर्थ आहे. ज्या अवस्थेमध्ये जीवेश्वरु भज्यते, विभक्त राहातात ती एक साधनभक्ती आहे. भजनालाच भक्ती म्हणतात. जीव आणि ईश्वर ज्या अवस्थेमध्ये सोयीकरता विभक्त केले जातात. मी भजन करणारा आहे, तो सेव्य आहे मी सेवक आहे. असं मानलं जातं. ती ही भक्तीची अवस्था. किंवा ज्या भक्तीमुळे कामकर्मादि सर्व दोष जातात. असे वेगळे वेगळे अर्थ होतात. ती अशी भक्ती उत्पन्न होते.
सशिष्य गुरुंना रोज एका शिष्याने भिक्षा केली. एके दिवशी भास्कर नांवाचा भक्तीमान् ब्राह्मण तिथे आला. तीन माणसांना पुरेल एवढा शिधा घेऊन भास्कर गुरुंना भिक्षा देण्याच्या उद्देशाने आला. पण तीन महिने इतर कोणा कोणा भक्तांच्या भिक्षांचे दिवस लागले असल्याने या भास्कराला मोकळा दिवस मिळाला नाही. पण रोज त्याला गुरु महाराजांच्या बरोबर प्रसाद भोजन मिळत असे. पण तो कांही जेवण्याच्या उद्देशाने आलेला नव्हता. पण बाकीचे लोक उपहासाने म्हणू लागले की भास्कर ब्राह्मण सांगताना जरी सांगतो की तो श्रीगुरुंना भिक्षा करायला आला आहे तरी प्रत्यक्ष भिक्षा न करता फुकटचे खाऊन स्वत:चे पोषणच करतो आहे. ही गोष्ट महाराजांच्या कानावर गेली. **श्रीगुरुंना भक्तीयोग सर्वांना दाखवायचा आहे**. एक दिवस महाराजांनी भास्कराला सांगितले, “आज सर्व शिष्यांसहीत आम्हाला भिक्षा करा.” ते ऐकून भाजी, दुध, साखर वगैरे आणून तो स्वैंपाक करू लागला. त्याच दिवशी दुसरा एक श्रीमंत माणूस भिक्षा करण्यासाठी आला. त्याला दुसऱ्या दिवशी भिक्षा करण्यास सांगितले.

महाराजांनी भास्कर ब्राह्मणाला गांवातल्या सर्व माणसांना प्रसाद भोजनाला बोलावण्यास सांगितले. भास्कराने त्याप्रमाणे गांवातील सर्वांना आमंत्रण दिले. ते लोक म्हणाले, तू तिघांचा शिधा आणून स्वैंपाक केला आहेस त्यातील अन्नाचा एकेक कण तरी आमच्या

वाटेला येईल का ? एवढा बोलावतो आहेस तो. याच्यावर महाराजांनी बरीच टीका लिहिली आहे. आधी ज्या ब्राह्मणाने त्या दिवशी भिक्षा करायचे नक्की केले असता महाराजांनी ते उद्यावर ढकलून भास्कर ब्राह्मणाला मध्येच भिक्षा करायची परवानगी कशी दिली, असा प्रश्न आहे. त्याचे उत्तर असे की महाराजांना विधी वगैरे नाहीये. **ज्ञानी पुरुषानेसुद्धा विधीचे अतिक्रमण केले तरी त्याचा ज्ञानभंग होत नाही.** त्या ब्रह्मज्ञानी पुरुषाचा महिमा कायम असतो तो वाढतही नाही किंवा कमीही होत नाही. पण मग ज्ञानी मनुष्य असा वागायला लागला तर शिष्यही तसेच वागतील. पण याचे उत्तर असे की **ज्ञानी पुरुषाचे चांगले आचरण जेवढे असेल त्याचे अनुकरण करावे. म्हणजे ज्ञानी गुरुंनी विधींचे अतिक्रमण केले आपणही अनुकरण करावे असा शिष्यांनी विचार करु नये.** परंतु गुरुंना दोष नाही. त्यांचे चांगले आचरण असेल तेवढे आपण घ्यावे. पूर्वजांनी जसे केले तसे आचरण करायचे. त्यांच्या अनिंद्य कर्मांचे अनुकरण करावे. **परशुरामाने आईला मारले हे लक्षात न घेता त्याने पित्याच्या आज्ञेचे पालन केले हे लक्षात घ्या. पित्याची आज्ञा पालन करणे हे जमदग्नीच्या या उदाहरणावरुन शिकावे.** जमदग्नींचे तप फार मोठे आहे. आज्ञा झाल्याबरोबर मारुन टाकले. ते प्रसन्न झाले. त्यांनी परशुरामांना विचारले, "काय पाहिजे ?" परशुराम म्हणाले, "आईला जिवंत करा आणि मी तिला मारले याचे स्मरण राहू नये." जमदग्नीने लगेच रेणुकेला जिवंतही केले.

परशुरामांना पित्याचे हे सामर्थ्य माहिती असल्यामुळे त्यांनी पित्याची आज्ञा पालन केली, असा या कथेचा अर्थ आहे. **मातृहत्या करणं हा नाही.**

काय झालेलं आहे, हरिश्चंद्राला वरुणाने जलोदर उत्पन्न केला. हरिश्चंद्राने मुलगा देतो सांगून मुलगा दिला नाही. मग शेवटी पैसे देऊन कोणाला आणायचे आणि त्याचा बळी दिला, म्हणजे हा रोहित म्हणजे हरिश्चंद्राचा मुलगा वाचणार होता. हरिश्चंद्रांचे प्रधान असा मुलगा शोधायला गेले. शुनश्चैवाच्या वडिलांना तीन मुलगे होते. त्यांना विचारल्यावर ते म्हणाले थोरला मुलगा मी देणार नाही. माझे त्याच्यावर प्रेम आहे. आई म्हणाली, धाकटा मुलगा माझा लाडका आहे त्याला मी देणार नाही. ह्या मधल्या मुलाला घेऊन जा. पण त्याला सोडून दिले. यज्ञबिज्ञ झाला. देव प्रसन्न झाले. पण तो मुलगा घरी जायला तयार नाही. विश्वामित्रांनी आपल्याला जीवदान दिले म्हणून त्यांच्या जवळच तो मुलगा राहिला. म्हणजे त्याने आपल्या पित्याचा त्याग गेला असा त्याचा अर्थ नाही.

**विश्वामित्रांच्या उपकाराला स्मरुन तिथंच तो राहिला. असा त्याचा अर्थ आहे.**

गुरुला टाकलं असं नाही. देत नाहीत आणि आपल्याला तर मंत्र पाहिजे म्हणून तपाने आदिल्याला प्रसन्न करुन शुक्ल यजुर्वेद त्याने मिळविला. हा त्यातला अभिप्राय आहे. ईर्षा नाही. वेद पाहिजे दुसरे कोणी देत नाही हा याज्ञवल्क्यांचा अभिप्राय आहे.

इंद्र अतिथी आला होता नं! गौतमांच्या पत्नीचा जार म्हणून त्यांचं रुप घेऊन आलेला. पण त्याला सोडून दिलं. अतिथी म्हणून त्याचा स्वीकार केला नाही त्यांनी. याचा अर्थ असा की त्याचा प्राण नाश होईपर्यंत राग केला नाही. राग आवरला गौतमांनी. अतिथी म्हणून घेतलं नाही. घालवून दिलं याचा अर्थ इंद्रालासुद्धा ते मारु शकत होते. देव असला म्हणून काय झालं. तप होतं त्यांचं. पण इतकं तप असलं तरी आपला राग त्यांनी आवरला. जाऊं दे म्हणाले. **आपल्या पत्नीचा जार असला तरी त्यांनी संयम केला. हा त्यांचा अभिप्राय आहे. अतिथीला टाकलं असा त्याचा अर्थ नाही.**

ब्रह्मदेवांना पुत्रोत्पत्ती पाहिजे होती म्हणून त्यांनी कन्या गमन केले. त्याचा अर्थ ते कामी होते असा नाही. शेष आहे पुन्हा. देव ब्राह्मणांच्या कार्याकरता शुक्रशोणित असलेले भौतिक शरीर स्वीकारले, असा त्यांचा अर्थ घ्यायचा. त्या शरीराला लागणारे सुरापान केले त्यांनी असं झालं. बृहस्पतींचीच किर्ती वाढली की नाही! त्या स्त्रीचं रुपाने हरण केले. म्हणजे त्या गुरुंची किर्ती वाढण्याकरता हा विरुध्द वागला म्हणायचे. तो जो आहे विश्वरुप तीन मस्तकांचा, त्रैलोक्याचं कल्याण होण्याकरता त्याचा नाश केलेला आहे. केवळ स्वार्थी असं नाही. महाराज पालखीमध्ये बसले, राजाकडून पूजाबिजा करुन घेतली. हे भगवंतांनी जरी केलं तरी त्यांचं तेज आहे, तप आहे त्यामुळे त्यांना दोष नाही. पण असमर्थ मात्र तसं वागू लागले तर त्यांचा अध:पात होईल.

भास्कर ब्राह्मणाने महाराजांच्या आज्ञेप्रमाणे सर्वांना जेवायला बोलावले. गांवातले टवाळखोर लोक म्हणाले, तूं जेवढे अन्न शिजवले आहेत त्याचे जेवढे कण आहेत तेवढ्या संख्येने आम्ही आहोत आणि तूं आम्हांला बोलावून काय जेवायला देणार? आम्हाला बोलवायला लाज वाटत नाही का तुला?

भास्कराने महाराजांना येऊन सांगितले, "ब्राह्मण माझे आमंत्रणच घेत नाहीत." आणि

काय म्हणाले ते सांगितले. ही अगदी सरळ बुद्धी आहे त्याची, ऋजुता ज्याला म्हणतात. हा मोठा गुण आहे. त्या गांवातल्या लोकांनी निंदा केल्याचे महाराजांना येऊन सांगितल्यावर महाराजांनी त्या लोकांना बोलावून आणले. महाराजांनी जबाबदारी घेतली. सगळ्यांना स्वत: जेवायला बोलावले. महाराजांनीच सांगितल्यामुळे ते सगळे स्वस्थ राहिले. त्यांनी जेवणाच्या पत्रावळी तयार केल्या. स्नान करून सगळे आले. ईश्वराच्या आज्ञेनं ते सिद्धान्न छाटीनं झाकलं. तीर्थाने अभिमंत्रित केलं. मग इतर ब्राह्मणांबरोबर भास्कराने ते अन्न गुरुमहाराजांना अर्पण केलं. भक्त, शिष्य, द्विज, इतरही मंडळी सहपरिवार तिथे भोजनाला आली. खीर वगैरे सहा पक्वान्नं होती. वरण, भात, भाजी वगैरे सर्व पदार्थ होते. तीन माणसांसाठी केलेला स्वयंपाक असंख्य लोकांना पुरला. त्या स्वैंपाक पात्रातून अन्न काढून नेऊन पंगतीत वाढले तरी ती पात्रं पुन्हा पूर्ववत् भरलेली असत. ते संपले नाही. कमी पडले नाही. षड्विध ऐश्वर्ययुक्त जे भगवान् आहेत त्यांची लीला आहे.

ब्राह्मण मंडळींचे आकंठ भोजन होऊन ते तृप्त झाल्यावर गांवातले इतर शुद्र वगैरे मंडळींना बोलावून त्यांना भरपूर अन्न दिले. त्यांनाही अन्न कमी पडले नाही. पशुपक्षांनाही अन्न दिले. कोणीही शिल्लक नाही याची खात्री पटल्यावर महाराजांच्या आज्ञेने आपण स्वत: भोजन करुन शिल्लक राहिलेले अन्न जलचर प्राण्यांना दिले. त्या वेळी सगळे अन्न संपले.

या सुरस अन्नाचे माधुर्य अमृतपान करणाऱ्या देवांनादेखील दुर्लभ आहे. अशा स्वादु अन्नाबद्दल कोणी स्वप्नातही ऐकले नसेल. अशा अन्नाने होणारी तृप्तीही अलौकिक आहे. गांवातले लोक म्हणाले, द्वापार युगात श्रीकृष्णांनी रात्री पांडवांकडे येऊन दुर्वास ऋषी आणि त्यांच्या असंख्य शिष्यांच्या भोजनाची व्यवस्था केली असं आम्ही ऐकलं होते पण आज प्रत्यक्ष पहायला मिळाले.

दुर्योधनाने दुर्वासऋषींना उत्तम खाऊपिऊ घातले, त्यांची चांगली सेवा केली तेव्हां दुर्वासऋषींनी प्रसन्न होऊन काय हवा तो वर मागून घेण्यास सांगितले. कपट द्यूत खेळून हरल्यामुळे ज्यांना वनांत जावे लागले त्या पांडवाकडे दुर्वासऋषींनी द्रौपदीचे जेवण झाल्यावर जाऊन जेवण मागावे आणि पांडव तर ते देऊ शकणार नाहीत म्हणजे दुर्वासऋषी रागावून शाप देतील आणि पांडवांचा आपोआप नाश होईल. पण दुर्योधन वरुन मात्र असं म्हणाला, ऋषी महाराज आपण आमच्याकडे आलात पण आमच्या

कुटुंबाचे प्रमुख आमचे मोठे बंधू धर्मराज आहेत. आपल्या दहा हजार शिष्यांसहित त्यांच्याकडेही जा. आपण उशिरा गेलात तर द्रौपदी जेवायची थांबेल त्यापेक्षा तिचे जेवण झाल्यावर आपण सावकाश जा. म्हणजे किती कपट आहे. वास्तविक द्रौपदीचे जेवण झाले की त्या पात्रातून अन्न मिळत नाही.

त्याप्रमाणे दुर्वासऋषी आपल्या दहा हजार शिष्यांसह पांडवांकडे वनात रात्री उशिरा आले. धर्मराजांनी त्यांचे यथोचित स्वागत करुन त्यांना स्नान करुन येण्याची विनंती केली. पण इकडे तर द्रौपदीचे जेवण झाले होते त्यामुळे ती चिंतातून झाली. तिने श्रीकृष्णाचे स्मरण केले. भक्तवत्सल गोपालकृष्ण द्रौपदीचा धावा ऐकून धावत आले. द्रौपदीने सर्व परिस्थिती श्रीकृष्णांना सांगितली. भगवान म्हणाले, द्रौपदी मला भूक लागली आहे. माझी आदी काही तरी व्यवस्था कर. मला अगोदर भोजन दे. द्रौपदी मोठ्या लज्जेने म्हणाली. ''श्रीकृष्णा सूर्यनारायणाची दिलेल्या अक्षय भोजन पात्रातून माझे जेवण होईपर्यंतचे वाटेल तितके अन्न मिळते. पण सर्वांना जेवण देऊन मी स्वत: आता जेवले आहे. आता त्या पात्रातून अन्न मिळणार नाही. ''

भगवान म्हणाले, ''बघू या, तूं ते पात्र घेऊन ये '' त्या पात्राला भाजीचे एक पान चिकटलेले होते तेवढेच खाऊन विश्वात्मा भगवान तृप्त झाले. **भगवान् तर नित्य तृप्तच आहेत. परंतु जो संतुष्ट वृत्तीचा आहे त्याच्याकरता हे आहे. अल्प जरी मिळाले तरी विश्वात्मा श्रीहरिलाच ते अर्पण करायचे. हे श्रीकृष्णानी या प्रसंगाने शिकिवले आहे.** भाजीचे पान मिळाले तरी त्यालाच अर्पण करायचे, सबंध जेवण मिळाले तरी त्यालाच अर्पण करायचे. तोच तृप्त आहे, ही जर भावना असली तर दुसरासुध्दा इतरांची तृप्ती करु शकेल. भगवान म्हणाले, येऊ दे सर्व ऋषी मंडळींना आणि तेवढ्यानेच सर्व तृप्त झाले.

ही पूर्वीची कथा आहे आणि आज असेच पहायला मिळेल. एका भाजीच्या पानाने सर्व ऋषी तृप्त झाले की नाही. तसं तीन माणसांच्या अल्प पाकातून चार हजार माणसांचे जेवण झाले. भगवान श्रीहरिची माया ही अतर्क्य आहे. भास्कर हा महाराजांचा मोठा प्रिय भक्त आहे. तो नुसताच जेवून त्यांच्याजवळ रहाता होता, असे नाही. सेवाही करीत होता. हा मोठा प्रिय भक्त आहे. याच्यावर प्रसाद झाला दुसऱ्यावर झाला नाही. तीन महिने अत्यंत श्रध्दा भक्तीने ह्याने महाराजांचे पादसंवाहन केले. लोकांनी टिंगल केली तरी तिकडे लक्ष दिले नाही. किंवा **लोकांची महाराजांच्याकडे तक्रार केली**

**नाही**. तो इतक्या महाराजांच्या जवळ **बसत होता. पादसंवाहनाच्या निमित्ताने ही त्याला सहज सांगता आले असते पण नाही सगळं सहन केलं, श्रध्दा, भक्ती आहे**. महाराजांचे सान्निध्य मिळतयं. सेवा घडतेय. भिक्षेचा योग जेव्हा येईल तेव्हा येईल. असं मानून अगदी स्वस्थ राहिला. त्याने महाराजांची **दास्यभक्ती** केली.

**श्रध्दा, भक्ती हेच मुख्य आहे. सेवा सफल होण्याकरता श्रध्दा पाहिजे, भक्ती पाहिजे. मोक्ष हे त्याचे फल आहे.**

त्यानंतर श्रीगुरुंनी ईप्सित वर देऊन भास्कराला आपल्या घरी पाठवून दिले. ईश्वराच्या प्रसादाने त्याला चारही पुरुषार्थ मिळाले. ऐहिक भोगही मिळून शेवटी भगवंतांच्या प्रसादाने ज्ञान मिळाले.

महाराजांनी टीकेत संसार शब्दाचा पुढील प्रमाणे अर्थ केला आहे. सत् अद्वैत आणि अनृत द्वैत हे दोन्ही एक आहेत. दोन्ही मिळून संसार आहे. देह हा अनृत आहे. आणि अद्वितीय आत्मा सत् आहे. पण हे दोन्ही एक झालेले आहेत. एक समजून आहे. हाच संसार आहे. ऐक्य दोघांचे अध्यास. दृढ भक्तीच्या प्रभावाने सायुज्य येते.

ईश्वराचा अवतार झालेला आहे पण आकार आहे. म्हणजे तो निर्विशेष ईश्वर नाही. ब्रह्म नाही. सविशेष आहे. निराकार निर्गुणाची भक्ती झाली, ध्यान झालं म्हणजे मोक्ष आहे. साकार, सविशेष ईश्वराच्या भक्तीने मोक्ष कसा मिळाला ? असा मोठ्या महाराजांनी टीकेत प्रश्न केला आहे. त्यावर विचार केला आहे.

निर्विशेष ब्रह्माचा साक्षात्कार करण्याची ज्यांना शक्ती नाही, तिथे मन जात नाही, अव्यक्तांकडे लक्ष जात नाही, असे जे मंद आहेत त्यांना सविशेष पदार्थाचे निरुपण केले. तो निर्विशेषच मग सविशेष, सगुण झालेला आहे. त्यांच्यावर कृपा केली देवाने, मग जे दिसतं आहे. सगुण, साकार ब्रह्म त्याचच चिंतन झाल्यानंतर त्यांचे (भक्तांचे) मन ताब्यामध्ये आले आणि ते समर्थ झाले म्हणजे तेच जे निर्विशेष सर्व उपाधीरहित ब्रह्म आहे तेच सविशेष बनते, प्रगट होते. साक्षात्कार होतो. 'बृहिबृहवृध्दौ इत्यस्मात् धावो: निष्पन्न ब्रह्म: शब्द:' या धातू पासून ब्रह्म शब्द निर्माण झाला आहे. 'बृहबृहिवृध्दौ वृध्द' म्हणजे सर्वांपेक्षा श्रेष्ठ सर्वांपेक्षा वाढलेलं म्हणजे वरिष्ठ, अशी वस्तू म्हणजे ब्रह्म असा अर्थ आहे.

'वृध्दिश्चात्रनिरतिशयाविविक्षिता'

ब्रह्म शब्दाचा अर्थ सर्वांपेक्षा मोठी अशी काही वस्तू आहे. ती निरतिशय वृद्धी आहे, सापेक्ष वृध्दि आहे. सविशेषाचे प्रकरण थोडेसे चाललयं तेवढी वृद्धीही नाही प्रकरणी नाही, उपपदही नाही, नुसता ब्रह्म शब्द आहे. जर मर्यादित शक्तीच्या वस्तूचे पूर्वी काही वर्णन चाललेले असेल. आणि त्यात जर ब्रह्म शब्द आला असला. मागचं जे आहे सापेक्ष वृद्धी असलेलं तेच ब्रह्म शब्दाने घेतात. प्रकरण कोणाचे चाललेल नाही. ब्रह्म म्हणून सामान्य शब्द आलेला आहे. किंवा एखाद मर्यादित वृद्धी दाखिवणारं उपपद जर तिथं असलं तर सविशेष ब्रह्म तिथं असतं तर निर्विशेष घेत आलं असतं.

'नित्यशुध्दबुध्दमुक्तस्वभावं'

ब्रह्म शब्दाचा अर्थ आचार्य महाराजांनी केला आहे. ब्रह्म शब्दाचाच अर्थ आचार्य महाराजांनी केला आहे. ब्रह्म शब्दाचाच अर्थ हा निघतोय म्हणाले. ते नित्य आहे. नित्य म्हणजे बाकीचे सगळे पदार्थ कालमर्यादित आहे. हे ब्रह्म आहे. आणि ब्रह्म इतरांपेक्षा मोठ आहे म्हणजे त्याला काल मर्यादा नाहीये. ब्रह्म शब्दाचा अर्थ नित्य असा आहे. आचार्यांच्या दृष्टीने मोठे पणा म्हणजे सगळे (इतर) कालमर्यादित सापडलेले. ब्रह्माला कालमर्यादा नाही. ते एक शुद्ध आहे बाकीचे सगळे अविद्यादिकांनी अशुध्द आहे. मलीन आहे. ब्रह्माच्या ठिकाणी काही मल नाही. अशी वृध्दी दाखवली.

तथाचपूर्वाचार्या: नित्यशुद्धबुद्धमुक्त

स्वभावंसर्वज्ञंसर्वशक्ती ब्रह्म

शब्दस्यतिब्युत्पाद्यमानस्यनित्यशुद्धत्वादयोर्थ: प्रतीयंते

हे आचार्यांचे भाष्य दिले आहे

बृहतेर्धातोरर्थानुगमेदिती

तदेवब्रह्मामुनास्वेच्छारुपेणावतीर्णम्

इति अष्टमाध्याग्रेस्फुटतरमुक्तमत

उक्तंसायुज्यं सायुज्यंनामात्यंतिकोमोक्ष ।।१९-३०।।

म्हणून तेच ब्रह्म आहे. अवतार घेतला म्हणजे ते निराळं झालं नाही. निर्गुण निराकार निर्विशेष ब्रह्म सविशेष झालेलं आहे मंदाच्या वर कृपा करण्याकरता. आणि त्याचं ध्यान करता करता सगुणाच्या ध्यानाने चित्त एकाग्र झालं. शुद्ध झालं म्हणजे हे ब्रह्माचं ज्ञान त्यांच्या प्रसादाने होते आपोआप.

शृणवन्यदप्यभ्दुतमाश्चेष्टितं
गंगाव्हयातत्रतुषष्टिवत्सरा ।।
साध्वीवशानर्चपरेशन्वहं
भक्त्यैकदोचेसतुतांकिमिच्छसि ।।१९.३१।।

आणखी 'एख ईशचेष्टितं श्रुणु' म्हणतात. गंगा नावाची साठ वर्षाची एक वंध्या साध्वी स्त्री भक्तीनं परमेश्वराची पूजा करीत होती. एकदा भगवानांनी तिला विचारले, तुझी काय इच्छा आहे?

ती म्हणाली, "अपुत्राला परलोक नाही, स्वर्ग नाही. स्वर्गात गेलेले पितर - पिण्ड, उदक सगळ्या क्रिया ज्यांच्या लुप्त झाल्यात असे - त्यांचा अध:पात होतो. हे ऐकून मला भीती वाटते. पुढच्या जन्मांत तरी सुपुत्राची प्राप्ती होऊन मला चांगली गती मिळावी. अशा इच्छेने मी आपले अर्चन करते. आपण माझं संरक्षण करा."

श्रीगुरु म्हणाले, "कोणच्या मोहाने या माया समुद्रात तूं कोठे भ्रमण करणार? माझ्या वराचं फल दुसऱ्या जन्मामध्ये आहे, असं तुला वाटतं का ? त्यावेळेला तुला स्मरण कसं राहाणार? म्हणून तुला मुलगा व मुलगी याच जन्मात होतील." त्यावेळी आपल्या पदरात गाठ मारुन ती वंध्या स्त्री म्हणाली, " माझा ऋतु गेलेला आहे आणि जन्मापासून मी वंध्या जरी असले तरी आपल्या कृपेने मी पुत्रवती होईन. पुत्राच्या इच्छेने तीर्थक्षेत्रात अर्चन करण्यात माझे सगळे वय गेले. विशेष करुन अश्वत्थाची मी सेवा केली, मूर्खपणाने. तो काय मला देणार आहे?"

यावर श्रीगुरु म्हणाले, "ब्रह्मा आणि नारद यांचा संवाद ऐक, तूं जे म्हणालीस अश्वत्थ काय देणार आहे, ते खोटे आहे. नारदाला ब्रह्मदेव सागंताहेत, मी अश्वत्थाच्या मूळात आहे. मध्ये विष्णु आणि अग्रभागी शिव आहेत. पुन्हा त्या तिघांच्या शाखा वेगळ्या. दक्षिण, पश्चिम आणि उत्तर. या शाखाही त्या तीन देवांच्या आहेत. पूर्व शाखेला सर्व देव आहेत. अंकुरामध्ये, तीर्थ, गो, यज्ञ समुद्र, यज्ञ, श्रुती आणि द्विज आहेत. असा अश्वत्थ आहे. तो अश्वत्थ असंस्कृत जर असेल तर त्याची पूजा करु नये. योग्य मुहुर्तावर त्याचा उपनयन संस्कार करुन उत्तम मुहूर्तावर त्याचे अर्चन करावे. रविवार, सोमवार, शुक्रवार, रात्री, सध्याकाळ व्यतीपात वगैरे कुयोगावर, अमावास्या वगैरे पर्वकाली त्याला स्पर्श करु नये, ब्रह्मचर्य, सत्यवचन आणि मौन यांनी जो युक्त आहे

त्याने भजन करावे. त्याच्या स्त्रीनेही करावी. अश्वत्थाच्या खाली गोमयाने सारवून रांगोळी घालून पुण्याहवाचन करावे. सात कलशांनी स्नान घालून आपापल्या अधिकाराप्रमाणे पूजा करावी. त्या ठिकाणी अष्टभुजा विष्णूचे ध्यान करुन, वस्त्राने त्याला गुंडाळून विष्णुसहस्त्रनामातल्या नामांचे पठण करीत मंद गतीने आपल्या शक्तीप्रमाणे प्रदक्षिणा कराव्यात. प्रदक्षिणेच्या सुरवातील, मध्ये आणि शेवटी असा तीन वेळेला नमस्कार करावा. म्हणजे पदा पदाला यज्ञाचे फळ मिळते, संकट, पातकं, ताप सगळं दूर होतं. शनिवारी शनिच्या नामांचे उच्चारण हे ग्रहपीडा दूर करणारे आहे. कोणस्थ........ पिप्पलादेन संस्थित: अश्वत्थाच्या जवळ रुद्र मंत्राचा जप केला असता कालमृत्युसुध्दा लांब जातो. (कांही करु शकत नाही) अश्वत्थ वृक्षासमीप ब्राह्मण भोजन, स्थान, जप यज्ञ हे अत्यंत फल देणारे आहेत. अश्वत्थ वृक्ष अक्षय पुण्य देण्यास विलंब करीत नाही, पुत्रकाम सिद्ध होण्याकरता. भूतलावर ज्याने अश्वत्थाची स्थापना केली त्याने आपले कुल हे स्वर्गलोकात स्थापन केल्यासारखे आहे. ज्याने अश्वत्थ वृक्ष तोडला त्याने आपला वंशच खंडित केला यात संशय नाही.''

प्रदक्षिणा संख्या जेवढी असेल त्याच्या दशांशाचे हवन करावे, त्या दशांशाचे ब्राह्मण भोजन, करुन सुवर्णाचा अश्वत्थ वृक्ष, दक्षिणा, गायी आणि तीळ दान करावेत. चांगल्या ब्राह्मणाला हे दान द्यावे. म्हणजे सगळे इष्ट प्राप्त होते. असा विधी ब्रह्मदेवाने नारदाला सांगितला.

म्हणून महाराजांनी त्या स्त्रीला सांगितले. या करता तूं अश्वत्थ वृक्षाचे पूजन कर, तो सिद्धीदायक आहे.

सकाम भजन कशाला सांगितलं ? तर सकाम म्हणजे काहीं इच्छेमध्ये मन गुंतले म्हणजे शांतपणाने भजन होत नाही. सकाम भजनाने मन शांत होते. ईश्वराच्या प्रसादाने त्या वासनाही निघून जातात. हे त्याचं फल आहे.

महाराजांनी तिला पुढे सांगितले, तुम्ही संगमात स्नान करा आणि षटकुल तीर्थाजवळ अश्वत्थ आहे त्याची पूजा करा. म्हणजे तुम्हाला मुलगा व मुलगी होईल.

अश्वत्थ हा ओंकाररुपी आहे असेही सांगितले आहे. सर्व वेद तिथे आहेत. त्याची जर पूजा झाली तर भगवंताच्या प्रसादाने वासनाक्षय होऊन अर्चक मोक्षापर्यंत जातो. मध्ये जर मुलगी, मुलगा पाहिजे असेल तर तेही मिळतात. तेही तुला मिळेल म्हणून सांगितले.

पुत्र आणि पुत्री होईल, हे जे फल सांगितले तर अन्नमय कोष जो आहे हाच आत्मा आहे. म्हणजे देह आत्मा आहे. देहाचीच उपासना जर आत्मदृष्टीने केली तर सर्वान्न प्राप्ती होते. सगळ्या प्रकारचे अन्न मिळते. त्या प्रमाणे ओंकाररुपाने जर उपासना झाली तर सर्व इष्ट फल मिळतं त्यात पुत्र, पुत्री हेही फल मिळतं. असं दाखिवलय.

ती स्त्री म्हणाली, मी जरी साठ वर्षाची असेल तरी आपले वचन म्हणजे वेद वचन समजून मी अश्वत्थाची सेवा करते, देवता दृष्टीने अश्वत्थाचे अर्चन स्त्रीला स्वतंत्रपणे कर्म करण्याचा अधिकार नाही. म्हणून त्या स्त्रीने पतीसह अश्वत्थरुपी ईश्वराचे म्हणजे सद्‌गुरुंचे पूजन केले.

चौथ्या दिवशी ब्राह्मण तिच्या स्वप्नात आला आणि म्हणाला, अश्वत्थाला प्रदक्षिणा घालून गुरुंच्या दर्शनाला तूं जा. आणि गुरु जे देतील ते भक्षण कर म्हणजे तुला मुलगा होईल. त्याप्रमाणे संगमावर स्नान करुन अश्वत्थाला आणि सदगुरुंना प्रदक्षिणा करुन प्रणाम केला. महाराजांनी तिला प्रसाद फलं दिली आणि सांगितले. ''हे व्रत करुन तू दान दे आणि इष्ट इच्छा पूर्ण करणारी ही फलं तू भक्षण कर. कलियुगामध्ये दोनच प्रकारचे पुत्र आहेत. औरस पुत्राचे दर्शन हे पितृमुक्ती देणारे आहे. तुला औरस पुत्री आणि पुत्र होतील. माझ्या अर्चनाचे हे फल आहे. यात संशय घेण्याचे कारण नाही.'' त्याप्रमाणे त्या स्त्रीने दान करुन फलं भक्षण केली. ती रजोरहित असतानासुध्दा ऋतुमति झाली. हा प्रभुचा महिमा आहे.

स्वतंत्र इच्छा असणारे भगवान आहेत. त्यांची लीला कोण जाणणार ? ज्यांची लीला वर्णन करताना दोन हजार जिव्हा असणारा तोही कुंठित झाला आणि श्रुतीही चकित झाली. अंगाला सुरकुत्या पडल्या आहे, केस जिचे पांढरे झालेत, देह जिचा कृश झाला आहे अशा स्त्रीला गर्भधारणा झाली. नंतर सोमनाथाने पुंसवनादि शास्त्राने सांगितलेले सगळे संस्कार केले. योग्य काली तिला कन्या झाली. एका दैवज्ञाने सांगतिले ही मुलगी फार मोठी साध्वी, सत्शील, गुणशालीनी होईल, पुत्रादि, संततीनेयुक्त, कुलाचा उद्धार करणारी होईल हे (जातक) ऐकून त्या सोमनाथ ब्राह्मणाने धन, वस्त्रादि दान दिले. कन्येला घेऊन ते दंपती बाराव्या दिवशी परमेश्वराजवळ म्हणजे महाराजांच्या जवळ आले. त्या गंगाबाईने प्रणाम करुन महाराजांच्या चरणाजवळ कन्या ठेवली आणि म्हणाली, संसाराचा हा वंध्या वृक्ष आपल्या कृपादृष्टीने फलित झाला. पण प्रवासी

लोकांनी ही फलं घेतली तर तो सफल होतो. आणि त्याचं फल कोणी घेतलं नाही तर तो वंध्यच आहे.

आता त्याचा अभिप्राय सांगताहेत. हा वंध्या वृक्ष फलित झाला पण सफल व्हायचा झाला तर पथिकांना त्याची फलं मिळाली पाहिजेत. आता त्याचा आणखी अर्थ काय निघतो ते पहा. स्वर्गलोकाच्या मार्गाला जाणारे जे पूर्वज यांनी 'फलितोपि जातापत्योपि सुखवश्चे।' पुत्र झाला, फल मिळालं. पण तो जर सुफल झाला म्हणजे पुत्रयुक्त जर झाला पथिक म्हणजे आपले पूर्वज जे आहेत ते ह्याला आशीर्वाद वगैरे देतील. पण कन्याच झाली. असं तिला सांगायचं. श्रुतीमध्येसुध्दा वर्णन केलयं अपुत्री स्त्री म्हणजे दैन्य आहे आणि पुत्र म्हणजे ज्योति आहे. फल मिळालं पण ते फल खर नाहीये. म्हणाली. फुकट आहे. पुत्ररुपी फल जर मिळालं असतं तर सगळ्या पाथांना - पितरांना त्याचे सेवन करता आले असते. तेव्हा ते फल फुकट गेलेले आहे. त्यापेक्षा वृक्षाला फल आलेच नसते तर बरे झाले असते असं ती म्हणाली.

मोठे महाराज आता टीकेमध्ये आध्यात्मिक दृष्टीने यावर विवरण करताहेत. ते म्हणतात. श्रीगुरुंची उपासना केल्यामुळे त्या ब्राह्मण स्त्रीची बुद्धी शुद्ध झाली. त्यामुळे गर्भभरण, प्रसव कष्ट याबद्दल वैराग्य उत्पन्न झाले. ही प्रजा नश्वर आहे. आणि या प्रजेने जो लोक मिळवायचा. स्वर्गादिक लोकांची आम्हाला जरुर नाही. असे वैराग्य संपन्न पुरुषाचे विचार तिच्या मनात आले. हा देह वंध्य आहे. या देहाला विवेकरुपी फल मिळाले. पथिक किंवा पांथ म्हणजे मुमुक्षु लोक मोक्षपर्यवासी, जर काही घडले या देहाकडून तर त्याला मान देतात. नाही तर त्याचा धिक्कार करतात. स्वर्गप्राप्ती हे फल मिळालं तरी फुकट आहे ते. उपभोगेन उपक्षिप्यते.'

(इथे आता आचार्यांचे सर्व भाष्य दिले आहे.)

हा संसारवृक्ष शेवटी अभावरुप होतो. तो असार आहे. शेकडो पाखंडरुपी जे विकल्प ते याच्याबद्दल होतात. तत्वजिज्ञासू माणसालाही या संसारवृक्षाचे तत्त्व काय आहे हे कळत नाही. वेदांताने सांगितलेले परब्रह्म जे ज्याचे मूल सार आहे, अविद्या काम कर्म हे अव्यक्त बीज ही त्याची कारण आहेत. सगुणाचे ज्ञान आणि क्रियाशक्ती हे दोन ज्याला अंकुर आहेत. हिरण्यगर्भरुपी अंकुर (हिरण्यगर्भ म्हणजे ब्रह्मदेव) आहे. सर्व प्राण्याचे जे लिंग शरीर ते ज्याचा स्कंध आहे, तृष्णाजलाने जो वाढतो. बुद्धी, इंद्रिय,

विषय हे ज्याला पर्ण आहेत. श्रुतीस्मृती, न्याय विद्या हे ज्याला पर्ण आहेत. यज्ञ, दान, तप आदि अनेक क्रिया ज्याची पुष्पे आहेत. नाना प्रकारच्या सुखदु:ख वेदना हा ज्याचा रस आहे. प्राण्यांकडून उपजीव्य जी अनंत फलं ह्या संसाररुपी वृक्षाची आहेत. प्राण्यांच्या तृष्णारुपी सलीलाचे अवशेषन झाल्यामुळे वाढलेला आहे आणि जटेप्रमाणे झालेला आहे. त्याचे मूल दृढ झाले आहे.

सत्यादि सप्त लोकांमध्ये ब्रह्मादिरुप पक्षी घरटी करुन राहिले आहेत. यात सुखाचे दु:खाचे अनेक शब्द (ध्वनि) निर्माण होताहेत. प्राण्यांच्या सुखदु:खामुळे उत्पन्न होणाऱ्या हर्ष, शोक, नृत्यगीत, वादित्र, हसणे इ,

असा हा संसारवृक्ष वेदांत विहित जे ब्रह्मात्म दर्शन आहे. जीवात्मा आणि ब्रह्म ह्यांचे ऐक्यच आहे. त्या ऐक्याचे दर्शन झाले तो असंग होतो. ह्या संसारवृक्षाचा असंगरुपी शस्त्राने उच्छेद केला जातो. देहालाच वृक्ष म्हटले आहे. म्हणजे देहासारखा उर्ध्वमूल..... इति श्रुते ।

आता गुरुमहाराज उत्तर देताहेत. त्या स्त्रीने, व्यवहार, दृष्टीने तसे म्हटले - फळ मिळून उपयोग काय. कन्येला घेऊन महाराज म्हणाले, ही कन्या शील, बुध्दी, गुण, पुत्रांनी युक्त होईल आणि सगळ्यांना मान्य होईल. चांगली कन्या तुम्हाला मिळालेली आहे. तुम्हाला मुलाची इच्छा असेल तर मुलगाही होईल. शतायु मुलगा हवा असल्यास तर तो मुर्ख होईल आणि विद्वान पाहिजे असेल तर अल्पायु होईल. कोणचा मुलगा पाहिजे ?

त्या दोघांनी सांगितले विद्वान आणि ज्याला मुले होतील असा पुत्र अल्पायु असला तरी हरकत नाही. महाराज म्हणाले, ''हरकत नाही, तसे होईल.'' आणि त्या कन्येसह दोघांना घरी पाठवून दिले. पुढे लवकरच त्या स्त्रीला मुलगा झाला. रजोरहित झालेली असतानासुध्दा तिला मुलगा आणि मुलगी झाली. तो मुलगा विद्या विनय संपन्न आणि मातापित्याची सेवा करणारा झाला. मोठा धार्मिक झाला. त्याला पाच मुले झाली. नंतर त्याने मोक्ष मिळविला. ती कन्यासुध्दा एका यज्ञदीक्षा घेतलेल्याची पत्नी झाली. आणि गुरु महाराजांच्या आशीर्वादाप्रमाणे ब्रह्मवादिनी झाली. तिलाही पुढे उत्तम गती मिळाली.

आता ब्रह्मवादिनी कशी झाली हा एक प्रश्न मुद्दाम उपस्थित केला आहे. मंत्रपठण करणं आणि ऐकणं हे दोन स्त्रियांना आहेत. मग ती ब्रह्मवादिनी कशी झाली ? ब्रह्मज्ञानाने

पठण ती कशी करु लागली ? त्याचं कसं आहे, अधिकार नसताना जर मंत्र पठण केलं किंवा श्रवण केलं तर दोष आहे. यज्ञदीक्षा घेतलेल्याची ती पत्नी आहे. त्यामुळे तिला काही मंत्र म्हणायचा अधिकार होता. कमरेला दर्भाचा कमरपट्टा बांधायचा त्यावेळेला काही मंत्र म्हणायचे असतात. ते मंत्र तिनेच म्हणायचे असतात. स्वतःच्या शाखेचे अध्ययन मात्र करायचे नाही.

सध्या वेदमंत्र स्त्रियांना शिकवतात. पण शास्त्राची स्पष्ट आज्ञा आहे की त्यांचे उपनयन होत नसल्याचे त्यांना वेदाध्ययनाचा अधिकार नाही.

सद्भक्तांना श्रध्दा, भक्ती जर असेल तर हा गुरुप्रभाव दिसतो. जन्मांधाना जसा सूर्य कधीही दिसत नाही तसा अभक्तांना हा गुरुप्रभाव कधीही दिसत नाही.

त्या दोघांची संततीची इच्छा तर पूर्ण झालीच पण यतिवेषधारी सद्‌गुरुंच्या कृपेने ते दोघेही मुक्त झाले.

गुरु आणि शास्त्राने जे तत्व सांगितले आणि तत्वबोधाचे जे उपाय सांगितले आहेत. त्या उपायांच्या ठिकाणी अत्यंत दृढ विश्वास म्हणजे श्रद्धा. ही दृष्टी ज्यांना प्राप्त झाली त्यांना गुरुप्रभाव काय तो कळतो. गुरुवाक्याप्रमाणे वागणारे जे आहेत. त्यांना श्रध्दा भक्तीने ऐहिकामुष्मिक सिद्धी सुलभ होतात.

आता आणखी एक चरित्र ऐका. एक कुष्ठरोग झालेला नरहरि नावाचा विप्र जगत्‌गुरुंकडे येऊन शरणागत होऊन म्हणाला, 'हे शंभो, हरे, परानंदमूर्ते, भक्तवत्सल, जयजयाच्युत आपणच शंभो म्हणजे पाप हरण करुन आरोग्य देणारे आहात, परानंदमूर्ते म्हणजे मोक्षदायक आहात, अशी आपली कीर्ती ऐकून अशा विश्वासाने मी आपल्याला शरण आलेलो आहे. मी कुष्ठी असल्यामुळे जरी मी यजुर्वेदज्ञ असलो तरी कोणी माझे मुख पहात नाही. पापरुपी माझे हे कुष्ठ तीर्थयात्रा, जप इ. मुळेही जात नाही. हे कुष्ठ केवळ आपल्या कृपेने दूर होईल या विश्वासाने मी आपल्याला शरण आलेलो आहे. याचा जर प्रतिकार होणार नसेल तर आपण मला तसे स्पष्ट सांगा, म्हणजे आपल्या समोरच मी प्राणत्याग करतो.'

गुरुमहाराज म्हणाले, 'तुझ्या पूर्वीच्या पातकांपासून उत्पन्न झालेले हे कुष्ठ जाईल. माझ्या वाक्यावर जर तुझा विश्वास असेल तर एक औदुंबराची शुष्क फांदी घेऊन

संगमावर रोवून त्याची पूजाअर्जा कर. ज्या दिवशी त्याला पाने फुटतील त्या दिवशी तुझे कुष्ठ जाईल.'

तो म्हणाला, ''ठीक आहे, महाराज'' आणि महाराजांच्या आज्ञेप्रमाणे त्याने ती शुष्क फांदी संगमावर आळं वगैरे करुन रोवली आणि तिला पाणी घालून अर्चन, प्रदक्षिणा वगैरे करण्यास सुरवात केली. गांवातल्या लोकांनी हे पाहून त्याच्याजवळ येऊन म्हणायला सुरवात केली. ''बाबा तुझ्यावर महाराजांची कृपा होणार नाही कारण त्यांची कृपा लगेच होत असते. ज्या अर्थी त्यांनी तुला हे करायला सांगितलं त्या अर्थी त्यांची तुझ्यावर कृपा होईल असे वाटत नाही. या वाळलेल्या फांदीला कधी तरी पाने फुटणे शक्य आहे का ? तेव्हा हे तू प्रयत्न सोडून दे. जा आपल्या गावाला '' पण त्या कुष्ठ रोग्याने मात्र गावकऱ्यांनी दाखवलेल्या भीतीकडे दुर्लक्ष करुन महाराजांच्या आज्ञेप्रमाणे त्या शुष्क काष्ठाचे अर्चन चालू ठेवावे.

ह्या रोग्याचा गावकऱ्यांना बुद्धिभेद करण्यात यश आले नाही म्हणून ते गुरु महाराजांच्याकडे येऊन म्हणू लागले. तो म्हातारा कुष्ठी वाळलेल्या लाकडाचीच सेवा करतोय. उगीच उपाशी मरेल तो. त्याला आपण काही तरी योग्य बोध करा. म्हणजे जणू काय महाराजांना काहीच काळजी नाही ह्या गावकऱ्यांनाच जास्त काळजी आहे.

महाराज म्हणाले, तो जे करतो ते चांगलं करतो, करु दे की, त्याच्या दृढ भक्तीनेच तो तरुन जाणार आहे. भवसिंधू पार करायला भक्तीच तारक आहे. मंत्र द्विज, औषध, तीर्थ वगैरे ठिकाणी जशी भावना असेल तसे फळ मिळते. याबाबत सूत ऋषींचा संवाद सांगतो तो ऐका.

सूत सांगतात. पांचाळ देशातल्या सिंहकेतु राजाचा मुलगा धनंजय एकदा वनात गेला. थकल्यावर एक जीर्ण शिवालय पाहून तिथे विश्रांतीसाठी बसला. त्याच्याबरोबर एक शबरही गेलेला होतो तोही शिवालयात बसला. तिथे पुष्कळ सुंदर शिवलिंगे पडलेली होती. तो शबर म्हणाला, ''ह्यातले एखादे शिवलिंग नेऊन घरीत्याची रोज पूजा करावी अशी माझी इच्छा आहे. मी अज्ञ आहे. पूजा वगैरे कशी करायची ते तुम्ही मला शिकवा. तुम्ही जे सांगाल तसे भक्तीभावाने मी करीन.''

राजपुत्र म्हणाला, ''चांगल्या स्थळी घरात शिवलिंगाची स्थापना कर. शुचिर्भूत होऊन आपल्या पत्नीसह तूं या शिवलिंगाची भक्तीभावाने पूजा कर. त्या शिवलिंगाला साक्षात्

ईश्वर समजून सगळे उपचार अर्पण कर. रोज देवाला चिताभस्म दे आणि देवाला दाखवलेल्या नैवेद्याने प्रसादबुद्धीने आपल्या भार्येसहित तू भोजन कर. '' असा सगळा पूजाविधी त्याला सांगितला. त्या शबराला संतोष झाला. त्याने तिथले एक शिवलिंग घरी नेले आणि सांगितल्याप्रमाणे त्याची योग्य स्थळी स्थापना करुन आपल्या पत्नीसह त्याची यथाविधी पूजा करायला सुरवात केली रोज चिताभस्म आणून शंकराना अर्पण करीत असे. एके दिवशी मात्र त्याला कुठेच चिताभस्म मिळाले नाही. तो खिन्न झालेला पाहून त्याच्या भार्येने सांगितले, माझे दहन करा आणि ते भस्म शंकरांना अर्पण करा. शरीराला प्राण निघून गेल्यावर कृमी तरी खातात किंवा त्यांचे भस्म तरी होते. जर पशुने ते खाल्ले तर त्याचे विट् होते. हा देह क्षणभंगुर आहे. हरिला भस्म अर्पण करण्याच्या निमित्ताने माझ्या देहाचे साफल्य करा.

तो शबर म्हणाला सूर्य, भूमी आणि अग्नीच्या साक्षीने तुझे भतृत्व मी अंगीकार करुन तुला वरलेले आहे. ह्याच्या उलट मी कसा वागू? तुला ऐहिक सौख्य काहीच मिळालेले नाही. पण ती आता शबराचे समाधान करण्यासाठी म्हणते, 'ह्या नश्वर शरीराच्या ठिकाणी तुम्ही धरलेला मोह व्यर्थ आहे. नश्वर शरीराने जर शाश्वत असे काही मिळविता आले तर चांगलेच आहे. दुसरे असे की हे शरीर माझे म्हणजे दुसऱ्याचे समजता ही परकेपणाची कल्पनाही चुकीची आहे. माझे शरीर म्हणजे आपले अर्धांगच आहे.' पत्नीचे म्हणणे मान्य करुन तिला दग्ध करुन तिचे चिताभस्म नेहमीप्रमाणे त्याने शंकरांना अर्पण केले. पूजा झाली, त्याला आनंद झाला आणि प्रसाद देण्यासाठी रोजच्याप्रमाणे त्याने पत्नीला हांक मारली. म्हणजे त्याची बुद्धी इतकी स्थिर झालेली होती. संसारातून त्याचे मन किती बाजूला झाले होते. आता बायकोचे आपण दहन केले हे तो विसरुन गेलेला आहे. म्हणजे या हानीचा त्याच्या मनावर काही परिणाम झाला नव्हता. आणि त्याने स्त्रीला हाक मारली त्या बरोबर दग्ध झालेली स्त्री रोजच्याप्रमाणे प्रसाद घ्यायला येऊन उभी राहीली. ते घरही पूर्वीप्रमाणे तसच आहे आणि ती स्त्रीही तशीच आहे. काही गेलं नाही. तो आश्चर्यचकित होऊन म्हणाला, हे असं कस? तू दग्ध झाली असता परत कशी आलीस?

तिने उत्तर दिले, मी झोपेत होते, उठून आले.

म्हणजे तीही आपल्या देहाला झालेली हानी विसरली. हा शबरही तिला आपण दग्ध केले हे विसरला. म्हणजे ईश्वराच्या कृपेने तत्काल झालेल्या हानीचे विस्मरण होते तर

अनंत जन्मांच्या हानीचे विस्मरण झाले तर नवल काय ? भगवान शंकर तिथे प्रगट झाले. आपल्या दर्शनाने त्या शबराच्या कुळाचे दोष दूर करुन ऐहीकामुष्मिक सर्व त्यांना दिले. हा सगळा भक्तीचा प्रभाव आहे. भक्तीशिवाय काहीही फळ मिळत नाही म्हणून महाराज सांगताहेत, ह्या कुष्ठ रोग्याच्या भक्तीने ह्याची इष्ट सिद्धी होईल.

एके दिवशी महाराज संगमावर स्नानाला निघाले असता ह्या कुष्ठ रोग्यावर त्यांची दृष्टी पडली. शुष्क काष्ठाला अंकुर आले म्हणजे तुझा दोष जाईल असं ते म्हणाले होते. आता हे जाईल म्हणजे सहज म्हणाले असं नाही. महाराजांच्या वाणीतून जे निघाले ते खरंच आहे अशी त्या कुष्ठ रोग्याची श्रध्दा आहे. महाराजांनी आपल्या कमंडलुतील तीर्थ त्या काष्ठावर प्रोक्षण केले आणि दिव्य दृष्टीने त्या काष्ठाकडे पाहिल्या बरोबर त्या काष्ठाला तत्काल अंकुर फुटले. म्हणजे सद्गुरुंच्या कृपादृष्टीने कुठेही शक्ती जागृत होऊ शकते. हे ह्या प्रसंगाने दाखिवले आहे. वाळलेल्या कुष्ठाला अंकुर उत्पन्न झाले. आणि ह्याचा कुष्ठ रोगही गेला. समोर ईश्वरस्वरुप सद्गुरुंच्या समोर उभे राहून त्याने महाराजांची स्तुती केली. ह्याच्या मनात स्तुती करण्याची तत्काल स्फुर्ती झाली म्हणजे भगवंताच्या कृपेचे किती फळ आहे. पापक्षय झाला, कुष्ठरोग गेला, आणखी बुद्धीचेही सगळे दोष गेले. अशा निर्दोष बुद्धीने केलेली स्तुती अत्यंत सत्य स्तुती आहे त्याला ती सद्गुरुंकडे ईश्वर बुद्धी पहाण्याची दृष्टी निर्माण झाली ना! म्हणजे त्या स्तुतीमध्ये अतिशयोक्ति नाहीये. ईश्वर प्रसाद ज्या भक्तावर झालेला असतो त्याने केलेली स्तुती हे काव्य नसते ती निश्चित असते.

कोटी चंद्राप्रमाणे आपण शांत आहात. सर्व देवांनी आपल्या गणांसह आपल्या चरणांचा आश्रय केला आहे. मायेचा प्रभाव दूर करणारे आपण सूर्य आहात. निर्गुण असून आपण सगुण आहात. संन्यासी रुप धारण केल असून अनेक भक्त आपली सेवा करीत आहेत. कामादि जे सहा मत्त गज आहेत त्यांचा आपण अंकुश आहात. त्यांचा आपण निग्रह करणारे आहात. धर्माचं रक्षण करण्यासाठी आपण अवतार धारण केलेला आहे. उपनिषदांमध्ये वर्णन केलेले सगळे आनंद आपल्यामध्ये आहेत. सूर्य आणि चंद्र आपले नेत्र आहेत. सज्जनांची आपण कामधेनू आहात. ज्याला मिथ्या म्हणता येईल असे पाच भौतिक विश्व आपल्यापासून उत्पन्न झालं आहे. आणि ते विलीनही आपल्याच ठिकाणी होते. कमलनेत्राप्रमाणे सुंदर आणि दीर्घ आपले नेत्र आहेत. दंड कमंडलुने आपण सर्वांचे अघ दूर केले आहे.

वेदत्रयींनासुध्दा आपल्या चरणांची धूळ मिळाली नाही. तो शोधतहेत धूलीकरण. नाद, बिंदू आणि कला हे ज्याचे स्वरुप आहे असे योगीध्येय आपण आहात. त्रितापाने पोळलेल्या जीवांना आपण आश्रय देणारे कल्पतरु आहात.

दैन्य, कष्ट, भीती कुबुद्धी हे आपण दग्ध करुन टाकता. अष्टांग योग आणि ज्ञान अधिकारी भक्तांना द्यायला आपण उत्कंठित आहात. कृष्णा पंचगंगेच्या संगमावर आपला निवास आहे. आदि मध्य ज्याला काही नाही (म्हणजे सर्व कालात असणारा) आणि अनंत शक्ती असणारे आपण आहात. आपल्या शक्तीची कोणालाच कल्पना येत नाही. आपण वाणी आणि मनाच्या पलिकडे आहात. मोठ्या  मोठ्या भक्तांनी आपले स्तुतीगायन करावे मी काय करु शकणार. स्तुती करताना ब्रह्मदेवही विमुख झाले. शेषही थकला वेदही चकित झाले.

स्तुती करुन तो सारखा महाराजांना नमस्कार घालतोय.

महाराज त्याला म्हणाले, माझ्या प्रसादाने तुला कीर्ती, ऐश्वर्य आणि सत्पुत्र मिळेल. तू मोठा योगज्ञ होशील आणि तुझ कुलही मोठं योगज्ञानसंपन्न होईल. आपल्या स्त्रीला इथे आपण  आणा आणि चिरकाल राहा.

त्याप्रमाणे तो आपल्या भार्येसह तिथच गाणगापुरात राहिला. त्याला पुढे मुलगा, मुलगी झाली. महाराजांनी दिलेल्या विद्यासरस्वती मंत्राचा जप करीत महाराजांची सेवा करता तो तिथे राहिला. त्याला महाराजांच्या कृपेने संसाराबद्दल अनासक्ती निर्माण झाली. पुढे तो जीवनमुक्त झाला. त्याचे कुलही त्याच्यासारखेच झाले. ब्रह्मज्ञानी पुरुषाच्या कुळात अब्रह्मज्ञानी कधी होत नाही. त्याचे कुळही ब्रह्मज्ञानी होते. हा त्याच्या भक्तीचा महिमा आहे.

सिध्द नामधारकाला पुढे सांगताहेत, तुझा पुर्वजही ह्याच्यासारखेच होता. म्हणून तुला गुरुभक्ती करण्याची इच्छा झाली. सदगुरुंचा हा वर्धमान प्रसाद तुझ्या कुलावरही होईल. तुझेही कुल मोठे होईल.

सायंदेवाचे चरित्र या विसाव्या अध्यायात आहे. नामधारकाने सिद्धांना विचारले, आमचे पूर्वज कोण होते ? त्यांनी भगवान प्रभूंची काय सेवा केली ज्या प्रभावाने मला अशी चांगली बुद्धी मिळाली ? ते मला सांगा.

सिद्ध म्हणाले, सायंदेवाचे महाराजांनी यवनापासून कसे रक्षण केले ते पूर्वी तुला सांगितलेच आहे. तेच तुझ पूर्वज, गुरुमहाराज गाणगापुरामध्ये आहेत. असे त्यांनी ऐकले. आणि महाराजांचे दर्शन घेण्यासाठी ते इथे आले. महाराजांचे मठात दर्शन झाल्यावर त्यांचे चरणदृश्य पकडून नमस्कार केला. महाराजांची ते स्तुती करु लागले, 'आपण परमात्म परंज्योति म्हणजे सूर्योदिकांनाही प्रकाश देणारे आहात. आपले हे चरण म्हणजे श्रुतींनीही ज्यांचे चिंतन करावे आणि सर्व तीर्थांना आश्रय देणारे आहेत. आपण मनुष्य नसून साक्षात महेश्वर आहात. तीन वेदच आपल्या रुपाने साकार झाले आहेत. आपल्या कमंडलुतील तीर्थात प्राणदान देण्याचे सामर्थ्य आहे. दुष्टांचा नाश करणारा दंड ज्यांच्या हातात आहे असे आपण विष्णू आहात. पापनाश समर्थ अशी उग्र दृष्टी ज्यांची आहे अशी मुक्ती देणारे आपण साक्षात् शिव आहात. आपण मृताला जिवंत केले आणि आपला संकल्प होताच वंध्या महिषीने दूध दिले. शुष्क काष्ठाला आपण पल्लव आणलेत. अत्यंजाचाही आपण एका क्षणात उद्धार केला. या भूमीवर आपला प्रभाव जाणण्यास कोण समर्थ आहे ?

महाराज म्हणाले, ''माझी सेवा फार कठीण आहे, कोणीही अज्ञ मनुष्य माझी सेवा जाणू शकत नाही गावांत, नदीतीरावर, अरण्यात, कुठेही मी राहातो.''

हे ऐकून सायंदेवांनी सांगितले, ''मी आपल्याबरोबर सेवा करण्यासाठी कुठेही यायला तयार आहे. महाराज म्हणाले, बरय, मग पुढे एक दिवस महाराज आपल्या इतर शिष्यांबरोबर न घेता फक्त सायंदेवांना संगमावर घेऊन गेले. तिथे अश्वत्थ वृक्षाच्या खाली येऊन बसले. सायंदेवाची परीक्षा घेण्यासाठी महाराजांनी अचानक पर्जन्यवृष्टी सुरु केली. मेघांचा गडगडाट, विजेचा लखलखाट होऊ लागला. वीज चमकण्याने दृष्टीला क्षणभर काही दिसत नव्हते. थंडीने सायंदेव थरथर कापत होते. मुसळधार पाऊस पडू लागला. थोड्या वेळाने पाऊस थांबल्यावर महाराज सायंदेवाला म्हणाले, गावात जाऊन शेकण्यासाठी अग्नी घेऊन ये. आमचे अंग भिजले असून आम्हाला थंडी वाजते आहे माझं चिंतन करुन इकडे तिकडे न पहाता अग्नी घेऊन ये.''

गारांच्या पावसाने तो ओला चिंब झाला होता. वीज चमकल्यावर जो प्रकाश पडायचा त्या प्रकाशात रस्ता पहात पहात तो गावात गेला. घरातून भांड्यात अग्नी घेऊन लगेच संगमाकडे यायला निघाला. गुरुमहाराजांनी त्याला परत येताना रस्त्यात इकडे तिकडे

न बघण्याची सूचना दिली होती. त्याला उत्सुकता वाटली की महाराजांनी असे कां बरे सांगितले असेल. आणि म्हणून त्याने संगमावर परत येताना रस्त्याच्या दोन्ही बाजूला पाहिले तोत्याला दोन भयंकर सर्प त्याच्या बरोबर येताना दिसले. घाबरुन तो धावत संगमाकडे येऊ लागला. धावता धावता तो भीतीने महाराजांचे ध्यान करु लागला. पण प्रत्यक्ष संगमाजवळ आल्यावर त्याला मोठ्याने वेदध्वनि ऐकायला येऊ लागला. आकाश निरभ्र झाले होते. महाराज त्याला म्हणाले, तुझ्या रक्षणाकरता आम्ही ते दोन सर्प मुद्दाम पाठवले होते. ते दोघेही सर्प महाराजांना नमन करुन निघून गेले.

महाराज सायंदेवाला म्हणाले ''गुरु सेवा करणे फार कठीण आहे.'' सायंदेव म्हणाला, ''हे कृपासमुद्रा, भगवंता, शरणागत वत्सला, मला गुरुसेवा तत्व काय आहे हे समजावून सांगा.'' गुरुमहाराज म्हणाले, 'ज्या प्रमाणे आपली छाया आपल्याला सोडत नाही त्या प्रमाणे आपण छायेसारखे सद्‌गुरुंच्या मागे सेवेसाठी राहिले पाहिजे. हे एक सेवा तत्व आहे. दुसरं म्हणजे आपल्याजवळच्या द्रव्यासहित आपला देव आपण आत्मदृष्टी ठेवून सद्‌गुरु सेवेला अर्पण करावा. सद्‌गुरु हे परमेश्वरच आहेत. अशा भावनेने सर्वकाळ त्यांचे भजन करावे. त्यांचे प्रसाद सेवन, चरणतीर्थ सेवन करावे. त्यांचा प्रसाद हेच भोजन. त्यांचे ध्यान हेच जीवन. त्यांचेच गुणगान करण्यात रममाण व्हावे. त्यांच्या कथांबद्दल आवड असावी. गुरुंनी एखादे दु:साध्य कार्य करायला जरी सांगितले तरी भक्तीने आरंभ करावा. गुरु हेच सिद्धी देतात. कालालासुध्दा गुरुंची भीती वाटते. त्यामुळे गुरुसेवा करताना मृत्युची भीती वाटू देऊ नये. म्हणून गुरुंनी कितीही अवघड काम सांगितले तरी ते करावे.

या संदर्भात शंकर पार्वतींचा संवाद ऐक, ब्रह्मदेवाचा पुत्र त्वष्ट्रा नावांचा, त्याने गुरुंची सेवा केली. त्याची सेवाभक्ती किती दृढ आहे हे पहाण्याकरता एकदा गुरुमहाराज त्याला म्हणाले, इथे पावासाळ्यात पाणी गळते प्रत्येक वर्षी, म्हणून एक उत्तम प्रकारचे घर आमच्याकरता तयार कर. ते आरामदायी असावे आणि नेहमी नवीन वाटावे. ते कधीही जुने होऊ नये. हे ऐकून तो शिष्य तशी व्यवस्था करण्याकरता निघाला त्यावेळी गुरुपत्नी म्हणाली, माझ्या अंगाला बसेल अशी एक कंचुकी आणून दे. ती उत्तम, अकृत्रिम असावी. गुरुपुत्र त्याला म्हणाला, माझ्या पायाला येतील अशा दोन पादुका आणून दे त्या घालून पाण्यावरुन किंवा कोणत्याही पृष्ठभागावरुन सहज चालता आले पाहिजे. आणि मला जिथे जायची इच्छा होईल अशा स्थानाला मला त्या पादुकांनी

न्यायला पाहिजे. गुरुकन्या म्हणाली, कानांत घालायला कुंडले, हस्तिदंताचे क्रीडागृह तसेच खेळायला बाहुल्या मला आणून दे. त्या बाहुल्या सचेतन असाव्यात. मी जिथे जाईन तिथे त्यांनी माझ्यामागे त्यांनी यायला पाहिजे. म्हणजे सद्गुरुंनी असाध्य कार्य जरी सांगितले तरी करावे हा उपक्रम आहे. त्याचं हे उदाहरण आहे. ज्या भांड्यामध्ये अन्न गार होणार नाही, ज्या भांड्याला काजळी धरणार नाही अशी भांडी मला आणून दे.

तो त्वष्ट्रा म्हणाला, मी अज्ञानी आहे. मला गुर्वाज्ञा काही समजत नाही. पण गुर्वाज्ञा पालन करताना मला मरण आले तरी हरकत नही. तो खिन्न होऊन विचार करीत असता एक अवधूत तिथे आले. त्वष्ट्रा त्यांच्याजवळ गुरुभाव धरुन गेला. त्यांना अभिवादन करुन आपल्या गुरुंची आज्ञा सांगितली. ते अवधूत त्याला म्हणाले, काशी क्षेत्र हे अभिष्ट क्षेत्र आहे. त्यात विश्वेश्वर जागृत असताना दुर्लभ असे काय आहे ? त्यांना शरण गेल्यावर सगळं मिळेल. त्या काशीक्षेत्राचा महिमा कोण जाणतो. काशीवासी जो आहे त्याचे दर्शन झाले तरी पाप जातं. तिथल्या सुखाचे काय वर्णन करावे ? मृत झालेल्या कोणत्याही प्राण्याला तारक मंत्राचा उपदेश करुन विश्वेश्वर त्याला मुक्ती देतात.

त्वष्ट्राने अवधूतांना विचारले, काशी कुठे आहे ? विश्वेश्वर कुठे आहेत ? स्वर्गात आहे की भूमीवर आहे ? मला ते काही कळत नाही पण आपणच मला तारा, मला काशी विश्वेश्वराचे दर्शन घडवा. अवधूत म्हणाले, चल, तुला मी तिथे घेऊन जातो म्हणजे तुझ्या निमित्ताने मलाही क्षेत्रदर्शन होईल. माझे जन्म साफल्य होईल. मग अवधूत योगमार्गाने त्वष्ट्र्याला घेऊन काशीला गेले. आणि क्षेत्राची यात्रा त्यांनी क्रमाने सांगितली. आणि ही यात्रा झाल्यावर स्वत:च्या नांवाने एक शिवलिंग स्थापन करुन त्याचे अर्चन कर म्हणजे तुझ्या मनोकामना पूर्ण होतील. असे सांगून अवधूत गुप्त झाले.

तो त्वष्ट्रा म्हणतो, माझी परीक्षा करण्याकरता गुरुच अवधूताचे रुप घेऊन आले होते. अवधूतांनी सांगितल्याप्रमाणे त्याने यात्रा केली. लिंग स्थापना केली. विश्वेश्वर त्याच्यावर प्रसन्न झाले आणि म्हणाले, शुद्ध गुरुभक्तीने तूं पवित्र झाला आहेस. तुला पाहिजे तो वर मागून घे. त्वष्ट्र्याने आपल्या गुरु, गुरुपत्नी, मुलगा, मुलगी यांनी काय मागितले ते सांगून त्या इच्छा पूर्ण करायची विश्वेश्वरांना प्रार्थना केली. विश्वेश्वरांनी तुझे सर्वतोपरी कल्याण होईल. असा आशीर्वाद दिला आणि ते अंतर्धान पावले. मग तो गुरुंकडे परत आला.

गुरुंनी प्रसन्न होऊन असा आशीर्वाद दिला की जो पर्यंत सूर्य चंद्र आहेत तो पर्यंत तू चिरंजिवी राहून सर्व लोकांमध्ये ब्रह्मदेवाप्रमाणे तूं प्रसिद्ध होशिल. सर्व सिद्धी तुला वश होतील. दु:ख, चिंता तुला कधी स्पर्श करणार नाहीत. हा माझा तुझ्यावरचा प्रसाद आहे. पुढे तो त्वष्ट्रा मोठा कीर्तीमान झाला.

हे गुरुंचे सेवा तत्व शंकरांनी पार्वतीला सांगितले. गुरुंच्या आज्ञेप्रमाणे आचरण आणि गुरुंचे अर्चन मनोभावे करणं हीच गुरुसेवा आहे. असे गुरुमहाराजांनी सायंदेवाला सांगितले. सायंदेव म्हणाले, आपण ज्या काशीक्षेत्राचे वर्णन केले. ते मी प्रत्यक्ष पाहिलं. आपण कुठं काशी कुठं, पण मी पूर्वी कधीही न पाहिलेलें सर्व आपण मला दाखिवलं. आपण मनुष्य, देव नसून परात्मा आहात. त्याने स्तुती केलेली आहे. शार्दुल विक्रिडात.

आपण वस्तुत: बहुरुपच आहात. जन्मक्रियारहित असूनही आपण बहुरुप व्हावे अशी आपल्याला इच्छा उत्पन्न झाली. आपण मग हे ब्रह्माण्ड उत्पन्न केलेत. आपणच सर्व लीला करता. सज्जनांचे संरक्षण करता आणि दुर्जनांचा नाश करता. आकाश हे अल्प आणि बहुरुपाने दिसते. ते दुसऱ्या उपाधीमुळे दिसते. घटकाश मोठा घडा किंवा परात घेतली तर अजून मोठे दिसते. आत्म्याशिवाय दुसरी अनात्म वस्तु काहीच नाही. जगातल्या पदार्थात ब्रह्म आहे म्हणूनच त्यांना नामरुप स्वरुप आहे. ब्रह्मानेच ते रुप धारण केले. ब्रह्मालाच नवीन रुप आले असे नाही. ब्रह्माण्डातून उत्पन्न झालेल्या ब्रह्माला निर्माण करुन आपापल्या धर्माने युक्त स्रव पदार्थ उत्पन्न केले. आपलच रुप जीवरुपाने करणारे आपण सज्जनांचा द्वेष करणाऱ्यांचा नाश करता.

कलीने आकृष्ट ज्यांचे मन झालेले आहे आणि म्हणून ज्यांनी यज्ञयागादि कर्म टाकलेली आहे अशा नरांच्याकडून त्रस्त, पिडीत झालेले देव त्यांना त्रास व्हायला लागला. म्हणून त्यांना आनंद देण्याकरता प्रात:कालच्या सूर्याप्रमाणे आपण उदित झालात (प्रात:कालचा सूर्य जसा अंध:कार दूर करतो तसे आपण अज्ञानरुपी अंध:कार दूर करता) आपण महामोहांधकारीरुप अंधकार दूर करता. स्वधर्माचरण करण्याची बुद्धी कमी झाली असता ती बुद्धी पुन्हा दृढ करण्याकरता आपण प्रकट झालात.

आपण सर्व आनंद आणि सुखांचे शुद्ध स्थान आहात. आपण आपले हे असे रुप प्रगट करुन जगत्रयांचा उद्धार करता. तिन्ही जनांचे मन हाच एक मृग, त्यांच मनरुपी मृगांच

क्रीडा करण्याचं स्थान हे वन असं पावन स्वरुप आपण प्रगट केलत. चतुर्थाश्रम घेऊन संसाररुपी गर्तामध्ये पडलेल्यांचा आपण उद्धार करता.

मुक्याला आपण वाणी दिलीत. अंधाला दृष्टी दिलीत. वंध्येला पुत्र दिलात. मृताला प्राण दिलेत. शुष्क काष्ठाला आपण पल्लव दिलेत. असा हा इतका मोठा आपला महिमा आहे. आपण त्रैलोक्याचे संरक्षण करायला समर्थ आहात.

एकच मी असताना विविध क्रीडावनरुप मी कसा झालो ? याचे उत्तर देताहेत. मुक्तांचा आवास आपण आहात. निर्दोष आपलं स्वरुप असल्यामुळे मुक्त लोक आपल्या ठिकाणी राहातात. मुमुक्षुंच्या सर्व इच्छा (सद्‌गुरु प्राप्ती, साधन, लाभ, दुर्वासना दूर होणे) कल्पवृक्ष आहात. आणि जे आपले बहिर्मुख भक्त आहेत, सकाम भक्त त्यांच्या इच्छा पूर्ण करणारे आपण आहात. वैचारिक आणि आर्थिक दारिद्र दूर करणारे आपण आहात. पाप दग्ध करुन टाकणारे आहात. ताप दूर करुन शांती देणारे आपण आहात. शास्त्रात जे निरनिराळे वाद - सिद्धांत - सांगितले आहेत. त्यांच्या पलिकडे आपले स्वरुप आहे. श्रुतीनी अन्विष्ट ज्याचे रज आहे असे आपले पद आहे.

योगीश्वर (याज्ञवल्क्यादि) सुध्दा ज्याचं चिंतन करतात, सर्व तीर्थांना ज्यांचा आश्रय आहे. सज्जनांना जीवन देणारे आपण आहात. सकाम भक्तांना लक्ष्मी देणारे आपण आहात. पाप हरण करणारे विद्वानांच्या वादालासुध्दा आपण पूज्य आहात. आकाश हे अल्प आणि बहुरुपाने दिसते. ते दुसऱ्या उपाधीमुळे दिसते. घटाकाश मोठा घडा किंवा परात घेतली. तर अजून मोठे दिसते. आत्म्याशिवाय दुसरी अनात्म वस्तु काहीच नाही. जगातल्या पदार्थात ब्रह्म आहे म्हणूनच त्यांना नामरुप स्वरुप आहे. ब्रह्मानेच ते रुप धारण केले. ब्रह्माला नवीन रुप आले असे नाही. ब्रह्माण्डातून उत्पन्न झालेल्या ब्रह्माला निर्माण करुन आपापल्या धर्माने युक्त सर्व पदार्थ उत्पन्न केले. आपलच रुप जीवरुपाने निर्माण करणारे आपण सज्जनांचा द्वेष करणाऱ्यांचा नाश करता.

आपण वेदांनासुद्धा अगोचर आहात. आपलं निर्मल चरित्र संपूर्ण सांगायला कोण समर्थ आहे ? स्वत: ईश्वरालाही आपले संपूर्ण चरित्र माहीत नाही. म्हणजे अज्ञात आहे असा अर्थ नाही. ईश्वर सर्वज्ञ नाही असा अर्थ नाही. म्हणजे कळत नाही याचा अर्थ आपलं चरित्र इतकं अनंत आहे. अग्नी, जल, सूर्य, चंद्र, भूमी, आकाश, वायू आणि पुरुष हे आठ आपले मूर्त स्वरूप आहे. (आचार्यांच्या दक्षिणामूर्ति स्तोत्रात दिले आहे) या आठ मूर्तीमध्ये सगळं जग आलेलं आहे.

दंड, कमंडलु घेतलेले प्रशांत असे आपले संन्यासी रुप आहे. आपण भीमा अमरजा संगमावर निवास करणारे आहात. हे आपले स्वरूप ध्यान करण्यास योग्य शरणागताचे रक्षण करणारे तारक आहे. हे आपलं रुप माझ्या चित्तामध्ये सदैव स्थिर करा.

अशी स्तुती करणाऱ्या सायंदेवांना दत्तप्रभु म्हणाले, तुझ्यावर मी संतुष्ट झालो असून तुला मी अहेतुकी भक्ती देतो आहे. वंशोवंशी माझी भक्ती नांदेल. या पुढे म्लेंच्छाची सेवा करू नकोस. आपल्या स्त्री पुत्रांसहित इथच राहायला ये. दत्तप्रभूंच्या आज्ञेप्रमाणे सायंदेव आपल्या स्त्रीपुत्रांना घेऊन गाणगापुरला आले आणि पुन्हा त्यांना दत्तप्रभूंची स्तुती केली.

नाम आणि रुप धारण करून आपण जगद्रुप झालात. आपण वस्तुत: ओंकारवाच्य आहात. ओंकारच्या ठिकाणी परमात्म्याचे ध्यान करतात. नाम आणि नामी, दोन भिन्न नाहीच ते एकच आहेत. आपण त्रिगुणात्मक आहात. आपल्याला आदि, अंत नाही. पूर्व पुण्याईने आपले हे सत्व, परात्पर रुप मला पहायला मिळाले. पापी असूनही आपल्या चरणांच्या आश्रयाने मी पवित्र झालो. परिस स्पर्शाने लोखंडसुद्धा सोने होते. दीन असूनही मी धन्य झालो.

सायंदेवांनी अत्यंत गद्‌गदीत होऊन श्रीगुरूंची अशी स्तुती कानडी भाषेत केली. आणि आज पर्यंत श्रीगुरुंच्या जेवढ्या लीला झाल्या त्यांचे त्या स्तुतीत वर्णन केले.

किती वैदिक स्तोत्र आहेत, ब्राह्मण असून सायंदेवांनी श्रीगुरूंची स्तुती कानडी भाषेत कां केली ? वेद किंवा पुराणातली घ्यायला नको का ? देवाला संतुष्टता कशी येणार ? मोठे महाराज सांगताहेत, विधीने सांगितलेले कर्म करण्याकरता वेद मंत्र पाहिजेत. ईश्वराची स्तुती आपल्या आपल्या अधिकाराप्रमाणे करायची. सायंदेवांनी प्रेमाने आपल्या मातृभाषेत ही स्तुती केली.

दत्तप्रभूंनी संतुष्ट होऊन सायंदेवांना वर देत म्हटले, तुझा ज्येष्ठ पुत्र, नागनाथ हा मोठा मान्यवर, धन्य होईल. आणि नागनाथाच्या मस्तकावर आपला शुभ हस्त ठेवला. लगेच नागनाथ बृहस्पतिंप्रमाणे वक्ता आणि ज्ञाता झाले. दत्तप्रभू पुढे म्हणाले, ही स्त्री मोठी भाग्यवान आहे. तुला आणखी चार पुत्र होतील. म्लेंच्छाची नोकरी सोडून तूं इथे सहकुटुंब येऊन राहा. माझ्या प्रसादाने तुझे कल्याण होईल भाद्रपद चतुर्दशीला अनंत

व्रताचे तूं आचरण कर. कृष्णांच्या उपदेशाप्रमाणे धर्मराजांनी हे मोठे व्रत केले आणि सार्वभौम सुख ह्याच्या प्रसादाने मिळून धर्मराज सदेह स्वर्गलोकात गेले.

सायंदेव म्हणाले, आपणच आमचे देव आहात. आमचा अनंत आपणच आहात. आपली सेवा हेच मोठे व्रत आहे. तरीही ह्या व्रताची आपण मला माहीती सांगा.

दत्तप्रभू म्हणाले, पांडवाच्या राजसभेमध्ये मयासुराने एक भ्रांती निर्माण करणारी मयसभा निर्माण केली होती. जिथे पाणी नसेल तिथे भ्रम होऊन पाणी दिसत होते आणि जिथे पाणी असेल तिथे जमीन दिसे. जिथे भिंत असेल तिथे दरवाजा दिसे आणि दरवाज्याच्या ठिकाणी भिंत दिसे त्यामुळे दार समजून गेले कि भिंतीवर डोके आपटावे. एकदा दुर्योधन तिथे आला असता पाण्यात दृष्टीभ्रमाने पडला. सभेतले सगळे लोक त्या हंसले. ह्याचा सूड म्हणून दुर्योधनाने कपटद्युत खेळून पांडवाचे राज्य हरण करुन त्यांना वनवासात पाठवले. त्यावेळी धर्मराजही अत्यंत दु:खित झाले. श्रीकृष्ण त्यांना भेटायला एकदा वनात आले असता त्यांनी श्रीकृष्णांना विचारले, 'आमचा त्राता तूच आहेच असं असताना आमचे दु:ख तुला कळत नाही का ?'

**श्रीकृष्ण म्हणाले, ''जो सदैव माझे भजन करतो त्याला दैवसुध्दा काही करु शकत नाही. देह तादात्म्य झालेल्यांनाच दैवाचा भोग काय असतो हे कळते म्हणतात. समाधी स्थिती प्राप्त करुन घेतलेल्या योग्याला दैवाची पीडा होत नाही. त्याला सुखदु:खाचे भान नसते. इतक्या भूमिकेवर तू आलेला नाहीस. तूं अनंताचे व्रत कर म्हणजे हे संकट दूर होऊन तुला परत राज्यप्राप्ती होईल.''**

**तेव्हा धर्मराजांनी विचारले, ''हे अनंत व्रत काय आहे, पूर्वी कोणी केले होते ? ते सर्व मला सांगा. ''**

**श्रीकृष्ण सांगू लागले, ''मी विभू म्हणजे व्यापक आहे. संबंध चराचर विश्व कालस्वरुप मी आहे. तरीही कर्म, प्रयोजन, गुणांनी मी इतर सर्वांपेक्षा वेगळा आहे. मी अनंत, ब्रह्म आहे. भाद्रपद शुध्द चतुर्दशीच्या दिवशी हे अनंत व्रत करणाऱ्यांना हे व्रत अनंत फल देणारे हे. ते तूं कर. म्हणजे तुला इष्ट प्राप्त होईल. ''**

पूर्वी सुमंतु नावाचे वसिष्ठ गोत्रातले ऋषी होते. त्यांच्या पत्नीने एका कन्येला जन्म दिल्यावर मृत झाली. मग सुमंतुनी दुसऱ्या स्त्री बरोबर विवाह केला. प्रारब्ध त्यांनाही चुकले नाही. त्या दुसऱ्या पत्नीला भांडण आणि द्वेष अत्यंत प्रिय होते. त्या ऋषींची कन्या सुशिला रांगोळी वगैरे काढण्यात हुशार होती. सुमंतुंनी कौडिण्य ऋषींना ब्राह्मविवाह पध्दतीने दिली. कौडिण्य ऋषी सासऱ्यांच्या आग्रहास्तव दोन महिने सुमंतुंच्या घरी राहिले. पण त्यांना सासूचा फार त्रास झाला. मग एक दिवस आपल्या सासऱ्यांची आज्ञा घेऊन सुशिलेला घेऊन कौडिण्य ऋषी आपल्या घरी जायला निघाले. सुशिलेच्या सावत्र आईने तिला बरोबर प्रवासात नेण्यासाठी काही दिले नाही. मग सुमंतु ऋषीनीच सुशिलेला गव्हाचा कोंडा बिंडा काही तरी बरोबर दिला. मध्यान्ह काळी एका नदीच्या किनाऱ्यावर ते जरा थांबले. तिथे काही सुवासिनी स्त्रिया कोणची तरी पूजा करीत होत्या. ते पाहून सुशिला तिथे गेली आणि त्या स्त्रियांना त्या कसली पूजा करताहेत ते विचारले. त्या स्त्रिया म्हणाल्या, आज भाद्रपद शुध्द चतुर्दशी आहे त्या निमित्ताने आम्ही अनंत व्रताची पूजा करतो आहोत.

आता खाली टीकेत महाराजांनी थोडे लिहिले आहे. अनंतव्रत हे अनंत फल देत. हे खरं आहे का, असे विचारले आहे. अर्थवाद करायची लोकांना सवय आहे. अमूक यज्ञ केला म्हणजे माणूस अमर होतो म्हणतात ना मग खरोखरच अमर होतो का ? जास्ती आयुष्य म्हणजे जास्त सुख, तसं अनंतव्रताने अनंत फल मिळत चांगलं फल देणारे, हे अनंत व्रत आहे हा त्याच्यावरुन बोध घ्यायचा असतो. अर्थ तीन प्रकारचा आहे गुणवाद, अनुवाद आणि भूतार्थवाद. विरोध जर असेल तर गुणवाद म्हणायचे. गुण सांगायचे, यूप कसा आहे तर आदित्यासारखा आहे म्हणजे आदित्यासारखा श्रेष्ठ आहे. समान अर्थ असेल तर अनुवाद म्हणतात. उदा. अग्नी हा थंडीचे औषध आहे. प्रमाणान्तसिद्ध अर्थ सांगितला म्हणजे अर्थवाद म्हणायचा अग्नीच्या सान्निध्यात थंडी जाते हे प्रत्यक्ष प्रमाण आहे. तेच ह्या वाक्याने सांगितले. म्हणजे हा अनुवाद झाला. प्रमाणाने सिद्ध होणारा, म्हणजे विधी नाही.

तिसरा भूतार्थवाद प्रामाण्य. काही ठिकाणी भूतार्त म्हणजे सत्यार्थ वाद असतो. खरा अर्थ सांगणारा असतो. ह्या भूतार्थवादानेच ईश्वराचे अस्तित्व सिध्द होते. तशी काही वाक्य आहेत. इंद्राने वक्रसुराला मारण्याकरता व्रज हातामध्ये घेतले. हे काय गुणवाद आहे का अनुवाद आहे ? खराच अर्थ आहेत. इंद्राने व्रज हातात घेतले म्हणजे इंद्राला

शरीर आहे. मीमांसक देवांना शरीर असते हे मानत नाहीत. ते मंत्र हेच देवांचे स्वरुप मानतात. वेदांतशास्त्रात ह्या भूतार्थवादाप्रमाणे देवांना शरीर आहे असे मानतात.

अनंत सर्व चराचराच भरुन राहिलेला आहे. आणि त्या चराचरापेक्षाही वेगळा आहे. अशा (भावनेने) रीतीने अनंताची उपासना करायला सांगितली आहे. त्यामुळे अशा अनंतरुपी परमेश्वराच्या उपासनेचे फल अनंतच असणार. ते काही खोटं नाही खरंच असणार. एकाच समयी आपल्या सगळ्या इच्छा पूर्ण झाल्याचा अनुभव येणं 'सर्व कामान वाप्ती' म्हणतात. मोक्षाचं हे लक्षण आहे. आत्मज्ञान झालं म्हणजे सगळे आनंद एकदम मिळतात. श्रोत्रेंद्रियांनी मिळणारा, रसनेंद्रियांनी मिळणारा, वगैरे

अज्ञानी जीव जो आहे तो कर्म करतो. त्या त्या कर्माचं फल भोगण्याकरता नवीन नवीन देह त्याला घ्यावे लागतात. ज्ञानी हा सर्व रुप झालेला आहे. त्याला एकेक देह धारण करुन एकेक कर्माचं फल भोगायचे नाही. सर्वात्मक झाल्यामुळे सर्व देहात असणारा आत्मरुप तो झालेला आहे. प्रत्येक जीवाचा देह आणि जीवरुप वेगळे वेगळे आहे. त्यामुळे त्याला नवीन देह पाहिजे म्हणजे नवीन देहाचे फल त्याला भोगावे लागते. पण ज्ञानी जीव सर्वात्मरुप म्हणजे ब्रह्मरुप झालेला आहे. सगळे जगत रुप होऊन गेलेला आहे. त्यामुळे सगळ्या देहात राहून जी फलं मिळतात ती ह्याला एकदम मिळतात. असं हे अनंतव्रताचं फल आहे पण अनंताची उपासना या आत्मरुपाने केली पाहिजे.

त्या स्त्रियांनी सांगितले, लाल वस्त्र नेसून चौदा गाठी बांधलेला दोरा म्हणजे अनंत दर्भाच्या शेषावर ठेवून चतुर्बाहू अशा अनंताचे ध्यान करुन त्याची पूजा करावी. जीर्ण दोरा विसर्जन करुन नवीन दोरा दंपतीनी आपल्या हातात बांधावा. मेहुण जे बोलावले असेल त्याला चौदाव्या वर्षी चौदा कुंभ दान द्यावेत. प्रत्येक वर्षी भक्तीने असे पूजन करावे. ह्यापेक्षा दुसरे व्रत नाही. हे अभिष्ट फल देणारे व्रत तू कर. त्या स्त्रियांनी सुशिलेला अनंताचा दोरा दिला. तो अनंत हाताला बांधून ती आपल्या पतीजवळ आली. तिथून ते पुढे निघाले. वाटेत एक श्रीमंत गृहस्थाने त्यांना आपल्या घरी नेऊन पुष्कळ संपत्ती दिली. अनंताच्या प्रसादाने ते मोठे श्रीमंत झाले. एक दिवस कौंडिण्य ऋषींनी सुशिलेच्या हातातला लाल दोरा पाहिला. त्यांना वाटलं सुशिलेने त्यांना वश करण्याकरता तो बांधला आहे. असे समजून रागाने तो अग्नीमध्ये टाकला. हा सर्व ऐश्वर्य देणारा अनंत आहे तो टाकू नका असे तिने विनवूनही त्यांनी ऐकले नाही.

त्यामुळे लवकरच अग्नी आणि त्यांच्या शत्रुंनी त्यांचे ऐश्वर्य हरण केले. वेडा पिसा होऊन तो वनात फिरु लागले. गायी, आम्रवृक्ष, वगैरेंना तो अनंत कुठे आहे असे कौडिण्य ऋषी विचारु लागले. एवढ्यात एका वृध्द विप्राच्यारुपाने अनंतानी त्यांना एका अद्भुत पुरात नेले. आणि आपले मूळ स्वरुप दाखवले. कौंडिण्य ऋषींनी मग अनंताची स्तुती केली.

''हे सर्वेश्वरा, अनंता, जनार्दना, आपल्या मायेने मोहित होऊन दुर्बुद्धीने झालेल्या अपराधांची क्षमा करा.''

मग अनंतांनी त्यांना सांगितले, तुझे सर्व माझ्या प्रसादाने नक्षत्रामध्ये पुनर्वसु नक्षत्र तू होशील. मग त्या कौडिण्य ऋषींनी श्रीकृष्णांना त्यांना वनात भेटलेल्या आम्रवृक्ष, विषारी, पाण्याची सरोवरे, वृध्द इ. बद्दल विचारले असता श्रीकृष्ण म्हणाले, जो तू आम्रवृक्ष पाहिलास तो पूर्व जन्मात विद्वान ब्राह्मण होता पण त्याने आपल्या शिष्यांना काहीही ज्ञान दिले नाही. म्हणून त्याला हा जन्म मिळाला. ज्याने पूर्व जन्मात धनिक असूनही दान केले नाही म्हणून तो वृषभ झाला. पूर्व जन्मात दोघी बहिणींनी फक्त आपसातच दान केले त्यांना सरोवररुप प्राप्त झाले आणि त्याचे पाणी विषारी झाले एकमेकांच्यात मिसळून क्रोधी जो होता तो खर झाला. पुढे त्या सर्वांना माझ्या प्रसादाने मुक्ती मिळाली.

श्रीगुरु सायंदेवाला म्हणाले. तुझ्या मनात गुरुकृपेने सद्‌गुरुबद्दल भक्ती उत्पन्न झालेली आहे. तूं भिऊ नकोस. तूंही हा संसारसागर तरुन जाशील. संसार हा मृग तृष्णेसारखा आहे. पण तुला त्याची भीती नाही.

।। अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ।।

सिद्ध सांगताहेत, तंतुक नावाचा एक भक्त होता. तीन प्रहर संसार कार्य करुन एक प्रहर तो महाराजांची सेवा करीत असे. गावातल्या इतर लोकांनी एका महाशिवरात्रीच्या निमित्ताने श्रीशैलयात्रेला जाण्यासाठी त्याला बोलावले. ते जायला निघाले होते. या तंतुकाने सांगितले, महाराजांचा हा मठ म्हणजे श्रीशैल्य पर्वत असून महाराज म्हणजे साक्षात मल्लिकार्जुन आहेत. हे ऐकून बाकीचे लोक, हा मुर्ख आहे असे म्हणून श्रीशैल्ययात्रेला निघून गेले.

दत्तप्रभूंनी त्याला विचारले, गांवातल्या इतर मंडळीबरोबर तूं का श्रीशैल्य यात्रेला गेला नाहीस ? त्यांनाही तंतुकाने तेच उत्तर दिले. मग शिवरात्रीच्या दिवशी महाराज मध्यान्ह काली त्याला म्हणाले, 'आज श्रीशैल्य पर्वतावर मोठा उत्सव आहे.' तंतुक म्हणाला, 'आपल्या चरणांशिवाय दुसरा कोणताही महत्त्वाचा उत्सव मला वाटत नाही. आपण प्रत्यक्ष परमेश्वरस्वरुप असताना हे मूर्ख लोक कुठे यात्रेला जातात मला समजत नाही.'

दत्तप्रभू म्हणाले, असं तू बोलू नकोस कारण जगत्प्रभु सर्वत्र भरुन राहिलेला आहे. श्रीशैल्य हे क्षेत्र तपस्वी महापुरुषांनी आपल्या तपश्चर्येने पवित्र केलेलं आहे आणि त्या तपाच्या प्रभावाने परमात्मा तिथे नित्य जागृत आहे म्हणून त्या ठिकाणी जाऊन भजन करणाऱ्यांची कार्य सिद्धी लवकर होते. महा तपस्वी स्वत: जरी मुक्त झाले तरी आपल्या तपाने इतरांनाही मुक्त करतात. अशा विभुती लोकांच्या उद्धार करताच जन्माला येतात. त्यांनी ज्या मार्गावरुन संचार केला त्या मार्गावरील धुरळ्याचा जरी स्पर्श झाला तरी मुक्ती मिळते. म्हणून सज्जन ज्या ठिकाणी राहातात त्या क्षेत्रामध्ये लोक आनंदाने जातात. तेव्हा तू माझ्या बरोबर चल. योगगतीने आपण श्रीशैल्य पर्वतावर जाऊ. माझ्या पादुकांना घट्ट धर आणि डोळे झाक

त्या तंतुकाने महाराजांच्या आज्ञेप्रमाणे त्यांच्या दिव्य पादुका घट्ट पकडल्या. डोळे झाकले. एका क्षणात ते दोघे श्रीशैल्याला गेले. तिथे गेल्यावर महाराज म्हणाले, 'पहा आपण श्रीशैल्यावर आलो आहोत.' तंतुकाने डोळे उघडले आणि महाराजांच्या आज्ञेप्रमाणे क्षौर स्नानादि करुन तो मल्लिकार्जुनच्या दर्शनाला गेला. तो तिथे जात असताना गांवातल्या ओळखीच्या एका माणसाने त्याला पाहिले. त्याने तंतुकाला विचारले, असा आमच्या नंतर कां आलास ? आम्ही चल म्हणालो तेव्हा कां नाही आलास ? तंतुक म्हणाला, ''श्रीगुरुंनी मला आजच एका क्षणात इथे आणले आहे.'' त्या माणसाचे काही उत्तराने समाधान झाले नाही. श्रीगुरुंच्या चरणाचे अत्यंत एकाग्रतेने ध्यान करीत तंतुक मल्लिकार्जुनाच्या मंदिरात दर्शनाला आला. तिथे शिवलिंगाच्या ऐवजी गुरुमहाराज बसले असून सर्व लोक त्यांचीच पूजा करताहेत असे दृष्य दिसले. तिथे शिवलिंग वगैरे काही दिसलेच नाही. त्यानेही महाराजांची पूजा केली.

मग तो महाराज जिथे बाहेर कुठे बसले होते त्यांच्या जवळ आला आणि म्हणाला, या ठिकाणी तुम्हीच आहात आणि हे गावांतले अज्ञानी लोक आपण इतक्याजवळ असताना

कशाला एवढ्या दूर येतात आपली पूजा करायला? संपूर्ण विश्व व्यापून आपण दशांगुल राहाता असे वेदही सांगतात.

महाराज त्याचा बुद्धिभेद होऊ नये म्हणून म्हणाले, ''परमात्मा एकच आहे, भजन करणाऱ्यांच्या दृष्टीने, तथापि स्थान प्रभाव हा भिन्न भिन्न आहे स्थान प्रभाव असल्यामुळे इथे सर्व लोक येतात. इथे घडलेले एक वृत्त ऐक. किरात देशामध्ये विमर्षा नावाचा राजा राज्य करीत होता. तो क्षात्र धर्माचे उत्तम पालन करणारा, ब्राह्मणांचा आदर करणारा आणि सर्वांचे हित करणारा असा प्रजादक्ष राजा होता. पण पूर्वीच्या काही संस्कारांनी तो स्त्री लंपट होता. तरीही उत्तम शिक्षक होता. त्याची स्त्री मात्र साध्वी, पतिव्रता होती. तिने एकदा त्याला विचारले, शंकराच्या ठिकाणी तुमची एवढी भक्ती कशी स्थिर झाली? तुम्ही तर एकीकडे धर्माच्या विरुध्द वागता!''

विमर्षण म्हणाला, ''पूर्वीच्या जन्मात मी उच्छिष्ट खाण्याकरता शंकराच्या मंदिरात गेलो असता लोकांनी मला मारले. आणि मरताना मी शंकराची पूजा केलेली पाहिली, उजळलेले दीपही पाहिले. त्या शिवलिंगला प्रदक्षिणा घालून शिवरात्रीच्या दिवशी मला मृत्यु आला. त्यामुळे मला शिवलोकाची प्राप्ती झाली. माझे जे दुर्गुण आहेत ते श्वानाच्या नैसर्गिक प्रवृत्तीमुळे झालेले आहेत. जीव पूर्व (जन्मांच्या) संस्कारांना अनुसरणारा असतो. ज्ञानी जरी असला तरी त्याचे वर्तन पूर्व संस्काराप्रमाणे असते. ज्ञानी माणसालाही ते संस्कार सोडता येत नाही''

मग त्या राणीने विचारले, ''माझा पूर्व जन्म काय होता?'' राजाने सांगितले, तू कपोती होतीस. तुझ्या तोंडात मांसाचा तुकडा पाहून एक घार तुझ्या मागे लागली. आणि तिने या श्रीशैल पर्वतावर तुझ्यावर झडप घातली आणि तुझे प्राणोत्क्रमण झाले. तिने राजाला विचारले, ''मला पुढचे कोणते जन्म येणार आहेत ते सांगा'' विमर्षण राजाने सांगितले, 'पुढच्या जन्मात मी सिंधुदेशात जन्माला येणार आहे. तू संजय देशात जन्म घेऊन माझी पत्नी होशील. नंतर मी सौराष्ट्र देशाचा राजा होईन तर तूं मागध देशात जन्म घेशील. नंतर आपण दोघे अवंति आणि दशार्णव देशात जन्म घेऊ. मी ययाति राजा होईन. सातव्या जन्मात विदर्भ देशात मी राजा होईन. त्यावेळी मदनासारखा सुंदर, बुद्धिमान, शीलवान आणि रतिसारख्या तुझ्या बरोबर विवाह करीन. अनेक यज्ञ करीन, सम्राट होईन. आपल्याला अनेक पुत्र होतील. सर्व उपभोग आपल्याला मिळतील. नंतर अगस्ती ऋषीपासून आत्मतत्वाचे ज्ञान प्राप्त करून तुझ्यासह जीवनमुक्त होईन.'

अशा रीतीने शंकरांच्या समोर त्या दोघांचे सहज प्राण गेले. पण श्वानयोनीत जन्माला येऊनसुद्धा त्यांना पुढे उत्तम गती मिळाली. असे हे स्थान महात्म्य जाणून लोक इथे येतात. अनुमानाने इथे जागृत देवस्थान आहे असे समजते.

नंतर श्रीगुरूंनी तंतुकाला पुन्हा घट्ट पादुकांना धरायला सांगून परत संगमावर क्षणार्धात आणले. मग तंतुकाला गांवात पाठवले. तोही आनंदाने गांवात गेला. गांवातल्या लोकांना संगमावर महाराज खिन्न झाले होते व परत जात होते एवढ्यात त्यांना तंतुक दिसला. तंतुकाला त्यांनी विचारले, 'तूं क्षौर कसे केलेस ?' त्याने उत्तर दिले, 'महाराजांनी एका क्षणात मला श्रीशैल्याला नेले. क्षेत्राचा सगळा आचार यथाविधी माझ्याकडून करवून घेतला आणि मला इथे आणून सोडले.' ते ऐकून ते लोक म्हणाले, 'मध्यान्हकाळी तुला आम्ही इथे पाहिलं आणि तूं इतक्या दूर जाऊन आल्याचे कसे सांगतोस ? तूं खोटं बोलतोयस' आणि ती सगळी मंडळी संगमावर आली. रात्री सर्वांनी शिवरात्रीचे जाग्रण केले. पंधरा दिवसांनी गांवातले श्रीशैल्याला गेलेल लोक परत आले. ते सगळे म्हणाले विस्मित होऊन की शिवरात्रीच्या दिवशी श्रीशैल्यम् पर्वतावर मल्लिकार्जुनाच्या मंदिराच्या दरवाजात त्यांनी तंतुकाला पाहिले होते. मग गांवातल्या सगळ्यांचा तंतुकाच्या सांगण्यावर विश्वास बसला. सद्‌गुरुच्या सेवेने कर्मबंध जो आहे तोही दूर करून त्या तंतुकाने परमानंदाची प्राप्ती करून घेतली. जिथे द्वंद्वाची भीती नाही. एक भक्ती-नवविधा भक्तीपैकी-करूनही असे किती मुक्त झाले असतील सांगता येत नाही.

दोन शिष्य हे कवी झाले आणि तेही गुरुंची स्तुती करून मुक्त झाले. त्या दोघा कवींनी गुरू लीलांचे वर्णन करणाऱ्या कथा रचल्या आहेत. अशा भगवंताची संपूर्ण लीला कोण सांगू शकणार आहे ? वेदसुद्धा जिथे शंकीत झाले आहेत तिथे मानवांची काय कथा ! नामधारकाने विचारले, ते कोण दोन शिष्य ! मला त्यांचे चरित्र सांगा, श्रोत्याने प्रश्न करावा अशी वक्त्याला इच्छा असते. कारण श्रोत्यांनी विचारले म्हणजे कथा ही स्मरणात येते.

सिद्ध म्हणाले, नंदीशर्मा नांवाचा एक कुष्ठी ब्राह्मण तुळजापूरला जाऊन तीन वर्ष तप करीत होता. मग तुळजाभवानीने त्याला चंदला परमेश्वराजवळ जाण्यास सांगितले. तिथे जाऊन नंदीशर्माने सात महिने तप केले. तिनेही मग त्याला सांगितले, भीमाअमरजा संगमावर रहाणाऱ्या यती महाराजांकडे तूं जा. नंदीशर्मा म्हणाला, माणसाकडे मला जा

म्हणतेस तुला कांही लाज वाटत नाही कां ? तुझा काय प्रभाव त्याची या वरून परीक्षा झाली. माणसाकडेच पाठवायचे होते मग मला इतके कष्ट कां दिलेस ? असे म्हणून तो तिथेच पुन्हा तप करू लागला. शेवटी पुजाऱ्यांनी देवीच्या आदेशाप्रमाणे त्याला तिथून घालवून दिले. नंदीशर्माने विचार केला. आजपर्यंत आपण इतके कष्ट भोगले. आता देवीच्या आज्ञेने अजून कांही कष्ट भोगायचे असतील तर भोगू असा विचार करून देवीला नमस्कार करून स्वामी महाराजांच्याकडे आला.

गाणगापुरात घेऊन त्याने स्वामी महाराज कुठे आहेत ? असे विचारले. कुष्ठी झालेला हा पापी मनुष्य आहे असे समजून त्याला कोणी उत्तर दिले नाही. मग एकाने सांगितले, आज शिवरात्री व्रताचे पारणे करण्याकरता देव मठात येत आहेत. तूं इथच थांब. इतक्यात प्रभू मठात आलेच. त्यांना कोणी तरी सांगितले, अगदी अर्जुन वृक्षाप्रमाणे ज्याचा देह झाला आहे असा कोणी तरी ब्राह्मण आलेला आहे. विश्वसाक्षी महाराज त्या ब्राह्मणाला बोलावून म्हणाले, देवांना सोडून माणसाकडे कशाला आलास तूं बाबा ?

नंदीशर्माने विचार केला आपल्या मनांतले विचार ह्यांनी ज्या अर्थी जाणले त्या अर्थी हे मानव नसून परमात्मा आहेत. आणि त्याने दत्तप्रभूंची क्षमा मागितली. त्याने प्रार्थना केली - महाराज, मी पापी असून आपण शरणागत आहात, आपण शरणागताचे रक्षण करणारे आहात. मी आपल्याला शरण आलेलो आहे. आपण भक्त वत्सल आहात. मला विवाह झाल्यावर हा कुष्ठ रोग झाला. पित्याने, पत्नीने, सर्वांनी माझा त्याग केला. कोणीही माझ्याकडे पहात नाही. देवसुद्धा माझा स्वीकार करीत नाहीत. त्यापेक्षा मृत्यु बरा असे मला वाटतयं. आपण परमात्मा आहात. आपणही माझा स्वीकार केला नाही तर मी इथेच प्राणत्याग करीन.

महाराज म्हणाले, भिऊ नकोस, तुझा हा रोग तुझ्या पूर्व पापापासून झालेला आहे आणि इतका काळ तुला तो भोगावा लागला आहे. म्हणून तुझ्या मनांत स्थिर, शुद्ध भक्ती उत्पन्न झाली. ह्या संगमावर तीर्थराज आहे. इथे सर्व पापे नष्ट होतात. त्या ठिकाणी जाऊन तूं स्नान कर. मग महाराज सोमनाथ ब्राह्मणाला म्हणाले, ह्यांच्याकडून यथाविधी संगमावर षटकुल तीर्थात सचैल स्नान करवा, मग अश्वत्थाचे पूजन करून घ्या आणि नंतर इथे घेऊन या. त्याप्रमाणे सोमनाथांनी सर्व केले आणि नंदीशर्माला महाराजांच्याजवळ आणले. महाराज म्हणाले, तुझे शरीर कुष्ठरहित झाले कि नाही हे एकदा पाहून घे.

त्याचे शरीर सुवर्णाप्रमाणे झाले होते. नंदीशर्माने आपले शरीर नीट न्याहाळले. तोही विस्मित झाला. फक्त जांघेमध्ये किंचित कुष्ठ राहिले होते. तो महाराजांना म्हणाला, हे थोडे कुष्ठ कसं राहिले ? महाराज हंसून म्हणाले, तुझ्या मनांत आमच्याबद्दल संशय आला होता म्हणून ते राहिले. तो म्हणाला, अमृत हे पाणी आहे अशा समजुतीने प्यायले तर त्याने काय मरण येईल काय ? दावाग्निला चुकून अज्ञानाने जरी स्पर्श केला तरी तो दाह केल्यावाचून राहिल का ? आपला स्वभाव जो पूर्णत्वाचा आहे यामुळे परिपूर्णत्वाला जाईल काय ? हा दोष ज्या अर्थी राहिला त्या अर्थी आपल्या ठिकाणी पूर्ण शक्ती दिसत नाही.

महाराज म्हणाले, ज्याचा जो मूळ स्वभाव असतो त्याचा तो स्वभाव कायम असतो. परंतु सदोषत: तो निराळा वाटतो कसा ? सूर्य उदयाला आला असतानासुद्धां जन्मांध जो आहे तो सूर्याचे अस्तित्वच मान्य करीत नाही. हा काय सूर्याचा दोष आहे काय ? हा त्या जन्मांधाचा दोष आहे. मी मर्त्य आहे माझ्या हातून तुझा रोग कसा बरा होणार अशी तुझ्या मनांत शंका आली कि नाही ? त्याचे (संशयाचे) हे फल आहे. तूं आणि मी सगळेच देव आहोत. ती अमर्त्यता सिद्ध होण्याकरता उपिनषदांमध्ये प्रतिपादन केल्याप्रमाणे सर्वच ब्रह्मरुप आहे अशी स्तुती तूं कर, म्हणजे तूंही ब्रह्म होशील आणि आम्हालाही ब्रह्म समजशील आणि तुझी शुद्धी होऊन कृतार्थ होशील.

नंदीशर्मा गद्गदित स्वराने म्हणाले, आपली स्तुती इतकी थोर आहे कि मी काय करणार ? लिपीसुद्धा मला कळत नाही. दुसरी कांही सेवा करायची आपण मला आज्ञा करा. महाराज म्हणाले, एकदा मुखातून निघालेले शब्द पुन्हा मागे घेता येत नाहीत. हत्तीचा सुळा एकदा पडला कि तो परत आपल्या जागेवर बसत नाही. तूं स्तुतीच केली पाहिजेस. असे म्हणून महाराजांनी त्याच्या मुखात अभिमंत्रित भस्म टाकले. आणि विविध प्रकारच्या उक्तीने स्तुती करण्यास सांगितले. मग प्रेम भक्तीमुळे ज्याचे शरीर नम्र झालेले आहे, स्वर गदगदित झाला आहे अशानंदी शर्माने श्रुतीमध्ये वर्णन केल्याप्रमाणे स्तुती करण्यास आरंभ केला.

आपण साक्षात परब्रह्म आहात, परमेश्वर आहात, ते पहाण्यासाठी दूरही जायला नको आणि ते पहाण्यासाठी डोळ्यांचीही आवश्यकता नाही. असे परम तत्व आपण आमच्याजवळ आहात. आपणच कर्ता आहात, जगाचे पोषण करूनसुद्धा आपण अविनाशी आहात. आपण नित्य आहात.

ईश्वराला कर्तृत्व आहे काय ? कर्तृत्व सगळे बुद्धीचे आहे. मग ह्याने अशी स्तुती कशी काय केली ? आत्मा असंग आहे. त्याला क्रिया वगैरे कांही संबंध नाही. बुद्धीला क्रिया आहेत.

हं, काय झालेलं आहे (की) आत्म्याला कर्तृत्व कसे ही शंका आहे. तर मग बुद्धीला तरी कर्तृत्व कसे असेल ? बुद्धी हे करण आहे ना ! साधन आहे. सुतार रंध्याने लांकूड तासतो. म्हणजे त्या रंध्याच्या ठिकाणी स्वतंत्र कर्तृत्व नाहीये. तो अचेतन आहे. सुताराने तो हातात घेतल्यानंतर त्याला कतृत्व आहे. तो करण आहे. कर्ता निराळा आहे. तस बुद्धी ही करण आहे. त्या बुद्धीला घेऊन कार्य करणारा दुसरा कोणी तरी असला पाहिजे. बुद्धीला स्वत:चे कर्तृत्व कसे असेल ? सांख्य असं कसं सांगतात ?

बुद्धीलाच कर्ता मानलं तर करण दुसरं कोण तरी दाखवायला पाहिजे. बुद्धीला स्वत: कर्ता होता येत नाही. रंध्यालाच सुतार म्हणायचे झाले तर त्याने दुसरा आणखी रंधा आणला पाहिजे. म्हणजे निराळा कोणी तरी ज्ञानी, चेतन पाहिजे. आणि लौकिक, वैदिक सगळे व्यापार कर्त्या शिवाय होत नाहीत. म्हणून जीव कर्ता ! आणि कर्तृत्व वगैरे हे सान्निध्यामुळे आहे, असंही समाधान आहे.
महावाक्याचा, ब्रह्माचा विचार होण्याकरता शम पाहिजे. हे सर्वही ब्रह्मच आहे. जग त्याच्यापासून उत्पन्न झालेले आहे. त्याच्यामध्येच ते लीन होते. आणि त्याच्यामुळेच सुरक्षित राहाते. म्हणून ते सर्व आहे. हे एकदा मनामध्ये आलं म्हणजे शांती आहे. मी कर्ता आहे, मी साधक, भक्त आहे वगैरे कांहीही अहंकार उत्पन्न होत नाही. सगळच ब्रह्म आहे. ही बुद्धी किंवा हे ध्यान जर झालं सगळे मनाचे व्यापार बंद होऊन मन शांत होते. आणि शांत मनाने मग विचार करून ज्ञान होते. सर्वच ब्रह्म आहे. ही बुद्धी किंवा हे ध्यान जर झालं सगळे मनाचे व्यापार बंद होऊन मन शांत होते. आणि शांत मनाने मग विचर करून द्वेष कुठला, कांहीच नाही. आणि मग मन उपासनेच्या वेळेला शांत राहाते. म्हणजे साक्षी आत्माच जगद्रुप झालेला आहे. त्याचेच फक्त चिंतन करायचे त्यापेक्षा निराळे कांही नाहीच आहे. 'सर्व खलु इदं ब्रह्म' म्हणून शांत होऊन, सर्व व्यापक आत्मा, द्रष्टा आहे, जगद्रुप झालेला आहे. ह्याचे चिंतन करायचे.

समष्टी बुद्धी हे पहिले महत् तत्व आहे. ते मायाशक्ती युक्त आहे. ज्याच्यामुळे हे सत्व समजलं जातं. त्या सत्वादि गुणांनी तीन प्रकारचा झालेला अहंकार आणखी आपल्यापेक्षा

भिन्न असलेला. त्या अहंकारापासून सगळी भूतं उत्पन्न झाली (आपण) ईश्वर मायामय आहे. आणि स्वतंत्र आहे. त्यातही पुन्हा ज्ञानाचे पात्र म्हणजे हा मनुष्य आहे. हे पूर्वी सांगितले आहे. आता ज्ञानाला पात्र हा मनुष्य असूनसुद्धा आपल्या मायेने भ्रांत झालेला आहे. आणि आत्मस्वरुप विसरून गेलेला आहे. हा मनुष्य सतत वेगळे वेगळे संकल्प करत असतो. आपल्या आत्मस्वरुपाला विसरून आपल्या कर्माच्या अधीन होऊन विविध योनींमध्ये जातो. त्यानंतर पापफलंही भोगतो आहे. कल्प संपल्यानंतर वासनारुप अंत:करणाने राहातो. म्हणजे ह्याचे सगळे स्थूल शरीर गेलेल असते. पुन्हा सृष्टीच्या आरंभी तो उत्पन्न होतो. पूर्वीच्या कर्मांप्रमाणे सत्कर्मवान असूनसुद्धा पुन्हा जन्म घेतो. स्वर्गामध्ये जाऊनसुद्धा पुण्य संपल्यावर चंद्रलोकामध्ये (खाली) पडतो. पुन्हा उपाधीच्या अधीन होऊन- पर्जन्याने जमिनीत-जमिनीतून धान्यात - धान्यातून पुरुषाच्या शरीरात- तिथून स्त्रीच्या शरीरात येतो- पुन्हा जन्म घेतो.

स्त्रीच्या गर्भाशयात स्त्री पुरुष संयोगामुळे शुक्र आणि रक्तरुप होतो. नंतर गर्भरूप होतो. मग पहिल्या ५ दिवसांत कलर ही त्याची अवस्था होते. सात रात्री नंतर बुदबुदाचा आकार येतो. १५ दिवसांनंतर पेशी तयार होतात. एक महिन्यानंतर तो गर्भ घनीभूत होतो. २ महिन्यांनी त्याला शिर उत्पन्न होते. ३ महिन्यांनी इतर सगळे अवयव येतात. ४ महिन्यांनी ९ छिद्र उत्पन्न होतात. ७ महिन्यांनी त्याला हालचाल करण्याचे सामर्थ्य येते. ८ व्या महिन्यानंतर पूर्व संस्कारानुसार बुद्धी तयार होते. ९ महिन्यानंतर तो पूर्ण देह तयार होतो. मग तो जीव ईश्वराची स्तुती करतो.

तो म्हणतो, मी पुन्हा पुन्हा जन्माला आलो, मृत झालो, विविध योनीत राहिलो, अनेक कष्ट सोसले. माझे मुख खाली आहे आणि गर्भाच्या पिशवीने मला बांधून टाकलेले आहे. इथून मला काढा, माझा उद्धार करा.

पुढे प्रसूती वायू त्याल गर्भाशयातून बाहेर ढकलतो आणि प्रसूत झाल्यावर ईश्वराची स्तुती करायची बुद्धी तो जीव विसरून जातो. ईश्वराच्या मायेने मोहित होऊन रडायला लागतो. त्या वयामध्ये इच्छा नसतानासुद्धा त्याला जे घडेल ते भोगावे लागते. त्याला कांही स्वत:ची भावना सांगता येत नाही कांही नाही, तो पराधीन असतो. त्या पराधीन अवस्थेत काय व्यथा होतात ते सांगायला तो असमर्थ असतो. पुढे तो बालवयात येतो. क्रीडेमध्ये त्याचा काल जातो. तारुण्यात विषयासक्त होतो. उन्मत्त होऊन दुर्जनांची

संगती मिळते. देवाचीच माया असलेली स्त्री पाहून तिच्या हावभावांनी हा जीव अजितेंद्रिय होतो. कार्याकार्याचा विचार न करतो तो दुमार्गाने जातो. वार्धक्यात स्वजनांचा त्रास भोगतो. रोगजर्जर होतो.

जीवात्मा शतायु जरी मानला तरी त्याचे अर्धे आयुष्य झोपेत जाते. शिल्लक असलेले अर्धे बाल्य, तारुण्य आणि वार्धक्यावस्थेत जाते. मग मनुष्य जन्म मिळूनसुद्धा ईश्वर भक्तीशिवाय त्याचा जन्म सार्थकी कसा लागणार ? मनुष्य जन्माचे सार्थक म्हणजे ईश्वराच्या नवविधा भक्तीत रमलेले जे संत आहेत त्यांची संगती घडणे आणि ईश्वराची भक्ती घडणे.

म्हणून नंदीशर्मा म्हणतो, आपल्या भक्तांची संगती आणि आपली भक्ती मला द्या.

मग इतरांना उद्देशून नंदीशर्मा सांगतो श्रीगुरूमहाराजांच्या रूपाने सत् आणि धर्माचे संरक्षण करणारा परमात्माच अवतीर्ण झाला आहे. आपल्या लीला तेजाने प्रगट झालेला हा मनुष्य नाहीये. मोक्षाकरता ह्याची सेवा करा. अष्टांग योग, निष्काम कर्मानुष्ठान अथवा श्रवण मननादिने ह्याला भजा. हा भगवान भक्तीनेच प्रसन्न होणारा आहे. ह्याच्याशी तद्रुप होऊन चिरासनावर पुष्कळ काळ जी घडेल ती उपासना, अग्नीच्या स्पर्शानं गवत क्षणार्धात भस्मसात होऊन जाते या प्रमाणे ह्या भगवंताने त्याच्या कृपेच्या नुसत्या अंशाने माझे पाप जाळून टाकले. वाणीला आणि मनाला विषय न होणार- न समजणारे आपले गुण किती सांगावेत ?

श्रुतीने नेति नेति - कांही नाही असं सांगितले असतानासुद्धा श्रद्धावान जे योग आहेत त्यांनाच आपण अगोचर आहात.

अशी त्याने पुष्कळ स्तुती केली. चरणावर मस्तक ठेवून गुरुमहाराजांना नमस्कार केला. परमात्म्याच्या स्तुतीने त्याचे शिल्लक राहिलेले कुष्ठही गेले. महाराजांनी त्याला इष्ट वर देऊन त्यांच्याजवळच राहायला सांगितले. नंदीशर्माने महाराजांच्या विविध लीला आणि स्तुती वर्णन करणारे पुष्कळ ग्रंथ तयार केले. त्याच्या कविता पुष्कळ लोकांच्यात प्रसिद्ध झाल्या ते पाहून नरकेसरी नावांचा एक कवी, गाणगापुराजवळच राहाणारा, म्हणाला, ही स्तुती कितीही चांगली असली तरी मनुष्याची स्तुती आहे. हे चांगले नाही.

नंतर तो नरकेसरी मानस पूजा करीत असताना त्याचे उपास्य दैवत कल्लेश्वर त्यावरच गुरुमहाराज बसलेले त्याला ध्यानात दिसले. मानस पूजा करताना रोज पांच नवीन श्लोक कल्लेश्वरावर करून त्याला ते अर्पण करायचा त्याचा नियम होता. पण त्या दिवशी तो महाराजांचीच स्तुती करू लागल्यावर महाराजांनी त्याला विचारले, तुझा कल्लेश्वर कुठाय ? हे ऐकल्यावर त्याचे ध्यान भंगले आणि कल्लेश्वरच महाराजांच्या रुपाने अवतीर्ण झालेला आहे ह्याची जाणीव होऊन तो महाराजांच्याबरोबरच आला. त्याने महाराजांची नवीन पांच श्लोकांनी स्तुती केल्यावर महाराजांनी त्याला विचारले, ईश्वराला सोडून मनुष्याची कशाला स्तुती करतोस ?

नरकेसरी म्हणाला, अज्ञ भावाने मी आपल्याला मनुष्य समजलो. आपण मला आपले सात्विकरुप दाखवलेत. त्यामुळे आपल्याच प्रसादाने माझा मोह गेलेला आहे. माझं पुण्य फळाला आले. आपण माझा शिष्य म्हणून स्वीकार करा. महाराजांनी त्याला उत्तम वस्त्र देऊन सांगितले. तूं आपले कल्लेश्वराचे भजन करत राहा. मी तिथेही आहे. तो म्हणाला, आपले हे प्रत्यक्ष दिसणारे रुप सोडून मी कल्लेश्वराच्या सेवेत जाऊ इच्छित नाही. आपल्या जवळच मला राहूं द्या. आपण अनायासे माझ्या घरी आलात आता माझी उपेक्षा करू नका. मी अत्यंत दयनीय आहे. असे म्हणून महाराजांसमोर त्याने लोटांगण घातले. मग महाराजांनी त्याला ब्रह्मज्ञानाचे सुख काय आहे ते त्याला सांगितले. अशा रीतीने हे दोन कवी महाराजांची स्तुती करून, लीला वर्णन करून कृत्यकृत्य झाले.

विसावा अध्याय समाप्त

।। अवधूत चिंतन श्रीगुरुदेवदत्त ।।

नामधारकाने म्हटले, महाराजांचा गुणानुवाद ऐकून माझी तृप्ती होत नाही. जसजसा मी तो ऐकत जातो तसतशी माझी अधिकाधिक श्रवण करण्याची तृष्णा आणखी वाढत जाते आहे. आपण अनलस आणि मोठे आहेत. पूर्व पुण्याईनेच आपली संगती घडते आहे.

सिद्ध म्हणाले, महाराजांचा गुणानुवाद हा क्षीरसमुद्र आहे. त्यातून तू किती अमृत पिशील ? सच्चित सुख रुप आणि लीलने नर झालेला हा परात्मा ह्याचे गुण किती आहेत ! त्याचे संपूर्ण गुण वर्णन करायला कोणी समर्थ नाही. काही पक्षी खूप उंच

उडतात कर काही मध्यम उंचीवर या न्यायाने मी यथामतीने महाराजांच्या लीला कथांचे तुला कथन करतो. भीमा अमरजा संगम तीरावर राहाणारे भक्त वत्सल महाराज भक्ताधीनत्वाचा स्वीकार करुन त्यांच्या (भक्तांच्या) इच्छेप्रमाणे वागले.

परमात्मा वस्तुत: निराकारच आहे. परंतु उपासना करण्याकरता साकार झालेला आहे. तो निरिच्छ आहे. शुध्द सत्व स्वरुपी आहे. बुद्धीशी संबंध ठेवून लीला करण्याकरता विश्वरुप झाले. ते सर्व व्यापक आहेत. उपासकांना उपासना करता यावी. माझे ध्यान करणाऱ्यांना माझे दर्शन व्हावे म्हणून मी साकार झालो आणि ब्रह्मा, विष्णु व शिव या रुपाने तीन लोकांमध्ये राहिलो. भूमीवरतीही माझे भक्त पुष्कळ आहेत, अगदी माझ्या ठिकाणी अंत:करण लावलेले त्यांना मी अगोदर आहे म्हणून आपण भूमीवर रहावे असा विचार त्यांनी केला. म्हणून प्रत्येक युगामध्ये श्रध्दा, भक्तीने माझे भजन करणाऱ्यावर मी अनुग्रह करतो.

भगवंताचे भक्त वात्सल्य अजून काय वर्णन करायचे ? परिपूर्ण आणि तृप्त असूनही भक्तांच्या घरी ते भोजनाकरता जातात अशा त्यांच्या अनंत लीला आहेत. भक्तावर अनुग्रह करणं हे त्या लीलांचे स्वरुप आहे. त्या लीला त्यांच्या स्वत:साठी नाहीत. कलीयुगामध्ये आपले भाग्य उदयाला आलेले आहे. कारण बाकीच्या युगांमध्ये ईश्वर दुर्लभ आहे. पण कलीयुगात मात्र भक्तीने तो सुलभ आहे. गाणगापुरमध्ये रोज कोणा कोणा भक्तांकडे महाराजांनी जाऊन भिक्षान्न सेवन केले. मग एके वर्षी दीपावली आली असता त्यांचे सात प्रिय भक्त त्यांना आपल्या गावी घरी यायचे आमंत्रण करायला आले. प्रत्येकाची इच्छा होती जगत् गुरुंनी आपल्या घरी यावे. आणि त्यांना नेऊन दीपावलीत पांच दिवस महाराजांना आपल्या घरी ठेवायची त्यांची इच्छा होती व त्याकरता महाराजांना त्याच दिवशी नेण्यासाठी ते आले होते. महाराज त्यांना म्हणाले, 'मी एका वेळेस सात गावांना कसा येऊ शकणार ?' आपली शक्ती असून ती विसरल्यासारखे महाराजांनी दाखिवले. 'तुमच्या प्रत्येकाकडे एकेक दिवशी येतो मी. बघा तुम्ही ठरवा. मी भक्ताधीन आहे, जो मला घेऊन जाईल तिकडे मी जाईन.' हे ऐकून प्रत्येक जण म्हणू लागला. मी प्रथम महाराजांना माझ्या घरी नेणार. ते भक्त महाराजांना म्हणाले, 'हा धनिक आहे, तो गरीब आहे अशा भेदाने आमच्याकडे तुम्ही पाहू नका. तुम्हाला सगळे सारखे आहेत. तुम्ही कसंही करुन माझ्याकडे याच महाराज.' असं म्हणून ते आग्रह धरुन बसले. महाराज म्हणाले, 'ठीक आहे, तुम्ही उठा मी

तुमच्या सगळ्यांच्या घरी येतो.' महाराजांनी तेवढ्यापुरती आपली शक्ती कमी असल्याचे दाखिवले. त्या भक्तांनी विचारले, 'तुम्ही कोणाच्या घरी येणार ?' महाराजांनी सस्मित मुखाने एकेकाला जवळ बोलावले आणि म्हणाले, 'मी तुझ्या घरी येतो पण हे कोणाला सांगू नकोस.' पटकन तुझ्या गावी निघून जा. त्याप्रमाणे समाधानाने ते सातही जण आपापल्या गावी निघून गेले. गाणगापुरासह आठ ग्रामात महाराज त्या दीपावलीत ५ दिवस महाराज आठ रुप धारण करुन राहिले. त्या सात भक्तांपैकी कोणी महाराजांना छाटी दिली. कोणी कमंडलु दिला तर कोणी मस्तकावर धारण करायचा शिरटोप दिला. प्रत्येकाने महाराजांना पक्वान्नाची भिक्षा केली आणि नंतर पुढे थोडे दिवसांना कार्तिक पौर्णिमेला ते सातही भक्त गाणगापुरामध्ये आले. प्रत्येक जण सांगू लागला की दीपवाळीमध्ये ५ दिवस गुरु महाराज त्याच्या घरात राहिले. गाणगापुरातले लोक म्हणाले, महाराज तर कुठेच गेले नव्हते, गाणगापुरामध्येच होते. आमच्याबरोबर इथेच त्यांनी दीपवालीचा उत्सव केला. ते सगळे एकमेकांचे म्हणणे खोटं आहे असे म्हणून लागले. शेवटी महाराज म्हणाले वाद घालत बसू नका, मी सर्वत्र गेलो होतो. हे ऐकून सर्वजण आश्चर्यचकित झाले, म्हणाले, 'प्रभू आपल्या महिम्याचा परपार जो आहे तो आम्हाला कळत नाही. आमच्या लौकिक वाणीच्या स्तोत्राला आपण पात्र कसे व्हाल ? ज्यांच्या वाणीमध्ये श्रुती आहे त्यांनाही आपण निर्विकार आहात ज्ञाता, ज्ञान आणि ज्ञेय या त्रिपुटी व्यवहाराची भ्रांती आणि विवेक यांची भ्रांती असे पर्यंत भोग आहे आणि विवेक झाला की मोक्ष. बुद्धीनेच सर्व समजायचे ना! बुद्धीला भ्रांती झाली की संसार आहे, भोग आहेत. बुद्धीला विवेक झाला कि मोक्ष आहे. अशा बुद्धीनेच प्राप्त होणारे ब्रह्म आहे. आपला जन्म आणि क्रिया दिव्य आहेत. आपला जन्म आणि दिव्य कर्म हे अन्यांकरता (इतरांकरता) नाही. आपले अवतार घेण्याचे प्रयोजन हे आम्हाला मोक्ष देण्यासाठीच आहे. आमच्या बुद्धीवर जे आपल्या मायेचे आवरण आहे. ते दूर व्हावे ही दक्षिणा आपण आम्हाला द्यावी.'

अशी प्रार्थना करुन त्या सर्वांनी महाराजांना अत्यंत भक्तीभावाने नमस्कार केला. त्यामुळे गुरु महाराज संतुष्ट झाले आणि ते सगळे आपापल्या घरी गेले. भक्तवत्सल प्रभूंनी कोणाला समजणार नाहीत अशा लीला केल्या. त्यांना जातपात, ज्ञान, पौरुष, आचार, रुप अर्थ, गुण, पराक्रम यापैकी कशाचीही त्यांना अपेक्षा नाही. त्यांना भक्ताच्या ठिकाणी श्रध्दा आणि भक्तीची अपेक्षा आहे. कृपा करायच्या वेळेला वरील पैकी

कोणता गुण भक्ताकडे आहे का ते पहात नाहीत. श्रध्दा, भक्ती आहे कि नाही एवढे पाहून कृपा करतात. त्यांना कोणावर कृपा करायची झाल्यास कोणी अडवू शकत नाही.

सिद्ध म्हणाले, आता एक आश्चर्यकारक कथा सांगतो. एका शुद्ध भक्ताने दास्य भक्ती करुन ऐहिकामुष्मिक प्राप्त करुन शेवटी मुक्ती मिळवली. तो शेती करीत असे. महाराज गावांतून संगमावर जाऊन परत येताना याच्या शेतातून येत जात. त्यावेळी तो अगदी भक्तीभावाने महाराजांना नमस्कार करीत असे आणि आनंदाने महाराजांचे चिंतन करीत आपली शेती करती असे. तो रोज महाराजांचा जायचा यायची रस्ता, दगड, कांटे वगैरे काढून स्वच्छ करती असे. जाताना नमस्कार करावा आणि संगमावर परत आले कि पुन्हा आनंदाने नमस्कार करावा.

एके दिवशी गुरुमहाराजांनी त्याला विचारले, रोज मला जाता येता कशाला नमस्कार करतोस ? तुला काय साध्य करुन घ्यायचे आहे ? तुझी काय इच्छा असेत ती स्पष्ट सांग.

त्याने उत्तरे दिले,' सुखाच्या इच्छेने मी आपली सेवा करतो. आपल्या कृपेने ह्या शेतात उत्तम पीक येते. ते आपण पहा. मी शुद्र म्हणून आपण माझी उपेक्षा करु नका.' त्याच्या प्रार्थनेप्रमाणे महाराज आनंदाने त्याचे सर्व शेत पाहून आले. सगळे पीक तयार होते. त्या शूद्राला महाराजांनी सर्व पीक तत्काल तोडून टाकण्यास सांगितले. ते म्हणाले, 'माझ्या वाक्यावर तुझा खरच विश्वास असेल तर हे सर्व पीक मी संगमावरुन परत येईपर्यंत कापून टाक.' असे सांगून दत्तप्रभूंनी संगमावर जाऊन आपले आन्हिक केले.

इकडे तो शेतकरी आपल्या मालकाकाडे गेला आणि म्हणाला, या शेताचा एकंदर कर किती द्यायाचा ते ठरवून हे शेत माझ्या ताब्यात द्या. मी आता हे पीक कापणार आहे. यावर त्या मालकाने नेहमीपेक्षा दुप्पट कर देईन असे वचन घेऊन पीक कापण्यास परवानगी दिली. लगेच त्याने मजूर बोलावून कापणीस आरंभ केला. तेव्हा त्याची पत्नी त्याच्या मुलांसह तिथे येऊन त्याला अडवू लागली. पण या शेतकऱ्याने तिला भीती दाखवून पळवून लावले आणि सगळे पीक महाराजांच्या आज्ञेप्रमाणे कापून टाकले.

त्या शूद्राला काय वेड लागले का ? नाही. तो उन्मत्त झाला नाही. भरताने मातेला टाकले. प्रल्हादाने पित्याला टाकले. बिभिषणाने मोठ्या भावाचा त्याग केला. मग ह्या शेतकऱ्याने एक साधे पीक गुरुंच्या आज्ञेखातर कापले तर ह्याला काय उन्मत्त झाला म्हणायचे का ? गुरुंची प्रत्यक्ष ईश्वराची आज्ञा ही त्याची भावना होती. एका संन्याशाच्या सांगण्यावरुन हा आपले शेत कापतोय हे पाहून त्याला रोखण्यासाठी मालकाने आपल्या नोकरांना तिथे पाठवले.

ह्याला आपल्या मालकाला त्या नोकराजवळ उलट निरोप दिला कि मी पीक कापायला सुरवात केली आहे ते मी कापून टाकणार. मला मालकाची भीती वाटत नाही. मी मालकाकडून तसे आज्ञापत्र आधीच लिहून घेतले आहे. हा निरोप त्या नोकराने आपल्या मालकाला जाऊन सांगतिला. त्या शेतकऱ्याच्या बायकोने शेत मालकाला जाऊन सांगितले, माझ्या नवऱ्याला ते पीक कापू देऊ नका. जर त्याने ते आताच कापले तर तुमचा कर कुठून देईल तो ? तो मालक म्हणाला, मला त्याने अधिक कर देण्याचे वचन दिले आहे. मग ती रडत रडत शेताजवळ आली. पण तोपर्यंत त्या शेतकऱ्याने सर्व पीक कापून तो महाराज संगमावरुन परत यायची वाट पहाता बसला.

महाराज आन्हिक आटोपून परत आले आणि त्यांनी शेतकऱ्याने सगळे पीक कापून टाकलेले पाहिले. त्या शेतकऱ्याने महाराजांना नमस्कार केला आणि आदराने उभा राहिला. महाराज त्याला म्हणाले, या जगात असे काही करायचे मनांतसुध्दा आणणार नाही आणि तू हे दुष्कर कर्म केल्याने सगळे लोक तुझी निंदा करणार. तुझे जीवन कसे होणार ? तुझ्या मालकाला तूं काय देणार ? हिरवेगार पीक फुकट गेले.

तो म्हणाला, तुम्ही सहज बोला किंवा कसंही बोला. पण सद्गुरुंचे भाषण हे वेदांप्रमाणे आहे. आपली वाणीच फल देणारी आहे. ज्याने जन्म दिला तोच जीवन देणार आहे. (केवढा निर्धार आहे) गर्भावस्थेत असताना आईच्या अन्नरसावर माझे भरण पोषण झाले कि नाही ? पण मग जन्माला आल्यानंतर तो जीवन सांभाळणार नाही का ?

महाराज त्याला म्हणाले, तुझी तशी भक्ती आहे ना मग तुझ्या म्हणण्याप्रमाणे होईल आणि ते गावांत निघून गेले. तो शेतकरी शांत चित्ताने महाराजांचे चिंतन करीत आपल्या घरी आला. त्याच्या मनावर ह्या सर्व घटनेत काहीही परिणाम झाला नाही. लवकरच सूर्य मूळ नक्षत्राला गेला असताना गाणगापुरात अचानक प्रचंड पाऊस पडला

आणि ह्याने कापलेले यावनाळ भरघोस वाढले. असंभवनीय रीतीने त्या यावनाळाला असंख्य अंकुर फुटले ते पाहून त्या शेतकऱ्याला आणि त्याच्या स्त्रीला अत्यंत आनंद झाला. तिने शेतकऱ्याची त्याला पीक कापताना वाटेल तसे बोलल्याबद्दल क्षमा मागितली. ती म्हणाली, तुम्ही खरे गुरुभक्त आहात. मग त्या शेतकऱ्याने शेतातल्या क्षेत्रपालाची पूजा केली आणि महाराज संगमावर जाण्यासाठी आले असता त्यांना आपले शेत दाखवले आणि म्हणाला, 'आपले, चरण म्हणजे चिंतामणी आहेत. आपले शब्द अमृतासारखे आहेत. आपले तेज हे ज्योतिस्वरुप आहे. आंधळ्याला आपले तेच समजत नाही. माझ्या पूर्व पुण्याईने आपले हे तेज मला पहायला मिळाले.' 'तुझा विसर न व्हावा।' असे भक्त मागतात, पण म्हणतो, 'महाराज, मी आपल्या दर्शनाने कृतकृत्य झालो. आपण मला विसरु नका.' हे केवढे मागणं आहे. म्हणजे किती विवेकी लोक असतात एकेक. इतक्या अनंत जीवांमध्ये देवाला आपली आठवण राहिली पाहिजे ते विलक्षणच आहे मागणे. देवाला काय !

महाराज त्याला म्हणाला, '' तू खालच्या वर्णात असलास तरी धन्य आहेत. तुला उत्तम गती प्राप्त होईल. एखाद्या दुराचारी माणसाने जरी माझी सेवा अनन्य भावनेने केली तर तो साधू होईल. माझ्या ठिकाणी तुझी उत्तम भक्ती भावना आहे. हे सगळं तुला दिलंय तुझ्या कुळामध्ये लक्ष्मी स्थिर राहिल. आणि माझी भक्तीही दास्यही तुझ्या वंशात राहील.'' मग तो शेतकरी आपल्या मालकाकडे जाऊन म्हणाला, ठरल्याप्रमाणे जास्ती भाग मी द्यायला तयार आहे. शेतात पुष्कळ धान्य झालं आहे.

इथे आता मोठ्या महाराजांनी टीकेत दिले आहे. तुझ्या कुलामध्ये स्थिर लक्ष्मी राहील. हा वर काय दिला ? कारण लक्ष्मी मिळाली तर ह्याला गर्व होऊन ह्याच्या हातून प्रमाद घडले तर! ह्याचे उत्तर असे आहे कि महाराजांनी नुसत तुझ्या वंशात लक्ष्मी स्थिर राहील असा वर दिलेला नाही तर त्याच बरोबर दास्यभक्तीही राहील असाही वर दिलेला आहे. एक विचार मोठ्या महाराजांनी मांडलेला आहे. देवांना उपासना किंवा ब्रह्मविचार करण्याचा अधिकार आहे कि नाही ? त्यांचे उपनयन कुठे झालेले आहे ? त्यांना उपनयनाची जरुरी नाही. त्यांना वेदज्ञान वगैरे सगळे असते. म्हणजे त्रैवर्णिक नसतानाही त्याला हा अधिकार आहे.

पण मग देवांमध्ये आणि शूद्रामध्ये वैषम्य नाही का ? हो आहे. देवांना उपनयन नाही,

वेदाध्ययन नाही कारण वेद स्वत:च देवांना प्रतिभात असतात. पूर्व जन्मातल्या सुकृताने त्यांना ही स्थिती मिळाली ना! शूद्राला उपनयन नसल्याने वेदाध्ययन नाही. श्रौत ज्ञान जे आहे त्याचा तो अधिकारी नाही.

हे पहा इतकं कडक आहे. त्याने वेद ऐकला किंवा उच्चारला तरी प्रायश्चित्त आहे. जेव्हा छंद करायला सांगितला आहे. आणि जर ऐकला तर लाख वगैरे कानात घालायला सांगितले आहे. पण मग असे असताना तो शूद्र विद्याधिकारी कसा होऊ शकतो ?

छंदोग्यामध्ये एक कथा आहे, खैव नावांचे ब्रह्मज्ञानी होते. जानस्तुती नावाच्या राजाला ते म्हणाला, 'हे शूद्रा, गायी वगैरे घेऊन ये. ह्याचा द्वाराने मी तुझ्या बरोबर बोलीन.' म्हणजे त्या खैव ऋषींनी राजाला 'शूद्र' म्हणून संबोधन करुन त्याला उपदेश केला की नाही. तर 'शूद्र' याचा अर्थ जाती नाही. त्या जानस्तुती राजाला काही कारणाने अत्यंत त्रास झाला. त्या शोकाने तो गेला होता. म्हणून त्याला शूद्र म्हटले. रुढ शूद्र शब्द जातीवाचक आहे. विद्या नसल्यामुळे तुला शोक झाला आणि त्या शोकाने तू माझ्याकडे आलेला आहेस. शूद्राला श्रवणाचा अधिकार नाही, अध्ययनाचा अधिकार नाही मग त्याला मुक्ती आहे की नाही ? पुराण श्रवणाला इतर ब्राह्मण मंडळीबरोबर आपणही बसावे सर्व सिद्धांत ऐकावेत, ऐकल्यावर तसे विचार मनात येतात, सिद्धांत कळतात आणि पुढच्या जन्मात मोक्ष मिळतो. विदुर वगैरे सारख्यांना मग कसे ज्ञान झाले ? पूर्वी त्यांनी कर्म केलेले आहे. त्यामुळे त्यांच्या बरोबर ते ज्ञान याही जन्मात आलेले आहे. पण याचा अर्थ त्यांना ज्ञानाचा अधिकार आहे असे नाही.

म्हणून शेवटी निर्णय देताना भाष्यकारांनी असे सांगितले आहे की पुराण वगैरे ऐकून ज्ञान मिळवावे. म्हणून संतानी याकरता मुद्दाम प्राकृतामध्ये ग्रंथ करुन ठेवले आहेत. सगळ्यांना ज्ञानाचे सिद्धांत ऐकायला मिळावेत. ईश्वर कसा आहे, ब्रह्मरुप कसे आहे हे ह्या प्राकृत ग्रंथावरुन कळते.

त्या शूद्राला आपले दास्य दिले. या आधी त्या पतिताचे ज्ञान काढून घेतले आणि इथे दास्य दिले ज्ञान दिले नाही. तो आपल्या मालकाला म्हणाला, सद्‌गुरुंच्या प्रसादाने आपल्या शेतात इतरांपेक्षा अधिक धान्य आलेले आहे ते मी तुम्हाला वचन दिल्याप्रमाणे देणार आहे. मला अन्याय करायचा नाही. त्याप्रमाणे ते पीक तयार झाल्यावर त्याने ते धान्य घरी आणले. शिल्लक राहिलेले इतर लोकांनाही दिले. पुढे सद्‌गुरुंच्या कृपेने तो

पुष्कळ श्रीमंत झाला पण अत्यंत विनयाने, नम्रपणे श्रीगुरुंची सेवा करीत राहिला. श्रीमंती आली म्हणून त्याने सेवा सोडली नाही.

अशा पुष्कळ लीला झाल्या आहेत. त्या आपल्याला कळल्या नाहीत. हे गाणगापूर धन्य आहे. तो शेतकरी श्रीमंत तरी झाला तरी उद्धट झाला नाही. नामधारकाने सिद्धांना विचारले, इतर काशी वगैरे तीर्थ क्षेत्र असताना भगवान हे गाणगापुरात कां राहिले ? सिद्ध म्हणाले, 'गाणगापुरात अनेक तीर्थ आहेत. मंद बुद्धीच्या लोकांना या कलियुगात तीर्थ अज्ञात आहेत. ती महाराजांनी प्रगट केली.' एकदा गाणगापुरातली काही मंडळी काशीयात्रेला निघाली असता श्रीगुरु त्यांना म्हणाले, 'तुम्ही इतक्या दूर कशाला जाता ? इथे गाणगापुरातच सर्व तीर्थ आहेत ती मी तुम्हाला दाखवतो. हा भीमा अमरजा संगम म्हणजे प्रयाग आहे. षटकुलात सगळी तीर्थ आहेत. पापनाशतीर्थ म्हणजे त्रिवेणी संगम आहे. जालंधराने मारलेल्या देवांना पुन्हा जिवंत करण्याकरता शंकरांनी दिलेले अमृत इंद्र नेत असताना काही अमृत खाली पडले. त्यातून ह्या अमरजा नदीचा प्रवाह तयार झाला आहे. त्या वेळेपासून अमरजा नदी काल मृत्यु दूर करणारी म्हणून प्रसिद्ध आहे. संगमावर जो अश्वत्थ आहे तो साक्षात सर्व कामना पूर्ण करणारा कल्पवृक्ष आहे. तिथे मनोरथ तीर्थ आहे. त्याच्या पुढच्या बाजूला संतोष तीर्थ आहे. विश्वेश्वर रुद्र तिथे स्वत: आहे. ही साक्षात् काशीच शंकरांनी भक्तांकरता निर्माण केली आहे.' विषयरुपी दाढांनी सर्प दंश झालेला जीव कामादि विषयांनी पीडला जाऊन ईश्वराला विसरुन जातो. म्हणून हे सगळे लोक विकाररुपी सर्पाप्रमाणे आहेत त्यामुळे कोणाची संगती करायची नाही. विषयभोग हे विषाप्रमाणे आहेत. स्त्री ही शववत् आहे. विषयरुपी कावळे गिधाडे वगैरे या शवावर तुटून पडतात. ज्याप्रमाणे आपण शवदर्शन झाल्यावर स्नान करतो त्याप्रमाणे खरा जीवनमुक्त साधू असेल तो स्त्रीचे दर्शन झाले तरी स्नान करतो. यासाठी केवढी मनाची तयारी करावी लागते. हा अभ्यास करायला किती जन्म घालवले पाहिजे ! थोड्या काळात हा अभ्यास होणे शक्य आहे का ! काशीची सर्व चिन्ह इथे आहेत. महाराज असा तीर्थ महिमा सांगत असता पूर्वाश्रमीची त्यांनी रत्ना नावाची भगिनी तिथे आली. महाराजांना नमस्कार केला. महाराजांनी तिला विचारले, 'तुला काय सांगितले होते याची आठवण आहे की नाही' असे विचारताच एकदम तिला महाराजांचे शब्द आठवले आणि तिच्या अंगावर तत्काळ कुष्ठ उद्भवले. **पण अशा भोगाच्या वेळेलाच महाराजांचे सान्निध्य तिला मिळाले. म्हणजे तिचे**

**पापही आणि पुण्यही आहे.** ती खिन्न झाली. महाराज तिला म्हणाले, हे कुष्ठ पुढच्या जन्मात भोगायचे असेल तर हे आता लगेच जाईल. कुष्ठाला कारण असणारे पाप प्रयत्नाने जाईल. ते राहिलं आणि पुन्हा कुष्ठ झालं तर ! ती रत्ना हुशार होती, ती म्हणाली, मला यापुढे गर्भवास पत्करावा लागणार नाही असा आपण मला आशीर्वाद द्या. महाराज म्हणाले, पापविनाश तीर्थात तीन दिवस स्नान केल आणि शिवांची पूजा केली तर सात जन्म केलेले पाप नष्ट होते तर कुष्ठांची काय कथा ? त्याप्रमाणे रत्नाने पापनाशतीर्थात तीन दिवस स्नान केल्यावर तिचे सर्व कुष्ठ गेले आणि पुढे महाराजांच्या कृपेने ती मुक्त झाली.

पाप हरण करणाऱ्या जंबुद्विपात असणाऱ्या अखिल तीर्थाप्रमाणे असणारे अघनाश तीर्थ महाराजांनी दाखवले. गयेप्रमाणे, रुद्रपादतीर्थ आहे. स्थान महात्म्य हे बरोबर आहे अशी श्रध्दा ठेवणाऱ्यांना पापक्षय होण्याचे फल मिळते. चिकित्सा करणाऱ्यांना नाही. गयेमध्ये जे कर्म करतात ते कर्म इथे रुद्र पाद तीर्थावर करा. कृष्णाच्या समोर द्वारकेप्रमाणे हे चक्रतीर्थ आहे. द्वारकेमध्ये करायला सांगितलेले कर्म इथे केले तर त्याचे चौपट फल मिळते. या ठिकाणी स्नान केले असता पतितही ज्ञानी होतो. आणि अस्थि जर टाकल्या तर त्यावर चक्र वगैरे चिन्ह येतात. गावांच्या पूर्व भागात असलेला कल्लेश्वर गोकर्णाप्रमाणे आहे. मन्मथलिंग महाबळेश्वराप्रमाणे तिथे आहे. श्रावण महिन्यात कल्ल्ेश्वराला अखंड अभिषेक केला, कार्तिक महिन्यात दीपोत्सव केला म्हणजे तो सर्व सिद्धी देतो.

अशी सगळी तीर्थयात्रा सगळ्यांनी केली. विज्ञानमय असे प्रभू तिथे थांबले.

नामधारक म्हणतात. आपण क्षेत्र महात्म्य फार चांगले सांगितले. ते सर्व लोकांना पवित्र करणारे आहे. हा भगवान् जगन्नाथ लीला करण्याकरता या ठिकाणी राहिला. ज्या ठिकाणी हा भगवान राहातो त्या ठिकाणी सर्व देव, योगी, मुनी येऊन राहातात आणि सर्व तीर्थही तिथे येऊन राहतात. कृष्णा पंचगंगा संगमही धन्य आहे आणि हा भीमाअमरजा संगमही धन्य आहे. या ठिकाणी रहाणारे पशु, पक्षी, जलचर हे ही त्या स्नानपानाने धन्य होतात. मग मनुष्यांचे धन्यत्व हे काय वर्णावे ? ज्याचे महात्म्य श्रवण केल्यावरही सगळ्या पापराशी नाहीशा होतात त्या ठिकाणी प्रत्यक्ष राहणारे जे सज्जन आहेत त्यांना काय गती मिळते हे सांगायचे काही कारण नाही. जे भगवत् भक्तियुक्त आहेत त्यांच्या हातात मुक्ती आहे. पण मुक्तीलासुध्दा बाजूला सारुन ते भक्तीचाच आश्रय करतात.

मुक्तीची अपेक्षा मला पूर्वी होती, म्हणतात. पण आपण केलेल्या बोधामुळे अहेतुकी भक्ती मिळून मुक्ती इच्छा दूर झाली. म्हणून अत्यंत प्रिय असं विष्णूंच कीर्तन, श्रवण वगैरे हेच मला विशेष आवडते. तुमचं चित्त त्या सद्‌गुरुच्या चरित्राने पूर्ण आहे म्हणून मला श्रीगुरुंचे मंगल, परमपावन चरित्र आणखी सांगा. ह्या चरित्राचे गायन स्वर्गातही होत असते. कोणचा म्लेंछ आहे आणि अत्यंत हीन असूनही भगवंताला तो कृपापात्र कसा झाला ?

सिद्ध म्हणतात, नामधारका तूं धन्य आहेस,. भगवंताच्या प्रसादानेच तुला अशी बुध्दी होते आहे. मलाही त्यांचे चरित्र सांगताना अतीव आनंद होत आहे. कुरवपुरामध्ये श्रीपादवल्लभ ज्या वेळी राहिले होते त्यावेळी एक रजक स्तोत्र, पूजा वगैरे म्हणून त्यांची सेवा करीत होता. त्याच्या सेवेने संतुष्ट झालेले श्रीपाद त्याला म्हणाले, मोठा भाविक आहेस, अखंड साम्राज्य तूं कर. ते ऐकून त्याला अतिशय आनंद झाला. एकदा एक राजा आपल्या सैन्य, राण्या, दासींसह तिथे जलक्रीडा करण्यासाठी आलेले या रजकाने पाहिला. तो विचार करु लागला, या राजाचा कोण गुरु असेल बरं ? ह्याला इतके भाग्य कशाने मिळाले असेल ? त्याचे जीवन फार श्रेष्ठ आहे. मला कुठलं असलं जीवन मिळणार ?

त्याच्या मनातलं विचार श्रीपादांनी ओळखले. ते म्हणाले, तुझ्या मनांतली इच्छा समजली. आता तुझे वय झाल्याने राज्य करायला तूं योग्य नाहीस, पुढच्या जन्मांत तुला तुझ्या इच्छेप्रमाणे राज्याचा उपभोग घ्यायला मिळेल. तरुणांनाच राज्याची आसक्ती असते. राज्यामध्येही राहून तुला माझे स्मरण राहील.

रजक म्हणाला, आपण म्हणता तेच बरोबर आहे. राज्याचा उपभोग तारुण्यातच घेतला पाहिजे. पण राज्यामध्ये असतानासुध्दा आपले स्मरण मला राहावे, अशी प्रार्थना आहे. श्रीपाद 'तथास्तु' म्हणाले. पुढे त्याला मृत्यु येऊन पुढच्या जन्मात तो बीदरचा बादशहा झाला. म्लेंच्छ जरी असला तरी पूर्वीच्या जन्मातल्या संस्कारामुळे देव आणि विप्र यांची सेवा करीत होता. सार्वभौम सत्ता मिळाल्यावर मनुष्य आनंदाला विरोध काहीच राहिला नाही. मनुष्य आनंदाची परिसीमा त्याने गाठली. सार्वभौम राज्य मिळाल्यावर हे तेज, प्रज्ञा, धर्म, यश सगळं नाहिसे होणार. पण पूर्वी वर मिळाल्याप्रमाणे त्या महाराजांची स्मृती होती. त्यामुळे राज्यात अनर्थ झाला नाही. आधीच्या जन्मातील प्रज्ञा ही पुढच्या जन्मांमध्ये येते. त्याच्या मनात पूर्व संस्कारामुळे सर्वांबद्दल समभाव होता.

शत्रुमित्रभाव नव्हता. त्याच्या म्लेंच्छ पुरोहितांनी त्याला सांगतिले, आपला धर्म उत्तम आहे त्याचे तुम्ही पालन करा. वर्णधर्म हा खोटा आहे. तो मनातसुध्दा आणू नये. मुख आणि इतर अवयव असलेला देह सगळ्यांनाच सारखा आहे की ! हा अमूक वर्णाचा श्रेष्ठ तो तमूक वर्णाचा कनिष्ठ हे यांनी कुठल काढलं ? अचेतन अशा दगडामध्ये,. लाकडामध्ये देवता कुठल्या आल्या ? पशू आणि मानवांचे अवयव वेगवेगळे असल्यामुळे ते एकमेकांपेक्षा वेगळे आहेत तसे म्हणायला हरकत नाही. त्यांच्यात भेदलक्षण नाही. स्त्री पुरुषांच्यात लिंगभेदाने स्पष्ट फरक आहे पण क्षत्रिय, मी ब्राह्मण म्हणणाऱ्यांच्यात काहीच वर्णभेद नाही. हा एक दोष त्यांनी काढला.

म्हणजे बाहेरुनच सर्व त्यांना ठरवायचे आहे. राजा त्याला म्हणला, तुमचे हे म्हणणे धीमान्य आहे. परमेश्वराने गुणकर्मभेदाने चातुर्वर्ण्य निर्माण केले. चेतन अचेतन सगळ्यामध्येच देव आहे. स्थूल (म्हणजे मोठ्या) अक्षरावरुन बालकाला लिपिज्ञान होते. तसं गुरुंनी सांगितलेल्या मूर्तीची कल्पना करुन हृदयाचे चित्ताचे स्थैर्य झालं म्हणजे देव सगळीकडे कसा आहे हे कळतं. स्वच्छ जलामध्ये प्रतिबिंब आहे. परंतु बिंबाची प्रतीती आहे, प्रतिबिंब असतानासुध्दा, पण तो आरसा, जल जर मलीन झाले तर ही प्रतीती येत नाही. म्हणून ज्यांना स्वप्रामाण्य आहे असा अनादि वेदांमध्ये सांगितलेल्या धर्माचे आचरण करणाऱ्या द्विजांना भक्तीने नमस्कार करती चला. ते देवांचेही देव आहे. वेद आणि स्मृतीही सांगितलेले धर्म आणि कर्म याप्रमाणे वागणारे विप्र पूज्य आहेत. त्यांच्याबद्दलची द्वेष भावना सोडून द्या.

काही काळाने त्या राजाच्या मांडीवर एक फोड झाला. त्याला अत्यंत व्यथा होऊ लागली. त्यावर पुष्कळ उपाय केले पण ते फुकट गेले. त्या यातनांमुळे त्याने सगळे विषयभोग सोडून दिले. शेवटी विद्वान ब्राह्मणांना बोलावून या रोगाचा प्रतिकार कसा करायचा हे विचारले. ते ब्राह्मण म्हणाले, तुम्ही म्लेंच्छ, मी ब्राह्मण इथे कसे सांगणार ? लोकापवाद नको म्हणून एकांतात आम्ही तुम्हाला यावर उपाय सांगू. मग ते दोघे गाणगापुरला पापनाशतीर्थावर आले.

त्या ब्राह्मणाने राजाला सांगितले, पूर्वी केलेल्या दुष्कर्मांमुळे हा रोग होतो. ह्या रोगाची शांती दान, औषध, तीर्थ, देव यांच्या सेवेने होते. सर्व पाप दूर करण्याचे सामर्थ्य ज्यांच्या दृष्टीत आहे अशा साधूंची दृष्टी पडली तरीसुध्दा हा होग दूर होतो.

राजाने विचारले, पूर्वीच्या जन्मांत दुष्कर्म केले. आता दुसरा देह आलेला आहे. त्याच देहाने पापाचं फळ त्याच देहात मिळालं तर ठीक आहे. पण आता दुसऱ्या देहात आल्यावर त्या पापाचे फल म्हणून रोग कसा होतो ?

हां ! ज्या शरीराने पापकर्म केले त्या आरंभक अशी जी पंचभूत ती नष्ट झाली. परंतु शरीर नष्ट झालं तरी शरीरामध्ये राहाणारा जीवात्मा नष्ट झालेला नाही. पापकर्ता तो आहे. शरीर साधन आहे. जोपर्यंत तत्त्वज्ञान होत नाही. तोपर्यंत पुन्हा पुन्हा जन्ममृत्युच्या फेऱ्यात जीव सापडतो. मरण म्हणजे जीवात्मा देहातून बाहेर पडणे. शुद्ध आत्मा जो आहे त्याला काही नाही. लिंग शरीर हे त्या जीवाचा शक्ती अवशेष आहे. आत्म्याच्या ठिकाणी ते लीन होते. आत्मस्वरुपामध्ये ते लीन झाले म्हणजे पूर्व जन्म संपला. प्राणोत्क्रमणाच्या वेळेला प्राणाच्या पाठोपाठ सगळी सूक्ष्म इंद्रियं बाहेर पडतात. एका नाडीने तो उदान पुण्याने पुण्यलोकाला नेतो. पापाने पापलोकाला नेतो. पाप आणि पुण्य मिळून मनुष्यलोकाला नेतो. दुसरे शरीर धारण करण्याकरता दुसऱ्या योनीमध्ये जातात.

कर्म करणारा आणि कर्मफल भोगणारा ह्याला मरण नाही. त्याला फक्त देह गेला. कर्मफल देणारा ईश्वरही अमर आहे. त्याच्या प्रेरणेने जन्मांतरात केलेलेजे दुष्कर्म असेल त्यामुळे रोगादि दु:ख प्राप्त होते. मागच्या जन्मात केलेले पाप नाहीसे झाले म्हटलं म्हणजे केलेल्याचा नाश व्हायचा. या ठिकाणी (या जन्मात) दु:ख आलं त्याचं कारण सांगता येत नाही. काही न करताना दु:ख भोगावं लागलं. केलेल फल काही फल न देता गेलं असं दोष येतात. म्हणून त्याच कर्माच हे फल आहे. साधूंच्या कृपादृष्टीने रोग कसा शांत होतो याची कथा सागंताहेत.

अवंतीपुरामध्ये धर्महीन असा स्वत:ला ब्राह्मण म्हणविणारा एकजण होता. तो एका वेश्येच्या नादी लागला होता. पूर्व जन्मातील पुण्याईमुळे त्यांच्या घरात एकदा ऋषभयोगी त्यांच्या घरी आल्यावर या दोघांनी त्याचे उत्तम आदरातिथ्य केले. पादसंवाहन वगैरे करुन त्यांची पूजा केले. त्यांना चांगले भोजन दिले. त्यांचे पादतीर्थही प्राशन केले. त्यांना वारा घातला. आपल्या सेवेने त्यांना संतुष्ट केले. ऋषभयोगी त्या दिवशी यांच्याकडे राहून दुसऱ्या दिवशी सकाळी आपल्या संचाराला निघून गेले. हे पुण्यकर्म त्यांच्या कडून घडल्यामुळे ते दोघे ब्रह्मकुळामध्ये जन्माला आले. तो ब्राह्मण दशार्ण देशाचा राजा वज्रबाहू याच्या राणीच्या पोटी जन्माला आला. त्या राणीने द्वेषभावनेने आपल्या सवतीला गर्भिणी असताना विष दिले. ती मेली नाही पण प्रसूत होऊन तिला

मुलगा झाला. तो मुलगाही त्या विषप्रयोगाने प्रभावित झाला. मायलेकरांच्या अंगावर व्रण उत्पन्न झाले. ती पीडा अनेक उपायांनी सुध्दा शांत झाली नाही. त्या दोघांना फार यातना होऊ लागल्या. यांच्या अंगाला पू इ. मुळे येणाऱ्या दुर्गंधीने त्रस्त होऊन राजाने त्या दोघांना जंगलात नेऊन सोडले. त्या अरण्यात भयंकर प्राणी होते. पोटात अन्न नाही, देहाला यातना होताहेत, रस्ता माहीत नसल्याने पायात कांटे टोचताहेत, दगडावर ठेचाळते आहे. ती देवाला म्हणून लागली, इतके कष्ट देण्यापेक्षा आम्हाला एखाद्या हिंस्त्र पशूचे भक्ष्य बनवलेले चांगले. आम्हाला या दु:खातून मुक्त कर. चालता चालता शोक करती आहे. पुढं तिच्या गाई दिसल्या. त्या गायींच्या मागे हळू हळू जाऊन त्या गवळ्यांना म्हणाली, तहानेने माझे प्राण जायची वेळ आली आहे. त्या गवळ्यांनी सांगितले, या मार्गावर पुढे विहीर आहे तूं पुढे जा. त्या प्रमाणें ती तिथे गेली. पाणी प्यायली. तिथे इतरही स्त्रिया होत्या त्यांना तिने विचारले, इथे कोण राजा राज्य करतोय ? इथले सगळे प्रजाजन आनंदी आहेत. त्या स्त्रियांनी सांगितले. इथे पद्माकर नांवाचा वैश्य राजा राज्य करतो आहे. इतक्यात त्या राजाच्या दासी तिथे आल्या. त्या तिला घेऊन राजवाड्यात गेल्या. राजाने तिची सविस्तर चौकशी केली. तिने पहिल्यापासून सर्व राजाला आपली हकिकत सांगितली. ते ऐकून दया येऊन त्या राजाने तिला आश्रय दिला. लवकरच तिच्या मुलाची व्रणाची पीडा वाढली आणि त्याला मृत्यु आला.

अज्ञानाने त्या मुलाच्या मृतदेहाला उद्देशून ती स्त्री बोलू लागली, 'माझ्यासारख्या दीन मातेला शोक सागरात लोटून तूं कुठे गेलास, बाळा ! तुझ्याचकरता म्हणून मी इतके कष्ट सोसले याची तुला आठवण नाही का ! तुझ्याचकरताच माता, पिता, बंधू, आप्तेष्ट सर्वांना सोडले. मी तुझ्याचकरता विसरुन गेले. माझा प्राण तू आहेस. तूंच जर गेलास तर मी जिंवत कशी राहीन ?'

तिचे हे रोदन ऐकून ऋषभयोगी तिथे आले. हे ज्ञानी महात्मे दु:खी जीवाला अगोदर तत्त्वज्ञान सांगतात. ते जर समोरच्या जीवाला पटलं तर तो जीवन मुक्त होतो. त्या जीवाचं तसं पूर्व सुकृत असेल तर ते तत्वज्ञान पटतं. सोडून द्या. माया ममता गेली. पण ती ममता तशीच जर राहीली तर तत्वज्ञानाचा काहीही उपयोग नाही असे समजून त्या जीवाची इच्छा असेल त्या प्रमाणे करतात ते. जिवंत करायचे असेल तर जिवंत करतात. पण मग ते जीव मग त्या आसक्तीतच पडतात. अगोदर बोध करुन पहातात.

ऋषभयोगी तिला म्हणाले, 'सर्व जग मायामय आहे, असत् आहे. कशाकरता रडतीस ?

पंचभूतांपासून बनलेला नश्वर देह माझा मुलगा आहे ही कल्पना कशाकरता आहे ?' 'आमच्या जवळ इतके दिवस का होता ना ! जन्मापासून स्मशानात जाईपर्यंत हा मुलगा नाही असं कसं म्हणता तुम्ही ?' असे त्या स्त्रीने विचारले, ऋषभयोगी तिला म्हणाले, 'किडा हा आपल्या शरीरावरच कंटक देह निर्माण करतो. आयुष्य असेपर्यंत त्या देहामध्ये चेष्टा करतो. देह म्हणजे जीव नाही. तो किटक जसा आपल्या शरीरावर धाम्ना निर्माण करतो तसा जीव हा आपल्या कर्मामुळे, कालकर्मगुणांपासून उत्पन्न झालेला देह पुत्रादि संबंधांना योग्य नाही. किंवा पुरुष, स्त्री या संज्ञेलाही पात्र नाही. तो अचेतन आहे. त्यातला आत्म्याचा अंश तर कायम आहे. त्याला जन्म मरण नाही. हा तर जाणारच आहे. मग कोणाबद्दल शोक करायचा ? म्हणून हा प्रारब्धयोग समजून आयुष्य असेपर्यंत परमेश्वराचे भजन कर.'

असा उपदेश करुन ते थांबले. अत्यंत अनावर दु:खी झालेली ती स्त्री म्हणाली, 'आपण दयाळु आहात, आपण मला अध्यात्मक तत्व सांगितलेत पण अबोधाचाच परिचय मला आहे. अध्यात्म तत्त्वाचं ज्ञान कसं येणार ? अध्यात्म तत्त्वज्ञान माझ्या ठिकाणी राहाणं शक्य नाही. ज्यामुळे माझे मन प्रसन्न होईल असे आपण करा. माझ्या या दु:खदशेत ईश्वराच्या प्रेरणेने आपण आलेले आहात. तेव्हा मला सुख होईल असे आपण करा. तो बालक म्हणजे मागच्या जन्मात ऋषभयोगीचीच सेवा केलेला होता. साधू केवळ  नमस्कार केला तरीही फल देतात. तपामुळे ज्याची बुध्दी अत्यंत प्रदीप्त आहे. अशा त्या योग्याने त्यामुलावर भस्म मंत्रित करुन टाकल्यावर तो मुलगा उठून बसला. त्याला योग्याने एक तलवार दिले, शैव कवच १०,००० हत्तींचे बल दिले. हा भद्रायु अजिंक्य होईल आणि राजाला शासन करणारा होईल. तो मुलगा आणि ती माता दिव्य गात्र झाले.

राजा ब्राह्मणाला म्हणाला, तुम्ही मला सज्जनांचे महात्म्य सांगितले. असा साधू पुरुष कुठे आहे ? मी मुसलमान आहे मला हे कसं सांगायचं हे तुम्ही मनांत आणू नका, शुद्ध ब्राह्मणांचा मी दास आहे.

त्या ब्राह्मणाने सांगितले, 'भीमा अमरजा संगमावर साक्षात् ईश्वरस्वरुप एक साधू पुरुष आहेत. त्यांना शरण जा.'  हे ऐकून तो यवनराजा महाराजांच्या दर्शनासाठी आपल्या सैन्यासह गाणगापुरला येण्यासाठी निघाला. गाणगापुरात आल्यावर त्याने चौकशी केली, इथे कोण तपस्वी पुरुष आहेत असे मी ऐकले ते कुठे राहातात ते मला दाखवा.

म्लेंच्छ सैन्य पाहून गांवातले लोक घाबरुन गेले. कांही बोलले नाहीत. तो राजा म्हणाला, 'मी त्यांच्या दर्शनाला आलोय ते कुठे आहेत ते लवकर सांगा मला,' मग लोकांनी सांगितले की, महाराज संगमावर आहेत.' हे ऐकल्यावर तो म्लेंच्छ राजा पायीच संगमावर आला. महाराजांना त्याने पाहिले आणि महाराजांनी त्याला विचारले, अरे रजका कुठं राहातोस तूं? तुझं सर्व कुशल आहे ना! इतके दिवस कां आला नाहीस तूं? श्रीगुरुंचे हे शब्द ऐकताच त्याला त्याच्या पूर्व जन्मीचे स्मरण झाले. तो म्हणाला, 'आपण दिलेल्या राज्यामध्ये आसक्त झाल्यामुळे आपले चरण मी विसरलो. माझ्यासारख्या रजक आपल्या सत्य संकल्पामुळे कृपेमुळे मी सार्वभौम राजा झालो. माझ्या अपराधांची आपण क्षमा करा. हे श्रीपादा, कृष्णातीरावर राहाणारा मी रजकच आहे. मी आपला दास आहे. अत्यंत दीन होऊन महाराजांच्या पुढे सर्वांगाने नतमस्तक होऊन तो पुढे म्हणाला, माझ्या या स्फोटकांच्या व्यथेच्या निमित्ताने मी आपल्याकडे आलो. आत (माझ्या चित्तात) आपलं मला ज्ञान होतं पण आपल्या शब्दांमुळे ते एकदम प्रगट झालं.'

महाराज म्हणाले, 'कुठं आहे स्फोटक तो दाखिव मला.' इतके दिवस त्या स्फोटकाच्या व्यथेने तो पीडला असतानासुध्दा महाराजांनी विचारल्यावर स्फोटक दाखवायला जातो तो काय स्फोटक नाही काही नाही. तो म्हणाला, 'हा स्फोटक जणु काय तुमच्या दुतासारखाच तुमच्या पर्यंत मला आणून सोडण्यासाठी आला होता कि काय ? अन्यायाने वागणाऱ्या मला त्याने आपल्याकडे आणले आणि तो दुसरीकडे गेला. आपली वाक्य (आपले शब्द) जागृत असताना दुःख दोषांनी भरलेल्या असार संसारामध्ये मी मग्न झालेला आहे. आपण माझा उद्धार करा.' महाराजांनी विचारले, 'तुझे मन हे भोग भोगून तृप्त झाले की नाही ? उत्तम प्रकारे राज्याचा भोग घेतलास ना ? मुलं बाळ झाली ना तुला ? आता आणखी काय अपेक्षा आहे तुझी ?

त्या रजकाने सांगतिल, 'आपल्या कृपेने माझ्या सर्व इच्छा परिपूर्ण झाल्या. आपणच दिलेली ही श्री आपल्यालाच अर्पण करायची इच्छा आहे.' 'ज्या तुमच्या राज्यात गोहत्या होते तिथे आमचे गमन कसे होईल ? ब्राह्मणादिक सर्व वर्ण मला हसतील आणि तुला म्लेंच्छ हंसतील', असे महाराज त्याला म्हणाले.

पण तो पक्का होता. तो म्हणाला, 'मी रजक आहे आणि आपण माझे स्वामी श्रीपाद आहात. माझ्या नगरात यापुढे हिंसा होणार नाही.' महाराज म्हणाले, 'मी भक्ताधीन

असल्यामुळे येतो तुझे राज्य वैभव पहायला. केवळ म्लेंच्छ आहे म्हणून माझे जे भक्त आहेत त्यांची उपेक्षा करणे योग्य नाही.' महाराजांचे बोलणे ऐकून प्रसन्न झालेल्या राजाने पालखीमध्ये उत्तम आसन करुन महाराजांना बसवले, त्यांच्या इतर शिष्यांनाही पालखीची व्यवस्था केली. आणि महाराजांच्या पादुका हातात घेऊन तो राजा आपल्या नगराच्या दिशेने चालू लागला. महाराज त्याला म्हणाला, राजा इथून तुझे नगर फार लांब आहे. आपल्याला खूप दूर जायचे आहे. तुझ्या सारख्या सार्वभौम राजाने असे पायी चालणे बरे नाही.' राजा म्हणाला, 'कोण मला सार्वभौम म्हणतंय ? ही लोक लज्जा सगळी गेली पाहिजे. मी राजा आहे. आपणही जवळच्या पालखीत बसायचे आणि बोलत बोलत जायचे असे नाही. मी आपला अनचर आहे. भूमीचा भार आपणच मला दिलेला आहे. आपल्या आज्ञेप्रमाणेच मी सेवा करतोय.

महाराज म्हणाले, 'तुला दिकपालांच्या अंशाने राजत्व दिलेले आहे. म्हणजे तूं साक्षात् विष्णुसारखा आहेस. तेव्हा माझ्या आज्ञेने पायी न येता घोड्यावर बसून ये. तुमच्या अशा चालण्याने आमचा क्रियालोप होईल. मी पुढे जातो. पापनाश तीर्थावर थांबतो तिथे तू हळू हळू ये. असे म्हणून अर्ध्या क्षणात ४० कोसावरच्या पापनाशतीर्थावर महाराज गेले. आपल्या शिष्यांसमवेत सायंकालचे नित्यकर्म तिथे केले. एवढ्या सायंदेवाचं पुत्र नागनाथ त्यांनी महाराज पाहिले. चकोराला जसा चंद्र पाहून आनंद होतो तसा नागनाथांना महाराजांना पाहून अतिशय आनंद झाला. महाराजांचे आन्हिक आटोपल्यावर त्याने महाराजांना आपल्या घरी नेले आणि त्यांना भिक्षा दिली सर्व शिष्यांसह. महाराज नागनाथाला म्हणाला, 'तो म्लेंच्छ राजा आता इथे येईल.' तेव्हा इथे न राहाता आम्ही तीर्थावर जातो. तो म्लेंच्छ राजा गावात आला म्हणजे त्याचा उपद्रव होईल. आणि त्या प्रमाणे तो राजा तिथे येण्यापूर्वी महाराज आपल्या शिष्यासह पापनाशतीर्थावर आले. तो पर्यंत तो राजाही तिथे येऊन पोहोचला. तिथून त्याने महाराजांना आपल्या नगरांमध्ये नेले. सर्व नगर ध्वज, पताका, रत्नांकित तोरणांनी सुशोभित केले. पालखी नगराच्या वेशीवर आल्यावर त्याने महाराजांना ओवाळले. मोठ्या सन्मानाने त्याने महाराजांना आपल्या राजवाड्यात नेले. त्यांच्यासाठी गालीच्याच्या पायघड्या घातल्या होत्या. सिंहासनावर बसवून त्यांची पाद्यपूजा केली. महाराजांच्या बरोबर आलेल्या शिष्यांचीही पूजा केली. आपल्या सर्व कुटुंबीयांना महाराजांचे दर्शन घडवले. गीत, वाद्य, छत्र, चामर, नृत्य असे सर्व त्यांना अर्पण केले. आपला सगळा परिवार त्यांना दाखवला.

त्याच्या म्लेंच्छ जातीच्या लोकांनी त्याचा हयाप्रमाणे पूजा अर्चा केल्याबद्दल धिक्कार केला. द्विजांनी मात्र राजाला आशीर्वाद दिले.

राजाने त्या म्लेंच्छांच्या टीकेकडे काही लक्ष दिले नाही. महाराज म्हणाले, 'तुझा सगळा परिवार पाहून मला आनंद झाला. या सर्व परिवारासह तु संतुष्ट झालास की नाही ?' तो राजा म्हणाला, 'या वैभवामुळे मला अजिबात समाधान नाही. माझे सर्व वैभव मी आपल्या चरणावर अर्पण केले आहे.'

महाराज म्हणाले, 'सर्वस्व दिल्याशिवाय कसं मिळेल ?' राजाने आत्मनिवेदन करुन सर्व राज्य महाराजांना देऊन टाकलं. संकल्पपूर्वक आत्मा आणि सर्वस्व देऊन टाकले. म्हणजे मिळालेले स्थान टिकलं पाहिजे ही इच्छा नाही. देऊन टाकायचं. नाही तर अशक्य काय होतं ? महाराजांच्या कृपेनेच सगळं मिळालं होतं. त्यामुळे बाकीचे म्लेंच्छ काही बोलू शकत नव्हते. राजाला काय बोलू शकतात ते ! इतके दिवसांची स्फोटकाची व्यथा एका क्षणात गेली हे धडधडीत दिसतयं. महाराजांच्या कृपेचा असा अनुभव आहे. म्हणून बाकीचे तरी काय बोलणार ? नुसता स्फोटक गेला असं नाही तर त्याला पूर्वजन्माची स्मृती दिली. म्हणजे पूर्वजन्मापासून त्याचा आणि महाराजांचा संबंध आहे हे आता कोणाला खरं वाटो अगर न वाटो. नास्तिक लोकांना वाटणार नाही. पण त्याचा अनुभव आहे ना तो !

महाराज म्हणाले, 'तू आत्मनिवेदन केलस हे फार चांगल केलस. तुझ्या इच्छेप्रमाणे तुला काय हवे ते देतो. तुझी माझ्या ठिकाणी भक्ती आहे.' हं ! काय केलं महाराजांनी त्या राजाच्या तरुण पुत्राला बोलावून राज्याची सर्व जबाबदारी सोपिवली आणि राजाला म्हणाले, 'तूंही आता इथून लगेच बाहेर पड. मी सुध्दा इथून लवकर मठामध्ये जाऊन इतर सर्व भक्तांचे समाधान करुन श्रीपर्वतावर जाणार आहे. तूंही तिथे ये. तिथे तुला माझे दर्शन होऊन तूं जीवनमुक्त होशील.' सगळी वासना संपलेली आहे ना ! काही शिल्लक राहिलेली नाही. असे सांगून महाराजांनी संगमावर आलेल्या शिष्यांसह स्नान इ. आटोपले. राजाने (गाणगापुरातल्या) व सर्व शिष्यांनी महाराजांची निरांजन वगैरे ओवाळून आरती केली. ब्राह्मण भोजन झाले. सर्वत्र भक्तीचा प्रसाद झाला. म्लेंच्छही भजन करायला लागले. आता इथे सगुणरुपाने राहाणे बंर नाही असा महाराजांनी विचार केला.

म्लेंच्छ राजाला सांगितल्याप्रमाणे महाराज श्रीशैल्य पर्वतावर गेले. म्लेंच्छ राजाने आत्मा आणि देह देऊन टाकला होता म्हणून महाराजांनी त्याच्या मुलाची नेमणुक करुन टाकली. म्लेंच्छ राजा महाराजांनी बोलावल्याप्रमाणे श्रीशैल्यावर त्यांना भेटला. त्याला सद्‌गती देऊन मला मठात आले. भजकांची कामधेघू असे भगवान त्या ठिकाणी प्रत्यक्ष राहिले. अनार्यांना मात्र ते अगोचर राहिले.

कृष्ण पंचगंगा संगमावर महाराज वाडीत स्नान करतात. या ठिकाणी (गाणगापुरात) भीमा अमरजा संगमावर सकाळचे आन्हिक वगैरे आटोपून गांवातल्या मठात भिक्षा घेऊन तिथे राहातात. त्यांनी पुष्कळ लीला दखिवल्या. अजूनही दाखिवताहेत. पुढेही दाखविणार आहेत. समजायला कठीण असा त्यांचा प्रभाव कोण जाणू शकणार आहे. ज्याची जशी इच्छा असेल ती महाराजांच्या भजनाने पूर्ण होते. भजकाचे अनुसरण करणारा भगवान् आहे तो! भगवंताच्या दुसऱ्या कला कलियुगात जागृत आहेत कि नाहीत कोणास ठाऊक ! साक्षात् भगवान् इथे आहेत. त्यांचे श्रध्देने संशय मनांत न आणता भजन कर.

नामधारकाला दर्शन झालेले नाही पण तो श्रवणाने मुक्त झालेला आहे. सिद्धांनी सांगितल्याप्रमाणे संशयरहित भावनेने त्याने गुरुंची पूजा केली. हा संवादरुप ग्रंथ, धर्मयुक्त असा गंगाधरात्मज आहे, त्याने हा श्रीगुरु चरित्र ग्रंथ रचला. हा ग्रंथ कुठेही स्थापन केला असता प्रेत, भूत, राक्षसादि असत् ग्रह जे आहेत. त्यांची पीडा दूर करणारा आहे. या ग्रंथाचा सप्ताह करणाऱ्याची तसेच ऐकाऱ्याचीही दत्तात्रेय सर्व इच्छा पूर्ण करतात. दत्तात्रेय हे आत्रेय गोत्रामध्ये उत्पन्न झालेले गणेश पुत्र जे आहेत त्याची वाणी पवित्र करणारे या ग्रंथामध्ये तोच ग्रंथाला सद्‌गुरु तारक उत्कर्षाने आहे.

'ओम नमो भगवन् विश्वहेतो'

याचेही पुष्कळ अर्थ केलेले आहेत. 'विश्वहेतो: ब्रह्म' ब्रह्मदेवांनीसुध्दा ज्यांची स्तुती केली आहे, मायेने लीन झालेले, विश्वाचे पोषण करणारे लीलेने विहार करणारे श्रेष्ठ लोक ज्यांची पूजा करतात अशा आपल्याला नमस्कार असो.

या शेवटच्या श्लोकातही वेगळे वेगळे अर्थ केलेले आहेत. पहिल्या श्लोकाचेही बरेच अर्थ केलेले आहेत. अंते मंगलम् ओम नम: म्हणजे ओंकार घेऊन सांगताहेत ते. ओम् हे भगवंताचे प्रतीक आहे.

पुरेना ? संपलं ! आता थोडी टीका राहिली आहे.

गणेश ब्रह्म, गणेश ब्राह्मणाच्या पुत्राची 'गा' म्हणजे वाणी त्याला पवित्र करणारी म्हणजे त्यानेच आपल्या वाणीने हे करवून घेतले आहे. तेव्हा ह्याही ग्रंथाचा तोच ग्रंथात्मा आहे. गुरुचरित्ररुपी असणारा दत्तात्रेय असणारा ग्रंथात्मा हाच तारक आहे.

..... तं चिदानंद सदगुरुम्

संपूर्णम्।।

।। अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।।